**MAHIS 2.2 M**

# एम. ए. इतिहास

## सत्र - II

## (राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार सुधारित अभ्यासक्रम)

# आंबेडकरवादी परिप्रेक्ष्य

© UNIVERSITY OF MUMBAI


**प्राध्यापक रविंद्र द. कुलकर्णी**
कुलगुरू,
मुंबई विद्यापीठ, मुंबई

**प्राचार्य डॉ. अजय भामरे**
प्र-कुलगुरु,
मुंबई विद्यापीठ, मुंबई

**प्राध्यापक शिवाजी सरगर**
संचालक,
दूरस्थ आणि ऑनलाईन शिक्षण केंद्र,
मुंबई विद्यापीठ, मुंबई



**प्रकल्प व अभ्यास समन्वयक** : **प्रा. अनिल आर. बनकर**
सहयोगी प्राध्यापक, इतिहास विभाग व
प्रमुख, मानव्यविद्याशाखा,
दूरस्थ आणि ऑनलाईन शिक्षण केंद्र,
मुंबई विद्यापीठ, मुंबई.

**संपादक** : **प्रा. शिवदास चांगदेव घाडगे**

**लेखक** : **डॉ. कृष्णा गायकवाड**
सहयोगी प्राध्यापक, इतिहास विभाग,
एल.जे.एन.जे. महाविद्यालय, विले पार्ले, मुंबई

: **प्रा. तुळशिदास पांडुरंग मोकल**
इतिहास विभाग प्रमुख,
को. ए. सो. डॉ. सी. डी. देशमुख वाणिज्य व
सौ. के. जी. ताम्हणे कला महाविद्यालय, रोहा,
रायगड.

: **डॉ. सिद्धार्थ आर. दवणे**
सहाय्यक प्राध्यापक, इतिहास विभाग,
अमिटी इन्स्टिट्यूट समाजशास्त्र,
अमिटी विद्यापीठ, ग्वालियर, मध्य प्रदेश

: **डॉ. मनोज इंगोले**
सहाय्यक प्राध्यापक, इतिहास विभाग,
कवयित्री बहिणावाई चौधरी उत्तर महाराष्ट्र
विद्यापीठ, जळगाव



**जुन २०२५, मुद्रण - १,**

**प्रकाशक** : संचालक, दूरस्थ आणि ऑनलाईन शिक्षण केंद्र,
मुंबई विद्यापीठ, विद्यानगरी, मुंबई -४०० ०९८.

**अक्षर जुळणी व मुद्रण :** मुंबई विद्यापीठ मुद्रणालय,
विद्यानगरी, सांताक्रुझ (पूर्व), मुंबई - ४०० ०९८

**Programme Name: M.A. Sem- II** **Core course: 51211 Perspectives of Ambedkarism**

**Total Credits: 04** **Total Marks: 100**

**Semester End Assessment: 50** **Internal Continuous Assessment: 50**

**Course Outcome:**

a) To understand the conditions of Depressed Classes in India and develop awareness about constitutional safeguards and Reservation policy.
b) To analyze Dr B.R. Ambedkar's views and Ideas on Socio-Religious and Educational Issues.
c) To create awareness about Constitutional safeguards among the students.

**MODULE I: (2 Credits)**

**Unit 1: Political and Economic Perspective of Ambedkarism**

a) Concept of Democracy of Dr. Babasaheb Ambedkar
b) Broken men theory, Reservation Policy, Labour Policy
c) Aims, Objectives and Achievements: Independent Labour Party, All India Scheduled Caste Federation and Concept of Republican Party of India.

**Unit 2: Socio-Religious and Educational Perspective of Ambedkarism**

a) Civil Rights Movement: Mahad Chavdar Tank Satyagraha, Kalaram Temple EntryMovement
b) Perspective on conversion to Buddhism
c) Bahishkrit Hitkarni Sabha, The Peoples Education Society

**MODULE 2: (2 Credits)**

**Unit 3: Perspective on Human Rights of Dr. Babasaheb Ambedkar**

a) His writings and Speechs on Human right issues.
b) Hindu Code Bill and Women Empowerment
c) States and Minorities: Future Model of Indian Constitution

**Unit 4: Legal and Constitutional Perpectives**

a) Indian Constitution: Preamble, Fundamental Rights, Directive Principles of State Policy

b) Constitutional Safeguards for Scheduled Castes, Scheduled Tribes, and Other Backward Castes.

c) Constitutional Safeguards for Women, Labour, and Minorities

**References:**


Abraham, P., Ambedkar’s *Contribution for Economic Planning and Development-Its Relevance*, Kanishka Publishers, New Delhi, 2002.

Aglave, Pradeep, *Dr. Ambedkar on Nation and Nationalism*, Dr. Ambedkar Chair, Nagpur, First Edition, 2014.

Ahir, D.C., *Dr. Ambedkar‘s Vision of DhammaAn Assessment*, B.R. Publishing Corporation, Delhi, 1997.

Ambedkar, B.R., *Annihilation of Caste With Reply to Mahatma Gandhi*, Dr. Babasaheb Ambedkar Source Material Publication Committee Higher Education Department, Government of Maharashtra, Mumbai, 2013.

Ambedkar, B.R., *Dr. Babasaheb Ambedkar Writings and Speeches Vol.1-21*, Education Department, Government of Maharashtra, Mumbai, First Edition, 1992.

Biswas, Oneil, *A Phenomenon named Ambedkar*, Blumoon Book, New Delhi, First Edition, 1998.

Dongre, M.K.,*Dimensions of Ambedkarism*, Vinay Publications, Nagpur, 2005.

Kumar, Kesava P., *Political Philosophy of Ambedkar An Inquiry into the Theoretical Foundations of the Dalit Movement*, Kalpaz Publication, Delhi, 2014.

Kumar, Raj, *Economic Thought of B.R. Ambedkar*, Commonwealth Publishers, New Delhi, 2011.

Mane, Suresh, *Dynamism And Relevance of Ambedkarism*, Paras Professional Publication, Mumbai, 2010.

Moon, Vasant, *Dr. Babasaheb Ambedkar Writings And Speeches Vol. 1*, Dr. Babasaheb Ambedkar, Source Material Publication Committee Education Department Government of Maharashtra, Mumbai, Third Edition, 2016.

Moon, Vasant, *Dr. Babasaheb Ambedkar Writings and Speeches Vol. 14 Part Two (Section IV)*, Education Department, Government of Maharashtra, Mumbai, 1995.

Moon, Vasant, *Dr. Babasaheb Ambedkar Writings and Speeches Vol. 15 (Sections I to VIII)*, Education Department, Government of Maharashtra, Mumbai, First Edition, 1997.

Moon, Vasant, *Dr. Babasaheb Ambedkar Writings and Speeches Vol. 3*, Dr. Babasaheb Ambedkar, Mahatma Phule, RajarshiShahu Source Material Publication Committee, Government of Maharashtra, Mumbai, Second Edition, 2008.

Narake, Hari, Dr. Kasare M.L., *Dr. B.R. Ambedkar and His Egalitarian Revolution Part One Struggle Human Rights*, Dr. Babasaheb Ambedkar Source Material Publication Committee Higher Education Department Government of Maharashtra, Mumbai, First Edition, 2003.

Rodrigues, Valerian, *The Essential Writings of B.R. Ambedkar*, Oxford University Press, New York, 2002.

Tomar J.P.S., *Dr. Ambedkar‘sThought on Education*, A.P.H Publishing Corporation, New Delhi,
2010.

Wagh, Sandesh M., *Dr. B.R. Ambedkar*, Sugawa Prakashan, Pune, 2011.

Wagh, Sandesh M., *Dr. Babasaheb Ambedkar: Architect of the Labour Policy of India*, Sandesh
Publications, Mumbai, 2016.

Wagh, Sandesh M., *Dr. Babasaheb Ambedkar‘s Conversion to Buddhism*, Sandesh Publications,
Mumbai, 2012.

Wagh, Sandesh M., *Dr. Babasaheb Ambedkar‘s Social Movement*, Sandesh Publication, Mumbai, 2012.

Wagh Sandesh M., *Socio-Political Conditions in the Nineteenth Century India*, Sandesh Publications,
Mumbai, 2012.

Wagh Sandesh M., *Dr. Babasaheb Ambedkar‘s Political Movement*, Sandesh Publication, Mumbai, 2012.

## अनुक्रमणिका


| क्रमांक | अध्याय | पृष्ठ क्रमांक |
| --- | --- | --- |
| १. | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची लोकशाहीची संकल्पना | ०१ |
| २. | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा ब्रोकन मॅन सिद्धांत | २२ |
| ३. | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे राजकीय पक्ष | ४५ |
| ४. | नागरी हक्क चळवळ : महाड चवदार तळे सत्याग्रह आणि काळाराम मंदीर प्रवेश चळवळ | ६७ |
| ५. | बौद्ध धर्मांतराचा दृष्टिकोन | ८५ |
| ६. | बहिष्कृत हितकारीणी सभा आणि पीपल्स् एज्युकेशन सोसायटी | १०० |
| ७. | मानवी हक्कांच्या मुद्दयांवर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे लेखन आणि भाषणे | १३१ |
| ८. | हिंदू कोड बिल आणि महिला सक्षमीकरण | १४६ |
| ९. | राज्य आणि अल्पसंख्यांक : भारतीय संविधानाचे भविष्यातील रुपरेषा | १६९ |
| १०. | भारतीय राज्यघटना, प्रस्तावना, मूलभूत अधिकार, राज्य धोरणाची मार्गदर्शक तत्त्वे | १८४ |
| ११. | घटनात्मक दृष्टिकोनातून अनुसूचित जाती, जमाती व इतर मागासवर्गीय संरक्षण | १९९ |
| १२. | घटनात्मक दृष्टिकोनातून महिला, कामगार व अल्पसंख्यांक संरक्षण | २१० |

# १

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची लोकशाहीची संकल्पना

**घटक रचना :**

१.० उद्दिष्ट्ये

१.१ प्रस्तावना

१.२ डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जडणघडण

१.२.१ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची वैचारिक पार्श्वभूमी

१.२.२ घरातील लष्करी पेशा

१.२.३ रामजींची शिकवण व कबीर पंथ

१.२.४ डॉ.बाबसाहेब आंबेडकर यांच्यावरील पाश्चात्त्य प्रभाव

१.३ लोकशाही संकल्पनेचा उगम आणि विकास

१.३.१ लोकशाहीच्या विविध विचारवंतांनी सर्वमान्य केलेल्या व्याख्या पुढीलप्रमाणे

१.३.२ डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची लोकशाहीची व्याख्या

१.३.३ सामाजिक लोकशाही

१.३.४ आर्थिक लोकशाही

१.३.५ राजकीय लोकशाही

१.३.६ संसदीय लोकशाही

१.४ डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिप्रेत असणारी लोकशाही

१.५ लोकशाहीची वैशिष्ट्ये (Features of Democracy)

१.६ लोकशाही समोरील आव्हाने

१.७ लोकशाहीस सर्वात मोठा अडथळा म्हणजे जातीव्यवस्था

१.८ लोकशाही यशस्वी करण्यासाठी आवश्यक बाबी

१.९ सारांश

१.१० प्रश्न

१.११ संदर्भ

## १.० उद्दिष्ट्ये

१. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची लोकशाहीची बहुआयामी संकल्पना समजून घेणे.

२. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या लोकशाही विचारांच्या, विशेषतः स्वातंत्र्य, समानता आणि बंधुत्वाच्या मूल्यांच्या तात्विक भूमिका अभ्यासने.

३. लोकशाही समाज टिकवून ठेवण्यात आणि बहुसंख्याकवाद रोखण्यात संवैधानिक नैतिकतेच्या भूमिकेचे मूल्यांकन करणे.

४. लोकशाही आदर्शांच्या विरोधात असलेल्या जातीव्यवस्थेवरील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या टीका आणि तिच्या उच्चाटनासाठीच्या धोरणांचा अभ्यास करणे.

५. जातीभेद, आर्थिक असमानता आणि संवैधानिक मूल्यांना धोका यासारख्या समकालीन मुद्द्यांवर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची लोकशाही तत्त्वे काशी लागू आहेत ते समजून घेणे.

## १.१ प्रस्तावना

भारतीय संविधानाचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे केवळ कायदेपंडित नव्हते, तर ते एक द्रष्टे विचारवंत, समाजसुधारक, तत्त्वज्ञ, आणि लोकशाहीचे खरे अध्वर्यू होते. भारताच्या स्वातंत्र्यानंतरच्या नव्या राष्ट्रनिर्मितीच्या प्रक्रियेमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी लोकशाहीचा पाया घालण्याचे कार्य केवळ विधानमंडळाच्या चौकटीतच नाही, तर सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक परिवर्तनाच्या दृष्टीनेही केले. त्यांनी लोकशाही केवळ मतदानाचा अधिकार, बहुमताचे राज्य किंवा निवडणूक प्रक्रिया इतक्यापुरती मर्यादित न ठेवता, ती एक जीवनशैली मानली. त्यांच्या मते, "लोकशाही ही शासनाची पद्धती नसून ती जीवन जगण्याची एक पद्धती आहे", हा त्यांचा दृष्टिकोन भारतीय लोकशाहीचा आत्मा ठरतो.

डॉ. आंबेडकर यांची लोकशाहीची संकल्पना तीन मुख्य अंगांवर आधारित होती. राजकीय लोकशाही, सामाजिक लोकशाही आणि आर्थिक लोकशाही. त्यांच्या मते, जर या तिन्ही अंगांचा परस्परसंबंध साधला नाही, तर लोकशाही ही पोकळ, अन्यायकारक आणि अल्पसंख्याकांवर बहुसंख्याकांच्या अत्याचाराचे साधन बनू शकते. त्यांनी "फ्रेंच राज्यक्रांती"मधील स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या तत्त्वांना भारतीय लोकशाहीच्या मूलभूत तत्त्वांच्या स्वरूपात स्वीकारले. संविधानात यांचा अंतर्भाव करून त्यांनी या मूल्यांना केवळ नैतिक भूमिका न देता कायदेशीर अधिष्ठान दिले.

डॉ. आंबेडकर यांचा ठाम विश्वास होता की राजकीय लोकशाही टिकण्यासाठी समाजात समता, बंधुता आणि सामाजिक न्यायाचे मूल्य रुजवणे आवश्यक आहे. त्यांच्या मते, "राजकीय लोकशाहीची मूळ तत्त्वे केवळ संविधानात लिहिल्याने न टिकता ती समाजाच्या व्यवहारात उतरली पाहिजेत." म्हणूनच त्यांनी सामाजिक विषमतेविरुद्ध आणि अस्पृश्यतेसारख्या अमानवी प्रथांविरुद्ध आयुष्यभर संघर्ष केला. ते स्पष्टपणे सांगतात की,

"आम्ही जर राजकीय लोकशाही निर्माण केली आणि सामाजिक व आर्थिक लोकशाही विसरलो, तर ही लोकशाही लवकरच विसर्जित होईल."

त्यांनी 'Annihilation of Caste' या भाषणात अत्यंत तीव्रतेने सामाजिक विषमतेचा निषेध करताना सांगितले की, "एखादा समाज जर धर्माच्या नावावर, जातीच्या आधारावर विषमता टिकवून ठेवत असेल, तर त्या समाजात खरी लोकशाही नांदू शकत नाही." यावरून दिसून येते की, लोकशाही ही त्यांच्यासाठी केवळ राज्याची रचना नव्हती, तर मानवी संबंधांचा नवविचार होता, ज्यात माणूसपणाचे, समतेचे, सन्मानाचे आणि न्यायाचे स्थान सर्वाधिक महत्वाचे होते.

डॉ. आंबेडकर यांचा लोकशाहीचा दृष्टिकोन हा केवळ सैद्धांतिक नव्हता, तर तो अत्यंत व्यावहारिक होता. त्यांनी संविधानाच्या माध्यमातून मूलभूत हक्क, सार्वत्रिक मताधिकार, सामाजिक न्याय, आरक्षण, धर्मनिरपेक्षता आणि कायद्यापुढे सर्वांच्या समानतेचा विचार रुजवला. त्यांचा लोकशाहीवाद केवळ अधिकारांबाबत नव्हे, तर कर्तव्यांबाबतही सजग होता. लोकशाही ही केवळ शासनप्रणाली नसून, ती एक जीवनपद्धती, सामाजिक मूल्य आणि समानतेची भावना आहे. भारतासारख्या वैविध्यपूर्ण आणि सामाजिक विषमता असलेल्या देशात लोकशाहीची संकल्पना केवळ राजकीय पातळीवर मर्यादित न राहता सामाजिक आणि आर्थिक समानतेच्या पायावर उभी राहणे आवश्यक आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय संदर्भात लोकशाहीची एक व्यापक आणि समग्र संकल्पना मांडली. त्यांची लोकशाहीची व्याख्या केवळ निवडणुका आणि बहुमताचे शासन यापुरती मर्यादित नसून, ती सामाजिक न्याय, आर्थिक समता आणि वैयक्तिक स्वातंत्र्य यांच्याशी निगडित आहे.

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार म्हणून त्यांनी लोकशाही मूल्यांना घटनात्मक स्वरूप दिले आणि भारतातील सामाजिक-आर्थिक विषमता दूर करण्यासाठी लोकशाहीला साधन म्हणून पाहिले. या अभ्यास घटकात डॉ. आंबेडकर यांच्या लोकशाहीच्या संकल्पनेचा सखोल अभ्यास केला जाईल. त्यांच्या विचारांचा उगम, त्यांच्यावरील पश्चिमात्य प्रभाव, सामाजिक, आर्थिक आणि राजकीय लोकशाहीच्या संकल्पना, तसेच लोकशाहीतील अडथळे आणि त्यासाठी आवश्यक बाबी यांचा समावेश या अभ्यासात आहे. याचा उद्देश डॉ. आंबेडकर यांच्या लोकशाहीच्या दृष्टिकोनाचे विश्लेषण करून त्याचे भारतीय संदर्भातील महत्त्व अधोरेखित करणे आहे.

प्रस्तुत अभ्यास घटकामध्ये आपण लोकशाहीची माहिती घेणार असून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मांडलेला लोकशाहीविषयक दृष्टिकोन अभ्यासणार आहोत. सन १९२० च्या दशकानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सामाजिक, राजकीय, आर्थिक, शैक्षणिक क्षेत्रामध्ये योगदान देण्यास सुरुवात केली. भारत स्वतंत्र झाल्यानंतर भारतीय राज्यघटनेच्या निर्मितीमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे महत्त्वपूर्ण योगदान होते. म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार म्हटले जाते. भारतीय राज्यघटना ही लोकशाहीची आधारभूत शिला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय समाजव्यवस्थेत लोकशाही प्रणाली स्वीकारून लोकशाही व्यवस्था रुजविण्यात महत्त्वपूर्ण भूमिका घेतली. यातूनच बाबासाहेबांचे महत्त्व अधोरेखित होते. लोकशाही

व्यवस्था भारतीय राज्यघटनेत स्वीकारल्याने राजकीय व्यवस्थेला नैतिक अधिष्ठान प्राप्त झाले. स्वातंत्र्य, समता, बंधुता व सामाजिक न्याय या मूल्यांतून लोकशाही व्यवस्था बळकट करताना सामाजिक व राजकीय व्यवस्थेला नवा अध्याय प्राप्त करून दिला.

## १.२ डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जडणघडण

भिमराव आंबेडकर १९०७ साली मॅट्रिकची परीक्षा पास झाले. त्यानिमित्त त्यांचा सत्कार करण्यात आला. या समारंभात गुरुवर्य कृष्णाजी केळुसकर यांनी स्वतः लिहिलेले गौतम बुध्दाचे चरित्र भीमरावांना भेट दिले. हा प्रसंग त्यांच्या आयुष्यात महत्त्वाचा आहे. कारण बुध्दाचे तत्त्वज्ञान अखिल मानवजातीच्या उत्कर्षाचे व संवर्धनाचे तत्त्वज्ञान आहे, त्याचा प्रभाव भीमराव आंबेडकरांवर पडलेला दिसतो. १९१९ मध्ये राजर्षी शाहू महाराजांची व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची मुंबई मुक्कामी प्रथम भेट झाली. ह्या दोन्ही महापुरुषांना समाज पुनर्रचनेचा ध्यास होता. मार्च १९२० मध्ये झालेल्या अस्पृश्यांच्या माणगांव परिषदेत शाहू महाराज डॉ. आंबेडकरांना अस्पृश्यांचे उध्दारकर्ते म्हणतात, पण त्याचबरोबर ते सर्व हिंदुस्थानचे पुढारी होतील अशी आशा व्यक्त करतात. पुढे डॉ. आंबेडकर ब्राम्हणेत्तर, अस्पृश्य व स्त्रिया या भारतीय समाजाच्या घटकांच्या सर्वांगीण विकासाची रूपरेषा आखताना दिसतात. या दोघांमध्ये सामाजिक बदलाचे वैचारिक साम्य व कृती करण्याचे धाडस आपल्याला दिसून येते. १९२१ मध्ये शाहू महाराजांना लिहिलेल्या पत्राच्या अखेरीस डॉ. आंबेडकर म्हणतात, 'आम्हाला आपली फारच गरज आहे, कारण हिंदुस्थानात जी मोठी चळवळ सामाजिक लोकशाहीच्या दिशेने प्रगती करीत आहे, तिचे आपण आधारस्तंभ आहात' यावरून डॉ. आंबेडकरांची सामाजिक लोकशाहीबाबतची बौध्दिक धारणा पक्की होती हे स्पष्ट होते व तशा प्रकारचे कार्य करणाऱ्या व्यक्तीच्या कार्याकडे भारताच्या भावी राज्यव्यवस्थेची रचना म्हणून ते पाहताना दिसतात.

ब्रिटनमधील वास्तव्यात लंडन विद्यापीठाच्या विद्यार्थी संघापुढे १९२३ ला 'जबाबदार सरकारचे दायित्व' या विषयावर निबंध वाचला. तो इतका कडक आणि बोचक होता की, शैक्षणिक क्षेत्रात त्यांच्या या लिखाणाने खळबळ माजली. त्यांच्याविषयी भारतीय क्रांतिकारक म्हणून शंका घेण्यात आली. लंडन स्कूलमधील प्रो. हेरॉल्ड लास्की यांनी डॉ. आंबेडकरांच्या या निबंधाचे कौतुक करून तो क्रांतीकारी असल्याचे भाष्य केले. १९२४ मध्ये सामाजिक चळवळीच्या अनुषंगाने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बहिष्कृत हितकारिणी सभेची स्थापना केली. त्यावेळी बोलताना ते म्हणाले, मी मिळविलेल्या ज्ञानशक्तीच्या उपयोग सर्व अस्पृश्य समाजाच्या चळवळीसाठी करणार आहे. त्यासाठी आपण आखलेल्या अनेक योजना सफल झाल्या, तर अस्पृश्य व स्पृश्य समाजाचा फायदाच होईल. या सभेच्या माध्यमातून लोकांची मानवी हक्कांसाठी लढण्याची तयारी त्यांनी केली, मानवी हक्कांच्या उपभोगाबाबत संयुक्त राष्ट्रसंघाच्या कार्याच्या अगोदर डॉ. आंबेडकर विचार व कृती करताना दिसतात.

विषमतेने शोषल्या गेलेल्या अस्पृश्य समाजाला खेड्यापासून शहरापर्यंत सर्वांना एकत्रित करून त्यांना शोषणाविरुध्द बंड करायला उभे करण्यास त्यांनी सुरुवात केली. डॉ. आंबेडकरांना भारतीय समाजाच्या पुनर्रचनेसाठी हिंदू धर्म व्यवस्थेची अमानवी व विषमतावादी तत्त्वे बदलायची होती. यासाठी महाडच्या चवदार तळ्याचा सत्याग्रह करून,

मनुस्मृतीचे दहन केले. ज्याने हिंदूधर्माचे पुनरुज्जीवन करता येईल असे त्यांना वाटत होते. नाशिकच्या काळाराम मंदिर प्रवेशाचे आंदोलन करून, हिंदू धर्माचा घटक म्हणून अस्पृश्यांना सुध्दा हिंदूच्या मंदिरात जाण्याचा समान अधिकार आहे. हे प्रस्थापित करू इच्छित होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्वातंत्र्य, समता, बंधुता व न्याय तत्त्वप्रणालीच्या ध्येयाने संपूर्ण मानव मुक्तीची चळवळ उभारलेली दिसते. या चळवळीच्या कार्यासाठी मूकनायक, बहिष्कृत भारत, समता व जनता यासारखी पत्रके सुरू केली. ज्या पत्रकांनी भारतातील पारंपरिक विषमतावादी रचनेवर कोरडे ओढले, तर मानवतावादाची, लोकशाहीची बीजे रुजवण्याचे कार्य केले.

### १.२.१ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची वैचारिक पार्श्वभूमी:

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची जडण-घडण ज्या समाजव्यवस्थेत झाली, त्यातूनच त्यांच्या बौध्दिक विश्वाची निर्मिती झाली असे म्हणावे लागेल. कारण अस्तित्त्वात असलेल्या विषमतावादी समाज व्यवस्थेला मूळापर्यंत जाऊन, समताधिष्ठित समाजाच्या निर्मितीसाठी सर्व प्रकारची आंदोलने, लिखाण व प्रत्यक्ष संविधान निर्मितीच्या माध्यमातून कायद्याचे संहितीकरण डॉ. आंबेडकर करताना दिसतात.

### १.२.२ घरातील लष्करी पेशा:-

भारतात ईस्ट इंडिया कंपनीचा कारभार सुरू झाल्यापासून लष्करी पेशामध्ये सर्वांना संधी मिळू लागली. त्यामध्ये डॉ. आंबेडकरांच्या घरातील पूर्वजांनी पारंपरिक गावातील विषम समाजव्यवस्थेच्या बाहेर जाऊन लष्कराच्या नोकरीचा स्वीकार केला. ही बाब त्यांच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने महत्त्वाची होती. लष्करी कॅम्प मधील समानतेचे व्यवहार त्यांनी अनुभवले. पुढे ज्यावेळी पारंपरिक विषमतावादी समाजाचे अनुभव डॉ. आंबेडकरांना दिसू लागले. त्यांची तुलना होऊन त्या पारंपरिक व्यवस्थेत बदल झाला पाहिजे. ह्या सामाजिक परिवर्तनाच्या जागृतीचे उगमस्थान डॉ. आंबेडकरांना घरातील लष्करी पेशातून मिळाले.

### १.२.३ रामजींची शिकवण व कबीर पंथ :-

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे वडील रामजी मिलिटरीतील सुभेदार पदावरून सेवानिवृत्त झाले होते. ते दापोलीला वास्तव्यास असताना रामानंद पंथ व कबीर पंथ या दोन पंथातील वादविवादात सहभागी होत असत. पुढे रामजीनी कबीर पंथाची दीक्षा घेतली. या पंथाच्या रिवाजाप्रमाणे पंथाची बंदगी रामजी दिवसातून दोन वेळा करीत, त्यांच्या ह्या वर्तनाचा घरातील इतर लोकांवर कसा परिणाम झाला हे स्पष्ट करताना डॉ. आंबेडकर म्हणतात. 'आमचे कुटुंब गरीब असले तरी त्यातले वातावरण पुढारलेल्या सुशिक्षित कुटुंबाला शोभेल असे होते. आम्हा भावंडांमध्ये विद्येची अभिरूची उत्पन्न व्हावी व आमचे चारित्र्य सोज्वळ बनावे, यासाठी आमचे वडील रामजी सुभेदार हे अतिशय दक्ष होते.'

रामजींचे वडील मालोजीराव रामानंद पंथी होते, त्यामुळे रामजींनी तोच पंथ पुढे चालवावा असे वाटे. पण हो-ला-हो म्हणणारा रामानंद पंथ न स्वीकारता, स्व-कर्तृत्वाची शिकवण देणाऱ्या कबीर पंथाची त्यांनी दीक्षा घेतली होती. डॉ. आंबेडकरांच्या घरी स्वकर्तृत्वास पोषक असे वातावरण तयार झाले. लहान वयातील भिमराव महाभारत, पांडवप्रताप हे ग्रंथ आपल्याला वाचनास आवडत नाहीत, असे ते वडिलांना सांगत. त्याऐवजी कबीरांच्या

दोह्यातील माणुसकी, समता व कर्तृत्व भिमरावांना खूप आवडे, मोठेपणी सुध्दा ते कबीरांचे दोहे गुणगुणत, त्यामुळे रामजीनी जाणीवपूर्वक स्वीकारलेल्या कबीरपंथाचे महत्त्व डॉ. आंबेडकरांच्या जीवनातील समाज पुनर्रचनेसाठी केलेल्या संघर्षाला पोषक ठरते. डॉ. आंबेडकरावर भागवत धर्मीय संत परंपरेतील उदार विचारांचा प्रभाव होता. भक्ती संप्रदायाची त्यांच्या घरात परंपरा होती.

### १.२.४ डॉ. बाबसाहेब आंबेडकर यांच्यावरील पाश्चात्त्य प्रभाव :-

भिमराव रामजी आंबेडकरांनी उच्च शिक्षणासाठी अमेरिकेतील कोलंबिया विद्यापीठात प्रवेश घेतला. कोलंबिया विद्यापीठाच्या एम.ए. च्या पदवीसाठी त्यांनी 'प्राचीन भारताचा व्यापार' या विषयावर प्रबंध लिहिला, तर १९१६ मध्ये 'भारतातील जाती त्यांची घडण, उत्पत्ती आणि वाढ' या विषयावर मानववंशशास्त्राच्या परिसंवादात शोधनिबंध सादर केला. ज्यामध्ये भारतीय समाजरचनेच्या अत्यंत कठिण अशा जातव्यवस्थेचे विश्लेषण केले. त्याबरोबरच पीएच.डी. करीता 'भारतातील राष्ट्रीय नफ्याचा वाटा : एक ऐतिहासिक पृथ:करणात्मक परिशीलन' हा प्रबंध सादर केला. हा प्रबंध पुढे पुस्तक रूपाने प्रकाशित झाला. या पुस्तकाला प्रो. सेलिग्मन यांनी लिहिलेल्या प्रस्तावनेत ते म्हणतात, 'डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी हाताळलेला हा विषय जगातील विचारवंतांच्या दृष्टीने महत्त्वाचा होता. कारण ज्यामध्ये निर्माण झालेल्या संघराज्य व्यवस्थांपुढील तो प्रश्न होता. केंद्र व प्रांतिक सरकारांना कोणते कर आकारण्याचे अधिकार असतात. याबाबतचा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा अभ्यास इतका सखोल व सांगोपांग होता की, अन्य कोणी असा अभ्यास केल्याचे आपणास माहित नाही.'

भारताच्या शिक्षण क्षेत्रातील वर्णव्यवस्थेचे वर्चस्व, शाळांमधील विषमतावादी वातावरण, शिक्षकांचे जातीय पूर्वग्रहदूषित वर्तन, जातीवर आधारित विषय निवडण्याची सक्ती ह्याबाबी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतात असताना अनुभवल्या होत्या. तर अमेरिकेच्या वास्तव्यात कोलंबिया विद्यापीठातील प्रो. सेलिग्मन, प्रो. सीगर यांच्यासारखे प्राध्यापक भिमरावांच्याबरोबर समतेच्या भूमिकेतून शिकवीत व चर्चा करीत, अशी सर्वस्वी नवीन समाजाधिष्ठित शिक्षण व्यवस्था त्यांच्या अनुभवांस आली. त्याचा खूप व्यापक प्रभाव त्यांच्या बौध्दिक कार्यप्रणालीवर पडलेला दिसतो.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या 'भारतातील जाती त्यांची घडण, उत्पत्ती आणि वाढ' या प्रबंधातील निवडक भाग समाजशास्त्रातील मासिकाने 'वर्ल्डस् बेस्ट लिटरेचर ऑफ दि मंथ' मध्ये प्रसिध्द केला. ही डॉ. आंबेडकरांच्या बौध्दिक विश्वासाला मिळालेली जागतिक मान्यता होती. कोलंबिया विद्यापीठाच्या मानववंशशास्त्र विभागाच्यावतीने चालत आलेल्या 'सनातनी समाजरचना विरुध्द आधुनिक समाजरचना' यावरील वादविवादामुळे डॉ. आंबेडकरांना भारतीय समाजव्यवस्थेचे सखोल व सूक्ष्म आकलनास मदत झाली. त्यामुळे जातीवरील प्रबंधात पाश्चात्त्य विचारवंत सेनार्ट, नेसफील्ड व रिजले यांचे सिध्दांत व भारतातील मनूच्या भ्रमाची चिकित्सा करून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्वतःचे विश्लेषण मांडले.

अमेरिकेत शिक्षण घेत असताना डॉ. आंबेडकरांवर दोन घटनांचा विशेष परिणाम झाला. एक म्हणजे अमेरिकेतील राज्यघटनेतील १४व्या घटना दुरुस्तीने निग्रोचे स्वातंत्र्य जाहिर झाले

व दोन अमेरिकेतील निग्रोचे थोर सुधारक बुकर ही वॉशिंग्टन यांचा मृत्यू. या घटना सामाजिक पुनर्रचनेच्या दृष्टीने महत्त्वाच्या होत्या. तसेच बाँड रसेल या जागतिक कीर्तीच्या विचारवंतांच्या 'प्रिन्सिपल ऑफ सोशल रिकन्स्ट्रक्शन' या पुस्तकाचे परिक्षण डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १९१८ मध्ये 'जर्नल ऑफ द इंडियन इकॉनॉमिक सोसायटी' या मासिकात प्रकाशित झाले. रसेल यांच्या युध्दाचे तत्त्वज्ञान व मालमत्तेचे परिणाम या दोन बाबींवर त्यांनी आपले मत व्यक्त करताना, मि. रसेल यांचा काही ठिकाणी गैरसमज तयार झाला असे म्हटले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी रसेलच्या काही मतांचा पुरस्कार व काही मतांचे खंडन केले. रसेलच्या चुकीच्या संकल्पनांपासून वाचकांचे रक्षण करण्यासाठी प्रस्तुत परीक्षण केल्याचे डॉ. आंबेडकर म्हणतात. समाजाच्या पुनर्रचनेच्या बाबतच्या रसेल यांच्या मांडणीतील कमतरता नाहीसी करणे म्हणजे या विषयाची जागतिक पातळीवरील मांडणी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी करणे होय.

अमेरिकेतील कोलंबिया विद्यापीठ, ब्रिटन मधील 'लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स अॅन्ड पॉलिटिकल सायन्स' आणि 'द ग्रेज इन' या विकसित राष्ट्रातील नामवंत संस्थामध्ये डॉ. आंबेडकरांचे अध्ययन झाले. तसेच जर्मनीतील बॉन विद्यापीठात त्यांना पुढील शिक्षण घ्यावयाचे होते, पण घेता आले नाही. पण काही काळ तेथेही त्यांनी अभ्यास केला. या जागतिक पातळीवरील शैक्षणिक संस्थांचा डॉ. आंबेडकरांच्या बौध्दिक विकासात मोलाचा वाटा आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार पश्चिमात्य तत्त्वज्ञान आणि भारतीय सामाजिक वास्तव यांचे संश्लेषण आहे. त्यांच्या विचारांवर खालील पश्चिमात्य तत्त्वज्ञ आणि संकल्पनांचा प्रभाव दिसतो:

**जॉन ड्युई:** कोलंबिया युनिव्हर्सिटीमध्ये शिक्षण घेताना आंबेडकर यांच्यावर ड्युईच्या विचारांचा प्रभाव पडला. ड्युई यांनी लोकशाहीला सामाजिक शिक्षण आणि सहकार्याची प्रक्रिया मानली, जी आंबेडकर यांच्या सामाजिक लोकशाहीच्या संकल्पनेत दिसते.

**जॉन स्टुअर्ट मिल:** मिल यांच्या 'On Liberty' मधील व्यक्तिस्वातंत्र्य आणि सामाजिक प्रगतीच्या विचारांचा प्रभाव आंबेडकर यांच्या स्वातंत्र्य आणि समानतेच्या संकल्पनांवर दिसतो.

**रूसो:** सामाजिक करार आणि सामान्य इच्छेच्या (General Will) संकल्पनेने आंबेडकर यांना सामूहिक हितासाठी लोकशाहीच्या महत्त्वावर विचार करण्यास प्रवृत्त केले.

**बुद्धिन्तिक मार्क्सवाद:** आंबेडकर यांनी मार्क्सवादी आर्थिक समानतेचे तत्त्व स्वीकारले, परंतु त्यांनी वर्गसंघर्षाऐवजी सामाजिक सुधारणांवर भर दिला. या पश्चिमात्य प्रभावांना भारतीय सामाजिक वास्तवाशी जोडून आंबेडकर यांनी लोकशाहीची एक अनन्य संकल्पना मांडली.

## १.३ लोकशाही संकल्पनेचा उगम आणि विकास

लोकशाही ही संकल्पना प्राचीन ग्रीक संस्कृतीतून उदयास आली. ग्रीसमधील ॲथेन्स शहरात इ.स.पू. ५ व्या शतकात लोकशाहीचा प्रारंभ झाला, जिथे नागरिक थेट शासनात

सहभागी होत असत. याला ‘डायरेक्ट डेमॉक्रसी’ असे म्हणतात. तथापि, ही लोकशाही मर्यादित होती, कारण ती केवळ स्वतंत्र पुरुष नागरिकांपुरती मर्यादित होती आणि गुलाम, स्त्रिया आणि परदेशी यांना त्यात स्थान नव्हते. मध्ययुगात युरोपात सामंतशाही आणि धर्मसत्तेच्या प्रभावामुळे लोकशाहीचा विकास खुंटला. परंतु, १७व्या आणि १८व्या शतकातील प्रबोधनकाळाने (Enlightenment) लोकशाहीच्या आधुनिक स्वरूपाला चालना दिली. जॉन लॉक, रुसो, मॉन्टेस्क्यू यांसारख्या विचारवंतांनी स्वातंत्र्य, समानता आणि सामाजिक करार (Social Contract) यांच्या संकल्पना मांडल्या. अमेरिकन (१७७६) आणि फ्रेंच (१७८९) क्रांतींनी लोकशाहीला राजकीय पातळीवर स्थापित केले. १९व्या आणि २०व्या शतकात औद्योगिक क्रांती आणि कामगार चळवळींमुळे सामाजिक आणि आर्थिक लोकशाहीच्या संकल्पना उदयास आल्या.

भारतात लोकशाहीचा इतिहास प्राचीन काळातील बुद्ध काळ व गणराज्यांपासून (उदा., लिच्छवी, वज्जी) सुरू होतो. परंतु, ब्रिटिश राजवटीत आधुनिक लोकशाहीच्या संकल्पनेचा प्रसार झाला. स्वातंत्र्य चळवळीने लोकशाहीला राष्ट्रीय आंदोलनाचा पाया बनवला, आणि डॉ. आंबेडकर यांनी याला सामाजिक आणि आर्थिक आयाम दिला. या संदर्भात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची भाषणे, खंड २० पृ. क्रमांक ४४४ वर नमूद केल्याप्रमाणे बाबासाहेब लोकशाहीचा उगम आणि स्वरूप याविषयी विवेचन करतांना म्हणतात, पहिली गोष्ट अशी की, लोकशाहीचे स्वरुप सारखें बदलते राहि आहे. आपण ज्या लोकशाहीबद्दल बोलतो ती कांही सातत्याने एक स्वरु राहिलेली नाही ग्रीक लोकांची अॅथेनियन लोकशाही' (Athenian Democracy) च घ्या, ही अॅथेनियन लोकशाही आणि आजची आपली लोकशाहीची कल्पना यांत महअंतर आहे. अॅथेनियन लोकशाहीमध्ये पन्नास टक्के लोक हे गुलाम असत. खरोखरी स्वतंत्र जनता फक्त पन्नास टक्केच असायची बाकी पन्नास टक्के गुलाम असलेल्या जन विभागाला शासन संस्थेत कोणत्याहि प्रकारचे स्थान नव्हतें ही एकच बाब अॅथेनियन लोकशाही व आधुनिक लोकशाही यांतील फरक दाखवायला पुरेशी आहे. प्रथम दर्शनीच तिच्याकडे तुमचे लक्ष वेधावें असें मला वाटतें ती दूसरी गोष्ट ही की, कोणत्याही एका देशांत देखील लोकशाहीचे स्वरुप एकच राहिलेलें नाही. इंग्लंडचे उदाहरण घ्या. १६८८ सालांत झालेल्या क्रांतीच्या पूर्वीची त्या देशातील लोकशाही व त्यानंतरची तेथील लोकशाही यांचें स्वरुप एकच आहे असें कोणीहि म्हणू शकणार नाहीं. कोणी असेहि म्हणू शकणार कीं, १६८८ ते १८३२ या काळातील इंग्लंडमधील लोकशाही व १८३२ सालीं मंजूर करण्यात आलेला पहिला सुधारणा कायदा' (First Re-form Bill) अंमलांत आल्यानंतरची लोकशाही ही एकच आहे. लोकशाहीचें स्वरुप सारखें बदलत आलें आहे.

तिसरी गोष्ट अशी की, लोकशाहीचें नुसतें' स्वरुप'च (Form) बदलत आले आहे असें नाहीं तर, तिचें उद्दिष्ट (Purpose) देखील काल ओघाबरोबर बदलत आले आहे. पुन्हां पुरातन इंग्लिश लोकशाहीचेंच उदाहरण घ्या. त्यावेळी तेथील लोकशाहीचें उद्दिष्ट काय होतें? राजाच्या अबाधित सत्तेवर नियंत्रण घालणें, त्याला त्याच्या विशिष्ट हक्कांच्या (Prerogative rights) अंमलबजावणीपासून परावृत्त करणें हेंच तें उद्दिष्ट होय. त्यावेळचा इंग्लंडमधील 'राजा' ह्या थराला जाऊन म्हणत असें कीं," कायदे करण्याचा हक्क पार्लमेंटला असला तरी मी राजा म्हणून कायदे करूं शकतो व माझ्या कायद्यांना वरिष्ठ स्थान दिलें जाईल !" राजाच्या ह्या अशा प्रकारच्या झोटिंगशाहीमुळे (Autocracy) लोकशाही सत्यस्वरुपांत उतरू शकली नाहीं. आज लोकशाहीचें उद्दिष्ट कोणतें आहे?

आधुनिक लोकशाहीचें उद्दिष्ट है अनियंत्रित राजसत्तेवर नियंत्रण घालणें हें नसून लोककल्याण' साधणें हें आहे. अशी लोककल्याण साधणारी लोकशाही व्यवस्था निर्माणासाठी लोकशाही म्हणजे काय हे समजून घेणे गरजेचे आहे.

### १.३.१ लोकशाहीच्या विविध विचारवंतांनी सर्वमान्य केलेल्या व्याख्या पुढीलप्रमाणे:-

१. अब्राहम लिंकन, "लोकशाही म्हणजे लोकांसाठी, लोकांनी चालवलेले राज्य होय." ("लोकशाही हे लोकांचे, लोकांचे आणि लोकांसाठीचे सरकार आहे.")

२. प्रो. हेरॉल्ड लास्की "लोकशाही हे केवळ शासनाचे स्वरूप नाही, तर ते समाजाचे, राज्याचे तसेच आर्थिक व नैतिक व्यवस्थेचे एक स्वरूप आहे." ("Democracy is not a mere form of Government rather it is a form of society, state and Economic and moral order.")

३. महात्मा गांधी: "लोकशाही हा एक जीवनमार्ग आहे." ("Democracy is a way of Life.")

४. पंडित जवाहरलाल नेहरू: "लोकशाही म्हणजे केवळ मतदानाच्या हक्कांसंबंधीची राजकीय समता नव्हे तर राजकीय समतेबरोबर आर्थिक व सामाजिक समता प्रस्थापित करणे होय." ("Democracy does not merely mean a political equality for right to vote, it is to establish economic and social equality along with political equality.")

५. जॉन ड्युई: “लोकशाही ही केवळ शासनप्रणाली नसून, सामाजिक सहकार्य आणि समान संधींची प्रक्रिया आहे.

६. “मार्क्सवादी दृष्टिकोन: लोकशाही ही भांडवलशाही व्यवस्थेत उच्चवर्गीय हितांचे रक्षण करते, परंतु समाजवादी लोकशाहीत ती खऱ्या अर्थाने जनकेंद्रित असते.

या व्याख्या लोकशाहीला राजकीय, सामाजिक आणि आर्थिक दृष्टिकोनातून पाहतात. परंतु, डॉ. आंबेडकर यांनी भारतीय संदर्भात या व्याख्यांना नवीन आयाम दिला.

### १.३.२ डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची लोकशाहीची व्याख्या:

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर :** दि. २२ डिसेंबर, १९५२ रोजी 'पुणे डिस्ट्रिक्ट लॉ लायब्ररी तर्फे आयोजित केलेल्या भाषणात डॉ. बी. आर. आंबेडकर यांनी लोकशाहीची व्याख्या पुढीलप्रमाणे स्पष्ट केली आहे. डॉ. आंबेडकर "रक्तपाताशिवाय लोकांच्या आर्थिक आणि सामाजिक जीवनात क्रांतिकारी बदल घडवून आणणाऱ्या शासन व्यवस्थेच्या प्रकारास आणि पध्दतीस लोकशाही म्हणतात." डॉ. आंबेडकर यांनी लोकशाहीला केवळ शासनप्रणाली न मानता, ती एक सामाजिक जीवनपद्धती आणि नैतिक मूल्यांचा संच मानले. त्यांच्या मते, “लोकशाही ही केवळ बहुसंख्यांचे शासन नाही, तर ती समानता, स्वातंत्र्य आणि बंधुत्वावर आधारित सामाजिक व्यवस्था आहे.” त्यांनी लोकशाहीला भारतीय संदर्भात परिभाषित करताना सामाजिक आणि आर्थिक समानतेवर विशेष भर दिला. त्यांच्या दृष्टिकोनात खालील मुद्दे महत्त्वाचे आहेत.

याच भाषणात डॉ.आबासाहेब आंबेडकर यांची लेखन आणि भाषणे, खंड २० मध्ये याचा उल्लेख केला आहे. त्यात डॉ.बाबासाहेब आंबेडकर लोकशाहीची खरी व्याख्या सांगतांना म्हणतात, 'लोकशाही'ची व्याख्या तरी काय? पुढील चर्चा करण्यापूर्वी लोकशाही' या शब्दप्रयोगांत येणाऱ्या कल्पनेचें स्पष्ट स्वरुप आपण जाणून घेऊ या. तुम्हांला माहीत असेल की, 'लोकशाही' ची व्याख्या राज्यशास्त्रवेत्ते, लेखक, समाजशास्त्रज्ञ आणि इतर कित्येक लोकांनी आपापल्या परीने केलेली आहे. अशा व्याख्यांपैकी फक्त दोनच मी माझा मुद्दा स्पष्ट करण्यासाठी येथे देत आहे. वॉल्टर बेगहोट यानें इंग्लिश संविधानावर (English Constitution) एक सुप्रसिद्ध ग्रंथ लिहीला आहे. त्यांत लोकशाहीचें सुस्पष्ट चित्र रेखाटण्याचा प्रयत्न केला गेला आहे.

या ग्रंथात त्यानें लोकशाहीची व्याख्या, "चर्चेवर आधारलेली शासनसंस्था" (Government by discussion) अशी केली आहे. अब्राहम लिंकननें केलेली व्याख्या आता बघू या. दक्षिणेकडील राज्याशी झालेल्या युद्ध समाप्तीनंतर गॅटिसबर्ग येथें सुप्रसिद्ध भाषण केलें, त्यांत लोकशाहीची व्याख्या त्यानें" लोकांचें सरकार, लोकांनी नियुक्त केलेलें सरकार, आणि लोकांकरितां राबणारें सरकार " (" A Government of the people, by the people and for the people") अशी केली.

अशा आणखी कितीतरी व्याख्यांचा नामनिर्देशन करतां येईल. माझ्या पुरतें बोलायचे झाल्यास मी लोकशाहीची व्याख्या निराळ्या शब्दांनी करील. मला असें वाटतें कीं, तीच लोकशाहीची आज खरी व्याख्या होऊ शकेल. माझी व्याख्या अशी. " लोकांच्या आर्थिक आणि सामाजिक जीवनांत क्रांतिकारक बदल रक्ताविरहीत मार्गानीं घडवून आणणारी शासनपद्धति म्हणजे लोकशाही होय." ज्या शासनपद्धतिमुळे सत्तारुढ मंडळीला सामाजिक व आर्थिक क्षेत्रांत मूलभूत बदल करतां येतात आणि असें बदल ग्रहण करतांना जनता रक्तलांच्छित (हिंसात्मक) मार्गाचा अवलंब करीत नाही, तेथे लोकशाही नांदते आहे. असें मी म्हणेल कीं, हीच लोकशाहीची खरी कसोटी आहे. तीच उच्चतम कसोटी आहे. ज्यावेळी तुम्ही एकाद्या पदार्थांचे गुणग्रहण करता त्यावेळी सगळ्यांत कडक कसोटी त्याला लावणें जरूर आहे. तेव्हांच त्याची खरी परीक्षा होते. लोकशाहीची ही व्याख्याच मी निकष म्हणून इथे वापरणार आहे. लोकशाहीत प्रत्येक व्यक्तीला विचार, अभिव्यक्ती आणि धर्मस्वातंत्र्य मिळाले पाहिजे. लोकशाही केवळ नियम आणि कायद्यांवर नव्हे, तर सामाजिक नैतिकता आणि बंधुत्वावर टिकते. डॉ. आंबेडकर यांनी ‘States and Minorities’ आणि ‘What Congress and Gandhi Have Done to the Untouchables’ यासारख्या लेखांत लोकशाहीच्या या आयामांवर सविस्तर चर्चा केली आहे.

### १.३.३ सामाजिक लोकशाही:

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सामाजिक लोकशाहीला त्यांच्या विचारांचा गाभा मानला. त्यांच्या मते, सामाजिक लोकशाही म्हणजे समाजातील सर्व स्तरांतील व्यक्तींना समान संधी आणि प्रतिष्ठा मिळणे. भारतीय समाजातील जाती व्यवस्था, अस्पृश्यता आणि लैंगिक विषमता यांना ते लोकशाहीच्या मार्गातील अडथळे मानत होते. त्यांनी म्हटले आहे, “राजकीय लोकशाही टिकवायची असेल, तर सामाजिक लोकशाही हवी.” सामाजिक

लोकशाहीसाठी जातिनिर्मूलन आवश्यक आहे. जाती व्यवस्थेच्या उन्मूलनाशिवाय सामाजिक समानता शक्य नाही.

शिक्षण हा सामाजिक परिवर्तनाचा पाया आहे. एक सशक्त लोकशाहीसाठी शिक्षणाची अवश्यकता डॉ. आंबेडकर यांनी प्रतिपादन केली. त्याच बरोबर समाज परिवर्तनाच्या चळवळीद्वारे अस्पृश्यता आणि लैंगिक भेदभाव समाजातून हद्दपार झाला पाहिजे. यासाठी डॉ. आंबेडकर यांनी महाड सत्याग्रह आणि मंदिर प्रवेश आंदोलनांद्वार सामाजिक लोकशाहीची लढाई लढली.

### १.३.४ आर्थिक लोकशाही:

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा महत्त्वाचा भाग होता. त्यांच्या मते, आर्थिक विषमता लोकशाहीला कमकुवत करते. 'States and Minorities' मध्ये त्यांनी आर्थिक लोकशाहीसाठी खालील तत्त्वे मांडली. यासाठी उत्पादन साधनांचे राष्ट्रीयकरण ही संकल्पना मांडली. जमीन आणि उद्योगांचे राष्ट्रीयकरण करून आर्थिक सत्ता काही मूठभरांच्या हातात केंद्रित होऊ नये. समान वेतन आणि संधी मिळाली तरच प्रत्येकाला आर्थिक समृद्धीची संधी मिळेल. लोकशाही बळकट करण्यासाठी कल्याणकारी राज्य असावे, असे त्यांचे मत होते. राज्याने गरीब आणि वंचितांसाठी कल्याणकारी योजना राबवाव्यात. डॉ.आंबेडकर यांनी मार्क्सवाद आणि समाजवाद यांच्यापासून प्रेरणा घेतली, परंतु त्यांनी हिंसक क्रांतीला विरोध केला आणि घटनात्मक मार्गाने आर्थिक लोकशाही साध्य करण्यावर भर दिला. त्यांना राजकीय लोकशाहीच्या मुळाशी सामाजिक लोकशाही अपेक्षित होती. जर राजकीय लोकशाहीच्या मुळाशी सामाजिक आणि आर्थिक लोकशाही असल्याखेरीज ती टिकणार नाही.

यासंदर्भाने ते संविधान सभेत इशारा देतांना म्हणतात, संविधान सभेतील २५नोव्हेंबर १९४९रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केलेले भाषण आजही प्रासंगिक वाटते. एक सशक्त लोकशाहीसाठी समता हे तत्व किती आवश्यक आहे. या संदर्भात ते म्हणतात की, आज आपण एका विसंगतीत प्रवेश करणार आहोत. सामाजिक आणि आर्थिक जीवनात विसंगती राहणार आहे. ही विसंगती शक्य तितक्या लवकर आपण दूर नाही करू शकलो तर मोठ्या परिश्रमाने उभा केलेला हा लोकशाहीचा डोलारा विषमतेची झळ पोचणारा वर्ग उध्वस्त करून टाकेल. सामाजिक आणि आर्थिक जीवनातील विषमता ही सशक्त लोकशाही निर्माणासाठी मोठा अडथळा आहे असे ते इशारा देतात.

### १.३.५ राजकीय लोकशाही:

राजकीय लोकशाही ही डॉ. आंबेडकर यांच्या विचारांचा तिसरा महत्त्वाचा आयाम आहे. त्यांनी भारतीय राज्यघटनेत राजकीय लोकशाहीचे तत्त्वे समाविष्ट केली, ज्यामध्ये खालील बाबींचा समावेश आहे.

**प्रौढ मताधिकार: सर्व प्रौढांना मतदानाचा हक्क.**

**निवडणुका आणि प्रतिनिधित्व:** स्वतंत्र निवडणूक प्रक्रिया आणि सर्वसमावेशक प्रतिनिधित्व.

**कायद्याचे राज्य:** कायदा सर्वांना समान आहे.परंतु, त्यांनी चेतावणी दिली की राजकीय लोकशाही केवळ सामाजिक आणि आर्थिक लोकशाहीच्या आधारावर टिकू शकते. त्यांनी 'Graves of Democracy in India' या भाषणात म्हटले आहे की, "भारताने राजकीय लोकशाही स्वीकारली आहे, पण सामाजिक आणि आर्थिक लोकशाहीशिवाय ती अयशस्वी होईल."

**लोकशाही आणि घटनात्मक नैतिकता:** डॉ. आंबेडकर यांनी घटनात्मक नैतिकता (Constitutional Morality) ही संकल्पना मांडली. त्यांच्या मते, लोकशाही केवळ नियम आणि कायद्यांवर नव्हे, तर सामाजिक नैतिकता आणि संविधानावरील विश्वासावर टिकते. घटनात्मक नैतिकता म्हणजे:संविधानाच्या मूल्यांचा आदर: स्वातंत्र्य, समानता आणि बंधुत्व यांचा स्वीकार.

**संस्थांचे पावित्र्य:** न्यायपालिका, कार्यपालिका आणि व्यवस्थापन यांचे स्वातंत्र्य.

**सामाजिक सहिष्णुता:** विविधतेत एकता आणि परस्पर आदर. डॉ. आंबेडकर यांनी संविधानाच्या प्रस्तावनेत आणि मूलभूत हक्कांमध्ये या नैतिक मूल्यांचा समावेश केला.

**संसदीय लोकशाही:** डॉ. आंबेडकर यांनी भारतासाठी संसदीय लोकशाहीचा पुरस्कार केला. ज्यामध्ये लोकप्रतिनिधी हे लोकसभेचे आणि विधानसभेच्या निवडणुकाद्वारे जबाबदार सरकार तयार करतील. असे मंत्रिमंडळ संसदेला जबाबदार आहे.

**स्वतंत्र न्यायपालिका:** कायद्याचे राज्य सुनिश्चित करण्यासाठी स्वतंत्र न्यायपालिका.परंतु, त्यांनी संसदीय लोकशाहीच्या यशस्वीतेसाठी सामाजिक आणि आर्थिक सुधारणांवर भर दिला.

### १.३.६ संसदीय लोकशाही:

देशाचा राज्यकारभार करण्याच्या अनेक प्रणाल्यामधील लोकशाही ही एक सर्वोत्कृष्ठ शासन प्रणाली आहे. लो शाही शासन प्रकारात संसदीय लोकशाही आणि अध्यक्षीय लोकशाही असे दोन प्रकार आहेत. जसे की अमेरिकेत अध्यक्षीय लोकशाही आहे. तर इंग्लंडमध्ये संसदीय लोकशाही आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संसदीय लोकशाही तत्त्वाचा स्विकार केला आहे. त्यांची लोकशाही शासन व्यवस्थेची संकल्पना फार उदात्त होती. लोकशाही म्हणजे निव्वळ राजसत्तेचा प्रकार नाही. तर लोकशाही ही जीवन प्रणाली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना लोकशाहीतून रक्तहीन क्रांती हवी होती. म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानात अध्यक्षीय लोकशाही तत्त्वाचा स्विकार न करता संसदीय लोकशाही तत्त्वाचा स्विकार केला. अध्यक्षीय लोकशाही आणि संसदीय लोकशाहीत मूलभूत फरक आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जाणीवपूर्वक संसदीय लोकशाही तत्त्वाचा स्विकार केला. अध्यक्षीय शासन प्रकार हा चांगला शासन प्रकार असला तरी या शासन प्रकारात जबाबदारीच्या तत्त्वाचा अभाव आहे. अध्यक्षीय शासन व्यवस्थेत एकदा का राष्ट्रपतीची निवड झाली तर त्याला चार वर्षापर्यंत पदावरुन सहजासहजी कोणीही काढू शकत नाही. आणि तो कायदेमंडळाला जवाबदेही नाही. जवाबदेही त्याला म्हणतात की, अगर कुणी

आपल्याला प्रश्न विचारला तर त्याला उत्तर देणे आपल्यावर बंधनकारक असते. अध्यक्षीय लोकशाहीत जवाबदेही तत्त्वाची उणिव आहे. म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जवाबदेही आणि जबाबदारीच्या तत्त्वाचा अंतर्भाव असलेल्या लोकशाही तत्त्वाचा पुरस्कार केला आहे. एकूणच संसदीय लोकशाही ही भारतीय जनतेसाठी उपयुक्त असून ती भारतीयासाठी उत्तम शासन व्यवस्थेचा प्रकार आहे.

१. संसदीय लोकशाहीत लोकमत हा सरकार बनवण्याचा आधार असतो. सरकार बनवणे पाडणे ही कामे लोकमताच्या आधारे होतात.

२. नियमित वेळेत निवडणूका होतात त्या शक्य तितक्या निर्भय स्वच्छ वातावरणात घेतल्या जातात. तसेच लोकशाहीत मतदार स्वइच्छेने मतदान करु शकतो.

३. मतदारांचा सहभाग राजकीय जीवनात वाढतो त्यामुळे मतदार, उमेदवार, लोकप्रतिनिधी या सर्वाच्या गुणांचा विकास होतो. सर्वांना समान संधी मिळते. जबाबदारीची व बांधिलकीची जाणीव होते.

४. संसदीय लोकशाहीत रक्तपात न होता राज्यकर्ते बदलले जातात.

५. संसदेत प्रत्येक प्रश्नावर चर्चा होते. वाद-विवाद होऊन उघडपणे लोकांच्या, प्रसिध्दी माध्यमांच्या साक्षीने विधेयके मंजूर होतात वा फेटाळली जातात. आर्थिक बजेटावरही खुली चर्चा होते.

६. संसदीय लोकशाहीत विविध पक्ष निर्माण होतात. लोकमत घडवितात. विरोधी पक्ष सरकारच्या चुका लोकांसमोर मांडतो लोकांत राजकीय पक्षामुळे जाणीव जागृती निर्माण होते.

## १.४ डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिप्रेत असणारी लोकशाही

भारतीय संविधानाचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे केवळ कायदेपंडित नव्हते, तर ते एक द्रष्टे विचारवंत, समाजसुधारक, तत्त्वज्ञ, आणि लोकशाहीचे खरे अध्वर्यू होते. भारताच्या स्वातंत्र्यानंतरच्या नव्या राष्ट्रनिर्मितीच्या प्रक्रियेमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी लोकशाहीचा पाया घालण्याचे कार्य केवळ विधानमंडळाच्या चौकटीतच नाही, तर सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक परिवर्तनाच्या दृष्टीनेही केले. त्यांनी लोकशाही केवळ मतदानाचा अधिकार, बहुमताचे राज्य किंवा निवडणूक प्रक्रिया इतक्यापुरती मर्यादित न ठेवता, ती एक जीवनशैली मानली. त्यांच्या मते, "लोकशाही ही शासनाची पद्धती नसून ती जीवन जगण्याची एक पद्धती आहे", हा त्यांचा दृष्टिकोन भारतीय लोकशाहीचा आत्मा ठरतो.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची लोकशाहीची संकल्पना तीन मुख्य अंगांवर आधारित होती. राजकीय लोकशाही, सामाजिक लोकशाही आणि आर्थिक लोकशाही. त्यांच्या मते, जर या तिन्ही अंगांचा परस्परसंबंध साधला नाही, तर लोकशाही ही पोकळ, अन्यायकारक आणि अल्पसंख्याकांवर बहुसंख्याकांच्या अत्याचाराचे साधन बनू शकते. त्यांनी "फ्रेंच राज्यक्रांती"मधील स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या तत्त्वांना भारतीय लोकशाहीच्या

मूलभूत तत्त्वांच्या स्वरूपात स्वीकारले. संविधानात यांचा अंतर्भाव करून त्यांनी या मूल्यांना केवळ नैतिक भूमिका न देता कायदेशीर अधिष्ठान दिले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा ठाम विश्वास होता की राजकीय लोकशाही टिकण्यासाठी समाजात समता, बंधुता आणि सामाजिक न्यायाचे मूल्य रुजवणे आवश्यक आहे. त्यांच्या मते, "राजकीय लोकशाहीची मूळ तत्त्वे केवळ संविधानात लिहिल्याने न टिकता ती समाजाच्या व्यवहारात उतरली पाहिजेत." म्हणूनच त्यांनी सामाजिक विषमतेविरुद्ध आणि अस्पृश्यतेसारख्या अमानवी प्रथांविरुद्ध आयुष्यभर संघर्ष केला. ते स्पष्टपणे सांगतात की, "आम्ही जर राजकीय लोकशाही निर्माण केली आणि सामाजिक व आर्थिक लोकशाही विसरलो, तर ही लोकशाही लवकरच विसर्जित होईल."

त्यांनी 'Annihilation of Caste' या भाषणात अत्यंत तीव्रतेने सामाजिक विषमतेचा निषेध करताना सांगितले की, "एखादा समाज जर धर्माच्या नावावर, जातीच्या आधारावर विषमता टिकवून ठेवत असेल, तर त्या समाजात खरी लोकशाही नांदू शकत नाही." यावरून दिसून येते की, लोकशाही ही त्यांच्यासाठी केवळ राज्याची रचना नव्हती, तर मानवी संबंधांचा नवविचार होता, ज्यात माणूसपणाचे, समतेचे, सन्मानाचे आणि न्यायाचे स्थान सर्वाधिक महत्वाचे होते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा लोकशाहीचा दृष्टिकोन हा केवळ सैद्धांतिक नव्हता, तर तो अत्यंत व्यावहारिक होता. त्यांनी संविधानाच्या माध्यमातून मूलभूत हक्क, सार्वत्रिक मताधिकार, सामाजिक न्याय, आरक्षण, धर्मनिरपेक्षता आणि कायद्यापुढे सर्वांच्या समानतेचा विचार रुजवला. त्यांचा लोकशाहीवाद केवळ अधिकारांबाबत नव्हे, तर कर्तव्यांबाबतही सजग होता. त्यांनी वारंवार नागरिकांना बौद्धिक प्रगल्भता, नैतिक शिस्त आणि बंधुता यांचे पालन करण्याचे आवाहन केले.

त्यांच्या दृष्टिकोनातून पाहिल्यास, लोकशाही ही एक सतत विकसित होणारी, समाजातील प्रत्येक घटकाच्या सशक्तीकरणासाठी झटणारी आणि सामाजिक समरसतेचा पाठपुरावा करणारी प्रणाली आहे. आजच्या काळात, जिथे लोकशाही संस्था अडचणीत सापडताना दिसतात, तेव्हा डॉ. आंबेडकरांच्या लोकशाही विचारांची नव्याने मांडणी आणि चिरस्थायीत्वाचे मूल्य अधोरेखित करणे अत्यावश्यक झाले आहे. अशा प्रकारे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची लोकशाहीची संकल्पना ही भारतीय राज्यघटनेचा गाभा असून, ती फक्त राजकीय रूपरेषा नाही, तर ती एक सामाजिक क्रांतीची प्रक्रिया आहे. त्यांच्या लोकशाही संकल्पनेचा अभ्यास म्हणजे एक व्यापक समतावादी, समावेशी आणि मानवतावादी दृष्टीकोनाचा शोध आहे, जो आजही भारतीय समाजासाठी दिशादर्शक ठरतो. त्यामुळे डॉ. आंबेडकरांच्या लोकशाहीच्या संकल्पनेवर सखोल विचार करणे हे केवळ शैक्षणिक नव्हे, तर सामाजिक गरज देखील आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची लोकशाहीची संकल्पना ही स्वातंत्र्य, समता आणि बंधुभाव या त्रीसुत्रीवर आधारलेली आहे. या अनुषंगाने डॉ.बाबासाहेब म्हणतात, 'माझे जीवनविषयक तत्त्वज्ञान तीन शब्दातच समूर्त झालेले आहे. स्वातंत्र्य, समता आणि बंधुभाव फ्रेंच राज्यक्रांतिवरून माझे जीवनविषयक तत्त्वज्ञान मी उसने घेतले आहे असे मात्र कोणी समजू नये. तसे मी केलेले नाही असे मी निक्षून सांगतो. माझ्या तत्त्वज्ञानाचे मूळ राजकारणात

नसून धर्मात आहे. माझे गुरु भगवान बुद्ध यांच्या शिकवणीतूनच हे तत्त्वज्ञान मी स्वीकृत केलेले आहे." एकूणच त्यांचे तत्वज्ञान हे बुद्धाच्या. स्वातंत्र्य, समता आणि बंधुभाव आणि न्याय या तत्वावर आधारित आहे, असे दिसून येते. व्यक्ती स्वातंत्र्यामध्ये अभिव्यक्ती, व्यवसाय, धर्म, आचारपध्दती, संस्कृती यांचा समावेश असल्याने व्यक्तिविकासासाठी राज्याने व्यक्ती स्वातंत्र्याला प्रोत्साहन दिले पाहिजे.

## १.५ लोकशाहीची वैशिष्ट्ये (FEATURES OF DEMOCRACY)

डॉ. बाबसाहेब आंबेडकर यांना अभिप्रेत असलेल्या लोकशाहीची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे

१) लोकशाही व्यवस्थेमध्ये कायदा सर्वांना समान असल्याने जात, धर्म, वंश, भाषा, लिंग किंवा जन्मस्थान यावरून लोकशाहीत भेदभाव केला जात नाही.

२) आपल्या राष्ट्रातील लोकांप्रमाणे इतर राष्ट्रातील नागरिकांबाबत बंधुभावाची भावना जोपासणे आवश्यक आहे. मानवता हे सर्वोच्च मूल्य मानून इतरांबरोबर चांगले संबंध प्रस्थापित करणे व आपला प्रत्यक्ष विकास साधताना इतरांच्या विकासाला अडसर न बनणे आवश्यक आहे.

३) लोकशाहीमध्ये कायद्यापेक्षा कोणीही श्रेष्ठ असू शकत नाही. कोणीही व्यक्ती कितीही श्रेष्ठ असली तरी तिला कायद्यात सवलत मिळत नाही. समान परिस्थितीत कायदा सर्वांना समान असेल. म्हणून लोकशाहीत कायद्याचे राज्य (Rule of the Law) हे अत्यंत महत्त्वाचे तत्त्व आहे.

४) लोकशाहीत जनतेच्या हाती सर्व सत्ता असते. लोकशाहीत पक्षप्रणालीआधारे निवडणूका लढविल्या जातात. या निवडणुकीत जो राजकीय पक्ष येतो, त्याने बहुमत प्राप्त केलेले असते. बहुमत प्राप्त न करणारा विरोधी पक्ष म्हणून सत्ताधारी पक्षावर अंकुश ठेवण्याचे कार्य करतो. त्यामुळे लोकशाहीत जनतेचे सार्वभौमत्त्व महत्त्वाचे असते.

५) जनतेचे प्रश्न प्रभावीपणे सोडविण्यासाठी लोकशाहीत विकेंद्रीकरण तत्त्व आवश्यक ठरते. सत्तेच्या विकेंद्रीकरणामुळे अधिकाधिक लोकांना राज्यकारभारात सहभागी होता येते.

६) लोकशाहीत जनतेने निवडून दिलेले शासन राज्यकारभार करताना जनतेला जबाबदार असते. भारतात संसदीय लोकशाही मंत्रिमंडळ संसदेला जबाबदार असते.

७) लोकशाहीत शासन कायद्यानुसार चालते. सनदशीर व शांततेचा मार्ग हे लोकशाहीचे अंगभूत वैशिष्ट्य असते.

## १.६ लोकशाही समोरील आव्हाने

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय लोकशाहीची संकल्पना केवळ राजकीय स्वातंत्र्यापुरती मर्यादित ठेवली नाही, तर ती सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक समतेवर आधारलेली संपूर्ण जीवनपद्धती आहे, असे स्पष्ट केले. त्यांच्या मते, केवळ निवडणुका, सार्वत्रिक मताधिकार व संसदीय व्यवस्था यामुळे लोकशाही बळकट होत नाही, तर ती टिकते समतेच्या व्यवहाराने, न्यायाच्या अनुभूतीने आणि माणसामाणसांतील

बंधुभावाने. परंतु भारतीय समाजात रूजलेली वर्णव्यवस्था, जातीभेद, सामाजिक विषमता आणि आर्थिक अन्याय हे घटक लोकशाहीच्या मुळावरच घाव घालतात.

डॉ. आंबेडकर यांनी स्पष्टपणे सांगितले की, “आपण राजकीय लोकशाही स्वीकारली असली तरी सामाजिक आणि आर्थिक लोकशाहीच्या बाबतीत अजून मागे आहोत. जोवर ती प्रस्थापित होत नाही, तोवर खऱ्या अर्थाने लोकशाही कार्यरत होणार नाही.”

### १. सामाजिक विषमता

भारतीय समाजात हजारो वर्षांपासून चालत आलेल्या वर्णव्यवस्थेने जन्माधारित सामाजिक भेद निर्माण केला आहे. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शूद्र अशा वर्गीकरणातून उच्च-नीचतेची रचना तयार झाली. या व्यवस्थेत काहींना विशेषाधिकार मिळाले, तर काहींना शोषण, अपमान, वंचना आणि अस्पृश्यतेला सामोरे जावे लागले. आंबेडकर म्हणतात, “Equality may be a fiction but nonetheless one must accept it as a governing principle.” सामाजिक विषमता लोकशाहीतील बंधुता, समता आणि न्याय या मूल्यांचा अपमान करते. समाजातील मोठा वर्ग जर सामाजिकदृष्ट्या बहिष्कृत असेल, तर लोकशाहीसाठी आवश्यक असणारी एकात्मता निर्माण होत नाही. त्यामुळे सामाजिक विषमता ही लोकशाही टिकविण्यात एक मोठा अडथळा ठरते.

### २. आर्थिक विषमता:

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा ठाम विश्वास होता की राजकीय लोकशाही केवळ सशक्त आणि समृद्ध आर्थिक पाया असताना टिकू शकते. परंतु भारतात फार मोठ्या प्रमाणावर आर्थिक विषमता आहे. एका बाजूला अल्पसंख्याक वर्गाकडे अपार संपत्ती आहे, तर दुसरीकडे बहुसंख्य जनता दारिद्र्यरेषेखाली जीवन जगते.

ते म्हणतात, “A democratic form of government presupposes an egalitarian society. It cannot survive in a society with glaring inequalities.” बेरोजगारी, भूक, शिक्षण व आरोग्य सुविधा मिळवण्यास असमर्थ समाज हा लोकशाहीसाठी घातक ठरतो, कारण या वर्गासाठी मताधिकार हा केवळ एक प्रतीक राहतो, परिवर्तनाचे साधन ठरत नाही.

### ३. जातीय विषमता

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय समाजातील जातीय व्यवस्था ही लोकशाहीच्या सर्वात मोठ्या शत्रूंपैकी एक मानली आहे. जातीव्यवस्था ही व्यक्तीच्या जन्मावर आधारित असून, ती माणसामाणसांतील मूलभूत समानतेच्या तत्त्वाला पूर्णपणे विरोध करते.ते म्हणतात,“Caste is not merely a division of labour, it is a division of labourers.”जातीय विषमतेमुळे मतांचे ध्रुवीकरण होते, जातीवर आधारित राजकारण वाढते आणि लोकशाहीचा खरा हेतू – सर्वांचा सहभाग व सन्मान – हरवतो. जातीच्या बंधनात अडकलेल्या समाजात नीतिमूल्यांचा ऱ्हास होतो आणि योग्य नेतृत्व उभे राहत नाही.

### ४. जाती व्यवस्था

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी जातीव्यवस्थेचा अत्यंत तीव्र निषेध केला. त्यांच्यामते, जातीव्यवस्था ही केवळ सामाजिक विघटन नव्हे, तर ती नैतिक पतनाचीही गंगा आहे. ती व्यक्तीला स्वतंत्र विचार करण्यापासून रोखते, माणुसकी हरवते, आणि समूहांमध्ये दुरावा निर्माण करते. "Caste has killed public spirit. Caste has destroyed the sense of public charity. Caste has made public opinion impossible." जातीव्यवस्थेने भारतीय समाजाला शतकानुशतके तुकडे-तुकडे केले आहेत. अशी विभागलेली जनता कधीही लोकशाहीसाठी आवश्यक असलेला एकत्रित जनमत तयार करू शकत नाही.

### ५. स्त्री-पुरुष विषमता

डॉ. आंबेडकर हे स्त्री-मुक्तीचे अग्रदूत होते. त्यांनी संविधानाच्या माध्यमातून स्त्रियांना समान हक्क दिले, परंतु त्यांनी हेही मान्य केले की भारतीय समाजात स्त्री-पुरुष विषमता ही खोलवर रूजलेली आहे. शिक्षण, मालमत्ता, विवाह, व्यवसाय, सार्वजनिक जीवन – सर्वच क्षेत्रांत स्त्रियांना दुय्यम स्थान मिळाले आहे.

ते म्हणतात,"I measure the progress of a community by the degree of progress which women have achieved." स्त्रियांना समान संधी, सन्मान आणि सहभाग मिळाल्याशिवाय लोकशाही पूर्ण होऊ शकत नाही. स्त्री हा समाजाचा अर्धा भाग आहे, आणि तिच्या सहभागाविना कोणतीही शासनव्यवस्था टिकू शकत नाही.

### ६. विभूती पूजा – लोकशाहीस घातक:

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यादृष्टीने भक्तीला राजकारणात विभूतीपूजेचे रूप येते. त्यातून सर्वाधिकारशाही निर्माण होण्याचे भय असते. म्हणून आपण फार जागृत राहिले पाहिजे, असा इशारा डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी त्यावेळी दिला होता.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यादृष्टीने लोकशाही केवळ शासनपद्धती नव्हे, तर मानवी मूल्यांची आणि सामाजिक न्यायाची रचना आहे. त्यांनी स्पष्टपणे सांगितले की जोपर्यंत समाजात सामाजिक, आर्थिक, जातीय आणि लिंगाधारित विषमता आहे, तोपर्यंत भारतीय लोकशाही केवळ वरवर चालणारी प्रक्रिया ठरेल. त्यामुळे त्यांनी लोकशाहीच्या यशासाठी शोषित, वंचित आणि उपेक्षित घटकांच्या सक्षमीकरणावर जोर दिला.

आजच्या काळातही लोकशाही संकटात सापडताना दिसते, तेव्हा डॉ. आंबेडकरांचे हे विचार अधिकच समर्पक ठरतात. लोकशाही टिकवण्यासाठी आणि विकसित करण्यासाठी त्यांच्या शिकवणुकीचा अभ्यास आणि अमल अत्यंत आवश्यक आहे. कारण खरी लोकशाही ही तिथेच उभी राहते, जिथे समाज न्याय, समता आणि बंधुता या मूल्यांच्या अधिष्ठानावर उभा असतो.

## १.७ लोकशाहीस सर्वात मोठा अडथळा म्हणजे जातीव्यवस्था

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची भाषणे, खंड अठरावा भाग तीन, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र साधने प्रकाशन समिती उच्च व तंत्र शिक्षण विभाग महाराष्ट्र शासन २००२ मध्ये प्रकाशित २० व्या खंडात लोकशाही सहजीवनाची एक पद्धत आहे लोकांनी निर्मलेल्या समाजात सामाजिक संबंध तसेच लोकांच्या परस्परातील सह जीवनात लोकशाहीचे मुळे शोधावे लागतात असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात.

पुढे ते या संदर्भात म्हणतात या समाजात व्यक्तींना अस्तित्व नसून ती असंख्य जातींचा समूह आहे. परस्परांपासून विभक्त अशा या जाती समूहामध्ये समान अनुभूती नाही किंवा अनुकंपाचे बंधही नाहीत. अर्थात भारतीय समाजात उपरोक्त आदर्श आहेत काय हा प्रश्न प्रस्तुत ठरतो जातीव्यवस्था अस्तित्वात असल्याने या आदर्शांना पर्यायाने लोकशाहीला या समाजातून कायमची हद्दपार केली आहे. लोकशाहीस सर्वात मोठा अडथळा म्हणजे जातीव्यवस्था आहे.

जाती व्यवस्था  म्हणजे श्रेणीबद्ध विषमता, होय. जातीचा दर्जा समान नसतो त्या एक दुसऱ्यांच्या वर उभ्या असतात त्या एक दुसऱ्यांचा द्वेष करतात तिच्यात चढत्या क्रमाने द्वेष आणि उतरत्या क्रमाने तिरस्कार तुच्छता असते. जातीव्यवस्थेच्या या विशेष याचा होणारा सर्वाधिक घातक परिणाम म्हणजे परस्पर सहकार्य करण्याच्या भावनेला आणि इच्छेला ती उध्वस्त करते. जातीव्यवस्थेचा दुसरा परिणाम आहे. जातीव्यवस्थेमुळे समाज विभक्त होत असून असे विभाजन सामाजिक अभिसरणाला social endosmosis प्रतिबंध करते. जातिव्यवस्थेच्या तिसऱ्या वैशिष्ट्येचा दुष्टपणा असा की ती लोकशाहीची मुळे नीखंदून टाकते.

## १.८ लोकशाही यशस्वी करण्यासाठी आवश्यक बाबी

सामाजिक विषमतानष्ट केली पाहिजे. लोकशाही यशस्वी व्हावयास लागणारी प्रथम आवश्यक बाब ही की, समाज व्यवस्थेत विषमता नसली पाहिजें. पीडित दडपलेला वर्ग समाजात असता कामा नये सर्व हक्क व सत्तेचे केंद्रीकरण ज्यांच्या ठायीं झालें आहे असा वर्ग एका बाजूला व सर्व प्रकारचे भार वाहण्याचे काम करणारा वर्ग दुसऱ्या बाजूला अशी विभागणी असू नये अशी विषमता, अशी अन्यायकारण विभागणी व त्यावर आधारलेली समाजरचना यांमध्ये हिंसात्मक क्रांतीचीं बीजें असतात आणि मग त्यांचे परिमार्जन करणें लोकशाहीला उद्वस्त करण्यात होतें. जगातील निरनिराळ्या भागातील लोकशाहीच्या इतिहासाचा अभ्यास केल्यास, लोकशाहीच्या अपयशांचें कारण सामाजिक विषमता, वर्गावर्गात उभी असलेली असमतेची दरी हेंच आहे असें दिसून येईल.

**पक्ष पद्धती (Party System) :** लोकशाहीच्या यशस्वीतेसाठी आवश्यक असलेली दुसरी गोष्ट म्हणजे विरोधी पक्षाचे अस्तित्व  अनुषंगानेंच ज्यांना विरोधी पक्षाची आवश्यकता वाटत नाहीं, त्यांना लोकशाहीया चीजेचें संपूर्ण आकलन झालेलें नसावें, लोकशाही म्हणजे काय ? मी कांही तिची व्याख्या येथे सांगत नाहीं, तर तिची कार्य-मिमांसा करतो आहे. या अर्थाने लोकशाहीला सत्तेवरील नियंत्रण (Veto of Power) असें म्हणता येईल.'वंश परंपरागत

सत्ता व सरंजामदारशाही (सनातनशाही) यांच्या नेमका उलट अर्थाचा शब्द म्हणजे लोकशाही.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 'State and Minorites' या आपल्या ग्रंथात त्यांनी राजकीय लोकशाही ही मुख्यतः चार मूलभूत प्रमेयावर आधारित असल्याचे म्हटले आहे. (अ) व्यक्ती हे एक स्वयंभू मूल्य आहे. (ब) व्यक्तीला काही मूलभूत व हिरावून घेता येणार नाहीत असे अधिकार असतात आणि अशा अधिकारांची व्यक्तीला हमी राज्यघटनेने दिली पाहिजे. (क) कोणत्याही प्रकारचा फायदा व लाभ यासाठी व्यक्तीला आपला घटनात्मक अधिकार गमवावा लागता कामा नये. (ड) दुसऱ्यावर हुकूमत गाजवता येईल अशा प्रकारची कोणतीही शासन संस्थेची सत्ता व अधिकार खाजगी व्यक्तीला असता कामा नये.

२८ ऑक्टोंबर, १९५१ रोजी पंजाबमधील डी. व्ही. महाविद्यालय, जालंदर येथे विद्यार्थी संसदेसमोर डॉ. आंबेडकरांचे 'संसदीय लोकशाही' या विषयावर व्याख्यान झाले. त्याप्रसंगी ते म्हणाले, 'आजच्या घडीला संसदीय सरकार व्यवस्थेत तीन मुख्य गोष्टी अंतर्भूत आहेत. (अ) पहिली अनुवंशिकतेचा नियम नाकारणे कोणीही व्यक्ती परंपरेने राज्यकर्ता म्हणून दावा करणार नाही. सत्तेवर येणाऱ्यास लोकांनी निवडून दिले पाहिजे. (ब) दुसरी लोकांच्या सार्वजनिक जीवनाला लागू होणारा कोणताही उपाय लोकांनी निवडलेल्या लोकांच्या सल्ल्यावरच आधारित असला पाहिजे. कोणीही एक व्यक्ती अधिकार ग्राह्य धरून स्वतःला सर्व काही माहित आहे, आपण कायदे करून सरकार चालवू शकतो असा दावा करू शकत नाही. (क) तिसरी गोष्ट, सत्ता प्रमुखाला सल्ला देण्याची इच्छा असलेल्या लोकांनी निर्धारित काळात स्वतःवरील लोकांचा विश्वास नव्याने संपादन केला पाहिजे. संसदीय सरकार १४ व्यवस्था म्हणजे चर्चेद्वारे सरकार पाहून कितीतरी अधिक आहे. तिथे दोन आधारस्तंभआहेत. एक विरोधी पक्ष आणि दोन मुक्त आणि निःपक्ष निवडणूका.'

**मजबूत विरोधी पक्षाची गरज:** विरोधी पक्षाचे अस्तित्त्व विरोधी पक्षाचे अस्तित्व सरकार कुठे चुकते आहे हे दाखविण्यासाठी विरोधी पक्ष असला पाहिजे.

**कायद्यासमोर समानता:** प्रशासनात समानतेची वागणूक कायदा आणि प्रशासनाच्या संदर्भात सर्वांना सारखी समानता, प्रशासनात समानतेची वागणूक ही बाब फार महत्त्वाची आहे.

**घटनात्मक नीतीमत्तेचे पालन:** संवैधानिक नैसर्गिक तत्त्वांचे प्रत्येकाने घटनात्मक नीतीदृष्ट्या पालन केले पाहिजे.

**लोकनिष्ठा :** लोकशाहीला लोकनिष्ठेची फार आवश्यकता आहे. लोकनिष्ठा म्हणजे सर्व प्रकारच्या विरोधात आंदोलनासाठी उभी राहणारी कर्तव्यनिष्ठा होय. याचा अर्थ की, प्रत्येकाने मग तो त्या विशिष्ट अन्यायाखाली भरडल्या नाही जाणाऱ्या माणसाच्या मुक्तीसाठी मदत करण्याची तयारी केली पाहिजे.

## १.९ सारांश

एकूणच लोकशाही शासन प्रकार चांगला असून भारतीयांसाठी तो उपयुक्त आहे. परंतु संविधान कर्त्यांनी काही धोकेही सूचविले आहेत. संसदीय लोकशाहीचे सामाजिक आणि

आर्थिक लोकशाहीत रुपांतर केले पाहिजेत. म्हणजेच समाजात समता प्रस्थापित केली पाहिजेत. कारण राजकीय लोकशाही ही जर सामाजिक लोकशाहीवर अधिष्ठित केली नाही तर तो टिकूच शकणार नाही. संसदीय लोकशाहीत स्वातंत्र्य, समता आणि बंधुभाव ही अखंड आणि अभंग अशी तत्त्वप्रणाली आहे. समाजात समता नसेल तर स्वातंत्र्याचा अर्थ मुठभर लोकांचे जनतेचे राज्य असणे असा होईल. जर समता ही स्वातंत्र्यशून्य असेल तर ती व्यक्तिच्या जीवनातील स्वयंप्रेरणा नष्ट करील. म्हणून भारतीय समाजात सामाजिक व आर्थिक समता प्रस्थापित झाल्याशिवाय देशाची राजकीय लोकशाही परिपक्व होणार नाही. तसेच राज्यकर्त्याने संविधानिक नैतिकतेचे पालन करणार नाही तोपर्यंत हा शासन प्रकार यशस्वी होणार नाही. वरील धोक्याची जाणीव ठेवून राज्यकर्त्यांनी राज्यकारभार केला तर संसदीय लोकशाही यशस्वी होईल.

## १.१० प्रश्न

१. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची लोकशाहीची व्याख्या स्पष्ट करा. ती पाश्चात्य उदारमतवादी लोकशाही सिद्धांतांपेक्षा कशी वेगळी आहे ते स्पष्ट करा.

२. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या लोकशाही दृष्टिकोनातील स्वातंत्र्य, समानता आणि बंधुता या तत्वांच्या महत्त्वाची चर्चा करा.

३. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या लोकशाही तत्वज्ञानात संवैधानिक नैतिकतेच्या भूमिकेचे विश्लेषण करा.

४. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सामाजिक लोकशाहीच्या संकल्पनेचे मूल्यांकन करून भारतातील जातिव्यवस्थेमुळे निर्माण झालेल्या आव्हानांना ते कसे तोंड देते स्पष्ट करा.

५. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मते आर्थिक लोकशाही म्हणजे काय? भारताच्या संदर्भात ती प्रत्यक्षात आणण्यासाठी त्यांनी सुचवलेल्या उपाययोजनांची चर्चा करा.

६. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या लोकशाही संकल्पनेवरील जॉन ड्युई यांच्या विचारांच्या प्रभावाचे विश्लेषण करा?

७. सामाजिक आणि आर्थिक लोकशाहीशिवाय राजकीय लोकशाही टिकाऊ नाही असा युक्तिवाद आंबेडकरांनी का केला, स्पष्ट करा?

## १.११ संदर्भ

१. कीर धनंजय: "डॉ. बाबासाहेब आंबेडकर", पॉप्युलर प्रकाशन, मुंबई.

२. प्रा. जोंधळे अनिल "प्रखर देशभक्त आणि राष्ट्र निर्माते डॉ. आंबेडकर", प्रबुध्दभारत पुस्तकालय आणि प्रकाशन व्यवसाय, नागपूर.

३. प्रा. देशपांडे म. द. "डॉ. आंबेडकर यांचे राजकीय विचार", लोकवाङ्मय गृह, मुंबई.

४. कसबे रावसाहेब, आंबेडकर आणि मार्क्स, सुगावा प्रकाशन, पुणे.

५. कसबे रावसाहेब, आंबेडकरवाद, सुगावा प्रकाशन, पुणे.

६. गायकवाड सुर्यकांत "डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि भाषावार प्रांत रचना", प्राजक्त पब्लिकेशन, पुणे.

७. कवळेकर के. के. आणि चौसाळकर ए. एस.: "डॉ. बी. आर. आंबेडकरांचे राजकीय भारत आणि नेतृत्व", विश्वनील प्रकाशन, पुणे.

८. प्रा. बी.सी.कांबळे, प्रा.वसंत मून, प्रा. बा.ह. कल्याणकर, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची भाषणे, खंड २०, भाग-३, डॉ.बाबासाहेब आंबेडकर चरित्र साधने प्रकाशन समिती, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, २००२.

९. Ambedkar, B. R. (1992). Dr. Babasaheb Ambedkar: Writings and Speeches, Vol. 2, 9, 10, 13. Education Dept., Govt. of Maharashtra.

१०. Zelliot, Eleanor. From Untouchable to Dalit: Essays on the Ambedkar Movement. Manohar, 1996.

११. Omvedt, Gail. (1994). Dalits and the Democratic Revolution. Sage Publications.

१२. Guru, Gopal. “Understanding Democracy and Social Justice in the Writings of Ambedkar.” Economic and Political Weekly, Vol. 38, 2003.

✞✞✞✞

# २

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा ब्रोकन मॅन सिद्धांत

**घटक रचना :**


२.० उद्दिष्टे

२.१ प्रस्तावना

२.२ अस्पृश्यतेची समस्या: एक ऐतिहासिक कोडे

२.२.१ ब्रोकन लोका म्हणजे कोण? (व्याख्या)

२.२.२ ब्रोकन लोक सिद्धांताचे प्रमुख पैलू

२.२.३ ब्रोकन लोक सिद्धांताचे परिणाम

२.२.४ ब्रोकन लोक सिद्धांतावरील टीका

२.२.५ समकालीन प्रासंगिकता

२.३ आरक्षण धोरण आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर

२.३.१ ऐतिहासिक पार्श्वभूमी: भारतातील जात आणि सामाजिक स्तरीकरण

२.३.२ संविधानातील तरतुदी आणि आंबेडकरांची भूमिका

२.३.३ डॉ. बाबासाहेबांच्या अरक्षण धोरणावरील टीका

२.३.४ आरक्षण धोरणाची वर्तमाणतील प्रासंगीकता

२.४ डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे कामगार धोरण

२.४.१ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कामगार तत्वज्ञान

२.४.२ डॉ. आंबेडकरांच्या कायदेविषयक व प्रशासकीय सुधारणा

२.४.३ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या कामगार धोरणावरील टीका

२.५ सारांश

२.६ प्रश्न

२.७ संदर्भ

## २.० उद्दिष्टे

१. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा ब्रोकन लोक सिद्धांत समजून घेऊन भारतातील अस्पृश्यतेच्या ऐतिहासिक उत्पत्तीच्या स्पष्टीकरणाचे टीकात्मक मूल्यांकन करता येईल.

२. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सामाजिक न्याय आणि आरक्षण धोरणामागील तात्विक, कायदेशीर संवैधानिक तर्काचे परीक्षण करता येईल.

३. सामाजिक न्याय, कामगार कल्याण आणि जाती-आधारित विशांतेच्या संदर्भात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांच्या प्रासंगिकतेचे मूल्यांकन करता येईल.

४. आधुनिक भारतातील दलित जाणीव-नेनीवेची ओळख, राजकारण आणि धोरण सुधारणांसाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सिद्धांतांनी कसा पाया घातला ते शोधता येईल.

## २.१ प्रस्तावना

भारतातील जाती आणि सामाजिक रचनेचे एक अग्रगण्य विद्वान डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय समाजातील अस्पृश्यतेच्या ऐतिहासिक उत्पत्तीचे स्पष्टीकरण देण्यासाठी 'ब्रोकन मेन थिअरी' ब्रोकन लोक सिद्धांत मंडल आहे. प्रस्तुत प्रकरणात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या 'द अनटचेबल्स: हू वेअर दे अँड व्हाय दे बिकेम अनटचेबल्स?' (१९४८) या ग्रंथातील ब्रोकन लोक 'ब्रोकन मेन' सिद्धांताचा शोध घेण्याचा प्रयत्न करण्यात अल आहे. डॉ. बाबसहेब आंबेडकरांनी मांडलेला ब्रोकन लोक सिद्धांत भारतातील जाती संस्थेचे व्यापक समाजशास्त्रीय विश्लेषण करून त्यांच्या ऐतिहासिक घटनाक्रमाचा परामर्श घेतो, 'ब्रोकन लोक' या संकल्पनेतुन डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी अस्पृश्यतेच्या उत्पत्तीबद्दलच्या पारंपारिक ब्राह्मणवादी आणि वसाहतवादी मिथकांना आव्हान देऊन भारतीय इतिहासाची मूलगामी पुनर्व्याख्या करण्याचा प्रयत्न केला आहे.

'ब्रोकन लोक' सिद्धांताची मांडणी करतांना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी असा युक्तिवाद केला की अस्पृश्य हे मूळतः ब्रोकन लोक हे भारतातील सामाजिक संघर्षात पराभूत झालेले आदिवासी गट आहेत ज्यांना जमीन किंवा संरक्षणाशिवाय सोडले गेले होते. कालांतराने, या विस्थापित लोकांना दुर्लक्षित केले गेले आणि कमी दर्जाची कामे करण्यास भाग पाडले गेले, ज्यामुळे ते सामाजिक दृष्ट्या बहिष्कृत ठरले.

## २.२ अस्पृश्यतेची समस्या: एक ऐतिहासिक कोडे

पूर्व-आधुनिक आणि वसाहतवादी इतिहासलेखनात, अस्पृश्यतेची उत्पत्ती बहुतेकदा धार्मिक किंवा मिथकात्मक औचित्याने झाकलेचे प्रतिपादन केले गेले आहे. पारंपारिक हिंदू धर्मग्रंथ आणि ब्राह्मणवादी मिथकांमध्ये अस्पृश्यतेचे कारण कर्म, धार्मिक अशुद्धता किंवा धर्माच्या उल्लंघनांना देतात, बहुतेकदा ते भूतकाळातील कर्मांसाठी दैवी शिक्षा म्हणून चित्रित करतात. दुसरीकडे, वसाहतवादी प्रशासकांनी अस्पृश्यतेचे कारण वांशिक किंवा

संस्कृतीचे मांडले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर या दोघांवरही असमाधानी होते. त्यांनी अस्पृश्यतेच्या उत्तपत्तीचे कारण सामाजिक संघर्ष, राजकीय बहिष्कार आणि आर्थिक उपेक्षिततेमध्ये रुजल्याचे प्रतिपादन केले, जे भौतिकवादी, ऐतिहासिक आणि तर्कसंगत विचारावर आधारलेले आहे.

**त्यांनी आपल्या सिद्धांतात दोन मूलभूत प्रश्न विचारले:**

१. अस्पृश्य कोण होते?

२. ते अस्पृश्य का व कसे झाले?

या प्रश्नांची त्यांची उत्तरे त्यांनी ब्रोकन लोकंच्या सिद्धांतात समाविष्ट केली आहेत.

### २.२.१ ब्रोकन लोक म्हणजे कोण? (व्याख्या)

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मते, “ब्रोकन लोक म्हणजे योद्धे किंवा भटक्या जमातींचे गट होते ज्यांनी प्रबळ शासक वर्गांशी, विशेषतः इंडो-आर्यांशी झालेल्या युद्धांमुळे त्यांचे प्रदेश गमावले. त्यांच्याकडे जमीन किंवा स्थिर उपजीविका नसल्याने, त्यांनी स्थायिक कृषी समुदायांच्या वर्चस्व असलेल्या गावाबाहेर आश्रय घेतला. ते आर्थिकदृष्ट्या कमकुवत आणि सामाजिकदृष्ट्या असुरक्षित होते, ज्यामुळे त्यांना भेदभावाचा सामना करावा लागला.” अर्थात गावकुसबाहेर वस्तिकरुन राहणारे इंडो-आर्यांकडुन पराभूत लोक, जे आपली सत्ता किंवा प्रदेश गामाऊं बसलेले होते ते लोक म्हणजे ब्रोकन लोक. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ब्रोकन लोकांची केलेली व्याख्या ही महात्मा फुलेयांच्या अनार्य सिद्धांताशी थोडी मिळती जुळती आहे. महात्मा फुले यांचा अनार्य सिद्धांत हा आर्य व मुलाच्या लोकतील संघर्षातून पराभूत लोकांशी संबंधित आहे. जो भारतातील शूद्र वरणाच्या उत्पत्तीची व्याख्या करतो.

बाबसाहेबांनी मांडलेला ब्रोकन लोक सिद्धांत भारतातील अस्पृश्यतेच्या उत्तपत्तीची व्याख्या करणार असून प्राचीन काळातील ऐतिहासिक वाटचालीचे विश्लेषन करणारा आहे.

### २.२.२ ब्रोकन लोक सिद्धांताचे प्रमुख पैलू

#### अ. पराभूत जमाती आणि त्यांची सामाजिक स्थिती

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा असा युक्तिवाद होता की हे ब्रोकन लोक मूळतः विविध स्थानिक आदिवासी गटांचे होते परंतु प्रगत इंडो-आर्यन वसाहतवाद्यांनी त्यांना बेदखल केले. प्रबळ जाती गटांप्रमाणे, हे लोक बाहेरचे होते ज्यांना वर्ण व्यवस्थेत कोणतेही स्थान नव्हते, ज्यामुळे ते पारंपारिक जातीय पदानुक्रमापेक्षा वेगळे झाले. तथापि, त्यांच्या कमकुवत सामाजिक स्थितीमुळे, त्यांना क्षुल्लक काम आणि विभक्त वसाहतींमध्ये राहणे भाग पाडले गेले.

#### ब. गावाबाहेरील वसाहत

ब्रोकन लोक गावांच्या बाहेर स्थायिक झाले, ज्यामुळे त्यांना मुख्य प्रवाहातील समाजापासून शारीरिक आणि सामाजिक वेगळेपणा आला. या भौगोलिक अंतराने त्यांच्या अखेरच्या

अस्पृश्यतेत महत्त्वपूर्ण भूमिका बजावली, कारण ते जाती-आधारित अर्थव्यवस्थेत सामील झाले नव्हते.

### क. ग्रामरक्षक म्हणून भूमिका

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी नमूद केले की हे उपेक्षित गट अनेकदा बाह्य धोक्यांपासून वस्त्यांचे रक्षण करण्यासाठी ग्रामरक्षक आणि संरक्षकांची भूमिका स्वीकारत असत. तथापि, सुरक्षा प्रदान करूनही, त्यांना समाजाचे समान सदस्य म्हणून स्वीकारले जात नव्हते आणि त्यांना बाहेरील मानले जात होते.

### ड. मांसाहारी आहाराशी संबंध

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मते, त्यांच्या अस्पृश्यतेचे एक प्रमुख कारण म्हणजे गुरांचे मांस खाण्याची त्यांची प्रथा. गायीचा आदर करणाऱ्या प्रमुख जाती गटांप्रमाणे, विशेषतः ब्राह्मणांपेक्षा, ब्रोकन लोक उदरनिर्वाहासाठी गुरांवर अवलंबून होते. या आहारातील फरकाचा वापर त्यांना अशुद्ध आणि अस्पृश्य म्हणून ओळखण्यासाठी केला जात असे.

### इ. बौद्ध धर्म आणि छळाशी संबंध

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मते ब्रोकन लोक ही सुरुवातीच्या बौद्ध धर्मशी जेडले गेलेले होते, त्यापैकी बरेच जण ब्राह्मणी वर्चस्वाच्या विरोधात बौद्ध धर्म स्वीकारला होता. भारतात बौद्ध धर्माचा ऱ्हास झाल्यानंतर, हे गट अधिकच दुर्लक्षित झाले, ज्यामुळे त्यांचा अस्पृश्य दर्जा प्राप्त झाला.

### ई. बौद्ध धर्म आणि धार्मिक संघर्षाची भूमिका

डॉ. बाबासाहेब आंबेडकर अस्पृश्यतेच्या उदयाला बौद्ध धर्माविरुद्ध ब्राह्मणांच्या शत्रुत्वाशी जोडतात, विशेषतः मौर्य साम्राज्याच्या पतनानंतर पुष्प मित्र शुंगाने वैदिक हिंदू धर्माचे पुनरुज्जीवन घडाऊन आणले, त्याचा बौद्ध किंवा अ-वैदिक संप्रदायातील लोकानी विरोध केला. त्यामुळे या काळात ज्यांनी ब्राह्मण धार्मिक विधींचे पालन करण्यास नकार दिला त्यांना बहिष्कृत करण्यात आले.

"अस्पृश्य मूळचे बौद्ध होते. जेव्हा ब्राह्मणांनी युद्ध जिंकले आणि हिंदू धर्माला भारताचा धर्म म्हणून स्थापित केले तेव्हा ते अस्पृश्य झाले." — (आंबेडकर, १९४८)

यज्ञ संस्कृतीस आणि ब्राह्मणी धर्म नियमांचे पालन करण्यास अवैदीकांनी नकार दिल्यामुळे त्यांना अपवित्र संबोधण्यात येवून बहिष्कृत केले गेले. आशा बहिष्कृत गटांना नवीन सामाजिक व्यवस्थेत सर्वात खालचा दर्जा दिला गेला.

अर्थात ब्रम्हणी समाज व्यवस्थेतील सर्वात खालच्या बहिष्कृत गटाला बाबसहेबांनी ब्रोकन लोक संबोधले आहे. त्याच्या गावकुसाच्या बाहेच्या वस्त्या हे त्यांच्या बहिष्कृतेचे प्रतीक आहेत. या गटावरील सामाजिक आणि राजकीय दडपशाहीमुळे ब्राम्हणी धर्माने त्यांना कायमचे गुलाम बनविले.

### २.२.३ ब्रोकन लोक सिद्धांताचे परिणाम

#### अ. पारंपारिक जातीच्या इतिहासाला आव्हान

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा ब्रोकन लोक सिद्धांत अस्पृश्यतेच्या पारंपारिक ब्राह्मणवादी स्पष्टीकरणांना आव्हान देतो, ज्यामध्ये असा दावा केला जातो की अस्पृश्य लोक त्यांच्या कर्मामुळे किंवा जन्मामुळे अधोगतीला गेले. त्याऐवजी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर एक ऐतिहासिक-भौतिकवादी स्पष्टीकरण देतात, ज्यामध्ये अस्पृश्यतेचे श्रेय ब्राम्हणी धर्मातील राजकीय आणि सामाजिक घटकांना दिले जाते. त्यामुळे जातीसंस्थेच्या पारंपरिक इतिहासाची चौकट मोडून डॉ. बाबासाहेब आंबेडकर जात ह्या सामाजिक जनीवेचे विश्लेषण करतात.

#### ब. जात ही सामाजिक रचना आहे

ब्रोकन लोकांच्या सामाजिक विस्थापन आणि सक्तीने दुर्लक्ष करण्यावर भर देऊन, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जात ही दैवी व्यवस्थेऐवजी सामाजिकरित्या निर्मित संस्था म्हणून मांडणी करतात. त्यांनी असा युक्तिवाद केला आहे की, जात आणि अस्पृश्यता सामाजिक-राजकीय परिस्थितीमुळे लोकांवर लादली गेली आहे, जन्मजात कनिष्ठतेमुळे नाही.

#### क. दलित ओळख आणि सामाजिक चळवळींचा आधार

ब्रोकन लोक सिद्धांताचा दलित इतिहासलेखन आणि राजकीय चळवळींवर महत्त्वपूर्ण प्रभाव पाडला आहे. दलित नेहमीच समाजाच्या सर्वात खालच्या पातळीवर नव्हते तर ऐतिहासिक घटनांमुळे त्यांना त्या स्थितीत आणण्यात आले होते या कल्पनेला या सिद्धांतामुळे बळकटी मिळाली. हा सिद्धांत दलित इतिहासाच्या अभ्यासात अत्यंत प्रभावी मानला जातो. त्याने अस्पृश्यतेच्या सामाजिक मुळांवर प्रकाश टाकला असून, अन्यायकारक व्यवस्थेविरोधात वैचारिक चळवळीस चालना दिली आहे.

#### ड. राजकीय विषय म्हणून 'ब्रोकन लोक'

ब्रोकन म्यान सिद्धांताचा प्रभाव केवळ ऐतिहासिक नाही, तर तो राजकीयदृष्ट्याही परिवर्तनकारी ठरला.

#### दलित इतिहासाची पुनर्रचना:

आंबेडकरांनी दलित इतिहासाला अभिमानाची रूपरेषा दिली. अस्पृश्य समाज हे पापी आत्मे नव्हते, तर सामाजिक हिंसाचाराचे बळी होते. त्यामुळे त्यांनी दलितांना फक्त पीडित न मानता, पर्यायी परंपरेचे वाहक आणि बदलाचे प्रतिनिधी म्हणून मांडले.

#### सामूहिक चेतना:

या सिद्धांतामुळे दलित समाजामध्ये ऐतिहासिक जागरूकता निर्माण झाली. त्यांनी स्वतःला अपमानित नव्हे, तर एक अभिमानास्पद वारसा लाभलेले लोक म्हणून पाहायला सुरुवात केली.

### २.२.४ ब्रोकन लोक सिद्धांतावरील टीका

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा ब्रोकन म्यान किंवा ब्रोकन लोक सिद्धांत हा अस्पृश्यतेच्या ऐतिहासिक उत्पत्तीबाबत मोलाचा दृष्टिकोन प्रदान करतो. तथापि, विद्वानांच्या काही गटांनी या सिद्धांतावर प्रश्न उपस्थित केले आहेत.

#### १. ब्रोकन लोक सिद्धांत: मुख्य युक्तिवाद

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा दावा असा होता की अस्पृश्यतेचा उगम हा ब्राह्मणी शक्तींनी बौद्ध व अवैदहिक समुदयावर केलेल्या दडपशाहीतून, तसेच लष्करी पराभव व सामाजिक विघटना झाला आहे.

त्यांच्या मते "बौद्ध धर्माच्या पतनानंतर बौद्ध समुदायांवर ब्राम्हणी धर्माकडुन हिंसक हल्ले झाले. या हल्ल्यांमध्ये अनेक आदिवासी, शेतकरी व ग्रामीण समुदायांचा नाश झाला किंवा त्यांना हद्दपार करण्यात आले. या समाजाचे तुकडे झाले, आणि त्यांची संगठित रचना मोडून पडली."

याच विखंडित, पराभूत आणि बहिष्कृत समूहांमध्येच अस्पृश्यतेचा जन्म झाला, असा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा दावा आहे.

#### २. ब्रोकन जमाती आणि बहिष्कृत लोकसंख्या

आंबेडकर स्पष्ट करतात की: "ब्रोकन लोक मूळतः ग्रामीण समुदायाचा भाग होते, परंतु त्यांना त्यापासून वेगळे करण्यात आले. त्यांनी जमाती किंवा समुदायाचे संरक्षण गमावले आणि त्यांना समाजाच्या काठावर राहण्यास भाग पाडले गेले." — डॉ. बाबासाहेब आंबेडकर, १९४८

हे लोक एकेकाळी आत्मनिर्भर आणि सामाजिकदृष्ट्या सुसज्ज होते.

परंतु ऐतिहासिक उलथापालथींमुळे त्यांनी आपले संरक्षण गमावले.

समाजाच्या तळाला ढकलले गेल्यामुळे ते भूमिहीन, असुरक्षित व हतबल बनले.

त्यांच्या उपजीविकेचे साधन केवळ इतर समाजांकडून नाकारलेली, हलकी मानली जाणारी कामे राहिली.

#### ३. ब्रोकन लोक सिद्धांतावरील टीका

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा 'ब्रोकन लोक सिद्धांत, जरी सर्वत्र आदरणीय असला तरी, काही इतिहासकार आणि विद्वानांकडून त्यावर टीका करण्यात आली आहे, ती पुढील प्रमाणे..

**अस्पृश्यता केवळ युद्ध व पराभवामुळे निर्माण झाली नाही:**

काही इतिहासकारांचे मत आहे की अस्पृश्यतेची मूळ कारणे अधिक गुंतागुंतीची असून ती केवळ लष्करी पराभवावर आधारित नाही. आर्थिक शोषण, धार्मिक रचनेतील भेदभाव,

आणि मानसिक व सामाजिक पातळीवरील अध:पतन यासारखे घटक देखील कारणीभूत होते.

**अस्पृश्यतेचा प्राचीन इतिहास:**

काही संशोधकांचा दावा आहे की अस्पृश्यतेचा उगम इंडो-आर्यन लोकांच्या आधीपासून आहे. म्हणजेच, ही संकल्पना काही स्थानिक समाजांमध्ये आधीपासून अस्तित्वात होती आणि नंतर तिचे अधिक प्रस्थ निर्माण झाले.

**प्रादेशिक वैविध्य:**

अस्पृश्यता ही संपूर्ण भारतभर एकसमान पद्धतीने लागू नव्हती. विविध भौगोलिक व सामाजिक पार्श्वभूमीच्या प्रभावामुळे अस्पृश्यतेचे स्वरूप वेगवेगळ्या भागांमध्ये भिन्न होते. त्यामुळे एकसंध ऐतिहासिक स्पष्टीकरण काही प्रमाणात अपुरे वाटते.

### २.२.५ समकालीन प्रासंगिकता

आजही आंबेडकरांचा ब्रोकन लोक सिद्धांत दलित चळवळींमध्ये आणि शैक्षणिक क्षेत्रात महत्त्वपूर्ण भूमिका बजावत आहे.

- **दलित इतिहासलेखन आणि पर्यायी दृष्टीकोन:**

या सिद्धांताने पारंपरिक हिंदू आणि वसाहतवादी इतिहास कथांना आव्हान देणारा प्रति-इतिहास निर्माण केला आहे.दलित इतिहासाला स्वतंत्र आणि समतामूल्याधारित जागा दिली आहे.

- **ओळख राजकारण आणि सांस्कृतिक चळवळी:**

दलित लेखक व कार्यकर्ते ब्रोकन म्यान प्रतिमेचा वापर प्रतिष्ठा, ओळख आणि सामाजिक न्यायासाठी करतात. हे प्रतीक विशेषतः बौद्ध धर्माच्या समतावादी परंपरेशी स्वतःला जोडण्यासाठी वापरले जाते.

- **शैक्षणिक व सामाजिक संशोधन:**

जात, सामाजिक बहिष्कार, सामूहिक स्मृती, आणि ऐतिहासिक आघातांचे विश्लेषण करण्यासाठी हा सिद्धांत एक मूलभूत ग्रंथ मानला जातो. सामाजिक न्यायावर आधारित अभ्यासक्रमात याचे महत्त्व सातत्याने वाढत आहे.

### २.२.६ सारांश

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा ब्रोकन मेन / ब्रोकन लोक सिद्धांत भारतीय समाजातील अस्पृश्यतेची उत्पत्ती आणि शाश्वतता समजून घेण्यातील एक आदर्श बदल दर्शवितो. तो अस्पृश्यतेला सामाजिक विघटन, धार्मिक संघर्ष आणि राजकीय वर्चस्वात रुजलेली ऐतिहासिक रचना म्हणून उघड करतो.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा ब्रोकन मेन / ब्रोकन लोक सिद्धांत अस्पृश्यतेची उत्पत्ती आणि दलितांवर होणारे अत्याचार समजून घेण्यासाठी एक ऐतिहासिक चौकट प्रदान करतो. अस्पृश्यतेला युद्ध, विस्थापन आणि आर्थिक वंचिततेशी जोडून, त्यांनी पारंपारिक स्पष्टीकरणांना आव्हान दिले आणि दलित स्वाभिमान चळवळींचा पाया घातला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा सिद्धांत जातीविरुद्धच्या संघर्षात एक शक्तिशाली विश्लेषणात्मक आणि मुक्तीचे साधन आहे, जो विद्वान आणि कार्यकर्त्यांना भारताच्या भूतकाळाचा पुनर्विचार करण्यास, त्याच्या अन्यायांना तोंड देण्यास आणि भारतात अधिक समावेशक लोकशाही भविष्य आणि समानतेसाठी प्रयत्न करण्यास प्रोत्साहित करतो.

बाबासाहेब आंबेडकर यांचा ब्रोकन मेन / ब्रोकन लोक सिद्धांत दलित समाजाला ऐतिहासिक आणि नैतिक प्रतिष्ठा बहाल करणारा एक क्रांतिकारी विचार आहे. त्यामुळे अस्पृश्यता ही केवळ धार्मिक किंवा कर्मनिष्ठ कल्पना नसून, एक सामाजिक-राजकीय प्रक्रियेमुळे घडलेली घटना असल्याचे अधोरेखित होते. आजही हा सिद्धांत सामाजिक समतेसाठी, ऐतिहासिक न्यायदृष्टीकोनासाठी आणि दलित स्वाभिमानासाठी आधारस्तंभ ठरत आहे.

## २.३ आरक्षण धोरण आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर

भारतीय समाजरचनेतील एक कटू वास्तव म्हणजे जातीनिर्मित विषमता. हजारो वर्षांच्या सामाजिक अन्यायामुळे निर्माण झालेली ही व्यवस्था केवळ व्यक्तीच्या सामाजिक स्थानावरच प्रभाव टाकत नाही, तर तिच्या जीवनाच्या सर्व अंगांवर खोल परिणाम करते — शिक्षण, नोकरी, संधी, प्रतिष्ठा आणि राजकीय प्रतिनिधित्व. या व्यवस्थेचा सर्वाधिक फटका अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि इतर मागासवर्गीय घटकांना बसला. या ऐतिहासिक अन्यायाला संस्थात्मक आणि न्यायसंगत उत्तर देण्याचा सर्वात प्रभावी मार्ग म्हणजे आरक्षण असून या धोरणाचे मूळ अधिष्ठान निर्माण करणारे विचारवंत म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर.

डॉ. भीमराव रामजी आंबेडकर (१८९१–१९५६) हे केवळ भारतीय संविधानाचे शिल्पकार नव्हते, तर एका व्यापक सामाजिक परिवर्तनाच्या चळवळीचे आधारस्तंभ होते. एक बहुश्रुत अर्थशास्त्रज्ञ, तत्त्वचिंतक, कायदेतज्ज्ञ आणि दलित समाजाचे प्रबळ नेते म्हणून त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य सामाजिक न्यायासाठी समर्पित केले. त्यांच्या दृष्टीने लोकशाही ही केवळ निवडणूकप्रक्रिया नव्हती, तर ती 'सामाजिक आणि आर्थिक समतेवर आधारलेली व्यवस्थात्मक संकल्पना' होय. म्हणूनच त्यांनी आरक्षण धोरणाला एक दयाभाव किंवा कृपादृष्टी समजण्याऐवजी, ते न्याय, समानता आणि प्रतिष्ठेवर आधारित मूलभूत हक्काचे स्वाभाविक साधन म्हणून मांडले आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरणी मांडलेले आरक्षण धोरण हे कोणत्याही एका वर्गासाठी केलेले विशेष सवलतीचे नियोजन नव्हते, तर संरचनात्मक अन्यायाला उत्तर देणारा सामाजिक उपाय होता. ते म्हणत, "आरक्षण म्हणजे भीक नाही, तर हा आमचा हक्क आहे." आंबेडकरांनी आरक्षणाला सुधारात्मक न्याय (Corrective Justice) मानले. त्यांच्या मते, जेव्हा सुरुवातीची स्पर्धा विषम स्थितीतून सुरू होते, तेव्हा समानता केवळ नावापुरती राहते. त्यामुळे समाजातील वंचित घटकांना प्रतिनिधित्व, शिक्षण, नोकरी आणि राजकीय

प्रक्रियेत संधी देणे ही केवळ न्यायाची बाब नव्हे, तर लोकशाही टिकवण्यासाठीही आवश्यक आट आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आरक्षणाची संकल्पना फक्त घटनात्मक चौकटीतच मांडलेली नाही, तर ती जातीय भेदभावाच्या ऐतिहासिक पार्श्वभूमीशी आणि सामाजिक शोषणाविरोधातील संघर्षाशी जोडलेली आहे. त्यांच्या मते, 'जेव्हा समाजाच्या मोठ्या वर्गाला जन्मावर आधारित भेदभाव, शिक्षणातून वंचितता, रोजगारातील बहिष्कार आणि राजकीय दुर्लक्ष यांचा सामना करावा लागतो, तेव्हा समान संधी आणि वस्तुनिष्ठ न्याय हे नैतिकतेपेक्षा अधिक — घटनात्मक आणि धोरणात्मक अनिवार्यता बनतात.

प्रस्तुत प्रकरणात डॉ. आंबेडकरांच्या आरक्षण धोरणाचा संकल्पनात्मक पाया, आणि त्याची ऐतिहासिक उत्क्रांती व भारतीय संविधानातील घटनात्मक मूर्त स्वरूप यांचा सखोल अभ्यास करण्यात आला आहे. यासोबतच त्यांच्या भाषणांमधून आणि लेखनातून प्रकट होणाऱ्या सकारात्मक कृतीविषयीच्या तत्वज्ञानाचे विश्लेषण करण्यात आले असून ते भारतीय राज्यघटनेतील सामाजिक लोकशाहीसाठी मार्गदर्शक ठरते याचा परामर्श घेण्यात आला आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा दृष्टिकोन आजही केवळ शैक्षणिक चर्चा नव्हे, तर एक प्रासंगिक राजकीय आणि नैतिक घोषणापत्र आहे, जो भारतासारख्या बहुसांस्कृतिक, बहुवर्गीय आणि बहुजातीय समाजात समतेची तत्त्वे प्रत्यक्षात उतरवण्याचा प्रयत्न करतो. म्हणूनच, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे आरक्षण धोरण हे केवळ वंचितांसाठी नव्हे, तर संपूर्ण भारतीय लोकशाहीसाठी आधार स्तंभ ठरले आहे.

आज, जेव्हा आरक्षणावर विविध राजकीय, सामाजिक व आर्थिक चर्चा घडतात, तेव्हा आंबेडकरांच्या मूळ कल्पनांचे मूल्य आणि त्यामागील उद्देश समजून घेणे अत्यंत आवश्यक आहे. कारण त्यांच्या दृष्टिकोनात फक्त मागासवर्गाचा उद्धार नव्हता, तर संपूर्ण भारताचा न्याय, समता आणि बंधुतेच्या मूल्यांवर आधारलेला भविष्यकाळ होता.

### २.३.१ ऐतिहासिक पार्श्वभूमी: भारतातील जात आणि सामाजिक स्तरीकरण

आरक्षण हे केवळ एक धोरणात्मक उपाय नाही, तर तो भारतीय समाजात शतकानुशतके चालत आलेल्या जातिनिर्मित असमानतेविरुद्धचा एक सामाजिक न्यायाचा उपाय आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आरक्षणाचा विचार करताना तो केवळ दयाभावावर आधारित नसून, ऐतिहासिक अन्यायाची भरपाई म्हणून, राज्याच्या जबाबदारीतून जन्मलेली एक नैतिक आणि कायदेशीर बांधिलकी असल्याचे स्पष्ट केले. त्यांच्या मते, समानता ही केवळ कायद्याच्या समोर असलेली नाही, तर वास्तवात अनुभवली जाणारी असावी.

#### १. आरक्षण म्हणजे काय?

आरक्षण म्हणजे समाजातील विशिष्ट मागासवर्गीय घटकांना — विशेषतः अनुसूचित जाती (SC), अनुसूचित जमाती (ST), आणि नंतर इतर मागास वर्ग (OBC) — शैक्षणिक संस्था, सरकारी नोकऱ्या आणि राजकीय प्रतिनिधित्व यामध्ये ठराविक टक्केवारीने जागा राखून

ठेवणे. यामागील उद्देश म्हणजे सामाजिक समतेचा आधार निर्माण करणे आणि वंचित घटकांना मुख्य प्रवाहात आणणे.

## २. डॉ. आंबेडकरांचा दृष्टिकोन

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा आरक्षणावरील दृष्टिकोन तीन मूलभूत तत्त्वांवर आधारित होता:

### (अ ) सुधारात्मक न्याय (Corrective Justice):

आरक्षण ही केवळ संधीची समानता नव्हे, तर ऐतिहासिक अन्यायाची भरपाई करण्याची एक उपाययोजना आहे. हजारो वर्षांच्या जातिव्यवस्थेने दलित व आदिवासी वर्गांना शैक्षणिक, सामाजिक व आर्थिकदृष्ट्या प्रगतीपासून वंचित ठेवले. त्यामुळे आज संधी दिली तरी ते स्पर्धेत उतरू शकत नाहीत, ही वस्तुस्थिती डॉ. आंबेडकरांनी ओळखली.

"जेव्हा सुरुवातीचा मुद्दा असमान असेल, तेव्हा समानतेचा मुद्दा काय?"

— डॉ. बाबासाहेब आंबेडकर (घटना सभा वादविवाद, 1949)

### (ब) हक्काची संकल्पना (Right-Based Approach):

आरक्षण हा कोणाचा उपकार नसून मागास समाजाचा हक्क आहे, असे आंबेडकरांचे मत होते. जात-पात निर्मूलनाची जबाबदारी फक्त वंचित वर्गावर न ठेवता, राज्याने सकारात्मक कृतीद्वारे समाजात समता प्रस्थापित केली पाहिजे.

### (क ) प्रतिनिधित्वाचा अधिकार:

लोकशाहीत विविध समाजघटकांचे सशक्त प्रतिनिधित्व असणे आवश्यक आहे. बहुसंख्यांक वर्चस्व रोखण्यासाठी, मागास वर्गांना राजकीय आणि प्रशासकीय पातळीवर सहभाग मिळावा यासाठी आरक्षण गरजेचे आहे.

## ३. दान नव्हे, कर्तव्य

डॉ. आंबेडकरांनी वारंवार स्पष्ट केले की आरक्षण ही कोणाची कृपा नाही, तर राज्याची जबाबदारी आहे. वंचित समाजाच्या सामाजिक पुनर्रचनेसाठी आणि राष्ट्रीय एकात्मतेसाठी आरक्षण आवश्यक आहे. ते म्हणत, “आरक्षण हे दयाभावावर नाही, तर सामाजिक प्रतिष्ठेच्या आणि न्यायाच्या आधारावर आहे.”

## ४. गुणवत्ता आणि सामाजिक संधी

आरक्षणविरोधी मंडळींनी नेहमीच “गुणवत्तेचा बळी” या मुद्द्यावर टीका केली. पण डॉ. आंबेडकर यांचे स्पष्ट मत होते की गुणवत्ता ही एक सामाजिक संकल्पना आहे. ज्या लोकांना संधीच मिळत नाही, त्यांच्यात गुणवत्ता कशी दिसेल? संधीची असमानता हीच गुणवत्तेच्या खोट्या कल्पनेमागची खरी समस्या आहे.

**५. तात्पुरती पण आवश्यक योजना**

संविधानाच्या मसुद्यात डॉ. आंबेडकरांनी आरक्षणाची तरतूद ही तात्पुरती असल्याचे नमूद केले होते. ते म्हणाले होते की आरक्षण हे एक "सोपान" आहे — कायमचा आधार नव्हे, तर वंचितांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठीचा एक पूल आहे. या धोरणाचा कालावधी ठरवताना त्याचा सातत्याने आढावा घेतला जावा अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली होती.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आरक्षणाला दलितांचा सन्मान आणि सामाजिक स्वीकृती सुनिश्चित करण्याचा एक मार्ग म्हणून देखील अरक्षणकडे पाहिले आहे. त्यांना हे माहित होते की केवळ आर्थिक उन्नतीमुळे जातीचा कलंक पुसला जाणार नाही. म्हणून, आरक्षण हे प्रतीकात्मक समानता आणि मान्यता मिळविण्यासाठीचा एक मार्ग म्हणून देखील त्याचे समर्थन केले आहे.

**६. पुणे करार आणि त्याचे परिणाम**

१९३२ चा पुणे करार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या दलित हक्कांसाठीच्या संघर्षात एक महत्त्वाचा टप्पा होता. ब्रिटिश पंतप्रधान रॅमसे मॅकडोनाल्ड यांच्या सांप्रदायिक पुरस्काराने दलित वर्गांना स्वतंत्र मतदारसंघ दिले जाहीर केला, ज्याचा गांधींनी विरोध केला. प्रचंड दबाव आणि गांधीजींच्या आमरण उपोषणामुळे, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी तडजोडीला मान्यता दिली, ज्यामुळे पुढील गोष्टी घडल्या:

- **संयुक्त मतदारसंघांमध्ये अनुसूचित जातींसाठी राखीव जागा.**
- **मूळ प्रस्तावित जागांपेक्षा जागांची संख्या वाढली.**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी नंतर या तडजोडीला भाग पाडल्याबद्दल खेद व्यक्त केला, परंतु या कराराने लोकशाही व्यवस्थेत राखीव प्रतिनिधित्वाचा पाया रचला गेला.

## २.३.२ संविधानातील तरतुदी आणि आंबेडकरांची भूमिका

घटना सभेच्या मसुदा समितीचे अध्यक्ष म्हणून, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आरक्षणासाठी अनेक घटनात्मक तरतुदी समाविष्ट केल्या आहेत त्या पुढील प्रमाणे :

**1. कलम १५ (४) आणि १५ (५): शैक्षणिक क्षेत्रातील आरक्षण**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार: शिक्षण हा सामाजिक गतिशीलतेचा मूलभूत स्तंभ आहे. वंचित वर्ग शैक्षणिकदृष्ट्या मागे राहिल्यामुळे त्यांनी शिक्षणात आरक्षण दिले पाहिजे.

कलम १५(४): राज्याला सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गासाठी (SC/ST) विशेष तरतुदी करण्याचा अधिकार बहाल करण्यात आला आहे.

कलम १५(५): शिक्षण संस्थांमध्ये (सरकारी व खासगी – अल्पसंख्यांक वगळता) आरक्षणाची तरतूद करण्यात आली आहे .

**2. कलम १६ (४): सार्वजनिक नोकऱ्यांमधील आरक्षण**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार: प्रतिनिधित्वाशिवाय लोकशाही केवळ संख्येची मजा आहे. सार्वजनिक नोकऱ्यांमध्ये शोषितांना स्थान मिळणे आवश्यक आहे.

कलम १६(४): राज्य सेवांमध्ये मागासवर्गांना आरक्षण देण्याची तरतूद करण्यात आली आहे.

नंतरच्या दुरुस्त्या: कलम १६(४A) – पदोन्नतीतील आरक्षण; १६(४B) – पदोन्नतीत वाढीस मर्यादा नाही.

**3. कलम ३३० आणि ३३२: राजकीय प्रतिनिधित्व**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार: वंचितांचे प्रश्न तेच मांडू शकतात जे त्यांचे प्रतिनिधी असतात. म्हणूनच लोकसभा व विधानसभा या दोन्ही ठिकाणी राखीव जागा आवश्यक.

कलम ३३०: नुसार लोकसभेमध्ये अनुसूचित जाती-जमातींसाठी जागा राखीव ठेवण्याची तरतूद करण्यात आली आहे.

कलम ३३२: नुसार राज्य विधानसभांमध्ये याच प्रकारची तरतूद करण्यात आली आहे.

**4. कलम ३३५: प्रशासकीय कार्यक्षमता आणि आरक्षण**

कलम ३३५: आरक्षण लागू करताना प्रशासनाची गुणवत्ता लक्षात ठेवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा दृष्टिकोन: गुणवत्ता ही सामाजिक सुसंधीने ठरते; त्यामुळे वंचितांचा सहभाग ही गुणवत्ता वाढवते, घालवत नाही.

यामुळे आरक्षण व कार्यक्षम प्रशासकीय सेवा यामध्ये समतोल राखण्याचा प्रयत्न केला जातो.

**5. कलम ३३८ आणि ३३८-A: आयोगांची स्थापना**

अनुसूचित जाती (३३८) आणि अनुसूचित जमाती (३३८-अ) यांच्या अधिकारांचे संरक्षण करण्यासाठी आयोग स्थापन.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी अशा संस्थात्मक संरचनांद्वारे आरक्षणाच्या अंमलबजावणीवर देखरेख ठेवण्यासाठी आयोगाची शिफारस केली आहे.

**6. कलम २४३-D आणि २४३-T: स्थानिक स्वराज्य संस्थांमधील आरक्षण**

२४३-डी: पंचायत संस्थांमध्ये अनुसूचित जाती, जमाती आणि महिलांसाठी जागा राखीव.

२४३-टी: नगरपालिका किंवा नागरी संस्थांमध्येही अशीच राखीव व्यवस्था.

स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये प्रतिनिधित्वाच्या माध्यमातून सामाजिक समावेश सुनिश्चित केला जातो.

### ७. १०३ वी घटनादुरुस्ती (२०१९): आर्थिक आरक्षण

या दुरुस्तीनुसार, कलम १५(६) आणि १६(६) अंतर्गत सामान्य वर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी (EWS) १०% आरक्षण देण्यात आले. यामध्ये OBC, SC, ST यांना न धरता इतर पात्र सामान्य जातींना हे आरक्षण दिले जाते.

### २.३.३ डॉ. बाबासाहेबांच्या अरक्षण धोरणावरील टीका

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आरक्षण धोरणाची मांडणी सामाजिक न्याय, समता, प्रतिष्ठा व प्रतिनिधित्व या मुल्यांच्या आधारावर केली होती. हे धोरण वंचित, शोषित, दलित व मागासवर्गीय समुदायांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी आणि ऐतिहासिक अन्याय दूर करण्यासाठी केलेल्या प्रयत्नांचा भाग होता. तथापि, कालांतराने या धोरणावर अनेक प्रकारची टीका झाली. या टीका समाजशास्त्रीय, राजकीय, आर्थिक आणि शैक्षणिक दृष्टिकोनातून करण्यात आल्या आहेत. खाली या टीकांचे सविस्तर विश्लेषण केले आहे.

### १. गुणवत्तेवर परिणाम

आरक्षणामुळे गुणवत्ता दुय्यम ठरते. पात्रतेपेक्षा आरक्षणाधिष्ठित संधी मिळतात.

काही विद्वानांचा युक्तिवाद आहे की शैक्षणिक संस्थांमध्ये किंवा नोकरभरतीत आरक्षित वर्गातील उमेदवार हे कधी कधी कमी गुण मिळवूनही निवडले जातात, जे गुणवत्तेच्या विरोधात जाते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, "गुणवत्ता ही तटस्थ नाही. ती सामाजिक-सांस्कृतिक संधींवर अवलंबून असते."

गुणवत्ता ही सामाजिक संधींचा परिणाम असते. ज्या समाजघटकांना शिक्षण व संधी दिल्याच नाहीत, त्यांच्याकडून गुणवत्ता कशी अपेक्षित करता येईल?

### २. सततचा कालवाढीचा धोका

आरक्षण तात्पुरते उपाय म्हणून होता, पण त्याचा कालावधी सतत वाढवण्यात आला.

आरक्षण १० वर्षांसाठी होता (१९५०), पण आजही विविध घटकांसाठी चालू आहे. हे लोकशाही प्रक्रियेतील राजकीय लाभासाठी वापरण्यात येत असल्याचा आरोप आहे.

भारतीय स्वातंत्र्याच्या ७५ वर्षांनंतरही सामाजिक विषमता कायम असल्यामुळेच आरक्षणाचा कालवधी वाढवला गेला आहे.

### ३. राजकीय फायदे मिळवण्यासाठी वापर

अनेक राजकीय पक्ष आरक्षणाचा वापर निवडणुकांमध्ये मतांसाठी करतात. निवडणुकांच्या अगोदर अनेक पक्ष नवीन घटकांना आरक्षण देण्याचे वचन देतात. यामुळे धोरणाचा मूल

उद्देश बाजूला पडतो. हे धोरण स्वच्छ नियोजनाऐवजी लोकप्रियतेच्या राजकारणात अडकले आहे.

### ४. खऱ्या गरजूंना लाभ मिळत नाही (Creamy Layer समस्या)

आरक्षणाचा लाभ गरजूंपेक्षा सामाजिकदृष्ट्या सक्षम व्यक्तींनाच वारंवार मिळतो. OBC, SC, ST वर्गातील आर्थिकदृष्ट्या सशक्त गट वारंवार संधी घेतात.

'क्रीमी लेयर' संकल्पना (OBC मध्ये लागू) SC/ST साठी देखील लागू करावी, अशी मागणी आहे.

### ५. इतर मागास गटांचा उपेक्षा

आर्थिकदृष्ट्या दुर्बल पण सामाजिकदृष्ट्या उच्च वर्गांतील लोक उपेक्षित राहतात.

सवर्णांमधील गरीब लोकांनाही शैक्षणिक, सामाजिक अडचणी येतात, पण त्यांना कोणतेही प्राधान्य मिळत नाही.

यासाठीच २०१९ मध्ये १०३ वी घटनादुरुस्ती करून EWS आरक्षण लागू करण्यात आले.

### ६. सामाजिक तेढ आणि वर्ग संघर्ष

आरक्षणामुळे समाजात विभागणी वाढते. आरक्षण मिळवणारे आणि न मिळवणारे यांच्यात तणाव निर्माण होतो.

योग्य संवाद आणि शिक्षणाच्या माध्यमातून यावर नियंत्रण मिळवता येऊ शकते.

## २.३.४ आरक्षण धोरणाची वर्तमाणतील प्रासंगीकता

भारतासारख्या सामाजिकदृष्ट्या विविध आणि असमानतेने ग्रासलेल्या देशात आरक्षण धोरण केवळ एक राजकीय उपाय नाही, तर ऐतिहासिक अन्याय दूर करण्यासाठीचा एक सामाजिक न्यायाचा उपाय आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आरक्षण धोरणाची मांडणी करताना समाजातील वंचित घटकांना समान संधी आणि प्रतिष्ठा मिळवून देणे हा मूळ उद्देश ठेवला होता. आजही, दशकांनंतरही, आरक्षण धोरणाची प्रासंगिकता शाबूत आहे – किंबहुना, ती अधिक ठळक झाली आहे. या धोरणाचे मूल्य आणि गरज आजच्या बदलत्या सामाजिक, आर्थिक आणि राजकीय संदर्भात समजून घेणे महत्त्वाचे ठरते.

### सामाजिक विषमतेचा सातत्याने टिकून असलेला प्रभाव

भारतीय समाज अजूनही जातिव्यवस्थेच्या पायऱ्यांवर आधारलेला आहे. अनुसूचित जाती (SC), अनुसूचित जमाती (ST) आणि इतर मागासवर्ग (OBC) यांच्यावर अजूनही अनेक ठिकाणी सामाजिक भेदभाव, अस्पृश्यता, आणि बहिष्कार दिसतो.

राष्ट्रीय सर्वेक्षण आणि सामाजिक अहवाल दर्शवतात की दलितांवरील अत्याचार अजूनही संपलेले नाहीत. त्यामुळे आरक्षण ही सुधारणेची प्रक्रिया अजून अपूर्ण असून ती आजही प्रासंगिक आहे.

### २. शिक्षण व रोजगारात संधीतील असमतोल

उच्च शिक्षणात व शासकीय नोकर्यांमध्ये मागासवर्गीयांचा सहभाग तुलनेने कमी आहे. आरक्षणामुळेच अनेक दलित व ओबीसी विद्यार्थी आयआयटी, आयआयएम, एम्ससारख्या संस्थांमध्ये पोहोचू शकतात.

ग्रामीण व गरीब भागातील विद्यार्थ्यांना आरक्षण हे केवळ प्रवेशाचेच नव्हे, तर आत्मसन्मानाचेही साधन ठरते.

### ३. सामाजिक समावेश आणि प्रतिनिधित्व

लोकशाही व्यवस्थेत विविध समाजघटकांचे प्रतिनिधित्व असणे आवश्यक आहे. संसद, विधानसभा, स्थानिक स्वराज्य संस्था यामध्ये SC/ST/OBC समाजाचे प्रतिनिधित्व सुनिश्चित करण्यासाठी आरक्षण आजही अपरिहार्य आहे.

हे प्रतिनिधित्व केवळ राजकीय नसून निर्णयप्रक्रियेमध्ये सामाजिक दृष्टिकोन सहभागी करण्याचे साधन आहे.

### ४. वर्ग-आधारित गरजांची वाढती जाणीव

२०१९ मध्ये १०३ वी घटनादुरुस्ती करून आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी (EWS) १०% आरक्षण लागू करण्यात आले. यामुळे सामाजिक आरक्षणाच्या व्याख्येमध्ये वर्गीय गरजांचे स्थान वाढू लागले आहे.

काही शैक्षणिक व सामाजिक अभ्यासक यावरून विचार मांडतात की “जात + वर्ग” आधारित धोरणे ही पुढील टप्प्यातील गरज असू शकते.

### ५. सामाजिक सौहार्द व असंतोष यातील समतोल

आरक्षणामुळे समाजात काही वर्गांमध्ये असंतोष आहे, विशेषतः सामान्य प्रवर्गात. हे असंतोष व्यवस्थापन व सामाजिक सौहार्द राखण्यासाठी सरकारने पुरवणी उपाय करणे आवश्यक आहे:

गुणवत्तेवर आधारित संधी वाढविणे

शैक्षणिक सुविधा सर्वांसाठी सुलभ करणे

कौशल्यविकास कार्यक्रम अधिक सर्वसमावेशक बनविणे

६. डिजिटल युगात समता आणि प्रवेश

डिजिटल शिक्षण, स्पर्धा परीक्षा, तांत्रिक प्रशिक्षण यामध्येही मागासवर्गीय समाजाचा प्रवेश सुलभ होण्यासाठी आरक्षण महत्त्वाचे आहे. आर्थिकदृष्ट्या दुर्बल व सामाजिकदृष्ट्या मागासवर्गांसाठी डिजिटल अंतर कमी करण्यासाठी आरक्षण हे मदत करणारे धोरण ठरू शकते.

**७. जागतिक स्तरावर समतावादी धोरणांची तुलना**

अमेरिका, दक्षिण आफ्रिका, ब्राझील सारख्या देशांमध्ये देखील Affirmative Action किंवा Positive Discrimination धोरणे राबवली जातात.

त्यामुळे भारतातील आरक्षण हे केवळ देशांतर्गत नव्हे, तर आंतरराष्ट्रीय सामाजिक न्यायाच्या अंगानेही सुसंगत धोरण आहे.

### २.३.५ सारांश

आरक्षण धोरण हे भारतातील ऐतिहासिक सामाजिक अन्याय दूर करण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मांडलेले एक मूलभूत सामाजिक न्यायाचे तत्त्व आहे. त्यांनी आरक्षणाला कोणताही दानधर्म न मानता, हे एक हक्क असल्याचे स्पष्ट केले. भारतीय संविधानात त्यांनी अनुसूचित जाती, जमाती आणि अन्य मागासवर्गीयांसाठी शिक्षण, नोकरी व राजकीय प्रतिनिधित्वात आरक्षणाची तरतूद करून सामाजिक समतेच्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल उचलले.

आजही भारतात जातीय विषमता, सामाजिक बहिष्कार व आर्थिक दुर्बलता कायम असल्याने, आरक्षण धोरणाची गरज आणि प्रासंगिकता अधिक तीव्रपणे जाणवते. मंडल आयोग, आर्थिक दुर्बल घटकांसाठी १०% आरक्षण आणि विविध सामाजिक गटांच्या प्रतिनिधित्वाच्या मागण्या यामुळे आरक्षणाचा परीघ विस्तारला आहे.

परंतु यासोबतच आरक्षणाच्या मर्यादा, त्याचा गैरवापर आणि गुणवत्तेविषयीच्या वादांचीही चर्चा सुरू आहे. त्यामुळे डॉ. आंबेडकरांच्या मार्गदर्शनानुसार, आरक्षण हे तात्पुरते पण परिणामकारक साधन समजून, त्याचा वापर समतेची खरी कल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी व्हावा, हे आवश्यक आहे.

आरक्षण धोरण हे केवळ मागासवर्गीयांसाठी आरक्षित जागांची व्यवस्था नसून, भारतातील सामाजिक लोकशाही सुदृढ करण्याचे एक प्रभावी माध्यम आहे.

## २.४ डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे कामगार धोरण

भारतातील सामाजिक, आर्थिक आणि राजकीय पुनर्रचनेच्या प्रक्रियेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान अत्यंत व्यापक, क्रांतिकारी महत्वाचे आहे. बहुतांशी त्यांच्या योगदानाचा उल्लेख दलित मुक्ति, सामाजिक न्याय, वंचित समुदायांचे हक्क आणि भारतीय संविधानाच्या निर्मितीपर्यंतच मर्यादित केले जाते. मात्र, कामगार धोरण, औद्योगिक हक्क आणि आर्थिक लोकशाही या क्षेत्रांतील त्यांचे कार्य आणि दृष्टीकोनही तितकाच महत्त्वाचा, पण तुलनेत दुर्लक्षित राहिलेला आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना श्रमिक वर्गाच्या सशक्तीकरणाचे महत्त्व पूर्णपणे जाणवले होते. त्यांनी कामगार हा फक्त उत्पादनाचे साधन नसून एक मानव म्हणून त्याच्या अधिकारांची, प्रतिष्ठेची आणि सुरक्षिततेची हमी दिली पाहिजे, असा विचार मांडला. त्यांचा विश्वास होता की, आर्थिक आणि सामाजिक समतेशिवाय राजकीय लोकशाही अपूर्ण आहे. म्हणूनच त्यांनी श्रमिकांच्या जीवनशैलीत आमूलाग्र सुधारणा घडवून आणण्यासाठी वैधानिक, धोरणात्मक आणि प्रशासकीय पातळीवर मूलभूत बदल घडवून आणले.

१९४२ ते १९४६ या काळात व्हाईसरॉयच्या कार्यकारी परिषदेचे कामगार सदस्य म्हणून त्यांनी जो व्यापक कायदेविषयक आणि धोरणात्मक विचार मंडला, त्याने आधुनिक भारताच्या कामगार कायदांचा पाया घातला गेला. त्यांनी केवळ किमान वेतन किंवा कामाचे तास निश्चित करण्यावर भर दिला नाही, तर स्त्री कामगारांचे संरक्षण, सामाजिक सुरक्षा, औद्योगिक आरोग्य, कर्मचारी विमा, कोळसा खाण कामगारांचे हक्क आणि कामगार संघटनांची स्वतंत्रता यांसारख्या विषयांवरही निर्णायक भूमिका घेतली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे कामगार धोरण हे त्यांच्या सामाजिक लोकशाहीच्या विचारसरणीचा एक अविभाज्य भाग होते. त्यांनी जात आणि वर्ग यांचे छेदनबिंदू अधोरेखित करून दलित कामगारांच्या दुहेरी शोषणाची जाणीव जनतेला करून दिली. त्यांच्या मते, भारतात खऱ्या आर्थिक सुधारणा शक्य होण्यासाठी जाती-आधारित व्यावसायिक व सामाजिक भेद नाहीसे करणे गरजेचे आहे. त्यांनी "जातीव्यवस्था ही केवळ श्रमाची विभागणी नसून श्रमिकांचीही विभागणी आहे" असे स्पष्ट करत श्रमिकांच्या सन्मानपूर्ण जीवनाचा आणि सामाजिक पुनर्व्यवस्थेचा अंतर्भाव त्यांच्या धोरणांत केला. त्यामुळेच आंबेडकरांचे कामगार धोरण हे फक्त श्रमिक सुधारणा नव्हते, तर एक व्यापक सामाजिक क्रांती होते.

आजच्या जागतिकीकरणाच्या, तंत्रज्ञानवाढीच्या आणि असंघटित क्षेत्राच्या विस्ताराच्या पार्श्वभूमीवर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कामगार धोरण अधिकच प्रासंगिक ठरते. असुरक्षितता, अल्पवेतन, कामाच्या अस्थिर अटींमध्ये जगणाऱ्या करोडो मजुरांसाठी त्यांच्या विचारांमध्ये मार्गदर्शनाची शक्ती आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे कामगार हक्कांना आर्थिक लोकशाहीचा एक आवश्यक घटक मानत होते, ही संकल्पना राजकीय आणि सामाजिक लोकशाहीला पूरक ठरण्यासाठी आवश्यक असल्याचे त्यांचे मत होते. त्यांच्यासाठी, कामगार वर्गाचे - विशेषतः जातीच्या पदानुक्रमाच्या सर्वात खालच्या पायरीवर असलेल्या घटकाचे - सक्षमीकरण करणे हे भारतीय समाजात न्याय, स्वातंत्र्य आणि समानता साध्य करण्यासाठी आवश्यक आहे.

### २.४.१ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कामगार तत्वज्ञान:

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे केवळ भारताच्या संविधानाचे शिल्पकार नव्हते, तर ते एक तत्त्वज्ञ, अर्थतज्ज्ञ, कायदेपंडित आणि कामगार हक्कांचे प्रभावी संरक्षक होते. त्यांच्या विचारसरणीचा पाया सामाजिक समतेवर आधारलेला असला, तरी त्याचे एक महत्त्वाचे अंग म्हणजे आर्थिक समता आणि कामगार वर्गाचे न्याय्य हक्क. त्यांनी स्पष्टपणे म्हटले होते की, “राजकीय लोकशाही टिकवायची असेल तर आर्थिक लोकशाही अनिवार्य आहे.” म्हणूनच त्यांच्या कामगार विषयक विचारांमध्ये केवळ वेतन आणि कामाच्या तासांपुरता मर्यादित

विचार नसून त्यामागे सामाजिक न्याय, मानवी प्रतिष्ठा आणि संपत्तीचे पुनर्वितरण यांचे व्यापक तत्त्वज्ञान कार्यरत होते.

**१. कामगारांची प्रतिष्ठा – श्रमाचा सन्मान**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मते, कामगार वर्ग हा समाजाचा उत्पादन कणा आहे. त्यांनी ठामपणे सांगितले की काम हा केवळ उपजीविकेचा मार्ग नसून, तो सामाजिक योगदानाचे प्रतीक आहे. त्यामुळे कामगाराचे मूल्यांकन फक्त त्याच्या उत्पादनक्षमतेनुसार करता कामा नये; तर त्याच्या श्रमाला समाजात आदर आणि प्रतिष्ठा मिळाली पाहिजे. त्यांनी ब्रिटिश भारतात कामाचे तास ८ निर्धारित करून कामगारांना माणूस म्हणून जगण्याचा हक्क मिळवून दिला.

**२. राज्याची जबाबदारी – कामगारांचे संरक्षण**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मते, मुक्त अर्थव्यवस्थेत कामगारांचे हित दुर्लक्षित राहते. त्यामुळे कामगारांचे संरक्षण करणारे कायदे निर्माण करणे ही राज्याची जबाबदारी ठरते. तसेच या कायद्याची सुनिश्चित अंमलबजावणी हे देखील राज्याचे कर्तव्य आहे. डॉ. बाबसहेब आंबेडकरांनी कामगारांसाठी अनेक कायदे तयार केले – जसे की फॅक्टरी ॲक्टमध्ये सुधारणा, कामगार कल्याण निधी, सामाजिक सुरक्षा योजना, महिला आणि बाल कामगारांचे संरक्षण इ. त्यांनी मते, "राज्याने फक्त 'रक्षक' नसून 'सक्रिय हस्तक्षेपकर्ता' असावे," जे श्रमिकांच्या न्यायासाठी आवश्यक आहे.

**३. आर्थिक पुनर्वितरण – न्याय वाटपाचा आग्रह**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे अर्थशास्त्राचे अभ्यासक होते, त्यामुळे ते म्हणत की, संपत्तीची असमानता ही सामाजिक विषमतेची मूळ कारण आहे. या आधारे त्यांनी आर्थिक पुनर्वितरणाचा आग्रह धरला. त्यांचे म्हणणे होते की, कामगारांना फक्त श्रमाचे मूल्य मिळणे पुरेसे नाही, तर उत्पादनात त्यांचे जे योगदान आहे त्यामध्ये ते भागीदार असले पाहिजे. यामुळेच त्यांनी राष्ट्रीयकरण, सामाजिक मालकी आणि श्रमिकांचे सामूहिक हित यासारख्या संकल्पना मांडल्या.

**असुरक्षित कामगारांचे संरक्षण – जात आणि वर्ग यांचा समन्वय डॉ.**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा दृष्टिकोन हा केवळ वर्गविरोधावर आधारित नव्हता, तर त्यांनी जात आणि वर्ग या दोन्हींचे एकत्रित विश्लेषण केले. त्यांच्या निरीक्षणानुसार, भारतातल्या सर्वात उपेक्षित, असंघटित आणि कमी वेतनाच्या कामांमध्ये प्रामुख्याने दलित आणि मागासवर्गीय कामगार भरलेले असतात. त्यामुळे कामगार कायद्यांना जात-जागरूकता असणे अत्यावश्यक आहे. त्यांनी यासाठी सामाजिक आरक्षण, समान संधी आणि विशेष उपाययोजना यांचा आग्रह धरला.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या कामगार तत्वज्ञानाची आजच्या काळातील गरज**

आजच्या गिग इकॉनॉमी, असंघटित क्षेत्रातील वाढ, तंत्रज्ञानामुळे निर्माण होणाऱ्या अस्थिर रोजगार, आणि कामाच्या बदलत्या स्वरूपाच्या पार्श्वभूमीवर, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे

विचार अधिकच महत्त्वाचे ठरतात. आजही अनेक मजूर कंत्राटी पद्धतीने काम करत असून त्यांना सामाजिक सुरक्षा मिळत नाही. अशा वेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मांडलेले सामूहिक हक्क, राज्याची जबाबदारी, आणि आर्थिक समतेचे तत्त्वज्ञान हे धोरणकर्त्यांसाठी मार्गदर्शक ठरते.

### २.४.२ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या कायदेविषयक व प्रशासकीय सुधारणा

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे भारतीय संविधानाचे शिल्पकार म्हणून ओळखले जात असले, तरी त्यांनी कामगार क्षेत्रात केलेले योगदान हे तितकेच क्रांतिकारक आहे. १९४२ ते १९४६ या कालावधीत व्हायसरॉयच्या कार्यकारी परिषदेतील कामगार सदस्य म्हणून, तसेच १९४७ ते १९५१ दरम्यान भारताचे पहिले कायदा मंत्री म्हणून, त्यांनी कामगार हक्क, कामगार कल्याण, सुरक्षा आणि आर्थिक न्यायाच्या दिशेने अनेक ऐतिहासिक सुधारणा घडवून आणल्या. त्या पुढील प्रमाणे

### अ. प्रमुख कायदेविषयक आणि प्रशासकीय सुधारणा (१९४२–१९४६)

#### १. किमान वेतन कायदा (१९४८|)

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे कायदेशीररित्या निश्चित किमान वेतन या संकल्पनेचे पुरस्कर्ते होते. त्यांनी असा आग्रह धरला की, प्रत्येक कामगाराला मूलभूत गरजा पूर्ण करण्यासाठी पुरेसे वेतन मिळाले पाहिजे. किमान वेतन कायदा १९४८ मध्ये लागू झाला, पण त्याचा तात्विक पाया डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पूर्वीच्या कामगिरीने तयार केला होता.

#### कामाचे तास कमी करणे

सन १९४६ मध्ये, त्यांनी औद्योगिक कामगारांचे कामाचे तास १२ वरून ८ केले. यामुळे भारताने ILO च्या जागतिक मानकांशी सुसंगत धोरण स्वीकारले.

“कामाचा दिवस असा असावा की कामगाराला थोडा वेळ विश्रांती मिळेल, आत्म-विकासासाठी थोडा वेळ मिळेल.” — डॉ. बाबासाहेब आंबेडकर, कामगार परिषद, १९४३

#### मातृत्व लाभ कायदा १९४१

डॉ. बाबसहेबणी स्त्री कामगारांच्या हक्कांचे संरक्षण करण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मातृत्व लाभा कायद्यासाठी पुढाकार घेतला. हा आशिया खंडातील प्रारंभीच्या मातृत्व संरक्षण कायद्यांपैकी एक होता.

#### कर्मचारी राज्य विमा (ESI) योजना

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ESI योजनेची संकल्पना मांडली, जी औद्योगिक कामगारांना वैद्यकीय विमा संरक्षण पुरवते. ही योजना वसाहतकालीन भारतातील सर्वात प्रगत सामाजिक सुरक्षा योजनांपैकी एक होती.

**कोळसा खाणींचे संरक्षण आणि कल्याण**

कोळसा खाणी आणि रेल्वेसारख्या धोकादायक क्षेत्रात कामगारांच्या सुरक्षिततेसाठी नियम लागू केले. कामाच्या अटी, आरोग्य, निवास आणि सुविधा यामध्ये सुधारणांचा समावेश घडाऊन आणला.

**भारतीय कामगार संघटना (सुधारणा) विधेयक, १९४३**

कामगार संघटनांना कायदेशीर मान्यता आणि सामूहिक हकांचे संरक्षण करण्याचा अधिकार दिला. यामुळे कामगार चळवळीला संस्थात्मक पाठबळ मिळाले.

**ब. आंतरराष्ट्रीय स्तरावर आंबेडकरांचे योगदान**

**१. ILO मध्ये भारताचे प्रतिनिधित्व**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारताच्या वतीने आंतरराष्ट्रीय कामगार संघटना (ILO) मध्ये प्रतिनिधी पाठवले. त्यांच्या अहवालांत तीन गोष्टींवर भर:

कामगार कल्याण आणि आर्थिक विकास यांचा परस्परसंबंध

जात आणि वर्ग यांचे एकत्रित विश्लेषण

भारताने नैतिक कामगार नेता म्हणून उदयास यावे

**क. जात आणि कामगार: डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा विशेष दृष्टिकोन**

**१. दुहेरी शोषणाचा मुद्दा**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्पष्टपणे म्हणतात की, दलित कामगारांना दुहेरी शोषणाचा सामना करावा लागतो – एकतर ते मजूर असल्यामुळे आणि दुसरे त्यांच्या जातीमुळे. अर्थात भंडावलदारकडून होणारे श्रमाचे शोषण आणि सामाजिक व्यवस्थेतून होणारे जातीआधारित शोषण असया दुहेरी शोषणाला दलित कामगार बळी पडतात.

"जाती व्यवस्था ही केवळ श्रमाची विभागणी नाही; ती कामगारांची विभागणी देखील आहे."
- बी. आर. आंबेडकर, जातीचे उच्चाटन, १९३६

**२. जात-जागरूक कामगार धोरणे**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मागणी केली की, खऱ्या कामगार सुधारणा जात-आधारित व्यावसायिक विभाजनाच्या निर्मूलनापासूनच सुरू होतात. कामगार चळवळीने स्वतःतील जातीय पातळ्यांवरही आत्मपरीक्षण करावे अशी त्यांची मागणी होती.

**ड. स्वातंत्र्योत्तर कार्य आणि संविधान निर्मितीत योगदान**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय संविधानाच्या माध्यमातून रुजवलेल्या लोकशाही व्यवस्थेत कामगारांचे कल्याण निहित आहे. टयांनी भारताचे कायदा मंत्री असताना

निर्धारित केलेले कामगार धोरण आजच्या भांडवली व्यवस्थेत होणाऱ्या कामगारांच्या शोषणाला वाचा फोडणारे आहे.

**१. कायदा मंत्री म्हणून योगदान (१९४७–१९५१)**

औद्योगिक विवाद कायदा, १९४७ च्या मसुद्याला अंतिम स्वरूप देण्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा मोलाचा वाटा होता. त्यांनी कामगार हक्कांचे संरक्षण करणाऱ्या तत्त्वांना संविधानात अंतर्भूत केले.

**२. राज्य धोरणातील तत्त्वे (Directive Principles of State Policy):**

कलम ३९ – समान कामासाठी समान वेतन

कलम ४१ – बेरोजगारीतील सार्वजनिक मदतीचा हक्क

कलम ४३ – जीवनमान वेतन व चांगल्या कामाच्या अटी

ही तत्त्वे न्याय्य नसली तरी, भविष्यातील कामगार धोरणांसाठी मार्गदर्शक ठरली.

### २.४.३ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या कामगार धोरणावरील टीका

काही टीकाकारांचा असा युक्तिवाद आहे की डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सुधारणा केवळ संघटित क्षेत्रापुरत्या मर्यादित होत्या, कृषी आणि अनौपचारिक कामगारांना वगळण्यात आले. तथापि, त्यांनी घातलेला संस्थात्मक पाया पुढील विषयांवर वादविवादांना माहिती देत आहे:

- सार्वत्रिक सामाजिक सुरक्षा
- कामगार संहिता सुधारणा
- कामगार संघटनांमध्ये दलितांचा सहभाग

आधुनिक कामगार चळवळी आणि धोरणनिर्मितीवर प्रभाव पाडणारे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर कामगार न्यायासाठी एक दीपस्तंभ राहिले आहेत.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे भारतीय कामगार धोरणातील योगदान संविधान आणि सामाजिक सुधारणांवरील त्यांच्या कार्याइतकेच सखोल आहे. त्यांचे दृष्टिकोन कल्याणाच्या पलीकडे कामगार संबंधांच्या परिवर्तनापर्यंत विस्तारलेले होते, जे प्रतिष्ठा, समानता आणि राज्य जबाबदारीवर आधारित होते. आंबेडकरांनी ओळखले की राजकीय लोकशाही आर्थिक लोकशाहीशिवाय टिकू शकत नाही आणि त्यांच्या कामगार धोरणात या विश्वासाचे दृढनिश्चय आणि स्पष्टतेने प्रतिबिंब पडले.

## २.४ सारांश

प्रस्तुत घटकात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मांडलेला ब्रोकन लोक सिद्धांत, आरक्षण धोरण आणि कामगार हक्क या विषयीचे विचार बहुआयामी सवारुपचे आहेत. त्याची

मांडलेला ब्रोकन लोक (ब्रोकन मेन) सिद्धांत हा अस्पृश्य हे मूळतः विस्थापित आणि पराभूत आदिवासी, आदिम समुदाय होते ज्यांना समाजाच्या परिघावर राहण्यास भाग पाडले गेले होते, नंतर ब्राह्मणी नियमांपासून सांस्कृतिक आणि धार्मिक विचलनामुळे त्यांना 'अपवित्र' म्हणून लेबल केले गेले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर त्यांच्या उपेक्षिततेला त्यांच्या वैदिक नसलेल्या ओळखीशी आणि बौद्ध धर्माशी असलेल्या ऐतिहासिक संबंधांशी जोडतात, अस्पृश्यतेला नशिबाऐवजी सामाजिक-राजकीय परिणाम म्हणून मांडतात.

दुसरा विभाग डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या आरक्षण धोरणाच्या समर्थनाचे विश्लेषण सकारात्मक कृती आणि सामाजिक न्यायाची यंत्रणा म्हणून करण्यात आले आहे. बाबासाहेबांनी पीडितांसाठी प्रतिनिधित्व आणि प्रतिष्ठा सुनिश्चित करण्यासाठी आरक्षण ही नैतिक आणि संवैधानिक गरज म्हणून पाहिले. त्यांनी भारतीय संविधानात हे दृष्टिकोन अंतर्भूत केले आणि असा युक्तिवाद केला की सामाजिक न्यायाशिवाय लोकशाही पोकळ आहे.

शेवटचा विभाग भारताच्या कामगार धोरणाला आकार देण्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या महत्त्वपूर्ण भूमिकेवर लक्ष केंद्रित करण्यात आले आहे. व्हाईसरॉयच्या कार्यकारी परिषदेत कामगार सदस्य म्हणून (१९४२-४६) या कालावधीत त्यांनी किमान वेतन, मातृत्व लाभ आणि ८ तासांच्या कामाच्या दिवसासह प्रमुख सुधारणा घडवून आणल्या. त्यांनी श्रमाची प्रतिष्ठा, उपेक्षित कामगारांचे संरक्षण आणि आर्थिक न्यायात राज्याची जबाबदारी यावर भर दिला. त्यांचे कामगार तत्वज्ञान जात आणि वर्ग यांना एकमेकांशी जोडणारे होते, लोकशाही समाजवाद आणि कामगार कायद्यात सामाजिक न्यायाचे एकत्रीकरण यांचे ते समर्थन करत होते.

हे तिन्ही विषय एकत्रितपणे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या स्वातंत्र्य, समानता, बंधुता आणि न्यायावर रुजलेल्या लोकशाहीच्या समग्र दृष्टिकोनाचे प्रतिबिंबित करतात.

## २.६ प्रश्न

१. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या 'ब्रोकन मेन थिअरी'चे परीक्षण करा.

२. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी विकसित केलेल्या आरक्षण धोरणाच्या तात्विक आणि संवैधानिक पायावर चर्चा करा.

३. ब्रिटिश राजवटीत कामगार धोरणात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या योगदानाचे मूल्यांकन करा.

४. सामाजिक-राजकीय रचना म्हणून आंबेडकरांच्या जातीच्या संकल्पनेवर चर्चा करा.

५. भारताच्या आरक्षण धोरणाला आकार देण्यात पुणे करार (१९३२) चे महत्त्व काय होते? त्यावरील आंबेडकरांच्या भूमिकेचे थोडक्यात मूल्यांकन करा.

## २.७ संदर्भ


- जातपात तोडक मंडळ, लाहोर सन १९३६ च्या वार्षिक अधिवेशनाकरिता डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी तयार केलेले भाषण.
- डॉ. आगलावे प्रदीप "समाजशास्त्रज्ञ डॉ. बाबासाहेब आंबेडकर, सुगावा प्रकाशन, प्रथमावृत्ती, मार्च २००१.
- फडके, य.दि., विसाव्या शतकातील महाराष्ट्र खंड-९, श्रीविद्या प्रकाशन, प्रथमावृत्ती, पुणे, १९८९..
- बी. सी. कांबळे, समग्र आंबेडकर चरित्र खंड २२, मुंबई.
- कसबे रावसाहेब, डॉ आंबेडकर आणि भारतीय राज्यघटना, सुगावा प्रकाशन, पुणे.
- जातपात तोडक मंडळ, लाहोर सन १९३६ च्या वार्षिक अधिवेशनाकरिता डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी तयार केलेले भाषण.
- डॉ. आगलावे प्रदीप "समाजशास्त्रज्ञ डॉ. बाबासाहेब आंबेडकर, सुगावा प्रकाशन, प्रथमावृत्ती, मार्च २००१.
- ओमव्हेट गेल: "दलित आणि वसाहती भारतातील लोकशाही क्रांती", सेज प्रकाशन, नवी दिल्ली.
- गोर एम. एस.: "एक धार्मिक विचारसरणीचा सामाजिक संदर्भ: डॉ. आंबेडकरांचे राजकीय आणि सामाजिक विचार, सेज प्रकाशन, नवी दिल्ली.
- चां. भ. खैरमोडे, भी. रा. आंबेडकर, चरित्र खंड २, सुगावा प्रकाशन, व्दितीय आवृत्ती, पुणे, १९९१.
- डॉ. बाबासाहेब आंबेडकर, बहिष्कृत भारत आणि मूकनायक, महाराष्ट्र शासन, १९९०.
- नलिनी पंडित, आंबेडकर, मुंबई ग्रंथालय प्रकाशन, प्रथमावृत्ती,१९९६.
- Ambedkar, B. R. (1936). Annihilation of Caste. Delhi: Navayana.
- Ambedkar, B. R. (1992). Dr. Babasaheb Ambedkar: Writings and Speeches, Vol. 2, 9, 10, 13. Education Dept., Govt. of Maharashtra.
- Zelliot, Eleanor. From Untouchable to Dalit: Essays on the Ambedkar Movement. Manohar, 1996.

# ३

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे राजकीय पक्ष

**घटक रचना :**


३.० उद्दिष्ट्ये

३.१ प्रस्तावना

३.२ डॉ. बाबासाहेबांचा उदय आणि राजकीय पार्श्वभूमी

३.४ स्वतंत्र मजूर पक्ष

३.४.१ स्वतंत्र मजूर पक्षाची उद्दिष्टे

३.४.२ स्वतंत्र मजूर पक्षाचे कार्य

३.५ भरतीय शेडयूल्ड कास्ट फेडरेशन (All India Scheduled Caste Federation)

३.५.१ शेडयूल्ड कास्ट फेडरेशन च्या स्थापने मागील भूमिका

३.५.२ 'शेडयूल्ड कास्ट फेडरेशन' ची स्थापना

३.५.३ परिषदेचे उद्देश खालीलप्रमाणे

३.५.४ शेडयूल्ड कास्ट फेडरेशन आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर

३.६ रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया स्थापनेची संकल्पना

३.६.१ ऐतिहासिक पार्श्वभूमी

३.६.२ रिपब्लिकन पक्षांची उद्दिष्टे

३.६.३ अंतर्गत गटबाजी आणि नेतृत्व संकट

३.६.४ नेतृत्व संघर्षाची कारणे

३.६.५ अंतर्गत गटबाजीचे परिणाम

३.७ सारांश

३.७ प्रश्न

३.८ संदर्भ


## ३.० उद्दिष्ट्ये

१. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या स्वतंत्र मजूर पक्ष (ILP), ऑल इंडिया शेड्युल्ड कास्ट्स फेडरेशन (AISCF) आणि रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (RPI) यांची निर्मिती, विचारधारा आणि राजकीय रणनीती समजून घेणे.

२. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या राजकीय विचारांच्या उत्क्रांतीचे विश्लेषण करणे, विशेषतः वर्ग-आधारित ते जाती-आधारित एकत्रीकरण धोरणांकडे कसे गेले हे समजून घेत येईल.

३. दलित आणि इतर उपेक्षित घटकांसाठी सामाजिक, आर्थिक आणि राजकीय न्याय प्राप्तीसाठी ILP, AISCF आणि RPI च्या उद्दिष्टांचे आणि कामगिरीचे अध्ययन करणे.

४. भारतीय संवैधानिक विकास, आरक्षण धोरण आणि दलित सक्षमीकरणात आंबेडकरवादी पक्षांची भूमिका अभ्यासणे .

५. आधुनिक भारतीय राजकारणात अंतर्गत गटबाजी, वैचारिक कमकुवतपणा आणि उपेक्षितता यासह RPI समोरील आव्हानांचे टीकात्मक परीक्षण करणे.

## ३.१ प्रस्तावना

डॉ. बाबासाहेब आबेडकरांचा सामाजिक विचार, आर्थिक विचार, धार्मिक चिंतन आणि वाङ्मयीन विचार ह्यावरील वैशिष्ट्यपूर्ण विविध पैलूंचा शोध प्रत्येक अभ्यासकाने आपापल्या भूमिकेच्या अनुषंगाने घेतला आहे. त्यामध्ये राखीव जागेचा प्रश्न, स्वातंत्र्यपूर्वकालातील दलित चळवळ, कामगार विषयक धोरण, स्वतंत्र मजूर पक्ष, शे. का. फेडरेशन, बाबासाहेबांचे समकालीन, बाबासाहेबांचे शेतीविषयक विचार, इत्यादी विविध विषयावर डॉ. आंबेडकराचे चिंतन अधिक सखोल, मूलगामी आणि सर्वसमावेशक असे होते. डॉ. बाबासाहेब हे समाजचितक असल्यामुळे समाजातील व्यक्तीगनांच्या अनेक गरजांचे, त्यांना सतत भान आहे. इथला माणूस अनेक अंधश्रद्धांनी, भयगंडांनी पापकल्पनांनी आणि संकुचित परिघातील अनके दोषांनी बधीर झालेला आहे, हे त्यांनी ओळखले होते. जातिभेदाच्या दाहकतेचे चटके बाबासाहेबांनी लहानपणापासूनच सोसले होते. धर्ममूढांनी केलेल्या अपमानांनी ते अनेकदा घायाळ झाले होते.

म्हणून त्यांचा लढा हा अस्पृश्यतेचा लढा, असे वरकरणी वाटत असले, तरी तो खऱ्या अर्थाने मानव मुक्तीचा लढा होता. स्वातंत्र्य, समता, बंधुता या मूल्यांचा शोधच तो होता, त्यामुळेच माणूस हा विज्ञाननिष्ठ व्हावा, त्याच्या हक्काची माणुसकीची व अस्मितेची त्याला जाणीव व्हावी यासाठी माणून त्यांनी सम्यक सामाजिक परिवर्तनाची कृत्तीशील लढाई केली. जातिनिर्मूलन ह्या ग्रंथात केलेली मांडणी, स्वतंत्र मजूर पक्षाचा जाहिरनामा, भरतीय शेडयूल्ड कास्ट फेडरेशन, 'स्टेट्स अँड मायनॉरिटी' यातील विश्लेषण आणि लोकशाही शासन प्रणालीचा पुरस्कार करणाऱ्या भारतीय राज्यघटनेचे लेखन यातूनच त्यांचे क्रांतिकारकत्व सिद्ध होते. भारतीय समाजरचनेच्या सर्व अंगोपांगांचा अत्यंत सूक्ष्म विचार डॉ. बाबासाहेबांनी केलेला होता. राष्ट्राला कोणत्या दिशेने घेऊन जावयाचे याचा नेमका आराखडा त्यांच्या लोकशाही, स्वतंत्र मजूर पक्ष, भरतीय शेडयूल्ड कास्ट फेडरेशन आणि ‘रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया’ ध्येय धोरणातील सर्वस्पर्शी विचारात आढळतो.

## ३.२ डॉ. बाबासाहेबांचा उदय आणि राजकीय पार्श्वभूमी

डॉ. आंबेडकरांचा उदय हा सामाजिक आणि शैक्षणिक संघर्षातून झाला. कोलंबिया विद्यापीठ व लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स येथील शिक्षणाने त्यांना आर्थिक, कायदेशीर आणि राजकीय विचारांचा भक्कम पाया दिला. त्यांनी महाड सत्याग्रह (१९२७) आणि

काळाराम मंदिर प्रवेश आंदोलन (१९३०) यांसारख्या सत्याग्रहांच्या माध्यमातून अस्पृश्यांना सामाजिक समता आणि मानवी प्रतिष्ठा मिळवून देण्याचा प्रयत्न केला. डॉ. बाबासाहेबांचा राजकीय नेतृत्वाचा प्रारंभ प्रामुख्याने १९१९ साली 'सायमन कमिशन' आले त्यावेळी दिलेल्या निवेदनाच्या वेळी झाला होता, असे आढळते. त्यावेळी प्रथमच अस्पृश्यांची राजकीय क्षेत्रात दखल घेण्यात आली. त्यावेळी बाबासाहेब प्राध्यापक होते. प्रथमच त्यांनी राजकीय यश मिळविले. सायमन कमिशन (१९२८) विरोधात काँग्रेसने बहिष्कार दिला असतानाही डॉ. आंबेडकरांनी दलितांचे स्वबळाचे प्रतिनिधित्व करत कमिशनसमोर साक्ष दिली आणि त्यांना स्वतंत्र राजकीय हक्कांची गरज स्पष्टपणे मांडली. साउथबरो कमिशनमध्येही त्यांनी स्वतंत्र मतदारसंघांची मागणी लावून धरली. क्रिप्स मिशन आणि गोलमेज परिषदा (१९३०–३२) यामध्येही त्यांनी दलित समाजाच्या राजकीय हक्कांसाठी ठाम भूमिका घेतली. तथापि, पुणे करार (१९३२) हा त्यांच्यासाठी तडजोडीचा क्षण होता, जिथे त्यांनी स्वतंत्र मतदारसंघांऐवजी राखीव जागांना मान्यता दिली. राजकीय दृष्टीने डॉ. आंबेडकरांनी बहिष्कृत हितकारिणी सभा (१९२४), इंडिपेंडंट लेबर पार्टी (१९३६), आणि शेड्युल्ड कास्ट फेडरेशन (१९४२) अशा संघटनांच्या स्थापनेद्वारे शोषितांच्या राजकीय हक्कांची चळवळ उभी केली. त्यांनी माणगाव परिषद (१९३७) च्या माध्यमातून समाजाच्या सामाजिक जागृतीचा निर्धार केला.

बहिष्कृत भारतीयांना लोकसंख्येच्या प्रमाणात प्रतिनिधित्व लाभावे, यासाठी बाबासाहेबांनी सामाजिक व राजकीय लढे दिलेत. एवढेच नव्हे तर हे लढे प्रभावी व परिणामकारी ठरावे, त्यामध्ये सातत्यपणा टिकावा, म्हणून सामाजिक व राजकीय संघटनांना एक व्यवस्था परिवर्तनांचे प्रभावी साधन बनावे, म्हणून त्या संघटनांस अनुकूल चळवळ व ग्रंथांची मांडणी केली. आपली भूमिका आजमावन्यासाठी पत्रकारीतेच्या क्षेत्रातही बाबासाहेबांनी आपला वेगळाच असा आंबेडकरी ठसा उमठविलेला आढळतो.

## ३.४ स्वतंत्र मजूर पक्ष

डॉ. बाबासाहेबांनी बहिष्कृत हितकारणी सभेऐवजी स्वतंत्र मजूर पक्ष स्थापन करण्याचा निर्णय घेतला, हीच त्यांची पहिली राजकीय संघटना होय. १९३५ चा कायदा अस्तित्वात आला. या कायद्याप्रमाणे राजकीय हित साधायचे तर राजकीय पक्ष स्थापन करणे आवश्यक होते. त्यानुसार त्यांनी स्वतंत्र मजूर पक्ष स्थापण्याचा निर्णय घेतला. कोणत्याही जातीय शब्दाऐवजी 'मजूर' हा वर्गीय शब्द यासाठी स्वीकारण्यात आला. ऑगष्ट १९३६ मध्ये हा पक्ष उदयास आला. हा स्वतंत्र मजूर पक्ष सर्व धर्माच्या, जातीच्या लोकांना खुला होता. केवळ अस्पृश्य लोकापुरते मर्यादित स्वरुप या पक्षाचे नव्हते. त्या काळातील निरनिराळ्या पक्षांचे स्वरुप पाहून व त्यांच्या भूमिका आणि बांधणीतील गुणदोषाचा बारकाईने अभ्यास करुन बाबासाहेबांनी स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना केली होती. त्या पक्षाच्या ध्येय धोरणाचे स्वरूप त्यानीच ठरविले होते.

भारतातील हा पहिलाच धर्मातीत पक्ष होता. त्याकाळातील सर्वपक्ष व सर्व प्रमुख पक्ष हे धर्मावर अधारित होते. मुस्लिमलीग धर्मावर, हिंदू महासभा हिंदू धर्मावर अधारीत काँग्रेस वर वर दिसायला राष्ट्रीय असा होता. तरी काँग्रेसचा पाया सर्व धर्मीयांच्या व समाजाच्या

प्रतिनिधीत्वाचा होता. असे म्हणता येणार नाही. खरे पाहता तो वरुन राष्ट्रीय व आतून धार्मिक होता. आजही त्याचे स्वरुप तसेच आहे.

डॉ. बाबासाहेबांनी सर्व धर्मीय जाती जमातीना खुला ठेवण्यात आलेला हा स्वतंत्र मजूर पक्ष निर्माण करुन राजकीय आघाडीवर स्वतःचा ठसा उमटवला. या पक्षामुळे केवळ देशातील जनतेचेच नव्हे तर राजकर्त्यां ब्रिटिशांचे लक्ष केंद्रित झाले. १९३५ च्या घटनादुरुस्तीनुसार १९३७ मध्ये प्रांतिक कायदेमंडळाच्या निवडणूका होणार व त्या निवडणुकींना तोंड देत असता अस्पृश्यांचे घटनात्मक संरक्षण काँग्रेसपासून उद्धस्त होणार नाही, याची काळजी घेण्यासाठी जातीय अशा राजकीय संघटनेकडे न वळता या धर्मातीत पक्षाची स्थापना केली होती. दुसऱ्या बाजूने विचार करता काँग्रेस व स्वतंत्र मजूर पक्ष यात भेद आहेत. कायदे मंडळात जाऊन कायदेमंडळे मोडून टाकणे हे काँग्रेसचे उद्दिष्ट होते. तर कायदेमंडळात जाऊन कायदेमंडळाच्या माध्यमातून जनतेच्या विकासाची कामे करुन घ्यावीत. समाजातील विषमता दूर करावी, अडाणी मागास समाजाला योग्य शिक्षण द्यावे, हे या देशातील प्रमुख उद्देश स्वतंत्र मजूर पक्षाने नजरेसमोर ठेवले होते.

स्वतंत्र मजूर पक्षाच्या ध्येयधोरणाची माहिती देतांना बाबासाहेब म्हणतात, 'गोरगरीब, पद्दलित व श्रमजीवी वर्गाचे हितरक्षण व संरक्षण करणे हेच आमच्या पक्षाचे प्रमुख कार्य आहे. तत्वाशी तडजोड न करता कायदेमंडळातील कोणत्याही पक्षाशी तपशीलाच्या बाबातीत योग्य प्रसंगी आम्ही सहकार्य करु. केवळ अस्पृश्य मानलेल्या जातीच्यां हितासाठी हा पक्ष नसून सर्व जातीच्या शेतकरी, कामकरी कुळे, मध्यम वर्गीय लोक, किरकोळ व्यापार उद्दीम करणारे लोक यांच्या योग्य हितसंबंधाचे संरक्षण करुन त्यांना विशेष हक्क व सवलती मिळवून देणे हा या पक्षाचा हेतू आहे. कामगाराच्या मजुरीची किमान मर्यादा ठरवून कामाचे तास कमी करणे, गिरण्या व कारखान्यातील नोकरीची शाश्वती, बढती यांची कायदेशीर तरतूद करणे, कार्याचे योग्य वेतन, पगारी रजा, आजारी रजा, पेन्शन, अपघात नुकसान भरपाई, बेकार भत्ता, कामगारांसाठी स्वस्त भाड्याची आरोग्यशीर घरे, कामागारांचे कर्ज कमी करुन व्याजाच्या दरावर नियंत्रणा घालणे, घरभाडे कायदा करवून घेणे वगैरे गोष्टींचा समावेश स्वतंत्र मजूर पक्षाच्या कार्यक्रमात करण्यात आला. व आमंलासाठी कायदे घडवून आणण्याचा मजूर पक्ष प्रयत्न करील'.

अशाप्रकारे ग्रामीण समाजाला प्रागतिक करणे, विशिष्ट जातीची मक्तेदारी होणार नाही, असा स्वंतत्र मजूर पक्ष होता. शेती, व्यापार, शिक्षण, राजकारण, आणि सर्व क्षेत्रात या पक्षाने पूर्ण परिवर्तनाची भूमिका घेतलेली आढळते. या पक्षाल समाजक्रांती अभिप्रेत असल्याचे यावरुन स्पष्ट होते.

### १. स्वतंत्र मजूर पक्षाची (ILP) वैचारिक चौकट

लोकशाही समाजवाद: केवळ आर्थिक नव्हे तर सामाजिक क्षेत्रातही समता व स्वातंत्र्य यांची अंमलबजावणी. जातिवादविरोधी भूमिका: जात हा वर्गपेक्षा अधिक क्रूर अन्यायाचा प्रकार असल्याचा आंबेडकरांचा ठाम विश्वास होता.

**धर्मनिरपेक्षता:** धर्माच्या आधारे कोणताही भेद न करता सर्वांसाठी समान न्याय मिळाला पाहिजे.

**संवैधानिक मार्ग:** हळूहळू, कायदेशीर पद्धतीने बदल घडवून आणणे हे प्रमुख धोरण.

### ३.४.१ स्वतंत्र मजूर पक्षाची उद्दिष्टे

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्वतंत्र मजूर पक्षाची उद्दिष्टे संवैधानिक आणि लोकशाही मार्गांनी संरचनात्मक परिवर्तनावर स्पष्ट भर देऊन तयार केली. पक्षाची प्राथमिक उद्दिष्टे खालीलप्रमाणे होती:

**१. जाती आणि सामाजिक असमानतेचे उच्चाटन**

स्वतंत्र मजूर पक्षाचा उद्देश शतकानुशतके संस्थात्मकरित्या चालत असलेल्या ब्राह्मणवादी सामाजिक व्यवस्थेला नष्ट करणे होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा असा विश्वास होता की जात ही केवळ श्रमविभाजन नाही तर धार्मिक कट्टरतेद्वारे अंमलात आणलेली श्रमिकांची विभागणी आहे. त्यांनी असा समाज निर्माण करण्याचा प्रयत्न केला जिथे प्रत्येक व्यक्तीला समान संधी असतील, मग ती जात किंवा वर्ग काहीही असो. दलितांना अस्पृश्यता आणि सामाजिक बहिष्कारास कारणीभूत ठरणाऱ्या जाती-आधारित पदानुक्रमाचा अंत करणे हे एक प्रमुख उद्दिष्ट होते.

**२. आर्थिक न्याय आणि कामगार हक्क**

स्वतंत्र मजूर पक्ष कामगारांच्या हक्कांवर लक्ष केंद्रित केले, ज्यात किमान वेतन, मर्यादित कामाचे तास, संघटन करण्याचा अधिकार आणि शोषणापासून संरक्षण यांचा समावेश होता. आंबेडकरांनी मूलभूत उद्योगांचे राष्ट्रीयीकरण करण्याचा प्रयत्न केला आणि राज्य-नेतृत्वाखालील आर्थिक नियोजनाचा पुरस्कार केला. आयएलपीचा उद्देश जाती-आधारित भेदभाव आणि कामगार आणि शेतकऱ्यांचे आर्थिक शोषण रद्द करणे होता.

**३. कृषी सुधारणा**

स्वतंत्र मजूर पक्षाने जमीनदारी संपुष्टात आणण्याचा आणि जमीन जमीनदार आणि भूमिहीन शेतकऱ्यांना पुनर्वितरण करण्याचा प्रस्ताव मांडला. त्यांनी शेतीच्या जमिनीची राज्य मालकी आणि शेती उत्पादनांना योग्य भाव देण्याची मागणी केली. आयएलपीने शेतकरी आणि भूमिहीन मजुरांच्या हक्कांचा पुरस्कार केला. त्यांनी जमीनदारी व्यवस्था संपवण्याचा आणि जमीनदारांना जमीन देण्यासाठी जमीन सुधारणा आणण्याचा प्रयत्न केला.

**४. राजकीय लोकशाही**

स्वतंत्र मजूर पक्षाने सार्वत्रिक प्रौढ मताधिकार, नागरी स्वातंत्र्य आणि भाषण आणि विधानसभा स्वातंत्र्यासह संसदीय लोकशाहीची स्थापना करण्यास पाठिंबा दिला. त्याचे उद्दिष्ट कायदेमंडळात उपेक्षित आवाज आणणे होते. आयएलपीला कायदेमंडळांमध्ये दलित आणि मजुरांना आवाज मिळावा याची खात्री करायची होती. त्यांनी अशा धोरणांना प्रोत्साहन दिले जे दुर्लक्षित समुदायांना राजकीयदृष्ट्या सक्षम बनवतील.

**५. लिंग समानता**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी लोकशाही प्रक्रियेत महिलांचा समावेश आणि त्यांना शिक्षण आणि रोजगार मिळण्यावर भर दिला. त्यमुळे स्वतंत्र मजूर पक्षाच्या प्राथमिक उद्दिष्टांमध्ये त्यांनी लिंग समतेवर भर दिला आहे.

**६. धर्मनिरपेक्षता आणि राष्ट्रीय एकता**

स्वतंत्र मजूर पक्षाने अशा धर्मनिरपेक्ष राज्यासाठी वचनबद्ध होते जिथे धर्म सामाजिक आणि राजकीय धोरणांवर नियंत्रण ठेवणार नाही. जात, पंथ किंवा धर्म विचारात न घेता सर्व नागरिकांची समानता राखली. पक्षाने धर्मनिरपेक्ष मूल्यांना प्रोत्साहन दिले आणि धार्मिक किंवा जाती-आधारित विशेषाधिकारांऐवजी लोकशाही आणि संवैधानिक तत्त्वांवर चालणारे सरकार निर्माण करण्याचे उद्दिष्ट ठेवले.

**७. धोरणात्मक उद्दिष्टे**

औद्योगिक व कृषी कामगारांचे हक्क सुनिश्चित करणे.

दलित आणि इतर सामाजिकदृष्ट्या बहिष्कृत घटकांचे सक्षमीकरण.

संविधानिक मार्गांनी सामाजिक व आर्थिक लोकशाही प्राप्त करणे.

### ३.४.२ स्वतंत्र मजूर पक्षाचे कार्य:

१९३७ च्या बॉम्बे प्रांतीय निवडणुकांमध्ये आयएलपीने निवडणूक लढवली आणि १७ पैकी १५ जागा जिंकल्या होत्या. डॉ. आंबेडकर स्वतः बॉम्बे विधानसभेवर निवडून आले. पक्षाच्या मजबूत कामगिरीने दलित, कामगार आणि समाजातील प्रगतीशील घटकांमध्ये त्याचे आकर्षण दर्शविले. या कामगिरीने शोषितांच्या राजकीय जागृतीचे आणि स्वतंत्र दलित राजकीय एकत्रीकरणाची व्यवहार्यता दर्शविली.

**१९३७ च्या निवडणुका :** मुंबई विधानसभेत ILP ने १५ जागांवर विजय मिळवला. कामगार हक्कांसाठी आंदोलन विशेषतः गिरणी कामगार, शेतमजूर व अन्य श्रमिकांसाठी रचनात्मक स्वरूपाच्या मागण्या करण्यात आल्या. स्वतंत्र मजूर पक्षाने संसदीय मार्गाने आपला संघर्ष उभा केला. त्यासाठी विधानमंडळात स्पष्ट भूमिका मांडणे, कायद्यांवर प्रभाव टाकणे या भूमिका घेतल्या.

**१. खोती व्यवस्थेला (जमीनदारशाही) विरोध**

महाराष्ट्रातील कोकण प्रदेशात सरंजामशाही जमीन मालकी हक्क प्रणाली असलेल्या खोती व्यवस्थेविरुद्धच्या लढाईत आयएलपीने महत्त्वाची भूमिका बजावली. या व्यवस्थेअंतर्गत शोषण झालेल्या शेतकरी आणि भाडेकरांच्या हक्कांसाठी पक्षाने काम केले.

**२. औद्योगिक वाद विधेयकाला (१९३८) विरोध**

काँग्रेसच्या नेतृत्वाखालील खेर सरकारच्या विधेयकाला विरोध करण्यासाठी आंबेडकरांनी आयएलपीचे नेतृत्व केले, ज्याचा उद्देश कामगारांचा संप करण्याचा अधिकार दडपण्याचा होता. आयएलपीने कामगारांना संघटित केले आणि निदर्शने आणि सामूहिक सभा आयोजित केल्या, ज्यामुळे विधेयकात महत्त्वपूर्ण सुधारणा झाली. डॉ. आंबेडकरांनी कामगार कायदे आणि सामाजिक सुरक्षा उपायांसाठी वकिली करण्यासाठी आयएलपीच्या व्यासपीठाचा वापर केला. त्यांच्या प्रयत्नांमुळे कामाच्या तासांची मर्यादा (८ तासांचा कामाचा दिवस) स्थापित झाली आणि कामगारांच्या परिस्थितीत सुधारणा झाली.

### ३. कायदेविषयक वकिली

मुंबई विधानसभेतील स्वतंत्र मजूर पक्षाच्या सदस्यांनी महत्त्वाचे मुद्दे उपस्थित केले ते पुढील प्रमाणे..

भाडेकरूंचे हक्क

नगरपालिका सुधारणा

गिरणी कामगारांसाठी योग्य वेतन

सार्वजनिक संस्थांमध्ये अस्पृश्यता निर्मूलन

राजकीय शिक्षण आणि सामूहिक एकत्रीकरण

स्वतंत्र मजूर पक्षाने जनतेमध्ये आंबेडकरी राजकीय विचार पसरवण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. त्यांनी कामगार सभा, रॅली आणि शैक्षणिक परिषदा आयोजित केल्या, विशेषतः मुंबई आणि नागपूरसारख्या शहरी औद्योगिक केंद्रांमध्ये.

### ४. वर्ग आणि जातीचे दुहेरी संबंध

स्वतंत्र मजूर पक्षाच्या अग्रगण्य योगदानांपैकी एक म्हणजे जात आणि वर्गाचे आंतरविभाजनात्मक विश्लेषण. भारतातील भांडवलशाही कशी जातीय संरचनांमध्ये अंतर्भूत होती, ज्यामुळे दलित आणि कामगारांचे दुहेरी शोषण झाले यावर त्यांनी प्रकाश टाकला.

### ५. ट्रेड युनियनमधील नेतृत्व

स्वतंत्र मजूर पक्षाने ट्रेड युनियन आणि कामगार चळवळींना सक्रियपणे पाठिंबा दिला. औद्योगिक कामगारांसाठी चांगले वेतन, कामाची परिस्थिती आणि रोजगार सुरक्षेसाठी त्यांनी लढा दिला.

### ६. दलित राजकारणासाठी वकिली

स्वतंत्र मजूर पक्षाने दलितांसाठी एक मजबूत राजकीय व्यासपीठ उपलब्ध करून दिले, जे कायदेमंडळांमध्ये त्यांच्या हक्कांचे समर्थन करत होते. त्यांनी अस्पृश्यताविरोधी उपाययोजना आणि अनुसूचित जातींसाठी शिक्षण आणि रोजगाराच्या चांगल्या प्रवेशासाठी जोर दिला.

### ७. भविष्यातील दलित राजकारणाचा पाया

स्वतंत्र मजूर पक्ष सन १९४२ मध्ये विसर्जित करण्यात आला, तरी त्याने डॉ. आंबेडकरांच्या भविष्यातील राजकीय चळवळींसाठी पाया घातला, ज्यामध्ये शेड्युल्ड कास्ट्स फेडरेशन (एससीएफ) आणि नंतर रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आरपीआय) यांचा समावेश होता.

**८. संक्रमण आणि विघटन**

१९४० च्या दशकाच्या सुरुवातीला, दुसऱ्या महायुद्धामुळे, बदलत्या राजकीय संरेखनांमुळे आणि केंद्रित दलित प्रतिनिधित्वाची गरज असल्याने, डॉ. आंबेडकरांनी आयएलपी विसर्जित केले आणि १९४२ मध्ये शेड्युल्ड कास्ट्स फेडरेशन (एससीएफ) ची स्थापना केली. एससीएफने दलित निवडणूक अधिकारांवर अधिक लक्ष केंद्रित केले असले तरी, आयएलपीचे व्यापक सामाजिक-लोकशाही आदर्श भविष्यातील राजकीय प्रयत्नांवर प्रभाव पाडत राहिले.

**९. ऐतिहासिक महत्त्व आणि वारसा**

स्वतंत्र मजूर पक्षाची (ILP) स्थापना: १९३६ मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी "स्वतंत्र कामगार पक्ष" (Independent Labour Party – ILP) ची स्थापना केली. या पक्षाच्या उडायची पार्श्वभूमी ही १९३० चे दशक – भारतात स्वातंत्र्य आंदोलन चालू होते. ब्रिटीश वसाहतवादविरोधात राष्ट्रवादी लढत होते, परंतु दलित व कामगारांच्या समस्यांकडे दुर्लक्ष होत होते. डॉ. आंबेडकर यांनी हे लक्षात घेत कामगार व बहिष्कृतांच्या प्रश्नांवर आधारित स्वतंत्र राजकीय व्यासपीठ उभे केले.

**१. ऐतिहासिक महत्त्व**

**(अ) इंटरसेक्शनल पॉलिटिक्सचा प्रारंभ**

जात आणि वर्ग या दोन्ही आघाड्यांवर एकत्र लढा देणारा पहिला पक्ष. सामाजिक, आर्थिक आणि राजकीय अन्याय यांचे एकत्रित विश्लेषण करणारा भारतातील पहिला पक्ष म्हणून स्वतंत्र मजूर पक्षाकडे पाहिले जाते.

**(ब) भावी पक्षांसाठी प्रारूप**

स्वतंत्र मजूर पक्षाची (ILP) च्या विचारसरणीचा प्रभाव त्यानंतर दलित हक्क साठी उभारण्यात आलेल्या विविध पक्षात दिसून येतो. प्रामुख्याने स्वातंत्र्य नंतर डॉ. बाबासाहेबांच्या संकल्पनेतून उदयास आलेल्या रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (RPI), बहुजन समाज पक्ष (BSP), दलित पँथर्स, कामगार आणि नागरी समाज संघटना या पक्षांवर स्वतंत्र मजूर पक्षाची (ILP) ध्येय्य आणि उद्दिष्टांचा प्रभाव दिसून येतो.

**२. संवैधानिक विचारसरणीतील योगदान**

मूलभूत हक्क व राज्य धोरणाची निर्देशक तत्त्वे यामध्ये स्वतंत्र मजूर पक्षाची (ILP) च्या तत्त्वज्ञानाचे प्रतिबिंब दिसून येते. कामगार कायदे, आरक्षण धोरणे, आणि कल्याणकारी योजना यांचा पाया स्वतंत्र मजूर पक्षाची (ILP) च्या विचारधारेतून घातालागेल्याचे स्पष्ट आहे.

**३. समकालीन भारतातील स्वतंत्र मजूर पक्षाची (ILP) चा वारसा**

**(अ) सामाजिक न्याय प्रवाहात योगदान**

सामाजिक न्यायाचा राजकीय प्रवाह निर्माण करणारा पहिला प्रयत्न. लोकशाही आणि संविधानवादाला स्थैर्य देणारी चळवळ.

### (ब) कामगार व दलित हक्कांसाठी आजही मार्गदर्शक

आजही असंघटित क्षेत्रात दलित कामगार असुरक्षित, कमी वेतनावर काम करत आहेत. जातीय पृष्ठभूमीमुळे कामगारांच्या आर्थिक शोषणाचे प्रश्न अधिक गुंतागुंतीचे झाले आहेत.

### (क) आधुनिक संदर्भात पुनर्परिक्षण

नव्या कामगार संहितांवर टीका करताना स्वतंत्र मजूर पक्षाची (ILP) च्या दृष्टिकोनाची पुनः आवश्यकता दिसून येते. जातीय आणि आर्थिक शोषणाच्या विरोधात व्यापक संघर्षासचा आराखडा म्हणून स्वतंत्र मजूर पक्षाची (ILP) पुन्हा केंद्रस्थानी आजही दिसून येते.

## ३.५ भारतीय शेडयूल्ड कास्ट फेडरेशन (ALL INDIA SCHEDULED CASTE FEDERATION)

भारतीय समाजव्यवस्थेतील शतकानुशतके चालत आलेली जातिव्यवस्था ही शोषण, अन्याय आणि विषमतेवर आधारित व्यवस्था होती. या व्यवस्थेत दलित, मागासवर्गीय आणि अनुसूचित जाती-जमातींना मानवाधिकारांपासून दूर ठेवण्यात आले होते. अशा परिस्थितीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक क्षेत्रात क्रांतिकारी कार्य केले. परंतु, त्यांनी केवळ समाजसुधारणेच्या माध्यमातूनच नव्हे, तर राजकीय संघटनांच्या माध्यमातूनही आपल्या हक्कांसाठी संघर्ष केला. त्यांच्या या राजकीय चळवळीचा एक महत्त्वाचा टप्पा म्हणजे "शेड्यूल्ड कास्ट फेडरेशन" या राजकीय पक्षाची स्थापना होय.

डॉ. आंबेडकर यांचा राजकीय आणि आर्थिक दृष्टिकोन नेहमीच दलित, मागास आणि वंचित समाजाच्या स्वायत्ततेवर आणि हक्क-सुरक्षेवर आधारित होता. त्यांना हे पूर्णपणे जाणवले होते की केवळ सामाजिक परिवर्तन पुरेसे नाही, तर राजकीय सत्ता आणि आर्थिक संसाधनांवरही वंचित समाजाचा हक्क असणे अत्यावश्यक आहे. म्हणूनच त्यांनी १९४२ साली 'शेड्यूल्ड कास्ट फेडरेशन' या राजकीय पक्षाची स्थापना केली, जो केवळ निवडणुकीत भाग घेण्यासाठी नव्हे, तर शोषित समाजाला त्यांच्या प्रश्नांबाबत आवाज देण्यासाठी, स्वतंत्र राजकीय अस्तित्व निर्माण करण्यासाठी आणि आर्थिक विषमतेविरुद्ध लढण्यासाठी होता.

शेड्यूल्ड कास्ट फेडरेशन हा पक्ष डॉ. आंबेडकरांच्या राजकीय स्वातंत्र्याच्या संकल्पनेचा मूर्तरूप होता. या पक्षाच्या माध्यमातून त्यांनी सांगितले की, वंचित समाजाने केवळ इतर पक्षांच्या पाठिशी उभे राहून नव्हे, तर स्वतःच्या राजकीय निर्णयक्षमतेने सत्तास्थानांमध्ये सहभाग घेतला पाहिजे. ही संघटना म्हणजे डॉ. आंबेडकरांनी मांडलेली "राजकीय लोकशाहीतील प्रतिनिधित्वाची संकल्पना" प्रत्यक्षात उतरवण्याचा प्रयत्न होता.

याशिवाय, आर्थिक बाबतीतही डॉ.बाबासाहेबांचा दृष्टिकोन स्पष्ट होता. त्यांनी खास करून शेती, औद्योगिक धोरणे, सार्वजनिक वित्त, आणि आर्थिक पुनर्वाटप यावर विचार मांडले होते. त्यांनी गरिबी निर्मूलनासाठी केवळ दानधर्म नव्हे, तर शोषणमुक्त अर्थव्यवस्थेची गरज मांडली. शेड्यूल्ड कास्ट फेडरेशनच्या कार्यक्रमांमध्ये आर्थिक समानतेचा मुद्दा प्रमुख होता,

ज्यात त्यांनी जमीन वितरण, शिक्षणसुविधा, रोजगारनिर्मिती आणि श्रमिक हक्क यांसारख्या विषयांवर जोर दिला.

या अभ्यास घटकात आपण डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा राजकीय दृष्टिकोन, शेड्यूल्ड कास्ट फेडरेशनची स्थापना, त्याचे उद्दिष्ट, कार्यक्रम आणि त्याच्या आर्थिक नीतीचे विश्लेषण सविस्तरपणे पाहणार आहोत.

### ३.५.१ शेडयूल्ड कास्ट फेडरेशन च्या स्थापने मागील भूमिका:

सायमन कमिशनसमोर साक्ष देताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते की, "भारतात इतर कोणत्याही अल्पसंख्याकांना राजकीय हक्कांच्या संरक्षणाची जेवढी निकड नाही, तेवढी ती अस्पृश्यवर्गाला आहे. कारण भारतातील अस्पृश्यवर्ग शैक्षणिक दृष्टीने उपेक्षित आहे. आर्थिकदृष्ट्या गरीब आहे, सामाजिकदृष्ट्या गुलामीत आहे आणि राजकीयदृष्ट्या कमकुवत आहे. म्हणून मी त्यांच्या राजकीय सुरक्षिततेची मागणी करीत आहे." पुढे इ. स. १९३२ मध्ये जातीय निवाडा जाहीर झाला आणि अस्पृश्यवर्गाला स्वतंत्र मतदारसंघ मिळाला. अस्पृश्यांच्या स्वतंत्र मतदारसंघाच्या मागणीस आपण प्राणपणाने विरोध म्हणून २० सप्टेंबर १९३२ रोजी गांधीजीनी प्राणांतिक उपोषण सुरू केले आणि त्याची परिणती 'पुणे करारा'त झाली. यानंतर इ. स. १९३६ सालच्या ऑगस्ट महिन्यात डॉ. आंबेडकरांनी स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना केली. जातिव्यवस्था आणि शोषणव्यवस्था यांच्याविरुद्ध झुंज देणाऱ्या डॉ. आंबेडकरांना 'स्वतंत्र मजूर पक्षानंतर 'शेडयूल्ड कास्ट फेडरेशन' स्थापण्याचा निर्णय का घ्यावा लागला.

भारताच्या राष्ट्रीय जीवनात दलितांचे स्वतंत्र व वेगळे अस्तित्व आहे हे मान्य करण्यास गांधीजी राजी नाहीत. घटना समितीतील बहुमत असलेला पक्ष दलितांना जे हक्क व ज्या सवलती दिलेल्या आहेत, त्या रद्द करून टाकील, ब्रिटिश सरकारने किप्स योजना अमलात आणली तर एका अर्थाने दलित वर्गाला लांडग्यापुढे टाकले आहे अशी स्थिती होईल." डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी क्रिप्स योजनेवर जी चौफेर हल्ला चढवला, तो योग्य होता. कारण क्रिप्स योजनेमुळे मुसलमानांना पाकिस्तान-निर्मितीचा हक्क दिला आणि दलितवर्गाचे भवितव्य मात्र बहुसंख्याकांच्या हाती सोपविण्यात आले. म्हणून भारताच्या राष्ट्रीय जीवनात आपल्याला स्वतंत्र अस्तित्व आहे, त्यासाठी झगडले पाहिजे आणि दलितवर्ग हिंदू समाजाचा केवळ एक 'उपगट' आहे या कल्पनेला कसून विरोध केला पाहिजे, हे डॉ. आंबेडकरांचे म्हणणे होते.

क्रिप्स साहेबांनी डॉ. आंबेडकरांना सवाल केला की, "तुम्ही कामगारांचे पुढारी की दलितवर्गाचे?" हे निमित्तकारण होते. तर प्रेसिडेंट रूझवेल्ट यांचे वैयक्तिक प्रतिनिधी कर्नल जॉन्सन यांनी पत्रकारांना सांगितले की, हिंदू राजकारणात जातीयवाद फार तीव्र आहे आणि या जातीयवादात हिंदूसभा, लीग आणि अस्पृश्यांचे पुढारी डॉ. आंबेडकर हे प्रमुख आहेत. स्वतंत्र मजुर पक्षाची गरज स्पष्ट करताना बाबासाहेब म्हणाले होते की, "देशाच्या राज्यकारभारात प्रत्यक्ष अगर अप्रत्यक्ष रीतीने भाग घेऊन आपल्या ध्येयास अनुकूल बनवल्याशिवाय गांजलेल्या वर्गास आपली दुःखे दूर करता येणार नाहीत. दुसरा कोणी आपल्या हिताकरता प्रयत्न करील या आशेवर जर गांजलेला व पिळला गेलेला वर्ग विसंबून

राहील, तर तो तोंडघशी पडल्याशिवाय राहणार नाही. यासाठी स्वतंत्र मजूर पक्षाची गरज आहे."

### ३.५.२ 'शेडयूल्ड कास्ट फेडरेशन' ची स्थापना:

हिंदी लोकांचे प्रतिनिधी घेऊन व्हॉईसरॉयने कार्यकारी मंडळ वाढवण्याचे घोषित झाले. त्यात्त हिंदू, मुसलमान, पारशी, ख्रिश्चन, शीख इ. प्रतिनिधी घ्यायचे ठरले; पण यात अस्पृश्यांचा प्रतिनिधी नव्हता. या अन्यायाविरुद्ध बाबासाहेबांनी ३१ जुलै १९४५ रोजी भारतमंत्री ॲमरी यांना तार केली, त्यात म्हटले आहे की, "सहा कोटी अस्पृश्यांचा उपहास करणे व मुसलगानांना हिंदू इतके प्रतिनिधित्व देणे आचर्यकारक वाटते. हिंदुस्थानात अस्पृश्य वर्ग हा एक महत्त्वाचा निराळा घटक आहे, असे त्यांनी जाहीर केले असताही व अस्पृश्य समाज युद्धकार्यात मदत करीत असला, तरीही अस्पृश्यांचा प्रतिनिधी घेतला नाही हा अस्पृश्य समाजाचा विश्वासघात आहे." डॉ. बाबासाहेबांच्या म्हणण्याची दखल घेऊन त्यांना कार्यकारी मंडळात समाविष्ट करून ९-७-१९४२ रोजी ब्रिटिश सरकारने डॉ. आंबेडकरांच्या नियुक्तीची घोषणा केली. यावरून दलित अस्पृश्यांच्या हक्कांसाठी 'शेडयूल्ड कास्ट फेडरेशन अशी भारतीय पातळीवर एक संघटना उभी करून त्याद्वारे दलितांच्या मुक्तिसंग्रामाला नवी दिशा देणे अपरिहार्य होते.

डॉ. आबेडकरांच्या चरित्राच्या नवव्या खंडात खैरमोडे म्हणतात, १९३० सालानंतर जातीयवाद राजकारणात धुमाकूळ घालू लागला आणि मग बाबासाहेबांना जातीयवादाचा मार्ग स्वीकारणे अटळ होऊन बसले." श्री. खैरमोडे यांच्याप्रमाणे अनेक सवर्ण नेते डॉ. आंबेडकरांवर 'जातीय संघटना स्थापन केल्याचा आरोप करीत होते. अशी पक्षाची स्थापना करणे म्हणजे राजकीय पक्षाचे जातीयकरण करणे होय, असे टीकाकाराचे म्हणणे होते. दलित वर्गाला आजवर नाकारलेले न्याय्य हक्क मिळवून देणे, हे ध्येय डोळ्यासमोर ठेवून कार्य करणाऱ्या डॉ. आंबेडकरांवर जातीय राजकारणाचा आरोप करणे कितपत योग्य आहे? १९ एप्रिल १९४२ रोजी मुंबईला केलेल्या भाषणात बाबासाहेब म्हणाले, "शिका, लढा आणि संघटित व्हा असा पूर्वी दिलेला सल्ला मी पुन्हा देतो. पुढे 'इंडिपेंडंट लेबर पार्टी' चे अध्यक्ष म्हणून डॉ. आंबेडकर क्रिप्शना भेटले तेव्हा म्हणाले, "अमेरिकेत निग्रो लोकांना जसे वागवण्यात येते तरोच हिंदुस्थानात अस्पृश्यांना वागवले जाते. मग अस्पृश्यांनी आपल्या हक्कासाठी लढू नये काय?" दलितवर्गाचा लवा हक्कासाठी स्वातंत्र्यासाठी होता आणि अस्पृश्यतेचा कलंक नाहीसा करण्यासाठी प्राणपणाने हा वर्ग बाबासाहेबांच्या नेतृत्वाखाली लढत होता. फेडरेशनची कल्पना बाबासाहेबांच्या मनात मूळ धरत होती. त्यांच्याच आदेशानुसार २८-१०-१९४१ रोजी श्री. पां. ना. राजभोज यांनी पत्रक काढले होते. त्यात म्हटले होते, "अखिल भारतीय अस्पृश्यांचे पुढारी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली अखिल भारतातील दलित पुढाऱ्यांची एक परिषद भरविण्याचे आम्ही ठरविले आहे. अनेक पुढा-यांशी पत्रव्यव्हार परिषद भरविण्यात आली.

### ३.५.३ परिषदेचे उद्देश खालीलप्रमाणे:-

(१) शेडयूल्ड कास्ट वर्गाची अखिल भारतीय संस्था स्थापन करणे.

(२) भावी राज्यघटनेत दलितवर्गासंबंधी मूलभूत तत्वांचा निर्णय करणे.

(३) हिंदुस्थानच्या निरनिराळ्या प्रांतातील दलित वर्गाला, निवडणुकीचे कामी उपयुक्त होईल अशी कायमची योजना तयार करणे.

(४) सामाजिक व राजकीय क्षेत्रात अस्पृश्यता नष्ट करण्याचे परिणामकारक मार्ग शोधून काढणे.

(५) अस्पृश्यता निवारणाच्या बाबतीत कायदेशीर मदत व्हावी म्हणून कायदेपंडितांची कमेटी स्थापन करणे.

(६) हिंदू सरकारला युद्धाचे कामी मदत करण्यासाठी किंग्ज कमिशनने, व्हाईसरॉय कमिशनने दलित वर्गातील तरुणांना जास्तीत जास्त मिळवून देणे व त्यांचा शिरकाव प्रांतिक व हिंदुस्थान सरकार यांच्या नोकऱ्यांतून अधिकाधिक करून देण्यासाठी दलितवर्गाच्या संघटना, प्रत्येक प्रांतांत कायमच्या उभारण्यासाठी प्रयत्न करणे,

या आवाहनानुसार अखिल भारतीय अस्पृश्य पुढाऱ्यांची बैठक दिल्ली येथे डॉ. आंबेडकरांच्या अध्यक्षतेखाली झाली. या बैठकीस श्री. मंडल, श्री. मलिक, पंजाबचे गोपालसिंग, श्री. राजा, श्री. शिवराज, गायकवाड इ. पुढारी हजर होते. शे. का. फे. ची घटना व संघटना यावर चर्चा झाली आणि अखिल भारतीय दलितवर्गाची परिषद १८ व १९ जुलै १९४२ रोजी नागपूर येथे आयोजित करण्याचे ठरले, या परिषदेला जोडूनच दलित महिला परिषद आणि समता सैनिक दल परिषद २० जुलै १९४२ रोजी आयोजित केली होती, या परिषदेला सुमारे ७५,००० लोक उपस्थित होते, तर २० हजार महिला उपस्थित होत्या. या परिषदेत जे ठराव मंजूर झाले त्यातून दलितांनी आपल्या मागण्या स्पष्टपणे मांडल्या. या तिन्ही दृष्टींनी ही परिषद ऐतिहासिकदृष्ट्या महत्त्वाची होती.

या परिषदेच्या आरंभी अध्यक्षपदासाठी श्री. एन. शिवराज यांचे नाव, जळगावचे श्री. डी. जी. जाधव यांनी सुचविले, श्री. जी. टी. मेश्राम यांनी अनुमोदन दिले. याशिवाय श्री. आर. एल. बिश्वारा (बंगाल), रायसाहेब शामलाल (उत्तर प्रदेश), श्री. शेन्द्रे (नागपुर), श्री. गोपालसिंग (पंजाब), श्री. कुरमिया (मद्रास), ए. डी. रॉय (बंगाल), पी. एन. राजभोज (पुणे) यांनी पाठिबादर्शक भाषणे झाली. रायबहादुर एन्. शिवराज यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात व्हाईसरॉयच्या कार्यकारी मंडळात डॉ. आंबेडकरांची नेमणुक झाली म्हणून स्वागत केले. ते म्हणाले, "एका निशाणाखाली येऊ आणि बाबासाहेबांच्या नेतृत्वाखाली आपल्या हक्कांसाठी लढा निर्धाराने चालवू, असे मार्गदर्शन केले. यानंतर "डॉ. आंबेडकरांनी राजकीय परिस्थितीचे विश्लेषण करीत, अस्पृश्यांना द्याव्या लागणाऱ्या लक्ष्याचे स्वरूप स्पष्ट केले, आपल्या लक्ष्याची दिशा स्पष्ट करताना त्यांनी मुख्यतः खालील मुद्यांवर भर दिला.

(१) अस्पृश्यांना स्वतंत्र अस्तित्व आहे आणि त्यांचे राजकीय जीवनात स्वतंत्र स्थान आहे.

(२) प्रत्येक राज्याच्या दरवर्षीच्या अंदाजपत्रकात अस्पृश्यांच्या शिक्षणासाठी ठराविक रक्कमेची तरतूद केली पाहिजे, विशेषतः उच्च शिक्षणासाठी.

(३) शासकीय सेवेत अस्पृश्यांसाठी राखीव जागा आवश्यक आहेत.

(४) प्रांतीय आणि केन्द्रीय कार्यकारिणीमध्ये अस्पृश्यांचे प्रतिनिधी हवेत.

(५) अस्पृश्यांच्या स्वतंत्र व वेगळ्या वसाहती हव्यात.

यानंतर, डॉ. आबेडकरांनी एका महत्वाच्या प्रश्नाचा विचार केला, त्यांना भारतीय 'गावगाडा' विषमतेने ग्रस्त असल्याचे जाणवत होते. बाबासाहेब म्हणतात, "देशातील सर्व अस्पृश्यांची एक राजकीय संघटना असणे, ही महत्वाची गरज आहे, म्हणजे देशातील सर्व अस्पृश्यांची प्रतिनिधित्व करणारी एक संस्था, आपले प्रश्न एकमुखाने मांडील. सध्या अस्तित्वात असलेल्या छोट्या छोट्या संस्थांचे विसर्जन करून एकच एक देशव्यापी संघटना बलवान करू. एक गोष्ट मी स्पष्ट करू इच्छितो की, सध्या जे युद्ध सुरू आहे ते लोकशाही आणि हुकुमशाही यांच्या दरम्यान, कारण नाझी हुकुमशाहीचा सर्वांत मोठा धोका आहे. लोकशाहीवर माझा दृढ विश्वास आहे. ती जगली तर आपल्याला दिव्य भवितव्य आहे. लोकशाही पराभूत झाली, तर आपला विनाश अटळ आहे. म्हणून न्याय्य आणि मानवी हक्कांसाठी आपण निर्धाराने लढू  या." डॉ. बाबासाहेबांच्या भाषणामुळे नवी शक्ती मिळाली आणि अस्पृश्यांच्या मुक्तिसंग्रामाला स्पष्ट व ठोस कार्यक्रम मिळाला. १९ जुलै १९४२ रोजी अधिवेशन सुरू झाले आणि अध्यक्ष रा. व. शिवराज यांनी श्री. दादासाहेब गायकवाड यांना पहिले चार ठराव एकत्रित करून मांडण्यास सांगितले. अलाहाबादच्या रावसाहेब शामलाल यांनी अनुमोदन दिले.

**ठराव क्र. १:** क्रिप्स योजना आम्हाला मान्य नाही आणि व्हॉइसरॉय यांनी केलेल्या घोषणेच्या संदर्भात (८ ऑगस्ट १९४०) क्रिप्स योजना म्हणजे शुद्ध फसवणूक आहे. तसेच भारताची राज्यघटना तयार करण्यासाठी घटना समिती सिद्ध करण्याच्या कॉंग्रेस पक्षाच्या मागणीस ब्रिटिश शासनाने मान्यता दिल्याबद्दल आणि अस्पृश्यांचे हितसंबंध सुरक्षित ठेवण्यासाठी, नव्या राष्ट्रीय सरकारने आणि ब्रिटिश सरकारने करार करावा, या कॉंग्रेसच्या सूचनेचा आम्ही निषेध करती,

**ठराव क्र. २:** अनुसूचित जातींची मान्यता असल्याशिवाय राष्ट्रीय जीवनात अनुसूचित जातींना स्वतंत्र स्थान अस्तित्व आहे हे मान्य केल्याशिवाय, आणि अनुसूचित जातींना सुरक्षितेतची हमी देण्यासाठी उपाययोजना केल्याशिवाय, घटना निर्मितीचा जो प्रयत्न होईल; तो आम्हाला अमान्य आहे.

**ठराव क्र. ३:** नव्या घटनेत खालील तरतुदी हव्यात:

(१) अनुसूचित जातींच्या विकासाठी प्रांतीय अंदाजपत्रकात आर्थिक तरतूद,

(२) कार्यकारिणीत, प्रांतीय व केन्द्रीय विधिमंडळात प्रतिनिधित्व,

(३) शासकीय सेवेत संख्येनुसार व गरजेनुसार सहभाग व प्रतिनिधित्व न्याय, महसूल, पोलिस खात्यात आवश्यक ती किमान शैक्षणिक पात्रता असणाऱ्या अनुसूचित जातींच्या व्यक्तींना आरक्षण,

(४) सर्व विधिमंडळात व स्थानिक स्वराज्य संस्थांत, कायद्यानुसार प्रतिनिधित्व,

(५) स्वतंत्र मतदारसंघ,

(६) प्रांतीय व केन्द्रीय लोकसेवा आयोगावर कायद्यानुसार प्रतिनिधित्व. वरील तिन्ही ठरावांत फक्त आशय नोंदलेला आहे. मूळ ठरावाचे भाषांतर दिलेले नाही. चौथा ठराव ग्रामव्यवस्थेतील मूलभूत बदलासंबंधीचा होता.

**ठराव क्र. ४:** अनुसूचित जातींना जोपर्यंत गावकुसाबाहेर राहावे लागते. तोपर्यंत त्यांना हिंदूंची जुलुम-जबरदस्ती सहन करावी लागणार आणि त्यांना 'अस्पृश्य' म्हणूनच हिणवणार. एकतर गावगडबात त्यांची लोकसंख्या नगण्यच आहे आणि त्यांच्याजवळ चरितार्थाचे स्वतंत्र साधन नाही. हिंदूंच्या जुलुमातून अस्पृश्यांना मुक्त करण्यासाठी आणि त्यांना माणूस म्हणून प्रतिष्ठा मिळावी यासाठी; त्यांना आर्थिक व सामाजिक सुरक्षितता कशी लागेल ते पाहिले पाहिजे.

म्हणून या परिषदेचे स्पष्ट मत आहे की, गावगाड्याचे वा ग्रामव्यवस्थेचे स्वरूप आमूलाग्र बदलले पाहिजे, यासाठी खालील उपाय त्वरीत योजले पाहिजेत

(१) हिंदू वेड्यापासून निराळी अशी अनुसूचित जातींची स्वतंत्र वसाहत.

(२) स्वतंत्र वसाहतीसाठी आयोगाची नेमणूक.

(३) अनुसूचित जातींना लागवडीस योग्य अशा जमिनीचे हस्तांतरण,

(४) खाजगी जमिनी ताब्यात घेण्याच्या कायद्यानुसार जी नवी जमीन उपलब्ध होईल त्याचे अनुसूचित जातींना वसाहतीसाठी वाटप.

(५) वसाहत आयोगाला केन्द्र सरकारने दरवर्षी पाच कोटी रुपयांचे किमान अनुदान द्यावे.

हे चारही ठराव मांडताना श्री. दादासाहेब गायकवाड म्हणाले, "हे चारही ठराव म्हणजे आपल्या चळवळीच्या कार्यक्रमाचे मूलाधार आहेत. पहिल्या ठरावानुसार क्रिप्स योजनेचा आम्ही स्पष्ट शब्दात्त निषेध केला आहे. असे सांगितले अध्यक्ष श्री. शिवराज यांनी, ठराव एकमताने मंजूर झराल्याचे जाहीर केले.

शेडयूल्ड कास्ट फेडरेशन या अखिल भारतीय पातळीवरच्या पक्षाच्या स्थापनेचा ५ वा ठराव श्री. डी. जी. जाधव यांनी मांडला. ते म्हणाले, "एकजुटीशिवाय शक्ती निर्माण होत नाही. एका संघटनेच्या निशाणाखाली अनुसूचित जाती एकत्र आल्याशिवाय आपल्यावर होणाऱ्या हल्ल्यापासून आपण बचाव करू शकणार नाही व आपला लंबा प्रभावीपणे चालवू शकणार नाही. आपण जर एकत्र आलो नाही, तर आपले विरोधक आपल्या गटागटांत विभागलेल्या अनुसूचित जातींना दडपत राहतील. या उद्देशाने शेडयूल्ड कास्ट फेडरेशनची स्थापना झाली. यानंतर रायसाहेब, ए. सी. दुसिया यांनी ठरावाला अनुमोदन दिले. श्री. पी. एन्. राजभोज, मांगीलाल राजपुताना, बी. सी. मंडल, बद्रीप्रसाद वाल्मिकी, पी. एल. के. तालीम, पी. जे. रोहम यांची भाषणे झाली आणि ठराव मंजूर झाला. एन. शिवराज यांच्या अध्यक्षतेखाली है. का. फेडरेशनची घटना तयार करण्याचे काम सोपविण्यात आले. त्या समितीत बंगालचे श्री. विश्वास, ए. डी. रॉय, दुसिया, बी. सी. मंडळ, मुंबईचे जाधव, राजभोज, दादासाहेब गायकवाड, पंजाबचे गोपालसिंग, सेठ किसनदास, वन्हाड मध्यप्रांताचे आर, व्ही. कवाडे, के. एस. शेन्द्रे, एच. एल. कोसारे, संयुक्तप्रांताचे शामलाल, राम सहाय, डॉ. नंदलाल जयस्वाल, बद्रीप्रसाद वाल्मिकी, बाबू तिलकचंद या सदस्यांचा समावेश होता.

### ३.५.४ शेडयूल्ड कास्ट फेडरेशन आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर:

शेडयूल्ड कास्ट फेडरेशन स्थापना परिषदेत विचार मांडतांना डॉ.बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, "गेल्या दहा वर्षांत राजकीय चळवळींना वेग आला आहे. अ. भा. से. का.

फेडरेशन स्थापन करण्याचा निर्धार आपण सर्वांनी केला आहे, याला ऐतिहासिक महत्त्व आहे. अस्पृश्यांच्या दृष्टीने एक नव्या पर्वाला सुरुवात झाली आहे. व्हॉईसराय यांच्या कार्यकारिणीत एक सदस्य म्हणून, मजूरमंत्री म्हणून मी सुत्रे सांभाळीत आहे. गेल्या वीस वर्षात आपल्या चळवळीचे नेतृत्व मी केले; आणि त्याचा अहवाल आपल्यासमोर आहे. अल्पसंख्य म्हणून जगत असलेल्या मुसलमान आणि अस्पृश्य यांच्यात पुष्कळय फरक आहे. मुसलमान समाज जास्त सुस्थितीत आहे. ब्रिटिश येण्यापूर्वी या देशात त्यांचेच राज्य होते. त्यामुळे त्यांची थोडीबहुत प्रगती झालेली आहे. पण शतकानुशतके आपण दडपले जात आहेत. आपण दरिद्री, अज्ञानात खितपत पडलो आहोत. आता आपण स्वतःच्या पायावर उभे राहिले पाहिजे. आपला समाज सतत प्रगत्तिपथावर राहिला पाहिजे, मंत्रिपदाची जबाबदारी स्वीकारल्यामुळे, फेडरेशनचे काम तुम्हाला शिरावर घेतले पाहिजे. मला पदाचा मोह नाही. गव्हर्नर जनरलच्या कार्यकारिणीत दलितवर्गाला प्रतिनिधित्व मिळाले, हे महत्त्वाचे आहे. माझ्या नियुक्तीमागची ही भूमिका महत्त्वाची आहे. ब्राह्मणशाहीच्या हितसंबंधांच्या दृष्टीने सरकारने हा निर्णय घेऊन सुरुगच लावला आहे. दलितवर्गाचा हा मोठा विजय आहे.

पुढे आपल्या भाषणात ते म्हणतात, हिंदू, मुसलमान आणि दलितवर्ग यांना राजकीय हक्कात योग्य वाटा मिळाला पाहिजे. कायद्यानुसार तशी तरतूद केली पाहिजे. राजकीय हक्कांचा योग्य वाटा मिळविण्यासाठी आपण एका निशाणाखाली येऊन लढा दिला पाहिजे. आपण सर्वांनी एकजूट केली तर आपल्या मागण्या व आपले हक्क आपल्याला मिळू शकतील.

अ. भा. दलितवर्गीय महिला परिषद २० जुलै १९४२ रोजी आयोजित केली होती. २० जुलै, १९४२ रोजी नागपूरच्या मोहन पार्कवर दुपारी १२-३० वाजता 'समता सैनिक दला'चे अधिवेशन झाले. व्याला ७० हजारापेक्षा अधिक तरुण श्री-पुरुष उपस्थित होते. श्री. ए. एल. कोसारे

स्वागताध्यक्ष होते. श्री. गोपालसिंग अध्यक्ष होते. समता सैनिक दलालादेखील डॉ. बाबासाहेबांनी मार्गदर्शन केले केवळ 'शेड्यूल्ड कास्टस् ची अखिल भारतीय पातळीवरची संघटना उभी केली. पण यावर डॉ. आंबेडकरांच्या विरोधकांनी टीका केली. त्यांच्यावर प्रामुख्याने जातीय संघटना निर्माण करण्याचा आरोप केला; तसाच त्यांनी ब्रिटिशांशी हातमिळवणी करण्याचा उद्योग चालविला आहे असाही आरोप केला. बाबासाहेबांचा मुक्तिसंग्राम कशासाठी चालला होता? त्यांच्यामते येथील जातिव्यवस्था हा भयानक सैतान होता. या जातिव्यवस्थेला धर्ममान्यता देणाऱ्या ब्राह्मणवादाशी त्यांचा संघर्ष होता. ब्राह्मणवादाच्या राक्षसाच्या मगरमिठीतून मुक्त होण्यासाठी, दलितवर्गाला लढावे लागेल. सवर्ण हिंदूंच्या औदार्यावर वा सहानुभूतीवर त्यांना अवलंबून राहता येणार नाही ही बाबासाहेबांची भूमिका होती.

डॉ. बाबासाहेबांना दलितवर्गाचे स्वातंत्र्य अभिप्रेत होते आणि दलितवर्गाला राजकीय सत्तेत न्याय्य वाटा मिळाला पाहिजे, असा त्यांचा आग्रह होता, त्यांना वाटत होते की, काँग्रेसचा लढा स्वातंत्र्यासाठी कधीच नव्हता, तर तो सत्तेसाठी होता, भारतातील दलितवर्ग हजारो वर्षे गुलामगिरी भोगत होता. त्यांच्या मुक्तीसाठी काँग्रेसने प्रयत्न केल्याचे दिसत नाही.

शोषित, पीडित दलितवर्गाला उच्चवर्णीयांनी जशी क्रूर वागणूक दिली, तशी जगाच्या पाठीवर क्वचीतच कुणी दिली असेल आणि तीही थोड्याथोड्क्या कालावधीसाठी नव्हे तर दोन हजारांहून अधिक वर्ष. अशा परिस्थितीत आणि महाडच्या धर्मसंगरापासून जो अनुभव त्यांच्या गाठीशी होता तो विचारात घेतला; तर केवळ दलितवर्गाची अनुसूचित जातींची भारतीय पातळीवर संघटना बांधणे क्रमप्राप्त होते. ही संघटना समतेचा लढाच चालविणार होती.

माणसाने माणसाचे शोषण करावे, एका वर्गाने दुसऱ्या वर्गाचे शोषण करावे आणि जुलूम करावा आणि एका राष्ट्राने दुसऱ्या राष्ट्राचे शोषण करावे ही कल्पना या शे. का. फेडरेशनला अमान्य होती. आपल्या निवडणुकीच्या जाहिरनाम्यात फेडरेशनने हे स्पष्ट केले आहे.

एकूणच स्वतंत्र मजूर पक्षाच्या निषाणाखाली डॉ. आंबेडकरांनी समतेचा लढा गतिमान केला आणि शे. का. फेडरेशनच्या स्थापनेनंतर या लढ्याला वेगळी दिशा मिळाली इ. स. १९४२ ते ४६ पर्यंत ते व्हॉईसरॉय यांच्या कौन्सिलमध्ये मजूरमंत्री म्हणून काम करीत होते. हा त्यांच्या कसोटीचा कालखंड होता. त्यानंतर ते घटना समितीत आले आणि भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार म्हणून त्यांचा गौरव झाला. घटना समितीत अस्पृश्यता निर्मूलनाचे कलम टाळ्यांच्या गजरात मंजूर झाले तेव्हा बाबासाहेबांना केवढा आनंद झाला होता, पण घटना समितीच्या सभागृहात मात्र म. गांधीजींचा जयजयकार होत होता. अस्पृश्यतेचा कलंक धुवून काढण्यासाठी वेळप्रसंगी रक्तही सांडू, असे म्हणणाऱ्या बाबासाहेबांचा सभागृहाला विसर पडला. १९५२ साली डॉ. बाबासाहेब आंबेडकर निवडणुकीत पराभूत झाले आणि फेडरेशनलाही पराभव पत्कारावा लागला. भारतीय राज्यघटनेच्या शिल्पकाराला निवडणुकीत पराभूत केले, ते कॉंग्रेस पक्षाने, १५-५-१९५४ रोजी साप्ताहिकात पुलगाव येथे केलेल्या भाषणाचा वृत्तान्त आला आहे. त्यात डॉ. बाबासाहेब म्हणाले, "इलेक्शन ही क्रिकेटची मॅच आहे. क्रिकेटमध्ये पराभूत झालेली टीम गाशा गुंडाळून स्वस्थ बसत नाही. ती पुन्हा दुसऱ्या वर्षी नव्या जोमाने खेळावयास प्रारंभ करते. असाच आशावाद आपण ठेवला पाहिजे. एखाद्या जबरदस्त आशावादी नेत्यप्रमाणे त्यांनी कार्यकर्त्यांना सतत सांगितले की, फेडरेशनला अपयश येणे हे वाऱ्याने झोडपलेल्या झाडासारखे आहे. परंतु त्या फेडरेशनरूपी झाडाचे मूळच मरून गेले असा अर्थ लावणे चुकीचे तरेल. तेव्हा डोळे उघडून सतत कार्य करीत रहा. १९५६ च्या ऑक्टोबरमध्ये नागपुर येथे बाबासाहेबांनी धम्मदीक्षा' घेतली आणि भगवान बुद्धाचा विचार मांडण्यासाठी ते सतत प्रयत्न करू लागले. १९४२ ते ५६ अशी चौदा वर्षे शे. का. फेडरेशनने चळवळ जिवंत ठेवली. फेडरेशन हा तत्वाशी निष्ठा ठेवणारा एक पक्ष होता. आपल्या १९५२ च्या निवडणूक जाहिरनाम्यात म्हटले आहे की, शे. का. फेडरेशनला अनुसूचित जमाती आणि अन्य मागासवर्ग यांच्याबरोबर हातात हात मिळवून कार्य करायचे आहे. अनुसूचित जमाती व अन्य मागासवर्ग यांच्यात जागृती करून त्यांना बलवान करायचे आहे, तशी सर्वांची इच्छा असेल; तर शे. का. फेडरेशनचे नाव बदलून "अ. भा. मागासवर्गीय फेडरेशन असेही नाव देता येईल. ही चळवळीची दिशा आहे. डॉ. बाबासाहेबांच्या तत्त्वज्ञानाच्या पायावर सर्व दलित-शोषित मागासवर्गीय, एकजुटीने संघटना उभी करतील तर या वर्ण-वर्ग-जातीअंताचे बाबासाहेबांचे स्वप्न साकार होईल.

### ३.५.५ सारांश:

भारतीय स्वातंत्र्यलढ्याचा कालखंड हा केवळ ब्रिटिश सत्तेविरुद्धचा संघर्ष नव्हता, तर तो अस्पृश्य, मागास आणि शोषित समाजाच्या सामाजिक व राजकीय हक्कांचा लढाही होता. या व्यापक लढ्याचे अग्रदूत म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या वैचारिक, राजकीय व संघटनात्मक कृतींमधून एक अमिट ठसा उमटवला. सामाजिक विषमतेच्या विरोधात त्यांनी केवळ आंदोलनच उभारले नाही, तर एक सशक्त राजकीय व्यासपीठ निर्माण करून शोषित समाजाला संविधानिक हक्क आणि सत्तेची भागीदारी मिळवून देण्याचे कार्य केले. याच उद्देशाने भारतीय शेड्यूल्ड कास्ट फेडरेशन (Scheduled Castes Federation) या संघटनेची स्थापना १९४२ मध्ये करण्यात आली.

याआधी इंडिपेंडंट लेबर पार्टी (१९३६) च्या माध्यमातून त्यांनी मजूर, दलित आणि शेतीप्रधान समाजाचा आवाज संसदेत पोहोचवण्याचा प्रयत्न केला होता. मात्र, त्यांना लवकरच हे जाणवले की, केवळ सामान्य आर्थिक मुद्द्यांपुरता मर्यादित राजकारण दलित समाजाच्या मुलभूत प्रश्नांची सोडवणूक करू शकत नाही. त्यामुळेच विशेषतः अनुसूचित जातींच्या राजकीय, सामाजिक आणि शैक्षणिक हितासाठी स्वतंत्र राजकीय व्यासपीठाची आवश्यकता निर्माण झाली. ही गरज ओळखून डॉ. आंबेडकरांनी भारतीय शेड्यूल्ड कास्ट फेडरेशनची स्थापना केली.

भारतीय शेड्यूल्ड कास्ट फेडरेशन ही केवळ निवडणुकीची राजकीय यंत्रणा नव्हती, तर ती दलित समाजाच्या सामूहिक आत्मभानाचा आणि संविधानिक हक्कप्राप्तीच्या संघर्षाचा एक मंच होता. डॉ. आंबेडकरांनी या संघटनेद्वारे अनुसूचित जातींना स्वतंत्र राजकीय आवाज मिळावा, आरक्षणाची अंमलबजावणी प्रभावीपणे व्हावी, आणि दलित समाजाचा शासन व धोरणनिर्मितीत प्रभावी सहभाग असावा, यासाठी मार्गदर्शन केले.

भारतीय शेड्यूल्ड कास्ट फेडरेशनच्या स्थापनेनंतर डॉ. आंबेडकरांनी दलित समाजाच्या राजकीय संघटनात्मक एकतेवर भर दिला. त्यांनी निवडणुकीच्या फडात उतरून शोषित वर्गाच्या स्वतंत्र मतप्रणालीचा प्रचार केला आणि दलितांना फक्त इतर पक्षांवर अवलंबून न राहता स्वतःचा राजकीय पक्ष, विचारधारा आणि दिशा यांची गरज पटवून दिली. ही भूमिका आजच्या दलित राजकारणाच्या दृष्टिकोनातून अत्यंत महत्वाची ठरते.

## ३.६ रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया स्थापनेची संकल्पना:

भारतीय स्वातंत्र्यलढ्यानंतर देशात लोकशाही व्यवस्थेचा उदय झाला, मात्र दलित, मागासवर्गीय व शोषित घटकांच्या राजकीय सक्षमीकरणासाठी स्वतंत्र राजकीय प्रतिनिधित्वाची आवश्यकता होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी याच मूलभूत जाणिवेतून 'रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया' (RPI) स्थापनेची संकल्पना मांडली. ही केवळ एक राजकीय संस्था नव्हती, तर ती समाज परिवर्तनाची क्रांतिकारी चळवळ होती.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी पूर्वी 'शेड्यूल्ड कास्ट फेडरेशन'ची स्थापना केली होती, परंतु स्वातंत्र्योत्तर भारतात एका व्यापक, सर्वसमावेशक आणि मानवतावादी मूल्यांवर आधारित पक्षाची गरज असल्याचे त्यांना जाणवले. त्यांच्या विचारानुसार, RPI ही दलित,

आदिवासी, श्रमिक व सर्व वंचित वर्गांची राजकीय आकांक्षा प्रत्यक्षात उतरवणारी संस्था असावी. "एक व्यक्ती एक मत" या लोकशाही मूल्यांबरोबरच "एक व्यक्ती एक मूल्य" या तत्वाची सामाजिक व आर्थिक अंमलबजावणी ही या पक्षाच्या स्थापनेमागील मुख्य प्रेरणा होती.

दुर्दैवाने, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या निधनानंतर १९५७ मध्ये RPI ची अधिकृत स्थापना झाली, परंतु त्या स्थापनेची मूळ संकल्पना आणि दिशा त्यांनीच दिली होती. या पक्षाद्वारे त्यांनी भारतीय राजकारणात सामाजिक न्याय, समता, आणि बंधुतेच्या मूल्यांची पुनर्स्थापना करण्याचा प्रयत्न केला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधनात जाती-धर्मातीत असा ध्यैयवाद मांडल्यामुळे जातीनिष्ट पक्षाची गरज वाटेनाशी झाली, त्यामुळे देशातील सर्व डाव्या पक्षांना, पुरोगामी आणि परिवर्तनवादी शक्तींना एकत्र गुंफण्यांसाठी आणि जाती-वर्णाच्या पार्श्वभूमीवर वर्गीय पाया देण्यासाठी या पक्षाचे नांव त्यांनी 'रिपब्लिकन पक्ष' असे ठेवले होते. त्याचे प्रारुप एका खुल्या पत्रात बाबासाहेब व्यक्त करतांना म्हणतात, "भारत हे स्वतंत्र, सार्वभौम लोकसत्ताक राष्ट्र राहिल. आणि भारतातील सर्व नागरिकांना सामाजिक, आर्थिक व राजकीय न्याय, विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रध्दा, उपासना स्वातंत्र्य, संधी व सामाजिक प्रतिष्ठा आणि राष्ट्रीय एकता यांचे आश्वासन देणारी बंधुता या भारतीय संविधानातील उद्दिष्ठांशी रिपब्लिकन पक्षाची प्रतिबद्धता स्पष्ट होते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय राज्यघटनेच्या माध्यमातून सामाजिक न्याय, समानता आणि स्वातंत्र्याचे मूल्यशिक्षण भारतीय समाजात रुजवण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या अनुयायांनी त्यांच्या विचारांना राजकीय स्वरूप देण्याचा प्रयत्न केला आणि त्यातून ३ ऑक्टोबर १९५७ रोजी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (RPI) ची स्थापना झाली. RPI हे एकेकाळी दलितांच्या राजकीय आकांक्षांचे प्रतिनिधित्व करणारे आणि संविधानिक लोकशाहीचा दीपस्तंभ मानले गेले. तथापि, गेल्या काही दशकांत या पक्षाला अनेक प्रकारच्या गंभीर आव्हानांचा सामना करावा लागला आहे. या प्रकरणात RPI समोरील बहुआयामी आव्हानांचे सखोल विश्लेषण करण्यात आले आहे.

### ३.६.१ ऐतिहासिक पार्श्वभूमी

डॉ. आंबेडकरांनी आपल्या मृत्यूपूर्वी RPI ची संकल्पना मांडली होती. इंडिपेंडंट लेबर पार्टी (1936) व AISCF (1942) च्या अनुभवावर आधारित, त्यांनी अनुसूचित जातींच्या प्रतिनिधित्वासाठी एक स्थायी, संस्थात्मक राजकीय व्यासपीठ उभारण्याचे स्वप्न पाहिले. त्यांच्या निधनानंतर त्यांच्या अनुयायांनी ही संकल्पना मूर्त स्वरूपात आणली.

दादासाहेब गायकवाड, एन. शिवराज यांसारख्या नेत्यांच्या नेतृत्वाखाली RPI ने महाराष्ट्रात मजबूत पाय रोवले. सुरुवातीला RPI ला काही निवडणूक विजय मिळाले आणि ते दलित राजकारणाच्या मुख्य वाहकापैकी एक बनले. मात्र, पुढे पक्षाची प्रगती थांबली आणि विविध समस्यांमुळे त्याचा प्रभाव हळूहळू कमी होत गेला.

### ३.६.२ रिपब्लिकन पक्षांची उद्दिष्टे :-

सर्व भारतीयांना समान न्याय मिळेल. तो प्रत्येक भारतीयाचा हक्क आहे. समता जेथे नाकारण्यात येईल, तेथे हा पक्ष लढा वेईल.

प्रत्येक व्यक्तीचे सुख हा केंद्रबिंदू समजण्यात येईल. आणि आपल्या उद्धारासाठी प्रत्येक व्यक्तीस समान संधी मिळेल. शासन संस्था ही हे ध्येय साध्य करण्यासाठी वापरावयाचे साधन आहे.

इतर बांधवांच्या हक्काचे व शासनव्यवस्थेच्या आवश्यक तेवढ्या अधिकाराचे संरक्षण करून प्रत्येक नागरीकास धार्मिक, आर्थिक, राजकीय स्वातंत्र्य असले पाहिजे. असे हा पक्ष मानेल.

ज्यांना स्वतःची उन्नती करण्यांची संधी मिळाली नाही, त्यांना संधी मिळालेल्या लोकांपेक्षा अग्रक्रम देण्याचे तत्त्व हा पक्ष सामाजिक बांधिलकी म्हणून स्वीकारेल.

प्रत्येक व्यक्तीस जीवनातील गरजा, भीती यापासून मुक्ती मिळवून देण्याच्या शासनसंस्थेच्या कर्तव्याची जाणीव हा पक्ष सतत सरकारला देत राहील.

हा पक्ष स्वातंत्र्य, समता, बंधुता यांच्या प्रतिस्थापनेचा आग्रह धरेल.

व्यक्ती व समाज या दोहोंच्या भल्याच्या दृष्टीने संसदीय राज्य पद्धती ही सर्वोत्तम राज्य पद्धती आहे. अशी या पक्षाची निष्ठा राहील.

ही सात उद्दिष्टे पाहिल्यावर भारतीय संविधनातील लोकशाही समाजवादालां प्रत्यक्षात उतरवणारा एकमेव रिपब्लिकन पक्ष होता. हे यावरुन स्पष्ट होते. रिपब्लिकन पक्ष सरनाम्यातील सामाजिक, आर्थिक न्याय विचार व अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य, समता, बंधुता या उच्चत्तम ध्येयांशी कठीबध्द होता, हे आढळते. पक्षाचा आशय, ध्येय आणि त्याच्या बांधणीचे सूक्ष्मपणे निरीक्षण केल्यास बाबासाहेबांचा प्रवास सुंदरतम सामाजिक विकासाकडे चालला होता. सर्व कल्याणकरी बहुजन हिताय, आणि बहुजन सुखाय, या ध्येयाचा प्रत्यय रिपब्लिकन पक्षाच्या प्रारुपातून स्पष्टपणे जाणवतो. परंतु हा पक्ष बाबासाहेबांच्या हयातीत स्थापन झाला नाही.

### ३.६.३ अंतर्गत गटबाजी आणि नेतृत्व संकट

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (RPI) ही एकेकाळी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या वैचारिक वारशाचे राजकीय मूर्त स्वरूप होते. या पक्षाचा उद्देश अनुसूचित जाती, जमाती आणि इतर वंचित घटकांना एकत्र आणून त्यांचे सशक्तीकरण करणे हा होता. मात्र, स्थापनेनंतर काहीच दशकांत RPI मध्ये नेतृत्व संघर्ष आणि गटबाजीने इतकी मुळे रोवली की, पक्षाचे एकसंध अस्तित्वच धोक्यात आले. हे संकट केवळ संघटनात्मक नव्हे, तर वैचारिक आणि कार्यपद्धतीशी निगडित आहे.

RPI ची स्थापना बाबासाहेब आंबेडकरांच्या मृत्यूनंतर झाली, त्यामुळे त्यांच्या करिष्म्याने एकत्र राहिलेल्या अनुयायांना लवकरच एकसंध नेतृत्वाअभावी दिशाहीनतेचा सामना करावा

लागला. सुरुवातीच्या काळात दादासाहेब गायकवाड आणि एन. शिवराज हे नेतृत्व करत होते, परंतु पुढे पक्षात विविध मतभेद निर्माण झाले आणि RPI अनेक गटांमध्ये विभागली गेली.

**त्यातून पुढील प्रमाणे गट निर्माण झाले..**

| गटाचे नाव | प्रमुख नेते |
|---|---|
| RPI (गवई) | राजेंद्र गवई |
| RPI (आठवले) | रामदास आठवले |
| RPI (कवाडे) | जोगेंद्र कवाडे |
| RPI (अठावळे) | रमेश अठावळे |
| भारिप-बहुजन महासंघ | प्रकाश आंबेडकर |

प्रत्येक गटाने स्वतःला आंबेडकरवादी म्हणवले आणि इतरांवर विचारधारेपासून भरकटल्याचा आरोप केला. या अंतर्गत संघर्षांमुळे RPI ने दलित जनतेसमोर एकसंध नेतृत्व आणि धोरण सादर करण्यात अपयश अनुभवले.

### ३.६.४ नेतृत्व संघर्षाची कारणे

**अ. नेतृत्वाचा अभाव:** डॉ. आंबेडकरांच्या मृत्यूनंतर त्यांच्या तोडीचे करिष्मा व समन्वय क्षमतेचे नेतृत्व पुढे आले नाही. परिणामी, नेतृत्व पदासाठी स्पर्धा निर्माण झाली.

**ब. वैयक्तिक महत्त्वाकांक्षा :** अनेक नेत्यांनी दलित चळवळीपेक्षा स्वतःचा राजकीय लाभ आणि पदे मिळवणे यावर भर दिला. त्यामुळे नेतृत्व वैचारिकतेपेक्षा सत्ताभिलाषेवर आधारले गेले.

**क. वैचारिक विसंवाद :** काही गटांनी आंबेडकरांच्या मूळ विचारधारेपासून दूर जाऊन इतर पक्षांशी युती केली. यामुळे वैचारिक गोंधळ आणि मतदारांचा भ्रम वाढला.

### ३.६.५ अंतर्गत गटबाजीचे परिणाम

**अ. मतविभाजन आणि निवडणूक अपयश :** दलित मतदारांचे मत अनेक गटांमध्ये विभागले गेले. परिणामी, RPI ला निवडणुकांमध्ये फारसा यश मिळाले नाही.

**ब. पक्षाची विश्वासार्हता कमी झाली :** सततच्या फुटी, एकमेकांवरील आरोप आणि स्थायित्वाच्या अभावामुळे RPI ला एक विश्वासार्ह पक्ष मानण्याचे प्रमाण घसरले.

**क. राजकीय संधीसाधूपणा :** नेत्यांनी आपली स्वतंत्र ओळख गमावून भाजप, काँग्रेस, शिवसेना यांसारख्या पक्षांशी युती केली. ही युती दीर्घकालीन विचारांपेक्षा तात्कालिक पदलाभावर आधारित होती.

**ड. कार्यकर्त्यांमध्ये असमाधान :** गटबाजी आणि एकसूत्रता नसल्यामुळे तळागाळातील कार्यकर्ते विस्कळीत झाले. त्यामुळे संघटनात्मक उभारणीला अडथळा निर्माण झाला.

### ३.६.७ सारांश :

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (RPI) ही डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दलित, शोषित आणि वंचित घटकांना स्वतंत्र राजकीय व्यासपीठ मिळवून देण्यासाठी संकल्पित केलेली एक महत्वाकांक्षी राजकीय चळवळ होती. स्वातंत्र्यानंतर भारतात सामाजिक समतेचा आदर्श राबविण्याच्या दृष्टीने आंबेडकरांना असे वाटले की, शोषित वर्गांना केवळ सामाजिक आणि शैक्षणिक सुधारणांपेक्षा अधिक काही हवे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १९३६ मध्ये स्वतंत्र मजूर पक्ष, नंतर शेड्यूल्ड कास्ट फेडरेशन स्थापन करून राजकीय जागरूकतेस चालना दिली. पण या प्रयत्नांनंतरही दलित समाजाला राजकीय सत्तेत हवा तसा वाटा मिळत नव्हता. म्हणूनच त्यांनी अखेरच्या टप्प्यात, १९५६ मध्ये रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया स्थापन करण्याचा निर्णय घेतला. दुर्दैवाने त्यांचा मृत्यू पक्षाच्या औपचारिक स्थापनेपूर्वीच झाला, पण त्यांच्या अनुयायांनी १९५७ मध्ये हा पक्ष अधिकृतपणे स्थापन केला.

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया स्थापनेमागे आंबेडकरांची संकल्पना ही भारतीय लोकशाहीला खरी सामाजिक समता देणारी होती. त्यांनी पक्षाचे मूळ उद्दिष्ट समाजातील सर्व वंचित घटकांना घटनात्मक हक्क, सामाजिक न्याय आणि आर्थिक समानता मिळवून देणे असे ठेवले होते. त्यांच्या मते, जर दलित समाजाने स्वतंत्र राजकीय पक्ष निर्माण केला, तर तो त्यांच्या हक्कांसाठी प्रभावी भूमिका बजावू शकेल. RPI ही डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची राजकीय समतेची कृतीशील संकल्पना होती, जी शोषित समाजाला केवळ प्रतिनिधित्व नव्हे, तर सत्तेचा सहभाग मिळवून देण्याचा मार्ग होती. ती भारतीय लोकशाहीत दलितांचा स्वतंत्र आवाज ठरावी, हीच त्यामागची मूळ भावना होती.

## ३.७ प्रश्न

१. ‘स्वतंत्र मजूर पक्ष’ (ILP) च्या स्थापनेची पार्श्वभूमी स्पष्ट करा.

२. स्वतंत्र मजूर पक्षाच्या वैचारिक चौकटिचे विश्लेषण करा.

३. स्वतंत्र मजूर पक्षाच्या उद्दिष्टांची सविस्तर चर्चा करा.

४. स्वतंत्र मजूर पक्षाच्या स्थापनेचा भारतातील सामाजिक-राजकीय आंदोलनांवर झालेला परिणाम स्पष्ट करा.

५. 'शेड्यूल्ड कास्ट फेडरेशन' पक्षाच्या स्थापनेची पार्श्वभूमी स्पष्ट करा.

६. शेड्यूल्ड कास्ट फेडरेशनच्या प्रमुख उद्दिष्टांचा आढावा घ्या आणि त्याचे भारतीय समाजरचनेवर झालेल्या संभाव्य परिणामांची चर्चा करा.

७. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या राजकीय विचारांच्या उत्क्रांतीचे मूल्यांकन करा.

८. रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (RPI) मध्ये अंतर्गत गटबाजी कशी आणि का उद्भवली, याचे सविस्तर विश्लेषण करा.

९. रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया स्थापनेची पार्श्वभूमी स्पष्ट करा.

१०. रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाच्या विघटनाची कारणे स्पष्ट करा.

## ३.८ संदर्भ


- कीर धनंजय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९९२.
- डोळे ना.य., भारतीय राजकीय विचारवंत, विद्या पब्लिकेशन, नागपूर.
- वराडकर रा.घ., भारतीय राजकीय विचारवंत, विद्या प्रकाशन, नागपूर.
- चां. भ. खैरमोडे, डॉ. भीमराव रामजी आंबेडकर खंड 1, पुणे, सुगावा प्रकाशन, चौथी आवृत्ती 1992.
- भी. रा. आंबेडकर, जनता, ता. 23-5-1938.
- मा. फ. गांजरे, डॉ. बाबासाहेब आंबेडकारांची भाषणे, नागपूर, अशोक प्रकाशन, द्वितीय आ. 1977.
- ज. गो. संत, डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात असा मी जगलो, पुणे, सुगावा प्रकाशन, द्वितीय आवृत्ती, 1994.
- बी. सी. कांबळे, समग्र आंबेडकर चरित्र खंड 3, मुंबई.
- शेषराव मोरे, डॉ. आंबेडकरांचे सामाजिक धोरण, एक अभ्यास, पुणे, राजहंस प्रकाशन, प्रथमावृत्ती, 1998.
- डॉ. बाबासाहेब आंबेडकर, बहिष्कृत भारत आणि मूकनायक, महाराष्ट्र शासन, 1990.
- चां. भ. खैरमोडे, भी. रा. आंबेडकर, चरित्र खंड 7, पुणे सुगावा प्रकाशन, व्दितीय आवृती 1998.
- बी. सी. कांबळे, समग्र आंबेडकर चरित्र खंड 22, मुंबई, पृ. 31, 32.
- Christophe Jaffrelot (2005), India's Silent Revolution.
- Gail Omvedt (1994), Dalits and Democratic Revolution.
- Anand Teltumbde (2001), Ambedkar in and for the Post-Ambedkar Dalit Movement.
- Eleanor Zelliot (2005), From Untouchable to Dalit.


✞✞✞✞

# ४

# नागरी हक्क चळवळ : महाड चवदार तळे सत्याग्रह आणि काळाराम मंदीर प्रवेश चळवळ

**घटक रचना :**


४. ० उद्दिष्टे

४.१ प्रस्तावना

४.२ डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे प्रारंभिक जीवन

४.३ डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शिक्षण आणि कारकीर्द

४.४ नागरी हक्क चळवळीची पार्श्वभूमी

४.५ महाड चवदार तळे सत्याग्रह

४.६ काळाराम मंदिर प्रवेश सत्याग्रह

४.७ सत्याग्रह आणि तद्नंतरची परिस्थिती

४.८ सारांश

४.९ प्रश्न

४.१० संदर्भ


## ४.० उद्दिष्ट्ये

१. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे प्रारंभिक जीवन, शिक्षण आणि व्यावसायिक कारकीर्द स्पष्ट करणे.

२. नागरी हक्क चळवळीच्या पार्श्वभूमीचे विश्लेषण करणे.

३. महाड चवदार तळे सत्याग्रहाचे परीक्षण करणे.

४. काळाराम मंदिर प्रवेश सत्याग्रहाचे चिकित्सक मूल्यमापन करणे.

## ४.१ प्रस्तावना

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, अर्थशास्त्राचे गाढे अभ्यासक, समाजशास्त्रज्ञ, धर्मतज्ज्ञ, कायदेपंडित आणि तत्त्वज्ञ होते. इतकेच नव्हे, तर त्यांनी

इतिहासाच्या क्षेत्रातही महत्त्वपूर्ण योगदान दिले. त्यांचे इतिहासविषयक ज्ञान आणि लेखन हे प्रथम श्रेणीतील इतिहासकारांपेक्षा कमी नव्हते.

एम.ए.च्या शिक्षणादरम्यान (१९१३-१५) त्यांनी 'प्राचीन भारतीय वाणिज्य' या विषयावर प्रबंध सादर करण्याचा विचार केला होता, परंतु काही कारणास्तव त्यांनी 'ईस्ट इंडिया कंपनीचे प्रशासन आणि वित्त' या विषयावर प्रबंध सादर केला आणि १९१५ साली कोलंबिया विद्यापीठातून एम. ए. पदवी प्राप्त केली.

या घटकामध्ये आपण डॉ. आंबेडकर यांचे प्रारंभिक जीवन, शिक्षण आणि नागरी हक्क चळवळीतील त्यांच्या योगदानाचा अभ्यास करणार आहोत, विशेषतः महाड चवदार तळे सत्याग्रह आणि काळाराम मंदिर प्रवेश सत्याग्रहाच्या संदर्भात.

## ४.२ डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे प्रारंभिक जीवन

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जन्म १४ एप्रिल १८९१ रोजी मध्य प्रदेशातील महू (सध्याचे डॉ. आंबेडकर नगर) येथे झाला. ते महार या दलित जातीत जन्मले, जी त्या काळी हिंदू समाजव्यवस्थेत अत्यंत खालच्या स्तरावर मानली जात होती. त्यांचे वडील, रामजी मालोजी सकपाळ, ब्रिटिश भारतीय सैन्यात सुभेदार पदावर कार्यरत होते आणि शिक्षणात गाढ रस ठेवत, आपल्या मुलांना शिक्षण घेण्यासाठी प्रोत्साहित करत. त्यांची आई, भीमाबाई सकपाळ, गृहिणी होत्या; त्यांचे निधन भिमराव पाच वर्षांचे असताना झाले. भिमराव हे त्यांच्या वडिलांचे चौदावे आणि शेवटचे अपत्य होते. त्यांचे मूळ गाव महाराष्ट्रातील रत्नागिरी जिल्ह्यातील आंबावडे होते.

लहानपणी भीमराव यांना 'भिवा' या टोपणनावाने ओळखले जात असे. त्यांचे बालपण गरिबी, सामाजिक बहिष्कार आणि जातीच्या आधारावर होणाऱ्या भेदभावाने भरलेले होते. शाळेत उच्चवर्णीय विद्यार्थ्यांकडून त्यांना अपमानास्पद वागणूक मिळत असे; उदाहरणार्थ, त्यांना वर्गात वेगळे बसवले जाई आणि पिण्याचे पाणी मिळवण्यासाठी इतरांच्या मदतीची गरज भासत असे.

या अडचणी असूनही, भिमराव यांनी शिक्षणात उत्कृष्ट प्रगती केली. त्यांनी सातारा येथे प्राथमिक शिक्षण पूर्ण केले आणि नंतर मुंबईतील एल्फिन्स्टन हायस्कूलमधून माध्यमिक शिक्षण घेतले.

भिवा यांचा विवाह १९०६ साली रमाबाई यांच्याशी भायखळा येथील भाजी मंडई मध्ये संपन्न झाला. त्यांनी आपल्या वैयक्तिक आणि व्यावसायिक जीवनात भिमराव यांना सतत पाठिंबा दिला. त्यांना काही अपत्ये झाली, परंतु त्यापैकी काही बालपणीच मरण पावली.

## ४.३ डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शिक्षण आणि कारकीर्द

भिमराव रामजी आंबेडकर यांनी आपले प्राथमिक शिक्षण सातारा येथील शाळेत पूर्ण केले. १९०७ साली, त्यांनी मुंबईतील एल्फिन्स्टन हायस्कूलमधून मॅट्रिक्युलेशन परीक्षा उत्तीर्ण केली. ते महार समाजातील मॅट्रिक्युलेशन परीक्षा उत्तीर्ण करणारे पहिले विद्यार्थी होते. या

यशानंतर त्यांच्या समाजाने त्यांचा सत्कार केला, ज्यामध्ये कृष्णाजी अर्जुन केळुसकर यांनी त्यांना बुद्धचरित्राची प्रत भेट दिली.

१९०८ साली, त्यांनी एल्फिन्स्टन कॉलेजमध्ये प्रवेश घेतला आणि १९१२ साली मुंबई विद्यापीठातून अर्थशास्त्र आणि राज्यशास्त्र या विषयांमध्ये बी.ए. पदवी प्राप्त केली.

१९१३ साली, सयाजीराव गायकवाड यांनी दिलेल्या शिष्यवृत्तीच्या आधारे, भिमराव आंबेडकर यांनी न्यूयॉर्क येथील कोलंबिया विद्यापीठात उच्च शिक्षणासाठी प्रवेश घेतला. १९१५ साली, त्यांनी अर्थशास्त्रात एम.ए. पदवी प्राप्त केली. त्यांनी "Ancient Indian Commerce" या विषयावर प्रबंध सादर केला.

पुढील शिक्षणासाठी त्यांनी कोलंबिया विद्यापीठ, न्यूयॉर्क मध्ये १९१५ आणि १९१७ मध्ये अनुक्रमे एम. ए. आणि पीएच. डी. करण्यासाठी प्रवेश घेतला. त्यांनी १९२१ मध्ये लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्समधून एम. एस्सी. पूर्ण केली. त्यांनी 'Provincial Decentralization of Imperial Finance in British India' या विषयावर आपला संशोधन प्रबंध सादर केला. त्यानंतर त्यांनी लंडनमधील ग्रेज इन मधून बॅरिस्टर पदवी प्राप्त केली. १९२२-२३ दरम्यान त्यांनी जर्मनीतील बॉन विद्यापीठात आर्थशास्त्राचे अध्ययन केले. १९२३ मध्ये लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्समधून डी. एस्सी. (D.Sc.) ही पदवी प्राप्त करणारे ते पहिले भारतीय ठरले. यापदवीसाठी त्यांचा प्रबंध "रुपय्याचा प्रश्न - त्याची उत्पत्ती आणि त्याचे निराकरण" या विषयावर होता. ५ जून १९५२ रोजी कोलंबिया विद्यापीठाने त्यांना LL.D. (Honoris Causa) ही मानद पदवी बहाल केली आणि १२ जानेवारी १९५३ रोजी उस्मानिया विद्यापीठ, हैदराबादने त्यांना D.Litt. (Honoris Causa) ही मानद पदवी बहाल केली. कोलंबिया विद्यापीठाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना 'ज्ञानाचे प्रतीक' (Symbol of Knowledge) आणि त्या विद्यापीठातील २०० वर्षांतील सर्वोत्तम विद्यार्थ्यांपैकी एक म्हणून गौरवले. कोलंबिया विद्यापीठाने त्यांच्या परिसरात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा बसवला आहे, जो त्या अमेरिकन विद्यापीठातील विद्यार्थ्यांना प्रेरणा देतो.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी त्यांच्या संपूर्ण आयुष्यात सामाजिक भेदभाव आणि उपेक्षिततेच्या अनुभवांचा आधार घेत सामाजिक न्याय आणि समतेच्या संघर्षात एक अग्रणी व्यक्तिमत्व म्हणून निखारून आले. त्यांचा वारसा जगभरातील लाखो लोकांना जाति-आधारित भेदभाव आणि दडपशाहीविरुद्ध लढण्यासाठी प्रेरणा देत आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे जीवन त्यांच्या काळात भारतीय समाजावर वर्चस्व गाजवणाऱ्या जातिव्यवस्थेच्या अनुभवांनी खोलवर आकारले. हिंदू सामाजिक उतरंडीमध्ये ऐतिहासिकदृष्ट्या उपेक्षित आणि पीडित असलेल्या दलित समुदायाचा सदस्य म्हणून, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना लहानपणापासूनच भेदभाव, बहिष्कार आणि अपमानाचा सामना करावा लागला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या लवचिकता, दृढनिश्चय आणि बौद्धिक पराक्रमामुळे ते भारताच्या सामाजिक न्याय आणि समानतेच्या संघर्षातील सर्वात प्रभावशाली व्यक्तींपैकी एक बनले. आधुनिक भारताच्या लोकशाही तत्त्वांना आणि संस्थांना आकार देण्यात त्यांच्या

प्रयत्नांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आणि त्यांचा वारसा जगभरातील सामाजिक बदलाच्या चळवळींना प्रेरणा देत आहे.

## ४.४ नागरी हक्क चळवळीची पार्श्वभूमी

आंबेडकरपूर्व दलित चळवळसुदधा अस्पृश्यांच्या उन्नतीबद्दल बोलते. आंबेडकरपूर्व दलित नेत्यांनी नेहमीच धार्मिक ग्रंथांवर टीका केली ज्यामध्ये अस्पृश्यांच्या दयनीय परिस्थितीचा उल्लेख आहे. हिंदू धर्माचा एक भाग असल्याने, हिंदू प्रथा पाळणाऱ्या हिंदू बांधवांनी त्यांना बहिष्कृत केले होते आणि म्हणूनच त्यांना 'जातीवादी हिंदू' म्हटले जाते. येथे विविध कार्यकर्त्यांनी सुरू केलेल्या दलित चळवळीने खालील प्रमुख प्रश्न उपस्थित केले आहेत:

१. अस्पृश्यांना मानव म्हणून का वागवले जात नाही?

२. हिंदू असलेले भारतीय लोक त्यांच्या हिंदू बांधवांना प्राण्यांपेक्षा आणि पक्ष्यांपेक्षा कमी का वागवतात?

३. ब्रिटिश सरकारनेही अस्पृश्यांच्या प्रगतीकडे आणि कलंक दूर करण्याकडे का लक्ष दिले नाही?

४. भारतीय राष्ट्रवादी नेत्यांनी अस्पृश्यांचे प्रश्न राष्ट्रीय अजेंड्यावर का घेतले नाहीत?

५. ज्या व्यक्तीला मानव म्हणून वागवले जात नाही त्याने राष्ट्रीय चळवळीत कसा भाग घ्यावा?

६. जेव्हा भूमीपुत्राला माणूस म्हणून स्वीकारले जात नाही, तेव्हा तो या भूमीसाठी लढू शकतो?

७. ब्रिटिश आणि जातीवादी हिंदू ज्या समुदायाला तुच्छ मानतात तो समुदाय कोणाविरुद्ध कसा लढेल?

८. म्हणून, 'दुहेरी वर्चस्व' (Dual Dominance) मुळे हा समुदाय दोघांपैकी एकापासून मुक्त होण्याचा प्रयत्न करेल आणि पुढे, शतकानुशतके एकमेकांशी बांधलेल्या साखळ्या तोडण्याचा तो सर्वतोपरी प्रयत्न करेल.

९. जरी, 'जातीवादी हिंदू' आणि बहिष्कृतांसाठी राष्ट्रवादाची संकल्पना एकमेकांपासून वेगळी असली तरी या समुदायाला असे वाटले पाहिजे की हे त्यांचे स्वतःचे राष्ट्र आहे ज्यासाठी त्यांनी आपले जीवन समर्पित केले पाहिजे.

१०. म्हणूनच, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नंतरच्या चळवळीनी देखील राष्ट्र म्हणजे काय, राष्ट्रवाद म्हणजे काय हे परिभाषित करण्याचा प्रयत्न केला आणि त्यांनी ब्रिटिश राजवटीसह जातीय हिंदू अशा दोन्ही आघाड्यांवर लढा दिला. त्यांनी भारतीयांविरुद्ध कधीही ब्रिटिशांना पाठिंबा दिला नाही परंतु जेव्हा जेव्हा त्यांच्या राष्ट्राबद्दलच्या भावना व्यक्त करण्याची वेळ आली तेव्हा त्यांनी केवळ भारताच्या बाजूने आपली भूमिका स्पष्ट केली.

## ४.५ महाड चवदार तळे सत्याग्रह

हिंदू धर्म शास्त्रांनी हिंदू समाजाला चार वर्णांमध्ये विभागले आहे - ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शूद्र. समाजाचा एक भाग असा होता जो या चातुर्वर्ण व्यवस्थेच्या बाहेर होता. परंतु जातीवादी हिंदूंच्या शोषणामुळे त्यांना अनेक बंधनांनाही तोंड द्यावे लागले. या गटाला अस्पृश्य म्हणून ओळखले जाऊ लागले. जातीवादी हिंदू त्यांना 'अपवित्र' मानत होते आणि अस्पृश्यतेची ही प्रथा केवळ परस्पर संवादापुरती मर्यादित नव्हती तर सार्वजनिक जागांपर्यंत देखील पसरली होती. अस्पृश्यांना मंदिरात प्रवेश करता येत नव्हता, त्यांना त्यांचे स्वतंत्र पाणी पिण्याच्या सोयी करण्यास भाग पाडले जात होते, त्यांच्या मुलांना शाळांमध्ये वेगळे बसावे लागत होते इत्यादी. जातीवादी हिंदूंच्या या प्रतिगामी चालीरीतींना आव्हान देण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली 'महाड सत्याग्रह' हा सर्वात महत्वाचा संघटित प्रयत्न होता.

१९२७ मध्ये महाराष्ट्रातील महाड शहरात झालेला महाड सत्याग्रह हे आधुनिक इतिहासातील एक महत्त्वाचे आंदोलन म्हणून ओळखले जाते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखालील या अहिंसक सत्याग्रहाने भारतातील दलित समुदायासाठी सामाजिक न्याय, समानता आणि नागरी हक्क मिळवण्याच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल उचलले.

शोषित जाती (ज्यांना वसाहतवादी राजवटीत दलित वर्ग किंवा अस्पृश्य म्हणून ओळखले जाते) शतकानुशतके भारतीय समाजात तीव्र भेदभाव, पृथक्करण आणि सामाजिक बहिष्काराचा सामना करत आहेत. पाणवठे, मंदिरे आणि शाळा यासारख्या सार्वजनिक संसाधनांमध्ये त्यांना प्रवेश नाकारण्यात आला, ज्यामुळे त्यांचे सामाजिक, राजकीय आणि आर्थिक सीमान्तीकरण शाश्वत राहिले.

महाड सत्याग्रह हा या अन्यायाविरुद्ध प्रतिसाद होता आणि खोलवर रुजलेल्या जाती-आधारित भेदभावाला आव्हान देण्याचा त्यांचा उद्देश होता. दलित वर्गाचे नेते म्हणून, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जातिव्यवस्थेच्या विचारसरणीला विरोध करण्यात आघाडीवर होते. त्यांचा असा विश्वास होता की, भारताला केवळ राजकीय सुधारणांचीच नव्हे तर सामाजिक सुधारणांचीही आवश्यकता आहे. स्वातंत्र्याचा संघर्ष सुरू असताना सामाजिक असमानतेविरुद्ध लढण्यासाठी एक प्रभावी रणनीती त्यांच्यासाठी महत्त्वाची होती. त्यांनी 'ॲनिहिलेशन ऑफ कास्ट' (१९३६) मध्ये सारांशित केल्याप्रमाणे: "समाजाच्या पुनर्बांधणीच्या अर्थाने सामाजिक सुधारणा केल्याशिवाय राजकीय सुधारणा प्राधान्य घेऊ शकत नाही, हा एक प्रबंध आहे जो मला खात्री आहे की वादग्रस्त ठरू शकत नाही"

मुंबई विधान परिषदेने १९२३ मध्ये सी. के. बोले ठराव मंजूर केला होता ज्यामध्ये अस्पृश्यांना महाड येथील चवदार तलावातील पाणी वापरण्याची परवानगी देण्यात आली होती. परंतु महाड नगरपालिकेच्या जातीवादी हिंदूंच्या अनिच्छेमुळे त्याची अंमलबजावणी झाली नाही. म्हणून, १९-२० मार्च १९२७ रोजी कुलाबा जिल्हा दलित वर्गाने एक परिषद आयोजित करण्याचे नियोजन केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर या बैठकीचे अध्यक्षस्थान भूषवणार होते आणि त्यांच्यासोबत तेथे जमलेल्या सर्व महार समाजाला चवदार तलावातील पाणी वापरण्याचा अधिकार मिळणार होता.

रामचंद्र बाबाजी मोरे यांच्या निमंत्रणावरून डॉ. बाबासाहेब आंबेडकर १९-२० मार्च १९२७ रोजी कुलाबा जिल्हा दलित वर्गाने आयोजित केलेल्या दोन दिवसांच्या परिषदेसाठी महाड येथे गेले होते. या परिषदेचे अध्यक्षपद डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भूषवले होते, ज्यात हजारो प्रतिनिधी उपस्थित होते. अस्पृश्यांच्या नागरी हक्कांबद्दल जागरूकता निर्माण करणे हा या परिषदेचा मुख्य अजेंडा होता. परिषदेदरम्यान असे ठरविण्यात आले की, उपस्थितांनी चवदार तलावाकडे आगेकूच करावी आणि "अस्पृश्य" सार्वजनिक जलसंचयात प्रवेश करण्याचा त्यांचा नैतिक आणि कायदेशीर अधिकार बजावतील. चवदार तळ्याचे महत्त्व सांगताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात:.

"अस्पृश्य लोकांना, खरेदी करण्यासाठी किंवा ग्राम सेवक म्हणून त्यांच्या कर्तव्यासाठी, गावातील अधिकाऱ्यांनी पाठवलेला पत्रव्यवहार किंवा गावातील अधिकाऱ्यांनी वसूल केलेला सरकारी महसूल भरण्यासाठी महाडला यावे लागत असे. चादर तळे हे एकमेव सार्वजनिक तळे होते जिथून बाहेरील कोणतीही व्यक्ती पाणी घेऊ शकत होती. परंतु अस्पृश्य लोकांना या तळ्यातून पाणी घेण्याची परवानगी नव्हती. अस्पृश्यांसाठी पाण्याचा एकमेव स्रोत महाड शहरातील अस्पृश्य वस्तीतील विहीर होती. ही विहीर शहराच्या मध्यभागी काही अंतरावर होती. नगरपालिकेने दुर्लक्ष केल्यामुळे ती जवळजवळ बंदच पडली होती."

२० मार्च १९२७ रोजी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी २,५०० "अस्पृश्यांचा" मोर्चा मुख्य रस्त्यांवरून चवदार तळ्याकडे नेला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी तळ्यातून पाणी घेतले आणि ते पेले. इतरांनीही त्यांचे अनुकरण केले. याला 'महाड सत्याग्रह' म्हणून ओळखले जाते. नंतर सर्वजण मंडपामध्ये परतले. हा एक शांततापूर्ण निषेध होता परंतु त्याचे परिणाम क्रांतिकारी होते.

तळ्यावरून आल्यावर दोन तासांनंतर, जातीय हिंदूंनी खोटी अफवा पसरवली की "अस्पृश्य" वीरेश्वर मंदिरात देखील प्रवेश करण्याचा विचार करत आहेत. यावेळी रस्त्याच्या कोपऱ्यांवर बांबूच्या काठ्या घेऊन सज्ज असलेल्या जातीय हिंदूंचा मोठा जमाव जमला. ते मंडपामध्ये घुसले. त्यावेळी आलेले बरेच प्रतिनिधी शहरात लहान लहान गटात विखुरलेले होते. काही जण सामान बांधण्यात व्यस्त होते आणि काही जण जेवण करून आपापल्या गावांकडे निघून जात होते. आतापर्यंत बहुतेक प्रतिनिधी शहर सोडून गेले होते. संतप्त जमावाने मंडपामधील प्रतिनिधींवर हल्ला केला, त्यांचे अन्न जमिनीवर फेकून दिले, त्यांची भांडी फोडली आणि त्यांना मारहाण केली.

महाडमधील जातीवादी हिंदूंना डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि त्यांच्या सहकाऱ्यांचे क्रांतिकारी कृत्य आवडले नाही. त्यांनी तळ्याची "अशुद्धता " पूर्ववत करण्यासाठी शुद्धीकरण विधी केला.

त्यांनी त्यांच्या गावात आलेल्या परिषदेच्या प्रतिनिधींना शिक्षा करण्यासाठी त्यांच्या जातीवादी लोकांनां गावोगावी निरोप धाडले. आज्ञाधारकपणे, अनेक जातीवाद्यांनी महाडला आलेले प्रतिनिधी त्यांच्या गावी पोहोचण्यापूर्वी किंवा पोचल्यानंतर त्यांच्यावर हल्ले करण्यात आले. (महाड सत्याग्रह पाण्यासाठी नाही तर मानवी हक्क प्रस्थापित करण्यासाठी होता.)

वास्तविक, काही स्पृश्य-उच्च जातीच्या हिंदूंनीही या सत्याग्रहाला पाठिंबा दिला आणि परिषदेसाठी प्रचार केला. उल्लेखनीय म्हणजे, सुरेंद्रनाथ टिपणीस, अनंतराव चित्रे, गंगाधर नीलकंठ सहस्त्रबुद्धे हे त्यापैकी होते. पहिल्या दिवशी, तेथे जमलेल्या नेत्यांनी त्यांची भाषणे केली आणि मानवतेच्या त्यांच्या हक्कासाठी जमलेल्यांना प्रेरित केले. रात्री परिषदेच्या विषय समितीने सर्व अस्पृश्यांसह प्रत्यक्ष तळ्याला भेट देण्याचा आणि त्यातील पाणी पिण्याचा निर्धार केला.  त्यानुसार, महाड नगरपालिकेने १९२४ मध्ये दलित वर्गासाठी हे तळे खुले केल्याचे जाहीर केलेल्या ठरावानुसार, आता तळ्याचे पाणी पिण्याचा आणि अस्पृश्यांचा हक्क स्थापित करण्याचा निर्णय घेण्यात आला. अस्पृश्य हिंदूंच्या जागृत शक्तीचे प्रतिनिधित्व करणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर ज्या तळ्यावरून मुस्लिम आणि ख्रिश्चन आणि स्पृश्य हिंदू पाणी घेत होते त्या तळ्याकडे कूच करत होते.  परंतु हिंदू देवतांची पूजा करणारे अस्पृश्य हिंदू, गेल्या अनेक युगांपासून त्याच हिंदू धर्माला बिलगून बसले होते, त्यांना तहानेने घसा सुकलेला असतानाही, पाण्याचा एक थेंबही पिण्याची परवानगी नव्हती. मात्र डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी हौदातून पाणी घेतले आणि ते प्राशन केले.

भारतीय राष्ट्रीय चळवळीत महार, अस्पृश्य आणि दलित वर्गासारख्या स्वधार्मिक जनतेला अशा प्रकारची वागणूक कशी काय दिली जाते? हो, जेव्हा या वर्गांना त्यांच्या शोषणाची जाणीव नसते तेव्हा ते राष्ट्रीय चळवळीमध्ये सहभागी होऊ शकतात हे शक्य आहे. परंतु जेव्हा त्यांना त्यांच्या हक्कांची जाणीव असते आणि त्यांच्या शोषणाची जाणीव होते तेव्हा ते स्वाभाविकपणे त्यांच्या मानवी हक्कांसाठी लढतील. हे काम डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केले होते आणि म्हणूनच जागरूक झालेल्या अस्पृश्य जनतेने त्यांचे अनुसरण करण्यास सुरुवात केली आणि त्यांचे मानवी हक्क मिळविण्यासाठी पुढे आले. कदाचित, असे म्हणणे चुकीचे ठरणार नाही की, जर सुरुवातीपासूनच, भारतीय राष्ट्रीय नेते आणि भारतीय राष्ट्रीय काँग्रेसने सामाजिक दुष्प्रवृत्ती दूर करण्यासाठी काम केले असते, तर स्वातंत्र्यासाठी संघटित लढा लवकरात लवकर यशस्वी झाला असता.

बॉम्बे क्रॉनिकलने परिषदेसाठी जमलेल्या लोकांवर झालेल्या हल्ल्याची घटना पुढील शब्दात नोंदवली,

"मिरवणूक अत्यंत शांततेत पार पडली आणि सर्व काही शांततेत पार पडले. परंतु सुमारे दोन तासांनंतर शहरातील काही दुष्ट विचारसरणीच्या नेत्यांनी खोटी अफवा पसरवली की दलित वर्ग वीरेश्वरच्या मंदिरात प्रवेश करण्याचा विचार करत आहेत.  त्यानंतर बांबूच्या काठ्यांनी सज्ज असलेला जातीवादी जमाव एकत्र आला. लवकरच हा जमाव आक्रमक झाला आणि संपूर्ण शहर अस्पृश्य जनतेवर हल्ले करण्यासाठी चवताळून उठला. अस्पृश्य वर्गाचे लोक रक्ताच्या थारोळ्यात माखले."

मुंबई शहर पोलिसांच्या विशेष शाखेने (Special Branch) या घटनेची चौकशी केली आणि सरकारला अहवाल दिला. महाड सत्याग्रहावरील पुढील कारवाईवर चर्चा करण्यासाठी ३ जुलै १९२० रोजी मुंबईत एक बैठक झाली. अहवालात म्हटले आहे की, “बहिष्कृत हितकारणी सभेच्यावतीने, कुलाबा जिल्ह्यातील महाड येथील अस्पृश्यांवर होणाऱ्या अत्याचारांच्या निषेधार्थ ३ जुलै रोजी संध्याकाळी कावसजी जहांगीर हॉलमध्ये दलित वर्गाची एक जाहीर सभा आयोजित करण्यात आली होती. बार-ऍट -लॉ डॉ. भिमराव रामजी आंबेडकर यांनी सुमारे १००० लोकांच्या सभेचे अध्यक्षपद भूषवले. अध्यक्ष रागोबा

नारायण वनमाळी, महादेव आबाजी कामळी, सीताराम नामदेव शिवतरकर, निर्मल लिंबाजी गंगावणे, गीतानंद ब्रह्मचारी आणि सामंत नानजी मारवाडी यांनी भाषणे दिली, ज्यात महाडमधील जातीवादी हिंदूंनी त्यांच्या धार्मिक बांधवांना दिलेल्या वागणुकीचा निषेध केला. या वागणुकीविरुद्ध शांततापूर्ण आंदोलन करण्यासाठी त्यांनी स्वयंसेवकांची नियुक्ती करून निधी गोळा करण्याचा निर्णय घेतला. दिवाळीच्या सुट्ट्यांनंतर ते प्रथम महाड येथे एक परिषद घेतील आणि नंतर नागरिक म्हणून अस्पृश्य जनतेला त्यांचे हक्क प्राप्त करण्यासाठी सत्याग्रह सुरू करण्याचा निर्णय घेतील. या संदर्भात एक ठराव मंजूर करण्यात आला. आणखी एक ठराव मंजूर करण्यात आला. मद्रासमध्ये केल्याप्रमाणे दलित वर्गाच्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी एक स्वतंत्र विभाग स्थापन करण्याची सरकारला विनंती करण्यात येईल असेही ठरले. वक्त्यांनी आर्थिक निधीसाठी आवाहन केले आणि सुमारे त्यानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी डिसेंबर १९२७ मध्ये महाड येथे दलित वर्गाचे हक्क मिळवण्यासाठी आणखी एक सत्याग्रह सुरू करण्याचा निर्णय घेतला. तथापि, जातीवादी हिंदूंनी १२ डिसेंबर १९२७ रोजी महाड दिवाणी न्यायालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि त्यांच्या सहकाऱ्यांविरुद्ध तात्पुरता मनाई आदेश जारी करण्याची मागणी करत कायदेशीर कारवाई सुरू केली. १४ डिसेंबर १९२७ रोजी न्यायालयाने तात्पुरता मनाई आदेश जारी केला, ज्यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकर, त्यांचे सहकारी आणि दलित वर्गाचे सदस्य किंवा त्यांच्या वतीने काम करणाऱ्यांना पुढील आदेश जारी होईपर्यंत चवदार तलावात प्रवेश करण्यास मनाई करण्यात आली. तथापि, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी २५-२७ डिसेंबर दरम्यान त्यांचा प्रस्तावित सत्याग्रह सुरू ठेवण्याचा निर्णय घेतला आणि दिवाणी खटल्याची सुनावणी होईपर्यंत चवदार तळ्यावर न जाण्याचा निर्णय घेतला. २५ डिसेंबर १९२७ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दलित वर्गाच्या लोकांना संबोधित करताना म्हटले होते की "

"असे नाही की चवदार तळ्याचे पाणी पिल्याने आपण अमर होऊ. इतके दिवस आपण ते न पिताही चांगले जगलो आहोत. आपण फक्त चवदार तळ्याचे पाणी पिण्यासाठी जात नाही आहोत. आपणही इतरांसारखेच मानव आहोत हे सांगण्यासाठी आपण तळ्याकडे जात आहोत. हे स्पष्ट असले पाहिजे की ही बैठक समानतेचा आदर्श स्थापित करण्यासाठी बोलावण्यात आली आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि त्यांच्या समर्थकांनी जातिव्यवस्थेच्या मूल्यांना प्रतिकात्मकपणे नाकारण्यासाठी 'मनुस्मृती'ची प्रत देखील जाळली. या मेळाव्यात समानता, भेदभाव न करणे आणि संसाधनांमध्ये समान हिस्सा यासाठी काही ठराव देखील मंजूर करण्यात आले.

नंतर, २५ डिसेंबर १९२७ रोजी महाड येथे आणखी एक परिषद आयोजित करण्यात आली होती ज्यामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी त्यांचे उच्चवर्णीय (सीकेपी) सहकारी भाऊ गंगाधर नीलकंठ उर्फ बापूसाहेब सहस्त्रबुद्धे यांच्या हस्ते हिंदू धर्मग्रंथ 'मनुस्मृती'चे सार्वजनिकरित्या दहन केले.

दिवाणी खटल्यात, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांसह त्यांच्या सहकाऱ्यांनी असा युक्तिवाद केला की, हे तळे महाड नगरपालिकेचे आहे आणि ते सर्वांसाठी खुले असावे. अस्पृश्यांना तळे वापरण्यापासून वंचित ठेवणारी प्रदीर्घ प्रथा सिद्ध करण्यात जातीवादी हिंदूंना अपयश

आले आणि ही प्रथा कायदेशीर अधिकार म्हणून पात्र नाही, असे सांगून न्यायालयाने वादींच्या विरोधात निकाल दिला. १९३७ मध्ये हा खटला फेटाळण्यात आला.

या निर्णयाविरुद्ध ठाणे न्यायालयामध्ये अपील दाखल करण्यात आले, परंतु सहाय्यक न्यायाधीश, ठाणे यांनी कनिष्ठ न्यायालयाच्या निर्णयाला मान्यता दिली. न्यायाधीशांनी असे म्हटले की अस्पृश्यांना तळे वापरण्यापासून वंचित ठेवण्याचे कोणतेही पुरावे किंवा कायदेशीर आधार नाही. त्यानंतर, वादींनी मुंबई उच्च न्यायालयात आव्हान दिले. उच्च न्यायालयाने १९३७ मध्ये अपील फेटाळले.

अशा प्रकारे, जवळजवळ १० वर्षांच्या संघर्षानंतर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आपल्या लोकांच्या मानवी हक्कांसाठी  कायदेशीर विजय मिळवू शकले.३५० रुपये जमा झाले. सत्याग्रह चळवळ सुरू झाल्यावर डझनभर लोकांनी स्वयंसेवक होण्यास संमती दिली.

## ४.६ काळाराम मंदिर प्रवेश सत्याग्रह

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी अस्पृश्यांच्या मानवी हक्कांसाठी आणखी एक लढा दिला तो म्हणजे २ मार्च १९३० रोजी नाशिक येथे सुरू केलेला मंदिर प्रवेश सत्याग्रह म्हणजेच काळाराम मंदिर प्रवेश सत्याग्रह' होय. तीन वर्षांपूर्वी त्यांनी महाड येथे चवदार तळे  सत्याग्रह सुरू केला होता जो दहा वर्षांनी १९३७ मध्ये कायदेशीररित्या यशस्वी झाला (जातीवादी हिंदूंच्या मतपरिवर्तनामुळे नाही). अस्पृश्य देखील हिंदू धर्माचे होते आणि ते राम, कृष्ण आणि लक्ष्मी सारख्या देव-देवतांचीही पूजा करतात. परंतु त्यांना जातीवादी हिंदूंनी त्यांच्या देवतांच्या मंदिरात प्रवेश करण्याची आणि त्यांची पूजा करण्याची परवानगी दिली नाही. म्हणून, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मंदिर प्रवेश सत्याग्रहाची आणखी एक चळवळ सुरू करण्याचा निर्णय घेतला आणि मंदिर निवडले गेले ते म्हणजे नाशिकचे काळाराम मंदिर. (रामाची मूर्ती काळ्या रंगात रंगवण्यात आली होती)

१९३० हे वर्ष क्रिया आणि प्रतिक्रियेचे वर्ष होते. याने विचारसरणीची एक नवीन दिशा आणि आंदोलनाचा  एक नवीन दृष्टिकोन समोर आणला; इंग्रजांवर दबावतंत्राचे नवीन प्रकार आणि सुसंवाद साधण्याच्या नवीन पद्धती. त्याहूनही चांगले म्हणजे तो सत्याग्रहाचा काळ होता. याच वर्षी १२ मार्च १९३० रोजी काँग्रेसचे सरसेनापती म्हणून महात्मा गांधींनी देशाच्या मुक्तीसाठी दांडी यात्रा आणि मीठ सत्याग्रहासारख्या चळवळीची सुरुवात केली.

गांधीजींच्या दांडी यात्रेच्या दहा दिवस आधी, भारतीय सामाजिक अशांततेचे जनक डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी नाशिक येथे मंदिर प्रवेश आंदोलन सुरू केले. या आंदोलनाची तयारी गेल्या तीन महिन्यांपेक्षा अधिक काळ सुरू होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकर त्यांच्या पत्रांद्वारे आणि सहकाऱ्यांच्याद्वारे मुंबईतून त्याचे मार्गदर्शन, प्रेरणा आणि संघटन करत होते. नाशिक येथील दलित वर्गाने सत्याग्रह समितीची स्थापना केली होती आणि तिचे सचिव भाऊराव गायकवाड उर्फ दादासाहेब गायकवाड यांच्यामार्फत प्रसिद्ध काळाराम मंदिराच्या विश्वस्तांना कळवले होते की, जर विश्वस्तांनी विशिष्ट तारखेपूर्वी अस्पृश्य हिंदूंसाठी मंदिर खुले केले नाही तर ते सत्याग्रह करतील. त्याच वेळी, दलित वर्गाला सदर मंदिरात श्री रामाची पूजा करण्याचा त्यांचा हक्क सांगण्यासाठी नाशिकला येण्याचे आवाहन करण्यात आले. सत्याग्रह समितीच्या या आवाहनाला प्रतिसाद म्हणून, नाशिक येथील दलित वस्ती परिसरात एका खास उभारलेल्या मंडपामध्ये सुमारे १५,००० स्वयंसेवक आणि प्रतिनिधी

जमले. उपस्थितांमध्ये देवराव नाईक, पां. ना. राजभोज, प्रधान, शिवतरकर, पतितपावन दास आणि बी.जी. खेर यांचाही समावेश होता. अखेर, सत्याग्रहाचा दिवस उजाडला. तो रविवार, २ मार्च १९३० होता. सकाळी १०.०० वाजता, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या अध्यक्षतेखाली मंडपामध्ये सर्व परिस्थितीचा विचार करण्यासाठी आणि सत्याग्रह सुरू करण्यासाठी मार्ग आणि उपाय अवलंबण्यासाठी एक परिषद भरवण्यात आली.

### डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी प्रस्तावित केलेल्या मंदिर प्रवेशामागील तर्कविचार

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी काळाराम मंदिर प्रवेशाबाबत विचारप्रवर्तक भाषण केले. ते म्हणाले, “आज आपण मंदिरात प्रवेश करणार आहोत. पण मंदिरात प्रवेश केल्याने संपूर्ण समस्या सुटणार नाही. आपली समस्या व्यापक आहे. ती राजकीय, सामाजिक, धार्मिक, आर्थिक, शैक्षणिक इत्यादी आहे. काळाराम मंदिर प्रवेशाचा मुद्दा हिंदू मानसिकतेला आवाहन करतो. उच्च जातीच्या हिंदूंनी आपल्याला प्राचीन काळापासून वंचित ठेवले आहे. तेच हिंदू आपले मानवतावादी हक्क देण्यास तयार आहेत का हा प्रश्न या मंदिर प्रवेश सत्याग्रहातून उपस्थित होईल. हिंदू मन आपल्याला मानव म्हणून स्वीकारण्यास तयार आहे का, हा प्रश्न या सत्याग्रहाद्वारे तपासला जाणार आहे. उच्च जातीच्या हिंदूंनी आपल्याला तुच्छ लेखले आणि कुत्र्यां-मांजरांपेक्षाही वाईट वागणूक दिली. तेच हिंदू आपल्याला माणसाचा दर्जा देतील की नाही हे आम्हाला जाणून घ्यायचे आहे. हा सत्याग्रह या प्रश्नाचे उत्तर देईल. हा सत्याग्रह उच्च जातीच्या हिंदूंमध्ये हृदयपरिवर्तन घडवून आणण्याच्या प्रयत्नांपैकी एक आहे. म्हणूनच या प्रयत्नाचे यश हिंदू मानसिकतेवर अवलंबून आहे. राम मंदिरात प्रवेश केल्याने आपली खरी समस्या सुटणार नाही. त्यामुळे आपल्या जीवनात कोणताही आमूलाग्र बदल होणार नाही. पण उच्च जातीच्या हिंदू मनाचे परीक्षण करण्यासाठी ही एक परीक्षा आहे. "माणसाला माणूस म्हणून वागवले पाहिजे; त्याला मानवतावादी अधिकार दिले पाहिजेत; मानवी प्रतिष्ठा स्थापित केली पाहिजे" या नवीन युगाच्या उदात्त आकांक्षा स्वीकारण्यास हिंदू मन तयार आहे का याची चाचणी घेतली जाणार आहे. हे ध्येय साध्य करण्यासाठी, आम्ही हा सत्याग्रह सुरू केला आहे. मुख्य प्रश्न असा आहे की जातीवादी  हिंदू या पैलूंचा विचार करून त्यानुसार वागणार आहेत का? आम्हाला माहित आहे की या मंदिरात दगडाने बनलेला देव राहतो. त्याच्याकडे फक्त एक नजर टाकून किंवा त्याची पूजा करून, आमची समस्या पूर्णपणे सुटणार नाही. लाखो लोकांनी आतापर्यंत या मंदिराला भेट दिली असेल आणि देवाचे दर्शन घेतले असेल. पण या कृतीने त्यांची मूलभूत समस्या सुटली असे कोण म्हणेल? आम्हाला हे माहित आहे. पण आजचा आपला सत्याग्रह हा हिंदूंमध्ये हृदयपरिवर्तन घडवून आणण्याचा प्रयत्न आहे. या तत्वनिष्ठ भूमिकेसह आम्ही हा सत्याग्रह सुरू करत आहोत.

### मंदिर प्रवेशासाठी व्यवस्था

साधारणतः १२. वाजता दुपारी परिषद स्थगित झाली आणि पुन्हा दीड वाजता बैठक झाली. दुपारी तीन वाजता, प्रतिनिधी चार जणांच्या तुकड्यांमध्ये विभागले  गेले  आणि एक मैलभर लांब मिरवणुकीने मोर्चा निघाला.  नाशिकच्या इतिहासातील ही सर्वात मोठा मोर्चा होता. आघाडीवर अनेक अस्पृश्य लष्करी अधिकारी होते व त्यांच्या लष्करी जीवनाशी असलेल्या संबंधाचे प्रतिबिंब असलेल्या लष्करी शैलीतील बँड वाजवण्यात आला. त्यानंतर स्काउट्सचा एक तुकडी त्यांच्या मागे येत होती.  त्यांच्या मागे सुमारे ५०० महिला

सत्याग्रही चालत होत्या ज्यांनी त्यांच्या दृष्टिकोनात क्रांतिकारी बदल झालेला होता; आणि त्यांच्या मागे उत्साहाने भरलेल्या, परंतु शिस्त, सुव्यवस्था आणि दृढनिश्चयाच्या पूर्ण भावनेने चालणाऱ्या अनेक सत्याग्रहींचा समूह होता. मिरवणूक मंदिराच्या पूर्वेकडील प्रवेशद्वाराजवळ येताच, जिल्हा दंडाधिकारी, पोलिस अधिक्षक आणि शहर दंडाधिकारी (तहसिलदार) मंदिराच्या प्रवेशद्वाराकडे निघाले. परंतु मंदिराचे सर्व दरवाजे बंद करण्यात आले होते. असे दिसताच सत्याग्रही मिरवणूकदार गोदावरी घाटाकडे निघाले. तिथे मिरवणूक एका सभेत रूपांतरित झाली. त्या रात्री अकरा वाजता नेत्यांनी पुन्हा या विषयावरील सर्व पैलूंवर चर्चा केली आणि मंदिराच्या प्रवेशद्वारासमोर अहिंसक संघर्ष सुरू करण्याचा निर्णय घेतला.

अशाप्रकारे हा ऐतिहासिक संघर्ष पुन्हा ३ मार्च १९३० रोजी सकाळी सुरू झाला. १२५ पुरुष आणि २५ महिलांची पहिली तुकडी मंदिराच्या चारही प्रवेशद्वारांवर तैनात होती आणि ८,००० हून अधिक नोंदणीकृत सत्याग्रही त्यांच्या फेरीची वाट पाहत होते. पण मंदिराचे दरवाजे बंद आणि समोर बॅरिकेड्स उभारलेले होते. सत्याग्रही प्रवेशद्वारावर बसून स्तोत्रे म्हणत आणि भजन गात असताना, ३,००० हून अधिक अस्पृश्यांचा जमाव त्यांच्या सभोवताली जमला होता; परंतु पोलिस सतर्क होते आणि त्यांनी त्यांच्या हालचाली सुरु केल्या. प्रत्येक प्रवेशद्वारावर सशस्त्र पोलिसांचा मोठा फौजफाटा तैनात होता. कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीला तोंड देण्यासाठी पहाटेपासूनच दोन प्रथम श्रेणी दंडाधिकारी त्या ठिकाणी कर्तव्यावर हजर होते. पोलिस अधिक्षक रेनाल्ड्स यांनी त्यांचे कार्यालय मंदिरासमोर उभारलेल्या तंबूत हलवले होते. मंदिराचे दरवाजे बंद असल्याने स्पृश्य लोकांनाही मंदिरात प्रवेश करण्यास मनाई होती आणि त्यांचे नेते बंद दाराआडून या कोंडीतून बाहेर पडण्याचा मार्ग शोधण्याचा विचार करत होते. जर मंदिराचे दरवाजे स्पृश्य हिंदूंसाठी उघडले असते तर एक कठीण परिस्थिती निर्माण झाली असती.

रात्री, शंकराचार्य डॉ. कूर्तकोटी यांच्या अध्यक्षतेखाली नाशिकमधील नागरिकांची एक जाहीर सभा झाली, परंतु सनातनी लोकांच्या वर्चस्वामुळे ती गोंधळात संपली. सनातनी आता घाबरले होते आणि गोंधळले होते. त्यांनी सभेवर दगड आणि जोडे फेकले. असे वाटले की, जर अस्पृश्यांसाठी मंदिर उघडण्यासाठी सनातनी हिंदूंना सांगायला राम जरी पुढे आला असता तर स्वतः रामालाही बाजूला या स्पृश्यानी दूर फेकले असते!

### जातीवादी हिंदूंची दंगल आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर जखमी

सत्याग्रह संघर्ष सुमारे एक महिना चालू राहिला. ९ एप्रिल चा दिवस उजाडला व त्या दिवशी रामनवमी होता. तो रामाच्या प्रतिमेच्या रथयात्रेचा दिवस होता. स्पृश्य हिंदू आणि अस्पृश्यांमध्ये तडजोड झाली. दोन्ही बाजूंच्या बलवान पुरुषांनी रथ ओढावा असे ठरले. दुपारी हजारो लोक हे दृश्य पाहण्यासाठी मंदिराच्या मुख्य प्रवेशद्वाराजवळ जमले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर, त्यांच्या पसंतीच्या बलदंड अंगरक्षकांसह प्रवेशद्वाराजवळ उभे राहिले. परंतु त्यांनी रथाला स्पर्श करण्यापूर्वीच, स्पृश्य हिंदूंच्या दंगलखोर लोकांनी त्यांच्याशी झटापट केली आणि रथाच्या तोंडालाच सशस्त्र पोलिसांचा बंदोबस्त असतानाच स्पृश्य हिंदू गुप्तपणे कारस्थान ठरल्याप्रमाणे, रथ घेऊन अरुंद, काटेरी आणि दोन्ही बाजूंनी गैरसोयीच्या रस्त्यावरून रथ पुढे घेऊन पळून गेले कद्रेकर नावाच्या धाडसी भंडारी तरुणाने गोळीबाराच्या आदेशाची वाट पाहणाऱ्या सशस्त्र पोलिसांचा बंदोबस्त मोडला.

स्पृश्य हिंदूंकडून दगडांचा वर्षाव सुरु असतानाच अस्पृश्य लोकांच्या जमावाने रथाचा पाठलाग केला आणि तो ताब्यात घेतला. इकडे गंभीर जखमी झालेले कद्रेकर रक्ताच्या थारोळ्यात खाली पडले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना त्यांच्या अंगरक्षकांनी वाचवले आणि तरीही त्यांचे  रक्षण करणाऱ्या अंगरक्षकांच्या छत्र्या या दगडांच्या वर्षावाने तुटल्याने त्यांनाही किरकोळ दुखापत झाली. शहरात सर्वत्र अस्पृश्य आणि स्पृश्य जातीच्या हिंदूंच्या गटांमध्ये खुलेआम झटापट सुरू होती.

## ४.७ सत्याग्रह आणि तद्नंतरची परिस्थिती

या सत्याग्रहामुळे नाशिक जिल्ह्यातील सनातनी हिंदूंच्या मनात अस्पृश्याबद्दल मोठ्या प्रमाणावर द्वेषाची भावना निर्माण झाली. या तणावामुळे अस्पृश्यांच्या मुलांना शाळांमधून बाहेर काढण्यात आले, त्यांच्यासाठी रस्ते बंद करण्यात आले आणि त्यांना बाजारात जीवनावश्यक वस्तू नाकारण्यात आल्या. याचे कारण म्हणजे ते इतर सर्व हिंदूंप्रमाणे समान हक्क मागत होते. अनेक गावांमधील अस्पृश्यांवर अत्याचार करण्यात आले. या त्रासाला न जुमानता, नाशिक येथील संघर्ष बऱ्यापैकी यशस्वी झाला असे म्हणता येईल.

**चर्चा आणि तडजोडीचे प्रयत्न**

दोन्ही पक्षांना तडजोड करण्यासाठी राजी करण्याचे प्रयत्न सुरू होते. डॉ. मुंजे आणि डॉ. कूर्तकोटी शंकराचार्य, तोडगा काढण्याचा प्रयत्न करत होते. मोठे उद्योगपती बिर्ला यांनी एप्रिल १९३० च्या मध्यात मुंबईत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची भेट घेतली होती. परंतु दलित वर्गाचा निर्धार इतका दृढ होता की सनातनी हिंदूंना प्रसिद्ध मंदिर वर्षभर बंद ठेवावे लागले आणि आंदोलन सुरूच राहिले.

त्या काळामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे मुंबई विधान परिषदेचे सदस्य देखील होते. त्यांनी नाशिक येथील काळाराम मंदिर प्रवेशादरम्यान अधिकाऱ्यांनी निर्माण केलेल्या समस्यांबाबत मुंबईच्या महामहिम राज्यपालांना दोन पत्रे लिहिली होती. ती पत्रे खालीलप्रमाणे आहेत:

२४ मार्च १९३० रोजी त्यांनी लिहिले की, "नाशिक येथील काळाराम मंदिरातील सत्याग्रहात केंद्रस्थानी असलेल्या परंतु जातीवादी हिंदू आणि अस्पृश्य यांच्या वादात सरकारने निष्पक्षपणे कारवाई करण्याचा प्रस्ताव मान्य करण्यात आला होता. पुढे, त्यांनी राज्यपालांच्या निदर्शनास आणून दिले की, पोलिस अधिकाऱ्यांनी पुजाऱ्याच्या घराच्या प्रवेशद्वारातून इतर स्पृश्य हिंदूंना मंदिरात प्रवेश करण्याची परवानगी दिली. हे रोखण्यासाठी, सत्याग्रह समितीने जिल्हा पोलिस अधिक्षक आणि जिल्हा दंडाधिकाऱ्यांशी (कलेक्टर) संपर्क साधून या प्रश्नावर चर्चा करण्याचा प्रयत्न केला आणि सत्याग्रह समितीने सर्वसामान्यांसाठी जनतेसाठी त्या पुजाऱ्याच्या खाजगी प्रवेशद्वाराकडाचा मार्ग रोखण्याचा आणि फक्त पुजाऱ्याच्या कुटुंबातील सदस्यांनाच परवानगी देण्याचा प्रस्ताव त्यांना कळवला.  तथापि, जिल्हा दंडाधिकाऱ्यांची  सत्याग्रह समितीच्या सदस्यांनी भेट मागितली असता त्यांनी भेटण्यास नकार दिला. याउलट पुजाऱ्याच्या घराकडील प्रवेशद्वारावर सत्याग्रह सुरू करणाऱ्यांना धडा शिकवला जाईल अशी चिठ्ठी देऊन त्यांना परत पाठवले."

जिल्हा दंडाधिकाऱ्यांनी घेतलेली भूमिका राज्यपालांच्या लक्षात आणून देण्यात आली. अशाप्रकारे, या संघर्षातून असे दिसून आले की, सरकार देखील जातीवादी हिंदूंची बाजू घेत

आहे. त्यांनी असेही लिहिले की, पोलिसांची वृत्ती केवळ अस्पृश्यांबद्दल आकस आहे. त्यांनी मूळ प्रसवानुसार सरकार तसेच अस्पृश्यांची फसवणूक करणाऱ्या जातीवादी हिंदूंना रोखायला हवे होते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी ११ एप्रिल १९३० रोजी मुंबईचे राज्यपाल फ्रेडरिक सायक्स यांना दुसरे पत्र लिहिले ज्यामध्ये त्यांनी जातीवादी हिंदूंनी अस्पृश्यांविरुद्ध केलेल्या दंगलींचा अहवाल दिला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सांगितलेल्या मंदिर प्रवेश सत्याग्रहाच्या घटनाक्रमाची आपल्यापैकी प्रत्येकाला माहित असली पाहिजे:

### दंगलीचा उगम

"नाशिक येथील काळाराम मंदिराच्या प्रथेनुसार, रथ (भगवान रामाचा रथ) शहरातून मिरवणुकीद्वारे बाहेर काढायचा होता. काळाराम मंदिरात कर्तव्यावर असलेल्या पोलिस अधिकाऱ्यांपैकी एक असलेल्या पोलीस निरीक्षक कर्णिक यांनी मला विचारले की रथ मिरवणुकीशी तुमचा काय संबंध आहे? मी त्यांना सांगितले की, जर अस्पृश्यांना समतेची वागणूक दिली गेली तर रथाला ओढण्यामध्ये आम्हाला कोणताही आक्षेप नाही आणि मी समान वागणुकीचे स्वरूप देखील स्पष्ट केले. मी दोन गोष्टींवर आग्रह धरण्याची अट घातली होती - (१) अस्पृश्य स्पृश्यांसह रथ ओढण्यात सहभागी होतील आणि (२) अस्पृश्य रथातील मूर्तीची पूजा करतील. त्यानंतर श्री. कर्णिक निघून गेले आणि जिल्हा दंडाधिकाऱ्यांकडे वळले. जिल्हा दंडाधिकाऱ्यांनी मला सांगितले की, माझ्या अटी स्पृश्य हिंदूंनी मान्य केल्या आहेत आणि स्पृश्य रथ मंदिराच्या मुख्य दरवाजापर्यंत आणतील आणि ते दरवाज्यापासून १० फूट ओढल्यानंतर अस्पृश्य लोक सामील होऊ शकतील आणि स्पृश्यांसह रथाला बांधलेला दोर धरून वाहून नेऊ शकतील. त्यांनी मला विचारले की रथ मिरवणुकीला माझा काही आक्षेप आहे का, ज्यावर मी उत्तर दिले की 'माझ्याकडे काही आक्षेप नव्हता' आणि शांततेच्या कारणाला मदत करण्यासाठी मी ५,००० अस्पृश्यांपैकी फक्त ५० जणांना प्रातिनिधिक स्वरूपात रथ ओढण्यात सहभागी होतील. त्यानुसार, स्पृश्यांनी रथ मंदिराच्या प्रवेशद्वारापर्यंत आणला. परंतु अस्पृश्य आणि पोलीस अधिकाऱ्यांना फसवू इच्छिणाऱ्या स्पृश्य लोकांनी दोन गोष्टी केल्या - (१) स्पृश्य लोकांनी दोरी एकमेकांच्या इतक्या जवळ धरली की अस्पृश्यांना पकडून सामील होण्यासाठी जागा उरली नाही आणि (२) पूर्वी मान्य केल्याप्रमाणे, मंदिराच्या दाराशी रथ थांबवण्याऐवजी, स्पृश्य लोकांनी तो ते घेऊन पळून जाऊ लागले जेणेकरून अस्पृश्यांना दोरी पकडण्याची आणि रथ वाहून नेण्यात सहभागी होण्याची संधी मिळू नये. ठरलेल्या प्रस्तावानुसार सर्वात महत्वाच्या अटीचे उल्लंघन करण्याच्या कृतीमुळे स्वाभाविकपणे अस्पृश्यांच्या भावना संतप्त झाल्या. त्यातच भर म्हणजे पोलिस शिपायांची कृती, ज्यांपैकी बहुसंख्य जातीवादी हिंदू होते, त्यांनी लगेच दोरी धरण्यासाठी संघर्ष करणाऱ्या अस्पृश्यांवर हल्ला करण्यास सुरुवात केली. हा संघर्ष जातीय हिंदू पोलिसांनी सुरू केला होता ज्यांनी उघडपणे स्पृश्य हिंदूंची बाजू घेतली. अशा प्रकारे ५० अस्पृश्यांच्या तुकडीवर दोन्ही बाजूंनी हल्ला करण्यात आला. ज्या स्पृश्य हिंदूंनी दोरी धरली होती ते त्यांना दूर सारत होते आणि दोरीजवळ उभे राहण्यापासून रोखत होते आणि जेव्हा अस्पृश्य लोक जागा घेण्यास धडपडत होते तेव्हा जातीय हिंदू पोलिस त्यांच्या लाठ्या आणि त्यांच्या रायफलच्या बुंध्याचा मारा करत होते. अस्पृश्य लोकांवर अशा प्रकारे हल्ला होत असल्याचे पाहून उर्वरित अस्पृश्य रथाच्या मागे लागले ज्याने स्पृश्य लोक भयानक वेगाने पळून जात जाऊ लागले. रथाचा पाठलाग

करणाऱ्या अस्पृश्यांचा जमाव त्याच्या अगदी जवळ आला आहे हे पाहून, स्पृश्य लोकांनी रथाला रस्त्यावर सोडून शेजारच्या शेतात जाऊन रस्त्यावर उभ्या असलेल्या अस्पृश्य लोकांच्या गर्दीवर दगडफेक करण्यास सुरुवात केली. रस्त्यावर एका बाजूला काटेरी तार होती आणि दुसऱ्या बाजूला निवडुंग होता, आणि परिणामी अस्पृश्य दगडांच्या वर्षावातून सुटू शकले नाहीत. त्यांच्यापैकी बरेच जण जखमी झाले. अस्पृश्यांचे वर्तन शांततापूर्ण होते हे यावरून दिसून येते की, स्पृश्य हिंदूपैकी एकही जखमी झालेला नाही.

### स्पृश्य हिंदूंच्या दंगलीची व्याप्ती

"स्पृश्य हिंदूंचा जमाव ज्या शेतातून दगडफेक करत होता तिथून चारी दिशांना विखुरला गेला आणि तिथून पुढे सत्याग्रह समितीच्या छावणीत गेला, त्यांची छावणी नेस्तनाबूत केली, स्वयंसेवकांच्या सायकली तोडल्या, समितीच्या एका सदस्याच्या मोटारीवर दगडफेक केली. स्वयंपाक तयार करत असलेल्या महिलांवर दगडफेक केली आणि खेळत असलेल्या लहान मुलांना जखमी केले. तेथून ते नदीच्या काठावर गेले जिथे त्यांना काही अस्पृश्य पुरुष, महिला आणि मुले आढळली जे मंदिराच्या दारावर नदीच्या पात्रावरून निघून अस्पृश्यांच्या मुख्य गटात सामील होऊ शकत नव्हते. कारण त्यांच्या बैलगाड्या आणि बैलजोड्या सांभाळण्यासाठी कोणीही नव्हते. या स्पृश्य हिंदूंनी त्यांच्यावरसुद्धा क्रूरपणे हल्ला केला, त्यांचे सामान पेटवून देण्यात आले आणि काहींना पाण्यात ढकलून देण्यात आले. मला दिलेल्या माहितीनुसार या हल्ल्यात एका पुरूषाचा मृत्यू झाला. नदीच्या पात्रावरील या दुर्दैवी अस्पृश्यांना फारच कमी मदत देण्यात आली. अस्पृश्यांचे मुख्य पथक त्यांच्या मदतीला जाऊ शकले नाही कारण त्यांना मंदिर परिसरातून हलण्यापासून रोखण्यात आले होते आणि त्यांच्याभोवती पोलिसांचा गराडा घालण्यात आला होता. बहुतेक पोलिस दल अस्पृश्यांचे मुख्य पथक मंदिर प्रवेश द्वारावर नियंत्रणात ठेवण्यात गुंतले होते, त्यामुळे नदीपात्रावरील हल्ल्यात बळी पडलेल्या अस्पृश्यांना मदत करण्यासाठी फारच कमी लोक उरले होते."

### पोलिसांचा दृष्टिकोन

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहिले, "तथापि, मला पोलिस अधिकाऱ्यांविरुद्ध काही तक्रार करायची आहे असे नाही. उलट, त्यांनी त्यांचे कर्तव्य बजावले आहे असे म्हणण्यास मला अजिबात संकोच वाटत नाही. सत्याग्रहामुळे उद्भवलेल्या अत्यंत कठीण परिस्थितीत त्यांच्या उत्कृष्ट कामाबद्दल मी विशेषतः निरीक्षक-शेळके, नगरकर आणि कराका यांची नावे नमूद करू इच्छितो. माझी तक्रार त्या शिपाईविरुद्ध आहे ज्यांनी स्पृश्यांची बाजू घेतली आणि आदरणीय अस्पृश्यांवर अत्यंत बेशिस्तपणे हल्ला करून त्यांचा जातीय पूर्वग्रह दाखवला. त्यांची नावे आणि क्रमांक त्यांच्या वरिष्ठांना सादर केले जातील आणि मला विश्वास आहे की महामहिम त्यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई करतील".

### जिल्हा दंडाधिकाऱ्यांचे (कलेक्टर) पक्षपाती धोरण

जिल्हा दंडाधिकाऱ्यांच्या पक्षपाती धोरणाची माहिती देताना, डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले, "मला हे सांगण्यास खेद वाटतो की, मी अस्पृश्यांच्या सत्याग्रहासंदर्भात जिल्हा दंडाधिकाऱ्यांच्या धोरणाशी समाधानी नव्हतो. माझ्या शेवटच्या पत्रात मी महामहिम यांना कळवले होते की, पुजाऱ्याच्या घराचे एक खाजगी प्रवेशद्वार मंदिरात प्रवेश करण्यासाठी जनतेकडून कसे वापरले जात होते आणि त्यामुळे आमचा सत्याग्रह कसा विस्कळीत होत

होता. जिल्हा दंडाधिकाऱ्यांनी आमच्या मागणीकडे दुर्लक्ष करून रामनवमीच्या दिवशी जनतेला पुजाऱ्याच्या खाजगी प्रवेशद्वाराचा वापर करण्याची केवळ परवानगीच दिली नाही तर आमच्या सत्याग्रहींना नेहमीप्रमाणे सार्वजनिक मार्गावर बसण्यास मनाई केली आणि पुजाऱ्याच्या खाजगी दरवाजाने प्रवेश करणाऱ्या स्पृश्य हिंदूंना बाहेर पडण्यासाठी बॅरिकेडसुद्धा काढून टाकण्यात आले होते. परिणामी, सत्याग्रह करणाऱ्या ३०० पैकी १८ अस्पृश्यांना रामनवमीच्या दिवशी अटक करण्यात आली. ९ तारखेच्या दंगलीनंतर, जिल्हा दंडाधिकाऱ्यांनी मला प्रस्ताव दिला की, मी सत्याग्रह थांबवावा अन्यथा ते पोलिस बंदोबस्त मागे घेतील. त्यांचा प्रस्ताव सत्याग्रह समितीने विचारात घेतला आणि तो फेटाळला गेला आणि मला ते योग्य वाटते. या टप्प्यावर सत्याग्रह थांबवण्यापेक्षा अस्पृश्यांच्या चळवळीसाठी मोठे संकट काहीही असू शकत नाही. अस्पृश्य हिंदूंचा असा समज होईल की बळाचा थोडासा जरी वापर केला तरी अस्पृश्यांचे आंदोलन चिरडण्यासाठी पुरेसा आहे. अशा परिस्थितीत मी किंवा सत्याग्रह समिती असा समज नाकारतो आणि आपण आपला सत्याग्रह सुरू ठेवला पाहिजे. पोलीस बंदोबस्त मागे घेण्याबाबत, मुंबई सरकारने त्याचे परिणाम पूर्णपणे समजून घ्यावे अशी माझी इच्छा आहे. माझ्या मते, याचा अर्थ असा आहे की, सरकार त्यांच्या मानवी हक्कांसाठी संघर्ष करणाऱ्या लोकांना मदत करण्यासाठी त्यांच्या अधीन असलेल्या शक्तीचा वापर करण्यास तयार नाही. अशी शक्ती कोणाच्याही हिताची नाही आणि दलित वर्गाला हा बदल घडवून आणण्यासाठी तयार असणाऱ्या कोणाशीही हातमिळवणी करणे योग्य ठरेल. मला आशा आहे की, मुंबई सरकार या मुद्द्यावर जिल्हा दंडाधिकाऱ्यांना योग्य निर्देश देईल. आजच्या तारखेच्या 'टाइम्स ऑफ इंडिया' वरून मला कळले की, जिल्हा दंडाधिकाऱ्यांनी CRPC कलम १४४ अंतर्गत आदेश जारी केला आहे. आणि काळाराम मंदिराजवळ येणाऱ्या लोकांना येण्यास मनाई केली आहे. मला माहित नाही की, या आदेशात आपल्या सत्याग्रहींना पूर्वीप्रमाणेच मंदिराच्या दारावर बसण्यापासून रोखण्याचा विचार आहे का? मी आदरपूर्वक आपले महामहिम यांना सादर करतो की, जिल्हा दंडाधिकारी यांनी त्यांच्या आदेशात नमूद केलेल्या कालावधीत मंदिराचे दरवाजे बंद राहतील आणि पुजाऱ्यांचे खाजगी प्रवेशद्वार जनतेसाठी खुले राहणार नाही याची हमी दिली तरच या आदेशाचे पालन केले जाण्याची शक्यता आहे (मी हा शब्द सल्ला म्हणून वापरतो कारण मला सत्याग्रह समितीचे मत माहित नाही)."

सत्याग्रह अद्याप संपला नव्हता आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर गोलमेज परिषदेत सहभागी होण्यासाठी लंडनला गेले होते. तरीही, त्यांनी २ नोव्हेंबर १९३१ रोजी सत्याग्रहींना त्यांच्या आशीर्वादाने एक पत्र लिहिले. पत्रात म्हटले आहे, “काही काळापूर्वी तुम्ही मला पाठवलेल्या पत्राचे उत्तर तुम्हाला लिहू शकलो नाही याबद्दल मला खूप वाईट वाटते, ज्यामध्ये पोलीस आयुक्तांशी तुमची भेट झाली होती. तुमच्या अपेक्षेप्रमाणे मला आयुक्त, सी. डी. यांचे पत्र मिळाले. त्यात नाशिक सत्याग्रह थांबवण्याचा सल्ला देण्यास मला सांगितले होते. मी त्यांना उत्तर दिलेले नाही. पण मी या मेलद्वारे ते देणार आहे. मी त्यांना सांगणार आहे की, आपण सत्याग्रह थांबवू शकत नाही. म्हणून तुम्ही आपल्या लोकांना सत्याग्रह सुरु ठेवण्यास सांगा. मी समजते की, तुम्ही ५ नोव्हेंबर रोजी पुन्हा सत्याग्रह सुरू करत आहात. मला आशा आहे की, तुम्ही सर्वोत्तम तयारी केली असेल. मला माफ करा. मी तुम्हाला मदत करण्यासाठी तिथे नाही. पण मला माहित आहे की, आमचे लोक आता त्यांच्या समस्येबद्दल जागरूक आहेत आणि त्यांना प्रत्येक वेळी माझी गरज नाही”.

नंतर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि सत्याग्रह समितीने हा सत्याग्रह सोडून देण्याचा निर्णय घेण्यात आला आणि भाऊराव गायकवाड उर्फ दादासाहेब गायकवाड यांना लिहिलेल्या एका पत्रात, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी खालीलप्रमाणे लिहिले:

202 DR. BABASAHEB AMBEDKAR : WRITINGS AND SPEECHES

Regarding the above mentioned *Satyagraha* Dr. Ambedkar explained his stand in the following letter addressed to Bhaurao Gaikwad.

BHIMRAO R. AMBEDKAR, Rajgriha Colony.
M. A., Ph. D., D. Sc, Dadar, Bombay 14.
Barrister-at-law., J. P., M. L. C. 3-3-34

My dear Bhaurao,

I am in receipt of your letter of the 23rd Feb. It is very kind of you to have asked me for my views on the propriety of the Depressed Classes launching upon a *Satyagraha* at the Kala Ram Temple in Nasik on the coming Ram Navami Day. I have no position in saying that such a move would be quite uncalled for and should not merely be suspended but should be stopped altogether. This may appear strange and surprising coming as it does from one who was the author of the *Satyagraha*. But I am afraid to declare this change of front. I did not launch the temple entry movement because I wanted the Depressed Classes to become worshippers of idols which they were prevented from worshipping or because I believed that temple entry would make them equal members in and an integral part of the Hindu Society. So far as this aspect of the case is concerned I would advise the Depressed Classes to insist upon a complete overhauling of Hindu Society and Hindu theology before they consent to become an integral part of Hindu Society. I started temple entry *Satyagrha* only because I felt that was the best way of energising the Depressed Classes and making them conscious of their position. As I believe I have achieved that purpose I have no more use for temple entry. I want the Depressed Classes to concentrate their energy and resources on politics and education and I hope that they will realise the importance of both.

Your sincerely,
Sd/-B. R. Ambedkar."[1]

Accordingly the *Satyagraha* was stopped immediately. —Editors

[1]: Khairmode, Vol. 5; Pp. 357-358.

हा सत्याग्रह पूर्ण सहा वर्षे चालला आणि शेवटी तो बंद करण्यात आला. इ.स. १९३५ मध्ये नाशिक जिल्ह्यातील येवला येथे झालेल्या एका परिषदेत हिंदूंच्या समान सामाजिक हक्क देण्यास नकार देण्याच्या हट्टी वृत्तीमुळे अस्पृश्यांनी हिंदू धर्मातून बाहेर पडण्याचा निर्णय घेतला. याच परिषदेमध्ये रविवार, दि. १३ ऑक्टोबर १९३५ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी घोषणा केली की, " मी हिंदू म्हणून जन्माला आलो हे माझ्या हातात नव्हते, पण मी हिंदू म्हणून मारणार नाही हे माझ्या हातात आहे." ही सत्याग्रह चळवळ

निःसंशयपणे काँग्रेसच्या सत्याग्रहापासून वेगळी होती. काळाराम मंदिर प्रवेश सत्याग्रहाचे संघटन करणारे अस्पृश्य होते, नेतृत्व करणारे अस्पृश्य होते आणि आर्थिक निधी पुरवणारे सुद्धा अस्पृश्यच होते.

## ४.८ सारांश

अस्पृश्यांच्या मानवी हक्कांसाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी चवदार तळे सत्याग्रह सुरू केला होता. चवदार तळ्याव्यतिरिक्त इतर पाण्याचे स्रोत असले तरीही जातीवादी हिंदू अस्पृश्यांसाठी तळे खुले करण्यास राजी नव्हते. हिंसा करून काही जमले नाही म्हणून स्पृश्य हिंदूंनी जवळजवळ दहा वर्षे कायदेशीर लढाई लढली आणि अखेर न्यायालयातून काही त्यांना यश मिळाले नाही. अशाप्रकारे, स्वतःच्या धर्मातील बांधवांसाठी जगात अशा प्रकारचा भेदभाव कधीच पाहिला गेला नव्हता.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी हिंदूंच्या देवदेवतांची पूजा करण्याचा आणि तोच अधिकार सार्वजनिक मंदिरांमध्ये वापरण्याच्या उद्देशाने मंदिर प्रवेश चळवळ सुरू केली. अस्पृश्य जातींना मंदिरात प्रवेश करण्याची परवानगी नव्हती. कारण ते प्रदूषित होईल (बाटले जाईल) असे त्यांना वाटत होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी एक प्रयोग म्हणून १९३० मध्ये नाशिक येथील काळाराम मंदिरात मंदिर प्रवेश सत्याग्रह सुरू केला. महार जातीचे लोक म्हणजेच दलित वर्गाचे लोक मंदिरात प्रवेश करून रामाची पूजा करण्यासाठी जमले होते. पण त्यांना लाठ्या-काठ्यांनी मारहाण करण्यात आली आणि त्यांच्यावर अमानुषपणे दगडफेक करण्यात आली. त्या दगडफेकीमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनाही दुखापत झाली आणि त्यांच्या कार्यकर्त्यांनी मानवी ढाली करून त्यांना वाचवले. ही चळवळ सहा वर्षे चालू राहिली परंतु जातीवादी हिंदूंनी अस्पृश्यांना मंदिरात प्रवेश करू दिला नाही. नंतर, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ती चळवळ सोडून दिली.

## ४.९ प्रश्न

१. मानवी हक्क चळवळीचे उत्कृष्ट उदाहरण म्हणजे ‘महाडचा चवदार तळे सत्याग्रह आणि काळाराम मंदिर प्रवेश चळवळ’ होय, स्पष्ट करा.

२. महाडच्या चवदार तळे सत्याग्रहाचे चिकित्सक मूल्यमापन करा.

३. काळाराम मंदिर प्रवेश चळवळीचे मुल्यांकन करा.

## ४.१० संदर्भ


- Kharat Shankarrao, Dr. Babasaheb Ambedkaranchi Patre (Marathi), Indrayani Sahitya Prakashan, Pune, 1990.
- Dr. Babasaheb Ambedkar Writings and Speeches (hereinafter read DBAWS), Vol.17, Part Three, Government of Maharashtra, 2003.
- DBAWS, Vol.1, 1979.

- Keer Dhananjay, Dr. Babasaheb Ambedkar Life and Mission, Popular Prakashan, Mumbai, 1990 (1954).
- Kamble B.C, Samagra Ambedkar Charitra, Vol.3, Sugava Prakashan, Pune, 2007. (Marathi)
- DBAWS, Vol.2, Government of Maharashtra, Mumbai, 1979.
- BLC Debates, Vol. I, Government of Maharashtra.
- Dongre M.K., Dimensions of Ambedkarism, Vinay Publication, Nagpur, 2005.
- Mankar Vijay, Dr. Babasaheb Ambedkar A Chronology, Blue World Series, Nagpur, 2009.
- Khairmode C.B., Dr. Babasaheb Ambedkar Charitra, Vol.2, Sugava Prakashan, Pune, 2003. (Marathi)
- Kuber W.N., Ambedkar A Critical Study, People's Publishing House, New Delhi, 2009.
- BLC Debates, Vol. XXIII, op. cit.
- Lokhande Bhau, Dr. Babasaheb Ambedkari Hitshatrunchya Janiva, Parijat Prakashan, Kolhapur, 2012. (Marathi)
- Kamble B.C., Samagra Ambedkar Charitra, Vol.16, Sugava Prakashan, Pune, 2007. (Marathi)
- Zelliot Eleanor, Ambedkar's World, The Making of Babasaheb and the Dalit Movement, Navayana, New Delhi, 2013(2004).
- Khandare Manik, Quotable Quotes of Babasaheb Ambedkar, People's Publication, Nagpur, 2008.
- DBAWS, Vol.10.
- Khairmode C.B., op. cit., Vol.8, Sugava Prakashan, Pune, 1991. (Marathi)
- Kshirsagar, R.K., Political Thought of Dr. Babasaheb Ambedkar, Intellectual Publishing House, New Delhi, 1992.

# ५

# बौद्ध धर्मांतराचा दृष्टिकोन

**घटक रचना :**

५.० उद्दिष्टे

५.१ प्रस्तावना

५.२ डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे धर्मविषयक विचार

५.३ धार्मिक पार्श्वभूमी

५.४ डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे धार्मिक कल

५.५ येवला परिषद आणि तद्नंतरच्या घटना

५.६ डॉ. बाबासाहेब आंबेडकर : केवळ बौद्ध धर्म का?

५.७ डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे बौद्ध धर्म विषयक विचार

५.८ डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या बावीस प्रतिज्ञा

५.९ सारांश

५.१० प्रश्न

५.११ संदर्भ

## ५.० उद्दिष्टे

१. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या धर्माच्या कल्पना स्पष्ट करणे.

२. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या धार्मिक कलांचे विश्लेषण करणे.

३. येवला परिषद आणि नंतरचे परिक्षण करणे.

४. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या बौद्ध धर्माच्या विचारांवर चर्चा करणे.

५. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या बावीस प्रतिज्ञांचे मूल्यांकन करणे.

## ५.१ प्रस्तावना

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे एक उच्चप्रतीचे सज्जन, एक महान विद्वान, एक बुद्धिवंत लेखक, एक कुशल राजकारणी, एक उत्कृष्ट समाजसुधारक, एक उल्लेखनीय कायदेतज्ज्ञ, खऱ्या अर्थाने देशभक्त, एक प्रेमळ मित्र आणि एक उत्कृष्ट धम्मदुत होते. बहु प्रतिभावान, भारतमातेच्या या समर्पित सुपुत्राने तिच्या चेहऱ्यावरील 'अस्पृश्यतेचा' डाग पुसण्यासाठी कठोर परिश्रम केले. व्यावहारिकदृष्ट्या वास्तववादी असलेले हे बौद्धिक दिग्गज, सर्वात

महत्त्वाचे म्हणजे, एक दूरदर्शी धार्मिक नेते होते. ते निश्चितच भारतातील समकालीन बौद्ध धम्माच्या पुनरुज्जीवनाचे अग्रणी होते. शिवाय, विसाव्या शतकाच्या मध्यात बौद्ध धर्माच्या जागतिक पुनरुज्जीवनाच्या इतिहासात, तो सर्व काळ एक दीपस्तंभ म्हणून उभे आहेत . शिवाय, त्यांच्या ज्ञानाने आणि दृष्टीने मानवतेच्या आणि सामाजिक क्षेत्रासाठी कायमचे योगदान दिले आहे.

## ५.२ डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे धर्मविषयक विचार

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मूलतः धार्मिक होते. धर्माने त्यांच्या जीवनावर अनेक प्रकारे प्रभाव पाडला होता. त्यांनी एकदा धर्माबद्दल म्हटले होते, "माझ्यामध्ये जे काही चांगले आहे किंवा माझ्या शिक्षणामुळे समाजाला जे काही फायदे झाले आहेत, ते माझ्यातील धार्मिक प्रभावामुळे आहेत. मला धर्म हवा आहे पण ढोंगीपणा नको आहे."

धर्माबद्दलचे त्यांचे विचार पुढीलप्रमाणे थोडक्यात सांगता येतील.

१. खऱ्या धर्माचे कार्य व्यक्तीचे उत्थान करणे आहे. त्यासाठी, त्याने सह-भावना, समानता आणि स्वातंत्र्याचे मूल्ये शिकवली पाहिजेत.

२. धर्म हा मुख्यतः केवळ तत्त्वांचा विषय असला पाहिजे. तो नियमांचा विषय असू शकत नाही. ज्या क्षणी तो नियमांमध्ये बदलतो, तो धर्म राहात नाही. कारण तो जबाबदारीची भावना नष्ट करतो जी खऱ्या धार्मिक कृतीचे सार आहे.

३. धर्म हा प्रत्येक व्यक्तीच्या जीवनात ओतलेल्या शक्तीचा प्रभाव आहे जो त्याचे चारित्र्य घडवतो, त्याच्या कृती आणि प्रतिक्रिया, त्याच्या आवडी-निवडी ठरवतो.

४. माणूस केवळ अन्नाने जगू शकत नाही. त्याच्याकडे एक मन आहे ज्याला विचारांच्या अन्नाची आवश्यकता असते. धर्म माणसामध्ये आशा निर्माण करतो आणि त्याला कृती करण्यास प्रवृत्त करतो.

५. नैतिकतेच्या अर्थाने धर्म हा प्रत्येक समाजात शासक तत्व म्हणून राहिला पाहिजे.

६. धर्माला कार्य करायचे असेल तर तो विज्ञानाचे दुसरे नाव असलेल्या तर्कशास्त्राशी सुसंगत असला पाहिजे.

७. धर्मात नैतिक नियम असणे पुरेसे नाही, तर त्याच्या नियमात स्वातंत्र्य, समता आणि बंधुत्वाची मूलभूत तत्वे असली पाहिजेत.

८. धर्माने मालमत्तेला पवित्र मानू नये किंवा तिचा संग्रह करू नये.

९. सामाजिक नीतिमत्तेच्या आधारे धर्माचे मूल्यांकन केले पाहिजे. जर धर्म हा लोकांच्या कल्याणासाठी असला तर इतर कोणत्याही मानकांना काही अर्थ नाही.

१०. अज्ञानींना अज्ञानी राहण्यास आणि गरिबांना गरीब राहण्यास भाग पाडणारा धर्म हा धर्म नसून विकृती आहे.

११. धर्म आणि गुलामगिरी विसंगत आहेत.

१२. धर्म माणसासाठी आहे आणि माणूस धर्मासाठी नाही.

## ५.३ धार्मिक पार्श्वभूमी

इसवी सन पूर्व सहाव्या शतकात, भारतात वर्धमान महावीर आणि गौतम बुद्ध यांनी सुरू केलेली धार्मिक क्रांती घडली. या दोन्ही गुरूंनी वैदिक धर्मातील गुंतागुंत, पुरोहित वर्गाचे वर्चस्व आणि देवाच्या अस्तित्वाचे तत्वज्ञान, आत्मा किंवा वैश्विक आत्म्यावरील विश्वास आणि विशेषतः हिंसा आणि यज्ञयाग, कर्मकांड या तत्त्वांना आव्हान दिले. महावीरांची अहिंसा ही संकल्पना सामान्य लोकांच्या आवाक्याबाहेरची आणि अतिशयोक्तीने भरलेली होती. याउलट बुद्धांची संकल्पना सामान्य माणसाला योग्य असलेल्या मध्यममार्गाची होती. त्यांनी वैदिक व पारंपारिक धर्माला आव्हान दिल्याने, वसाहतवादी इतिहासकार डॉ. विन्सेंट स्मिथ यांनी त्यांना 'प्राचीन भारतातील प्रोटेस्टंट धर्म' असे संबोधले.

१४ ऑक्टोबर १९५६ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी बौद्ध धर्माचे पुनरुज्जीवन केले, हे दुसरे पुनरुज्जीवन असल्याचे म्हटले जाते. कारण बुद्धांनी वैदिक धर्माला आव्हान दिले होते आणि बौद्ध राजा बृहद्रथ मौर्याचा त्याचा ब्राह्मण सेनापती पुष्यमित्र शुंगाने विश्वासघाताने केलेला खून ही प्रतिक्रांती होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी पुन्हा वैदिक धर्माला (हिंदू धर्माला) आव्हान दिले आणि त्यांच्या पाच लाख अनुयायांसह बौद्ध धर्म स्वीकारला. हे जगातील पहिल्या प्रकारच्या सामूहिक धर्मांतरांपैकी एक आहे आणि म्हणूनच बौद्ध धर्म आणि त्याच्या पुनरुज्जीवनाची ही दुसरी क्रांती आहे. बुद्धाची क्रांती अहिंसा, करुणा, बंधुता, मानवी संवेदना आणि तर्क या तत्त्वावर आधारित होती. इतर धर्म तलवारीच्या टोकावर आणि हिंसाचाराच्या धोक्यावर विस्तारलेले आहेत.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हिंदू धर्माचे होते परंतु फार अगोदर म्हणजे दहावी उत्तीर्ण झाल्यावर त्यांना बौद्ध धर्माची चांगली ओळख झाली. कारण १९१३ मध्ये मॅट्रिक उत्तीर्ण झाल्याबद्दलच्या त्यांच्या सत्कार समारंभात कृष्णाजी अर्जुन केळुस्कर यांनी त्यांना स्वतः लिहिलेले भगवान बुद्धांचे चरित्र भेट दिले होते. रविवार, १३ ऑक्टोबर १९३५ रोजी नाशिक जिल्ह्यातील येवला परिषदेत त्यांनी संकल्प केला की, जरी ते हिंदू म्हणून जन्मले असले तरी हिंदू म्हणून मरणार नाहीत. ते हिंदू समाजात अस्पृश्यांना समान वागणूक मिळावी यासाठी त्यांचे मानसिक होण्याची वाट पाहत होते. तरीही, किंबहुना, त्यांना किमान मानवी हक्क तरी मिळाले पाहिजेत. कारण प्राण्यांना तरी जास्त अधिकार मिळतात. अखेर, रविवार, १४ ऑक्टोबर १९५६ रोजी त्यांनी बौद्ध धर्म स्वीकारला. नागपूर येथे 'दीक्षाभूमी' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या ठिकाणी सुमारे पाच लाख अनुयायांना त्यांनी बौद्ध धर्माची शपथ दिली. त्यांनी बौद्ध धर्मांतरितांना बावीस प्रतिज्ञा दिल्या.

## ५.४ डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे धार्मिक कल

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी १९५६ मध्ये बौद्ध धर्म स्वीकारला, परंतु जर आपण त्यांच्या संपूर्ण जीवनाचे रेखाचित्र काढले तर आपल्याला असे आढळून येते की, असे अनेक प्रसंग आले आहेत जेव्हा ते बौद्ध धर्माकडे अधिक आकर्षित झाले आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर बौद्ध धर्माकडे कसे वळले किंवा बौद्ध धर्माकडे त्यांचा कल काय होता? २५ डिसेंबर १९२७ रोजी त्यांनी वैदिक धार्मिक ग्रंथ 'मनुस्मृती' हा याचे दहन केले. पुढे, रविवार, २ मार्च १९३० रोजी त्यांनी नाशिक येथील काळा राम मंदिरात मंदिर प्रवेश

सत्याग्रह सुरू केला. परंतु जातीवादी हिंदूंनी अस्पृश्य हिंदू लोकांना मंदिरात प्रवेश द्यावा म्हणून त्यांच्या मानसिकतेत जराही बदल केली नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी त्यांच्या 'मूकनायक' या वृत्तपत्रामध्ये नाशिक येथील त्र्यंबक येथे संत चोखा मेळा मंदिर बांधू इच्छिणाऱ्या लोकांना तसे न करण्यास सांगितले आणि अस्पृश्यता दूर करण्यासाठी त्यांची शक्ती वापरण्याचा सल्ला दिला.

सायमन कमिशनच्या भेटीदरम्यान, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी अस्पृश्यांचे जातींचे हिंदू जातींपेक्षा वेगळेपण दाखवण्यावर भर दिला. लंडनमधील गोलमेज परिषदेत त्यांनी अस्पृश्य लोकांना "प्रोटेस्टंट हिंदू" किंवा "प्रस्थापित हिंदू मतांविरोधी " असे संबोधण्याचा सल्ला दिला.

इ. स. १९२९ मध्ये महाराष्ट्रातील जळगाव येथे किमान पाच हजार महारांनी एक पत्रक काढले होते की, जर सवर्ण हिंदूंनी दिलेल्या वेळेत अस्पृश्यतेचे पालन करणे सोडून दिले नाही तर ते इस्लाम किंवा ख्रिश्चन धर्म स्वीकारतील. तथापि, सवर्ण हिंदूंनी त्यांना उत्तर दिले की, अस्पृश्य जातींनी प्रथम त्यांचे त्यांच्या पोटजातीअंतर्गत भेदभाव दूर करावेत मग ते स्वतःच अस्पृश्य पालनाचा विचार करतील. महार, मांग, चांभार, भंगी इत्यादी अस्पृश्यांनी अनेक प्रसंगी सह-भोजनाचे आयोजन केले आणि त्यांच्यामध्ये असे कोणतेही पोटजातीअंतर्गत भेदभाव नाहीत असे दाखवण्याचे प्रयत्न केले. जेव्हा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी त्यांच्या या मुद्द्यावर चर्चा केली तेव्हा त्यांनी त्यांना इतर धर्म स्वीकारण्याचा सल्ला दिला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी 'बहिष्कृत भारत' च्या संपादकीयमध्ये लिहिले आहे की, “बौद्ध किंवा आर्य समाजवादी बनून तथाकथित सवर्ण जातींच्या अस्पृश्यता पालनावर कोणताही विशेष परिणाम होणार नाही, म्हणून आम्हाला हा मार्ग अनुसरण्यामागे काहीही अर्थ दिसत नाही. हिंदूंच्या वर्चस्वाचा यशस्वीपणे सामना करण्यासाठी, आपण ख्रिश्चन किंवा मुस्लिम बनले पाहिजे आणि एका शक्तिशाली समुदायाचा पाठिंबा मिळवला पाहिजे आणि याद्वारे अस्पृश्यतेचे चिन्ह पुसून टाकले पाहिजे.” त्याचा परिणाम हा झाला की, एका महिन्याच्या आत, त्या परिसरातील बारा महारांनी इस्लाम धर्म स्वीकारला. कदाचित डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी त्या वेळी त्यांना बौद्ध धर्म स्विकारण्याचा सल्ला दिला असता तर त्यांनी लगेचच तो स्विकारला असता.

बौद्ध धर्म स्विकारण्याबद्दलचा पहिला उल्लेख १९३० मध्ये भीमा-कोरेगाव येथे झालेल्या बैठकीत आला, ज्यामध्ये नागपूरचे धर्माजी पाटील यांनी विचार केला की, दलित वर्गाने बौद्ध धर्म स्विकारणे योग्य ठरेल. मात्र ती सूचना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची सूचना नव्हती. इंग्लंडमध्ये झालेल्या तिसऱ्या गोलमेज परिषदेत ते भारतातील दलित वर्गासाठी ब्रिटिशांपासून स्वतंत्र मतदारसंघ मिळविण्यासाठी लढत होते. त्यांच्या मागणीला पाठिंबा देण्यासाठी, मे १९३२ मध्ये नागपूरजवळील कामटी येथे डिप्रेस्ड क्लासेस परिषद आयोजित करण्यात आली होती. या ठिकाणी बुद्ध महासभेचे सरचिटणीस यांनी डिप्रेस्ड क्लासेस श्रेणीतील लोकांना बौद्ध धर्म स्विकारण्यास सांगितले. १९३३ मध्ये, डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वतः मुस्लिम होतील अशा अफवा पसरल्या होत्या, ज्या त्यांनी जोरदारपणे फेटाळल्या आणि असेही म्हटले की कदाचित ते बौद्ध होतील.

रविवार, १३ ऑक्टोबर १९३५ रोजी, दहा हजार लोक, ज्यामध्ये हैदराबाद आणि मध्य प्रांतातील काही लोक होते, येवला येथे 'बॉम्बे प्रेसिडेन्सी डिप्रेस्ड क्लासेस कॉन्फरन्सला' उपस्थित राहण्यासाठी जमले होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी तेथे एक ऐतिहासिक घोषणा केली की, जरी त्यांचा जन्म हिंदू धर्मात झाला तरी ते त्यांच्या हातामध्ये नव्हते, परंतु हिंदू म्हणून मारणार नाही हे त्यांच्या स्वतःच्या हातात आहे.

## ५.५ येवला परिषद आणि तद्नंतरच्या घटना

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी नाशिक येथील लोकांना काळा राम मंदिर प्रवेश सत्याग्रह थांबवण्याचे आवाहन केले आणि हिंदुस्थानात एका सन्माननीय दुसऱ्या धर्मामध्ये जाण्याचे आवाहन केले. महात्मा गांधींनी यावर प्रतिक्रिया दिली आणि म्हटले की धर्म हा घर किंवा अंगरखा नाही जो इच्छेनुसार बदलता येतो. त्यांनी जॉन आर. मॉट यांच्याशी झालेल्या चर्चेत अस्पृश्यांना 'गरीब गायी' म्हणून संबोधले आणि त्यामुळे त्यांना ख्रिश्चन आणि हिंदू धर्मातील फरक समजू शकत नाही असे म्हटले. म्हणूनच, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी उत्तर दिले की, असा धर्म पिढ्यानपिढ्या बाळगणे आवश्यक नाही जो त्याच्या अनुयायांना समानतेचा अधिकार देऊ देत नाही.

फ्रेडरिक बेलीच्या यांनी म्हटल्यानुसार , "ओरिसामधील गावातील अस्पृश्य हे गावातील प्रचलित धार्मिक विधी आणि राजकीय संरचना पळत नाही....... त्यामुळे ते आपला स्वतंत्र समुदाय असल्याची चिन्हे आहेत असे दिसते."

महाराष्ट्रात, नाशिक येथे दुसऱ्यांदा आठशे तरुणांनी मनुस्मृतीचे औपचारिक दहन केले आणि कोणत्याही जत्रेत भाग न घेण्याचा, पवित्र स्थळांना भेट न देण्याचा आणि पुजाऱ्यांना दक्षिणा न देण्याचा तसेच हिंदू सण साजरे न करण्याचा निर्णय घेतला. पुढे काळा राम मंदिर प्रवेश आंदोलन समिती देखील बरखास्त करण्यात आली. त्याच दिवशी ९ नोव्हेंबर १९३५ रोजी नागपूर येथील हिंदू धर्म त्याग समितीने धर्मांतर करण्यास इच्छुक असलेल्या लोकांची यादी तयार करण्यास सुरुवात केली. जानेवारी १९३६ मध्ये, पुणे येथे डिप्रेस्ड क्लासेस युथ कॉन्फरन्स आयोजित करण्यात आली, जिथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आणखी एक जोरदार भाषण केले आणि हिंदू धर्म सोडण्याचा पुन्हा संकल्प उद्धृत केला. आंबेडकरपूर्व काळातील एक सुधारक किसन फागुजी बंदसोडे यांना हिंदू धर्मातच सुधारणा हाव्यात अशी इच्छा होती, परंतु नागपूरचे लोक धर्मांतर करण्यासाठी अधिक खूप सक्रिय झालेले दिसत होते.

येवला घोषणेनंतर, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अनेक प्रसंगी ख्रिश्चन, इस्लाम, शीख, हिंदू, बौद्ध इत्यादी विविध धार्मिक नेत्यांशी चर्चा केली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अनेक कार्यक्रम आणि कृतींमधून त्यांचा बौद्ध धर्माकडे वाढलेला कल दिसून येतो. उदाहरणार्थ, भारत भूषण प्रिंटिंग प्रेस, मुंबई येथून त्यांनी १९३६ मध्ये प्रकाशित केलेले "मुक्ती कोन पथे ?" (मुक्तीचा मार्ग कोणता?) हे पत्रक पहिल्या पानावर काव्यात्मक स्वरूपात प्रकाशित केले होते. त्यात बौद्ध धर्माचा उल्लेख न करता सर्व मागास वर्गांना आवाहन करण्यात आले होते की:

"जर तुम्हाला तुमची प्रतिष्ठा, मानवता, समानता, बंधुता हवी असेल तर धर्म बदला."

लोकनाथ नावाच्या एका इटालियन बौद्ध भिक्षूने सिलोनमध्ये प्रकाशित झालेली एक पुस्तिका भारतातील मागास वर्गांना समर्पित केली होती, ती पुस्तिका 'बौद्ध धर्म तुम्हाला मुक्त करेल' या शीर्षकाने त्यांना आठवण करून दिली की "तुम्ही एकेकाळी बौद्ध होते आणि ... जातीवादी हिंदूंनी तुमचा सतत छळ केल्यामुळे आणि दुजाभाव दाखविल्यामुळे तुमची सुद्धा मानसिकता आपण हीन आहोत अशीच झालेली आहे". बारा वर्षांनंतर, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी त्यांचे 'अस्पृश्य' ( The Untouchables ) हे पुस्तक लिहिले, ज्यामध्ये त्यांनी 'ब्रोकन मेन' सिद्धांत मांडला. त्यांनी मुंबईतील दादर येथील त्यांच्या घराचे नाव 'राजगृह', मुंबईतील महाविद्यालयांचे नाव 'सिद्धार्थ' आणि महाविद्यालय परिसरांची नवे 'आनंद भवन' आणि 'बुद्ध भवन' अअशी ठेवली होती; औरंगाबाद येथील महाविद्यालयाचे नाव 'मिलिंद' आणि महाविद्यालय परिसराचे नाव 'नागसेन वन' असे ठेवले होते. त्यांनी स्वीकारलेली ही सर्व नावे बौद्ध धर्मामध्ये आढळणारी होती. डॉ. आंबेडकरांच्या मते, 'बौद्ध धर्म हा एक वैश्विक धर्म होऊ शकतो'.

मे १९५० मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी महाबोधी सोसायटीच्या जर्नलमध्ये 'बुद्ध आणि त्याच्या धर्माचे भवितव्य ' या शीर्षकाचा एक लेख लिहिला, ज्यामध्ये असा मांडणी करण्यात अली होती की , जर कोणत्याही धर्माला जागतिक धर्म म्हणून मान्यताप्राप्त म्हणून राहायचे असेल तर त्याला खालील निकष पूर्ण करता आले पाहिजेत.

१. सामाजिक एकतेचे नियमन करणारे तत्व म्हणून धार्मिक नैतिकता असलेला समाज.

२. भविष्यात त्याची थट्टा होऊ नये म्हणून धर्म विज्ञानावर किंवा तार्किकतेच्या तत्त्वावर आधारित असला पाहिजे.

३. धर्माने सामाजिक जीवनाची तीन मूलभूत तत्त्वे ओळखली पाहिजेत - स्वातंत्र्य, समता आणि बंधुता.

४. धर्माने गरिबीला पवित्र मानू नये किंवा तिचे उदात्तीकरण करू नये. पुढे ते असा दावा करतात की, वरील चारही आवश्यकता केवळ बौद्ध धर्माद्वारे पूर्ण केल्या जाऊ शकतात, जगातील इतर कोणत्याही धर्माद्वारे नाही.

५. बौद्ध धर्माच्या भवितव्याबद्दल, त्यांनी बौद्ध संघाच्या व्यवस्थेवर त्याचा प्रचार व प्रसार करण्याचे जबादारी सोपवल्याचे दिसून येते.

त्रिरत्न बौद्ध महासंघाची स्थापना करणारे इंग्लंडचे संघरक्षित जेव्हा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना पहिल्यांदा भेटले आणि त्यांना विचारले की, भारतात बौद्ध धर्माला खरोखरच भविष्य आहे का? डॉ. बाबासाहेबांनी कडवटपणे उद्गार काढले की, भारतात त्याचे भविष्य नाही. तथापि, नंतर त्यांनी धर्मांतराची तयारी केली आल्याचे आपणास दिसून येते.

१९५० मध्ये नवी दिल्ली येथे झालेल्या बुद्ध जयंती कार्यक्रमात ते म्हणाले की, भारतीय राष्ट्रध्वजावरील अशोक चक्र आणि राजमुद्रा ही प्रतीके आपणास भारतीय बौद्ध संस्कृतीमध्येच आढळतात. आतापर्यंत, बौद्ध धर्माच्या वैश्विकता, तर्कशुद्धता आणि वैज्ञानिक दृष्टिकोनाचा विचार केला तर, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बुद्धांच्या 'महान गृहत्यागा 'चे पारंपारिक कारण नाकारले आहे आणि त्यासाठी तार्किक कारण स्वीकारले आहे आणि ते त्यांनी त्यांच्या 'बुद्ध आणि त्यांचा धम्म' या पुस्तकात समाविष्ट केले आहे. ते

म्हणतात की, एकमेकांचे शेजारी असलेल्या शाक्य आणि कोलिय या राज्यांतील युद्ध थांबवण्यासाठी बुद्धांनी गृहत्याग केला होता. या व्यतिरिक्त, त्यांनी त्यांच्या आईवडिलांची आणि पत्नीची दिवसाउजेडी परवानगी घेऊनच भर सभेमध्ये मांडलेला गृहत्याग करण्याच्या शिक्षेचा प्रस्ताव प्रजासत्ताक राज्य पद्धती असल्यामुळे स्वीकारला होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना तमिळ बौद्ध विद्वान पी. लक्ष्मी नरसू यांनी लिहिलेल्या 'द एसेन्स ऑफ बुद्धिझम' या पुस्तकाची प्रत मिळविण्याची खूप इच्छा होती. नरसू यांच्या मते, "बौद्ध धर्माच्या सर्व विचारप्रवाहांमध्ये एक सामान्य नियम आहे की, 'गुरुची शिकवण म्हणून कोणतीही तत्वविरोधी गोष्ट स्वीकारली जाऊ शकत नाही, ती तर्काशी पूर्णपणे सुसंगत असली पाहिजे ." ४ मे १९५५ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी बौद्ध धर्माच्या प्रसारासाठी 'द बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडिया' या संस्थेची स्थापना केली.

## ५.६ डॉ. बाबासाहेब आंबेडकर: केवळ बौद्ध धर्मच का?

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याकडे ख्रिश्चन धर्म, इस्लाम, शीख आणि बौद्ध धर्म यांसारखे अनेक पर्याय होते . सुरुवातीला त्यांनी शीख धर्माचा पुरस्कार केला पण नंतर सोडून दिला. इ.स. १९३५ मध्ये त्यांनी केलेल्या घोषणेचा संदर्भ पाहिल्यास , शेवटी त्याचा परिपाक १४ ऑक्टोबर १९५६ रोजी बौद्ध धर्म स्वीकारण्यात झाला. त्याबद्दल डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले, "या धर्मांतराने मला प्रचंड समाधान आणि अकल्पनीय आनंद मिळाला आहे. मला असे वाटते की, मी नरकातून मुक्त झालो आहे." बुद्धाच्या धर्माचा पाया स्पष्ट करताना, डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले: "बौद्ध धर्म देव आणि आत्म्याचे अस्तित्व नाकारतो. बौद्ध धर्माचा खरा आधार दुःख दूर करण्याचा तर्कसंगत मार्ग आहे. बुद्ध म्हणाले, "जगात दुःख आहे, दुःख सर्वत्र पसरलेले आहे". नव्वद टक्के लोक कोणत्या ना कोणत्या प्रकारच्या दुःखाने किंवा त्रासाने ग्रस्त होते. बौद्ध धर्माचा मुख्य उद्देश दुःखी मानवाला मुक्त करणे आहे".

### इस्लाम, शीख आणि ख्रिश्चन धर्माशी चर्चा

एकेकाळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर शीख धर्म स्वीकारण्याच्या निर्णयाप्रत आले होते आणि खरे तर त्यांचा शीख धर्म स्वीकारण्याचा निर्णय अंतिम टप्प्यात आला होता. त्यांच्या भाषणाचा समारोप करताना, डॉ. बाबासाहेब आंबेडकर एका विशिष्ट भावनेने म्हणाले: “शीख धर्म स्वीकारण्याच्या हालचालीला शंकराचार्य, डॉ. कुर्तकोटी यांच्यासह अनेक हिंदूंनी मान्यता दिली आहे. खरे तर, त्यांनीच पुढाकार घेतला आणि मी तोच धर्म स्वीकारावा यावर जोर दिला. जर मी त्याला पर्यायी धर्म मानण्याचा प्रयत्न केला असेल, तर ते हिंदूंच्या भवितव्याची काही प्रमाणात जबाबदारी मला वाटली म्हणून आहे." धनंजय कीर म्हणतात, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे हे वाक्य त्यांनी ८-८-१९३६ च्या 'टाइम्स ऑफ इंडिया' मधून हे घेतले आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरा इस्लाम किंवा ख्रिश्चन धर्मापेक्षा शीख धर्माला प्राधान्य देण्यास का टायर झाले? धनंजय कीर यांनी असा संशय व्यक्त केला आहे की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना ब्राह्मण धर्माचा नाश करणाऱ्या इतर कोणत्याही कट्टरपंथी धर्मापेक्षा शीख धर्माला प्राधान्य देण्यास जोर देण्यामागे "ब्राह्मणी कावा " होता. "डॉ. मुंजे आणि डॉ.

कुर्तकोटी यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना शीख धर्मात रूपांतरित करण्याच्या प्रस्तावात पाठिंबा देऊन सर्वात कमी स्पर्धक धर्माची निवड करावी. कारण त्यांचा असा विश्वास होता की, भूतकाळातील आणि वर्तमानातील सर्व महान हिंदू नेत्यांप्रमाणेच, शीख धर्म हा हिंदू धर्माची एक शाखा आहे. कारण त्याची संस्कृती आणि तत्त्वे हिंदू धर्माशी मिळतीजुळती आहेत."

धनंजय कीर म्हणतात, किमान शीख धर्म बौद्ध धर्मापेक्षा खूपच चांगला झाला असता. शीखांचा सर्वव्यापी पगडी आणि दाढी त्यांना एक स्वतंत्र आणि विशेष ओळख तसेच उग्र व आक्रमक स्वरूपच देत नाही तर 'किरपाण' बाळगण्याचा अधिकार त्याला स्वसंरक्षणासाठी एक शस्त्र देखील उपलब्ध करून देते. शिवाय, देशात सर्वात मोठी सामाजिक-आर्थिक प्रगती करणारे शक्तिशाली शीख धर्मांतरित अस्पृश्यांसाठी एक शक्तीचा बुरुज ठरले असते. शीख पगडी, दाढी आणि किर्पाणाने सशस्त्र अशा अस्पृश्य धर्मांतरितांनी शीख धर्मात प्रवेश केला असता तर देशात त्यांचा एक दरारा निर्माण झाला असता. याशिवाय, जेव्हा पंजाबी सुभ्याची विभागणी झाली असती, तेव्हा शीख धर्म स्वीकारणाऱ्यांना तिथे जायचे असते तर त्यांना स्वतःची मातृभूमी मिळू शकली असती. खलिस्तान च्या मागणीमुळे दलितस्तान मिळविण्याचा मार्ग मोकळा होण्यास मदत झाली असती.

**इस्लामवरील चर्चा**

कदाचित त्यांना इस्लाम धर्म प्रमुखांशी संपर्क साधण्याची परवानगी नव्हती. त्यांनी हैदराबादच्या निजामाकडून आर्थिक निधीचा प्रस्ताव नाकारला. हे सर्व त्यांनी पूर्णपणे जाणून घेतले की, इस्लाम स्वीकारल्याने अस्पृश्यांना सामाजिक, आर्थिक आणि राजकीयदृष्ट्याही निश्चितच मदत होईल. अस्पृश्यांना नेमक्या याच तीन गोष्टी हव्या होत्या आणि तरीही जर इस्लाम स्वीकारण्याची किंमत मोजावी लागली तर त्यांना ते नको होते. त्या प्रमाणात मुंजे, सावरकर आणि शंकराचार्य आणि इतर ब्राह्मण नेते त्यांना इस्लामपासून दूर करण्यात यशस्वी झाले. "डॉ. मुंजे यांनी रजब यांना लिहिलेल्या पत्रासोबत जोडलेले डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विधान असे आहे की, जरी इस्लाममुळे दलित वर्गाला राजकीय, सामाजिक आणि आर्थिकदृष्ट्या जे आवश्यक आहे ते मिळत असले तरी, ख्रिश्चन धर्माला अमेरिका आणि इंग्लंडकडून अमर्याद संसाधने उपलब्ध होती आणि त्यामागे ख्रिश्चन सरकारे होती आणि जरी शीख धर्माबद्दल काही सकारात्मक बाबी असल्या तरी इस्लाम आणि ख्रिश्चन धर्माच्या तुलनेत तो दलित वर्गाला सामाजिक, आर्थिक आणि राजकीयदृष्ट्या तितकासा साहाय्यकारी होणार नव्हता. असे असले तरीही त्यांनी हिंदूंच्या हितासाठी शीख धर्माचे समर्थन केले आणि असेही म्हटले की नव-शीखांच्या मार्गात येणाऱ्या आर्थिक आणि राजकीय अडचणी दूर करण्यासाठी शिखांना मदत करणे हे हिंदूंचे कर्तव्य आहे."

यावरून हे स्पष्ट होते की डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी कधीतरी स्पष्टपणे कबूल केले होते की इस्लाम स्वीकारल्याने अस्पृश्यांना मदत झाली असती आणि त्यांना अधिक फायदे मिळाले असते आणि त्यांच्या सामाजिक, आर्थिक आणि राजकीय समस्या इतर कोणत्याही धर्मापेक्षा जास्त सोडवल्या असत्या. १९४० मध्ये प्रकाशित झालेल्या त्यांच्या 'थॉट्स ऑन पाकिस्तान' या विलक्षण ग्रंथात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या इस्लामबद्दलच्या विचारांचे स्पष्ट चित्र आपल्याला दिसते. परंतु डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी त्यापेक्षा वेगळा दृष्टिकोन

घेतला आणि मुस्लिमांना एक वेगळे राष्ट्र म्हटले आणि भारताचे हिंदुस्थान आणि पाकिस्तानमध्ये विभाजन करण्याचे आवाहन केले.

## ५.७ डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे बौद्ध धर्म विषयक विचार

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे बौद्ध धर्माचे मोठे चाहते होते. त्यांनी स्वतः सांगितले की तुलनात्मक धर्मांच्या अभ्यासातून दोन महान व्यक्तिमत्त्वांनी त्यांच्यावर प्रचंड प्रभाव पाडला आहे किंवा त्यांना मोहित केले आहे. ते म्हणजे एक बुद्ध आणि दुसरे म्हणजे येशू ख्रिस्त होय . त्यांनी बौद्ध धर्म स्वीकारला याचे कारण म्हणजे बौद्ध धर्म लोकांना एकमेकांशी कसे वागावे हे शिकवतो आणि समता, बंधुता आणि स्वातंत्र्याच्या संदर्भात माणसाला त्याचे कर्तव्य, एक दुसऱ्याशी आणि जर देव मनात असलेल्यांनी मनाशी देवाशी संबंध कसे ठेवावे हे सांगितले. त्यांच्यासाठी, बौद्ध धर्म हा नैतिकतेवर आधारित होता. तो नीतिमत्तेवर आधारित होता आणि बुद्ध मार्गदर्शक म्हणून काम करत असे, देव म्हणून नाही. श्री कृष्णाने म्हटले की तो देवांचा देव आहे, ख्रिस्ताने म्हटले की तो देवाचा पुत्र आहे आणि मोहम्मद पैगंबर म्हणाले की तो अल्लाचा शेवटचा प्रेषित आहे. बुद्ध वगळता सर्व धर्मांच्या संस्थापकांनी धर्म हाच केवळ मोक्षदाता (तारणहार) असल्याचा दावा केला आणि धर्माची तत्वे हीच केवळ अचूक आणि अंतिम आहेत असा दावा केला, तर बुद्ध मार्गदाता (मार्गदर्शक) या भूमिकेवर ठाम होते. बुद्ध हा धर्म नैतिकतेवर आधारित आहे.

बौद्ध धर्मात देवाऐवजी नैतिकता होती. बुद्धांनी 'धर्म' या शब्दाचा एक अत्यंत क्रांतिकारी अर्थ मांडला. ब्राह्मणांसाठी धर्म म्हणजे यज्ञ आणि त्या यज्ञाद्वारे देवाला आहुती देणे होय. कर्माच्या जागी, बुद्धांनी धर्माचे सार म्हणून नैतिकता वापरली. हिंदू धर्माचा सामाजिक संदेश असमानता होता तर बौद्ध धर्म समानतेचा होता. त्यांनी पुढे म्हटले की गीता चातुर्वर्ण्याचे समर्थन करते. 'बुद्ध आणि त्यांच्या धर्माचे भविष्य' या त्यांच्या लेखात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी बौद्ध धर्माबद्दलचे त्यांचे विचार खालीलप्रमाणे सारांशित केले आहेत:

१. समाजाला एकत्र ठेवण्यासाठी कायद्याची मान्यता किंवा नैतिकतेची मान्यता असणे आवश्यक आहे, कारण या दोन्ही गोष्टी नसतील तर समाजाचे तुकडे होणे निश्चित आहे.

२. धर्माचे कार्य तर्कानुसार असले पाहिजे, जे विज्ञानाचे दुसरे नाव आहे.

३. धर्मात नैतिक संहिता असणे पुरेसे नाही, तर त्याच्या नैतिक संहितेने स्वातंत्र्य, समानता आणि बंधुत्वाच्या मूलभूत तत्त्वांना मान्यता देणे आवश्यक आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मते, बौद्ध धर्माने हे निकष पूर्ण केले आहेत आणि म्हणूनच अस्तित्वात असलेल्या धर्मांमध्ये बौद्ध धर्म हा एकमेव धर्म आहे जो जगात अअसला पाहिजे. बौद्ध धर्म नाहीसा झाला आहे या सर्व अटकळींना नकार देत ते म्हणाले: "भौतिक स्वरूपात बौद्ध धर्म नाहीसा झाला या मताशी मी सहमत आहे. परंतु आध्यात्मिक शक्ती म्हणून तो अजूनही अस्तित्वात आहे." हिंदू धर्माबाबत, ते म्हणाले की, तो तीन टप्प्यांतून गेला आहे - वैदिक धर्म, ब्राह्मण धर्म आणि हिंदू धर्म. ब्राह्मण धर्माच्या काळात बौद्ध धर्माचा जन्म झाला. ब्राह्मण धर्माने असमानतेचा उपदेश केला. बौद्ध धर्माने समानतेचा उपदेश केला. त्यांच्या मते, बौद्ध धर्म हा हिंदू धर्मापेक्षा वेगळा होता. त्यांनी पुढे असे निरीक्षण केले:

हिंदू धर्म देवावर विश्वास ठेवतो, बौद्ध धर्मात देव नाही. हिंदू धर्म आत्म्यावर विश्वास ठेवतो, बौद्ध धर्मात आत्मा नाही, हिंदू धर्म चातुर्वर्ण्य आणि जातिव्यवस्थेवर विश्वास ठेवतो, बौद्ध धर्मात जातिव्यवस्था आणि चातुर्वर्ण्य यांना स्थान नाही.

बि. बि. सी. लंडन या वृत्तवाहिनीला मुलाखत देताना मे १९५६ मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले: "मला बौद्ध धर्म आवडतो कारण तो तीन तत्त्वप्रणाली देतो जी इतर कोणताही धर्म देत नाही. बौद्ध धर्म प्रज्ञा (अंधश्रद्धा आणि अलौकिकतेविरुद्ध काम करते ), करुणा (प्रेम) आणि समता (समानता) शिकवतो. चांगल्या आणि आनंदी जीवनासाठी माणसाला हेच हवे आहे. देव किंवा आत्मा त्याला त्याच्या स्वतःच्या कर्मातीत नरकापासून वाचवू शकत नाहीत. शिवाय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर बौद्ध धर्माला त्याच्या खालील गुणांसाठी देखील प्राधान्य देत होते .

१. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी असे निरीक्षण केले की, बौद्ध भिक्षुणींची व्यवस्थेने स्त्रियांबद्दलच्या प्राचीन हिंदू दृष्टिकोनावर एक उत्तम पर्याय दिलेला होता.

२. बौद्ध असतानाही एखाद्याला ख्रिश्चन धर्माच्या गुणांची वस्तू किंवा रूप याची नक्कल करण्याची आवश्यकता नाही. कारण "९० टक्के ख्रिश्चन धर्म बौद्ध धर्मातील तत्वांचे अनुकरण करूनच स्थापन झालेला आहे."

३. चांगल्या आणि आनंदी जीवनासाठी माणसाला प्रज्ञा, करुणा आणि समता हवी असते आणि बौद्ध धर्म ते सर्व देतो.

४. बौद्ध धर्म हा प्राचीन भारतीय वैराग्य नागा संस्कृतीसह पाळणारा आहे जो वैदिक, ब्राह्मणी, महाकाव्य, वेदांतिक हिंदू संस्कृतीपेक्षा वेगळा आहे.

५. हिंदू समाजातील अस्पृश्य लोक त्यांच्या पूर्वाश्रमीच्या बौद्ध धर्मातीलच आहेत.

६. भगवान बुद्ध हे मानवमधील सामाजिक भेदभावाच्या विरोधात होते आणि समतेचे समर्थन करणारे होते. त्याच आधारावर त्यांनी संघाची स्थापना केली ज्यामध्ये ७५ टक्के ब्राह्मण भिक्षू आणि २५ टक्के शूद्र भिक्षू एकमेकांच्या बरोबरीने वागविले जात होते.

७. बुद्धाचे नाव भारताबाहेर प्रसिद्ध आहे आणि त्याची प्रतिष्ठा आणि कीर्ती राम आणि कृष्णापेक्षा श्रेष्ठ आहे.

८. बौद्ध धर्म तर्कावर आधारित आहे. त्याची मुख्य तत्त्वे ईश्वरवादी धर्मांचा भाग नाहीत.

९. बौद्ध धर्म हा दुःखाचे निर्मूलन करण्याचा तर्कसंगत मार्ग आहे.

१०. बौद्ध धर्म जगाला वाचवू शकतो.

## ५.८ डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या बावीस प्रतिज्ञा

अखेर, दसऱ्याच्या दिवशी, रविवार, १४ ऑक्टोबर १९५६ रोजी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी नागपूर, दीक्षाभूमी येथे बौद्ध धर्म स्वीकारला आणि १५ ऑक्टोबर रोजी त्यांनी अस्पृश्य जाती आणि काही सवर्ण हिंदूंच्या सुमारे पाच लाख अनुयायांना उपदेश आणि प्रतिज्ञा दिल्या. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना माहित होते की, त्यांच्या मागास वर्गावर

सर्व पौराणिक, काल्पनिक देव-देवतांचा प्रभाव आहे ज्यापासून त्यांना मुक्तता मिळवावी लागेल. जर त्यांनी या प्रतिज्ञा पाळल्या नाहीत तर ते पुन्हा त्यांचे स्वातंत्र्य आणि समता गमावतील आणि हिंदू धर्माचे बळी ठरतील, अशी त्यांना सर्वात जास्त चिंता होती.

या प्रतिज्ञा तीन भागामध्ये विभागल्या आहेत.

भाग १: हिंदू पौराणिक कथा आणि धर्मशास्त्रांचा निषेध

१. मी ब्रह्मा, विष्णू, महेश यांना देव मानणार नाही किंवा त्यांची उपासना करणार नाही.

२. मी राम व कृष्ण यांना देव मानणार नाही किंवा त्यांची उपासना करणार नाही.

३. मी गौरी-गणपती इत्यादी हिंदू धर्मातील कोणत्याही देव-देवतेस मानणार नाही किंवा त्यांची उपासना करणार नाही.

४. देवाने अवतार घेतले, यावर माझा विश्वास नाही.

५. गौतम बुद्ध हा विष्णूचा अवतार होय, हा खोटा आणि खोडसळ प्रचार होय असे मी मानतो.

६. मी श्राद्धपक्ष करणार नाही; पिंडदान करणार नाही.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बौद्ध धर्म हा वैज्ञानिक आणि तर्कशुद्ध धर्म म्हणून निवडला, जो कोणत्याही भेदभावाशिवाय प्रत्येक मानवाचे स्वागत करतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी हिंदू धर्माच्या पवित्र संस्कृत ग्रंथांचा अभ्यास केला आणि हिंदू धर्माच्या 'त्रिमूर्ती' म्हणजेच ब्रह्मा, विष्णू आणि महेश यांच्यावरील खोट्या श्रद्धा उघड केल्या. म्हणूनच, त्यांनी त्यांच्या अनुयायांना यापुढे या देवतांवर विश्वास ठेवू नका आणि त्यांची पूजा करू नका असे आदेश दिले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे हस्तलिखित उपलब्ध आहेत ज्यात त्यांनी ब्रह्मा आणि शिव यांच्या भ्रामकतेचा उल्लेख केला आहे. म्हणून, त्यांनी त्यांच्या अनुयायांना हे व्रत दिले. त्याचप्रमाणे, हिंदू राम आणि कृष्णावर विश्वास ठेवत होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी "हिंदु धर्मातील कोडे" या शीर्षकाने एक टीकात्मक ग्रंथ लिहिला आणि त्यातील एका प्रकरणाचे शीर्षक "राम आणि कृष्णाचे कोडे" असे होते. येथे त्यांनी प्रश्न उपस्थित केले की रामायण आणि महाभारत हे अनुक्रमे वाल्मिकी आणि व्यास यांनी रचलेले महाकाव्य ग्रंथ आहेत. अगदी ऐतिहासिक साहित्यिक स्रोत देखील नाही. सध्या भारतीय राजकारणात, राम जन्मभूमी आणि राम मंदिराचा प्रश्न हिंदूंना जिंकण्याचा आणि त्या नंतरच्या निवडणुकांचा ज्वलंत मुद्दा आहे. राम आणि कृष्ण यांनी वापरलेले तंत्रज्ञान भारतातून अचानक कसे गायब झाले? म्हणूनच, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना त्यांच्या अनुयायांना राम आणि कृष्णाची पौराणिक कथा तर्कबुद्धीने समजून घ्यावी असे वाटत होते. या व्यतिरिक्त, राम आणि रावणाबद्दल श्रीलंकेच्या साहित्यात कोणताही संदर्भ आढळत नाही.श्री गणेशाचे डोके हत्तीच्या डोक्याने पुन्हा बसवल्याची कथा खूप लोकप्रिय आहे. ही सर्व ब्राह्मणी साहित्यातील कल्पना आणि पौराणिक निर्मिती आहे. देवाच्या अवताराची संकल्पना खूप अतार्किक आहे. हे व्रत केले गेले, कारण अशा प्रकारच्या संकल्पना जनतेमध्ये अंधश्रद्धांना प्रोत्साहन देतात. जर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना त्यांच्या सहकाऱ्यांना बुद्धिवाद, आधुनिकतावाद आणि वैज्ञानिक दृष्टिकोनाकडे घेऊन जायचे असेल, तर त्यांना अशा अंधश्रद्धांबद्दल शिकवले पाहिजे असे ठाम वाटत होते.

हिंदू तत्वज्ञानात, विष्णूने दहा अवतार घेतले आहेत आणि नवव्या अवतारांपैकी एक बुद्धाचा होता असे प्रचलित आहे. मग प्रश्न असा येतो की, भारतातील सर्व हिंदू त्यांच्या घरात आणि मंदिरांमध्ये बुद्धाची प्रतिमा का लावत नाहीत? म्हणूनच, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी असे प्रतिपादन केले की, बुद्ध हे मानवपुत्र होते आणि ज्ञान आणि स्वपरीक्षणाच्या स्थितीत पोहोचलेले एक महान व्यक्तिमत्व होते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर, बुद्धिवादी असल्याने, त्यांनी त्यांच्या अनुयायांना मृत व्यक्तीचे श्राद्ध करू नये आणि पिंडदान करू नये असा सल्ला दिला, जे व्यक्तीच्या मृत्यूनंतर हिंदू विधींचे अविभाज्य भाग आहेत. इ.स. १९२० मध्ये, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी त्यांच्या वडिलांची पुण्यतिथी साजरी केली आणि धक्कादायकपणे त्यांच्या पत्नी रमाबाई यांना वसतिगृहात असलेल्या चाळीस विद्यार्थ्यांना मांस आणि मासे देण्यास सांगितले जे त्यांना वसतिगृहमध्ये कधीच मिळत नव्हते. त्यानुसार त्यांनी त्यांच्या अनुयायांना असे संस्कार आणि विधी टाळण्यास सांगितले. त्यांना माहित होते की, जर त्यांना त्यांच्या समुदायाला हिंदू धर्माच्या कट्टर प्रथांपासून मुक्त करायचे असेल तर त्यांना हिंदू पौराणिक कथा आणि धर्मशास्त्रांच्या प्रथांचा निषेध करावा लागेल आणि त्यांचा त्याग करावा लागेल.

विभाग २: बुद्धांच्या शिकवणींचा स्वीकार

७.मी बौद्धधम्माच्या विरुद्ध विसंगत असे कोणतेही आचरण करणार नाही.

८. मी कोणतेही क्रियाकर्म ब्राह्मणाचे हातून करवून घेणार नाही.

९. सर्व मनुष्यमात्र समान आहेत असे मी मानतो.

१०. मी समता स्थापन करण्याचा प्रयत्न करीन.

१५. मी तथागत बुद्धाने सांगितलेल्या अष्टांग मार्गाचा अवलंब करीन.

१२. तथागताने सांगितलेल्या दहा पारमिता मी पाळीन.

१३. मी सर्व प्राणिमात्रावर दया करीन, त्यांचे लालन पालन करीन.

१४. मी चोरी करणार नाही.

१५. मी व्याभिचार करणार नाही.

१६. मी खोटे बोलणार नाही.

१७. मी दारू पिणार नाही.

१८. ज्ञान (प्रज्ञा), शील, करुणा या बौद्धधम्माच्या तीन तत्त्वांची सांगड घालून मी माझे जीवन व्यतीत करीन.

या प्रतिज्ञांमध्ये आपल्याला बुद्धाच्या शिकवणुकीचा समावेश असलेला दिसून येतो. धर्मांतरित व्यक्तीने कधीही ब्राह्मणाचा सल्ला घेऊ नये. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मते, "बुद्धांनी पाच अनुसरणे (पंचशील) आणि अष्टांगिक मार्ग किंवा मध्यम मार्गाचा उपदेश केला

तेव्हा त्यांच्या समोर स्पष्टपणे सामान्य जनता होती." सामान्य व्यक्तीने केवळ पंचशीलाचे जरी पालन केले तरी त्याचे दुःख दूर होऊ शकते किंबहुना, तो मनुष्य सुखी होऊ शकतो. या पंचशीलांचे पालन केले तरी सामान्य व्यक्तीचे जीवन कायमचे आनंदी राहू शकते आणि हिंसाचाराच्या कोणत्याही पापांपासून तो दूर राहू शकतो. सर्व प्राणिमात्रांबद्दल करुणा बाळगू शकते. याशिवाय, व्यक्तीने आपले जीवन शांत आणि मुक्त करण्यासाठी दान, शील, नेखम्म, मेत्ता , उपेख्ख इत्यादी 'पारमिता' पाळल्या पाहिजेत. या प्रतिज्ञा १९५६ साली दिल्या असल्या तरी त्या आज २०२५ आणि पुढील पिढयांना सुद्धा कायम मार्गदर्शक राहतील.

विभाग ३: बौद्ध धर्माबद्दल श्रद्धा आणि संकल्प

१९. माझ्या जुन्या, मनुष्यमात्राच्या उत्कर्षाला हानिकारक असणाऱ्या व मनुष्यमात्राला असमान व नीच मानणाऱ्या हिंदू धर्माचा मी त्याग करतो व बौद्धधम्माचा स्वीकार करतो.

२०. तोच सद्धम्म आहे अशी माझी खात्री पटलेली आहे.

२५. आज माझा नवा जन्म होत आहे असे मी मानतो.

२२. इतःपर मी बुद्धाच्या शिकवणुकीप्रमाणे वागेन अशी प्रतिज्ञा कर

या विभागातील प्रतिज्ञा धर्मांतरितांना हिंदू धर्माचा त्याग करून मानवता आणि प्रगतीचा मार्ग स्वीकारण्यास प्रोत्साहित करतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना हे लक्षात आणून द्यायचे होते की, जीवनात संपूर्ण परिवर्तन म्हणजे त्यांना पुनर्जन्म झाल्यासारखे वाटेल.

## ५.९ सारांश

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना बालपणापासूनच ते उच्च पात्रताधारक बॅरिस्टर होईपर्यंत जातिव्यवस्थेमुळे वैयक्तिक त्रास, बहिष्कार, भेदभाव सहन करावा लागला. म्हणूनच, त्यांनी ब्रिटिश सरकार तसेच स्वतंत्र भारत सरकारसोबत संवैधानिक मार्गाने हा भेदभाव संपवण्याचा संकल्प केला. त्यांनी जातीवादी हिंदूंनी पाळलेल्या अस्पृश्यतेच्या चुकीच्या कृत्यांचा आणि पद्धतींचा आणि धार्मिक भीतीमुळे जातीवादी हिंदूंना त्यांचे पालन करण्यास भाग पाडणाऱ्या धर्मग्रंथांमधील भेदभावाचा पाय घालणाऱ्या तत्वांचा पर्दाफाश करण्याचा सर्वतोपरी प्रयत्न केला. परंतु त्याचा काही उपयोग झाला नाही. म्हणूनच, त्यांचे मन आणि प्रयत्न स्वतःच्या अनुयायांना समता न देणाऱ्या धर्मात बदल घडवून आणण्यासाठी होते. म्हणूनच, त्यांनी जवळजवळ २५-३० वर्षे सखोल विचारमंथन केल्यानंतर भारतीय धर्मात म्हणजेच बौद्ध धर्मात धर्मांतर केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आधुनिक भारतात आणि विशेषतः जगात बौद्ध धर्माचे पुनरुज्जीवन केले आणि त्यांच्या पाच लाख अनुयायांनीही बौद्ध धर्माचे पुनरुज्जीवन केले. इतर कोणत्याही धर्मापेक्षा त्यांचा बौद्ध धर्माकडे सर्वाधिक कल होता. असे अनेक प्रसंग आहेत आणि त्यांनी स्वीकारलेली बौद्ध चिन्हे त्यांचा बौद्ध धर्माकडे असलेला कल दर्शवतात. १९५६ मध्ये येवला परिषदेने त्यांचे हे कल प्रत्यक्षात आणले. त्यांनी नाव धर्मांतरितांना त्यांचा नवीन जन्म मिळावा म्हणून बावीस प्रतिज्ञा दिल्या. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेली बावीस प्रतिज्ञा १९५६ आणि आजच्या काळातील सामाजिक

संदर्भात प्रासंगिक आहेत आणि भविष्यातही प्रासंगिक राहतील. बौद्धांनी आपले जीवन मुक्त करण्यासाठी प्रतिज्ञा पाळल्या पाहिजेत. त्यांनी असा विश्वास ठेवला पाहिजे की हजारो वर्षांपासून, त्यांचे पूर्वज आणि ते देखील हिंदू देवतांची पूजा करत राहिले परंतु त्यापैकी एकही देवता त्यांचे अश्रू पुसण्यासाठी किंवा जातीवादी हिंदूंना, अत्याचार करणाऱ्यांना रोखण्यासाठी आले किंवा त्यांना सद्बुद्धी दिली नाही. बौद्धांनी हिंदू धर्माच्या पौराणिक कथांचा चिकित्सकपणे अभ्यास केला पाहिजे, कर्मकांड सोडून द्यावे, विवेकाने पडताळणी करावी आणि नैतिकतेसह विज्ञानाचा स्वीकार करावा.

## ५.१० प्रश्न

१. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे बौद्ध धर्म विषयक विचार सविस्तर लिहा.

२. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी बौद्ध धर्मच का स्वीकारला? चिकित्सक मूल्यमापन करा.

## ५.११ संदर्भ


- Khairmode C.B., Dr. Bhimrao Ramji Ambedkar, Vol.1, Sugava Prakashan, Pune, 2002. (Marathi)
- Zelliot Eleanor, Ambedkar's World, The Making of Babasaheb and the Dalit Movement, Navayana, New Delhi, 2013.
- Keer Dhananjay, Dr. Ambedkar, Life and Mission, Popular Prakashan Mumbai, 1990.
- Times of India, 4 January 1930.
- Article in Harijan Weekly of M.K. Gandhi dated 19th December, 1936.
- Baily F.G., Caste and the Economic Frontier, Manchester University Press, Manchester, 1957.
- Dr. Babasaheb Ambedkar., The Untouchables, Kaushalya Prakashan, Aurangabad, 2003.
- Kuber W.N., Dr. Babasaheb Ambedkar A Critical Study, People's publishing House, New Delhi, 2009.
- Times of India, 3 May 1950.
- Dr. Ambedkar, B.R., The Buddha and his Dhamma, Buddha Bhoomi Publication, Nagpur, 2003. ( Refer Marathi edition )
- Narsu P. Lakshmi, The Essence of Buddhism, Asian Educational Services, New Delhi, 1993.
- Khairmode C.B., op. cit., Vol.12. (Marathi)

- Dr. Babasaheb Ambedkar, Writings and Speeches, Unpublished Writings, Vol.4, Part-iii, Govt. of Maharashtra, 1987.
- Rege Sharmila, B.R. Ambedkar's Writings on Brahmanical Patriarchy-Against the Madness of Manu, Navayana, 2016.
- Kenadi L., Revival of Buddhism in Modern India, Ashish Publishing House, New Delhi,1995.
- Gaikwad K.S., a Paper titled Significance of Metta, Karuna, Mudita and Upekkha: A Buddhist Philosophy for Healthy World Society in International Journal CIJHAR, issue of Oct-Dec 2013.
- Omvedt Gail, Buddhism in India, Challenging Brahmanism and Caste, Sage Publications, New Delhi, 2003.
- Verma Vidhu, Reinterpreting Buddhism: Ambedkar on the Politics of Social Action, Economic and Political Weekly, December 4, 2010, vol xlv no. 49, pp. 56-65.
- Harvey Peter, An Introduction to Buddhism, Teachings, History and Practices, Cambridge University Press, New York, 2013.
- Kalinga Tudor Silva, Article on Buddhism, Social Justice and Caste: Reflections on Buddhist Engagement with Caste in India and Sri Lanka, Society and Culture in South Asia, Sage Publications, New Delhi, 18-19 July, 2016, pp.1-13.
- Johannes Beltz, An Article on Can Buddhism be the substitute of Communism? B.R. Ambedkar's (1891-1956) project of reconstructing Indian society.pp.1-18.
- Wright Robert, Why Buddhism is True, The Science and Philosophy of Meditation and Enlightenment, Simon & Schuster.
- Sangharakshita, Ambedkar and Buddhism, originally published by Windhorse Publications, Sangharakshita, 1986.
- Meena Bardia, Dr. B.R. Ambedkar His Ideas About Religion and Conversion to Buddhism, the Indian Journal of Political Science, Indian Political Science Association, Vol. 70, No. 3 (JULY - SEPT., 2009), Pp.737-749, Published By: Stable URL: Https://Www.Jstor.Org/Stable/42742756
- Xing Guang, The Concept of Buddha, Its evolution from early Buddhism to the trikaya theory, Routledge Curzon, 2005.


✞✞✞✞

# ६

# बहिष्कृत हितकारीणी सभा आणि पीपल्स् एज्युकेशन सोसायटी

**घटक रचना :**

६.० उद्दिष्टे

६.१ प्रस्तावना

६.२ बहिष्कृत हितकारीणी सभेचा आढावा

६.३ बहिष्कृत हितकारीणी सभेची स्थापना

६.४ बहिष्कृत हितकारीणी सभेची घटना

६.५ पीपल्स् एज्युकेशन सोसायटी आणि तिची शैक्षणिक संस्था

६.६ शिक्षण, आरोग्य आणि जमीन विभाग, नवी दिल्ली यांना मंजुरीसाठी अर्ज

६.७ पीपल्स् एज्युकेशन सोसायटी आणि तिची घटना

६.८ सारांश

६.९ प्रश्न

६.१० संदर्भ

## ६.० उद्दिष्टे

१. बहिष्कृत हितकारीणी सभेचा आढावा घेणे.

२. बहिष्कृत हितकारीणी सभेची घटना स्पष्ट करणे.

३. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पीपल्स् एज्युकेशन सोसायटीसाठीच्या अर्जाचे विश्लेषण करणे.

४. पीपल्स् एज्युकेशन सोसायटीचे आणि तिच्या घटनेचे टीकात्मक मूल्यमापन करणे.

## ६.१ प्रस्तावना

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी त्यांच्या राजकीय आणि सामाजिक कार्याच्या सुरुवातीच्या काळात १९२४ मध्ये बहिष्कृत हितकारिणी सभेची स्थापना केली. नंतर १९४५ मध्ये त्यांनी पीपल्स् एज्युकेशन सोसायटी नावाची एक शैक्षणिक संस्था स्थापन केली. या संघटना सुरू करताना त्यांच्याकडे निधी नव्हता. पण तरीही त्यांनी त्यांची स्थापना मात्र केली. त्याच वेळी त्यांनी या संघटनांच्या मंडळावर जे सदस्य घटले ते केवळ दलित वर्गापुरते मर्यादित नव्हते तर ते सर्व जाती आणि समुदायाचे होते. हे सदस्य देखील शिक्षण

आणि कायद्याच्या क्षेत्रातील तज्ञ होते आणि त्यांच्या सामाजिक आणि राजकीय दृष्टिकोनाने देखील निर्मळ होते. बहिष्कृत हितकारिणी सभेचे अध्यक्ष सर चिमनलाल सेटलवाड (१८६४-१९४७) होते. ते २० व्या शतकाच्या सुरुवातीला मुंबई उच्च न्यायालयात प्रॅक्टिस करणारे एक प्रमुख भारतीय बॅरिस्टर आणि कायदेतज्ज्ञ होते. त्यांनी सलग १२ वर्षे (१९१७-१९२९) मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू म्हणून काम करण्याचा अनोखा मान मिळवला होता, जो विद्यापीठाच्या इतिहासातील सर्वात मोठा कार्यकाळ होता. ते सरकारी सेवेतही सहभागी होते. , त्यांनी बॉम्बे प्रेसिडेन्सीमध्ये सुधारणा योजने अंतर्गत मंत्री म्हणून देखील कार्य केले होते.

पीपल्स् एज्युकेशन सोसायटीची नोंदणी १९४५ मध्ये झाली, ज्यातील सदस्यांकडे उच्च पात्रता आणि डॉक्टरेट, बॅरिस्टर, मास्टर्स सारख्या पदव्या होत्या. येथे आपल्याला असे आढळून येते की, सोसायटीने सर्व जाती आणि समुदायांसाठी सदस्यता खुली केली होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी प्रथम त्यांचा प्रस्ताव तयार केला आणि मुंबईच्या फोर्ट परिसरात ६ एकर जमीन निवडली. त्यासाठी भारत सरकारकडून ६,००,०००/- रुपयांचे व्याजमुक्त कर्ज मंजूर करण्यासाठी अर्ज केला. त्यांनी सरकारला आश्वासन दिले की, ते लगेच ती रक्कम वापरणार नाहीत तर महाविद्यालयाची मान्यता मिळाल्यानंतरच वापरतील. येथे एक गोष्ट लक्षात घेण्यासारखी आहे की, त्या काळात डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वतः मंत्री होते म्हणजेच व्हाईसरॉयच्या कार्यकारी मंडळात कामगार सदस्य होते परंतु त्यांनी पीपल्स् एज्युकेशन सोसायटीच्या मंजुरीसाठी अर्ज करण्याची निर्देशित प्रक्रिया काटेकोरपणे पाळली.

या प्रकरणात, आपण या दोन्ही संघटनांचे ध्येये आणि उद्दिष्टे, त्यांच्या घटना पाहू आणि पीपल्स् एज्युकेशन सोसायटीशी संबंधित सध्याचे प्रशासन आणि राजकारण याबद्दल कोणतीही चर्चा करणार नाहीत .

## ६.२ बहिष्कृत हितकारीणी सभेचा आढावा

बहिष्कृत हितकारीणी सभा ही डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी २० जुलै १९२४ रोजी मुंबई येथे स्थापन केलेली एक महत्त्वाची सामाजिक संघटना होती. शिक्षण, सामाजिक जागरूकता आणि आर्थिक सक्षमीकरणाला प्रोत्साहन देऊन मागास वर्गाचे (Depressed Classes -सध्या दलित म्हणून ओळखले जाणारे) उत्थान करणे हे तिचे प्राथमिक उद्दिष्ट होते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मुंबईतील दामोदर हॉलमध्ये एक बैठक बोलावली, जिथे सभेची औपचारिक स्थापना झाली. त्यांनी व्यवस्थापकीय समितीचे अध्यक्ष म्हणून काम केले.

सभेच्या सविस्तर घटनेकडे जाण्यापूर्वी, आपल्याला फक्त खालील गोष्टींवर एक नजर टाकावी लागेल.

सभेचे मार्गदर्शक ब्रीदवाक्य "शिका, चेतवा, संघटित व्हा "(Educate, Agitate, Organize ) हे होते. मराठी भाषांतर हे चांगदेव खैरमोडे यांनी केलेले आहे. गेल्या अनेक

वर्षांपासून ते एक घोषवाक्य बनले आहे आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांवर बोलणाऱ्या प्रत्येकाने हे 'ब्रीदवाक्य' उच्चारले पाहिजे असा शिरस्ताच जणू काही पाळला जात आहे. किंबहुना, हे वास्तव बनले आहे की प्रत्येकजण शिक्षणाला इतके महत्व देतो आणि जास्तीत जास्त उच्च शिक्षण घेत आहे.

**सभेचे उद्दिष्ट म्हणजे :**

**उत्थानासाठी बहुआयामी दृष्टिकोन:**

सभेच्या घटनेत, जसे की सुरुवातीलाच असे नमूद केले आहे, सभा आपली उद्दिष्टे साध्य करण्यासाठी बहुआयामी दृष्टिकोनाची वचनबद्धता स्पष्टपणे दर्शवते. खऱ्या सक्षमीकरणासाठी सामाजिक बहिष्काराच्या अनेक पैलूंशी सामना करणे आवश्यक आहे हे ओळखून, सभेने खालील गोष्टींना प्राधान्य दिले:

**शिक्षण:** सभेचे उद्दिष्ट "वसतिगृहे उघडून किंवा आवश्यक किंवा इष्ट वाटतील अशा इतर माध्यमांचा वापर करून मागास वर्गात शिक्षणाचा प्रसार करणे" होते.

**सांस्कृतिक प्रगती:** समुदायाची भावना आणि सामायिक ओळख वाढवण्याचे महत्त्व ओळखून, सभेने "ग्रंथालये, सामाजिक केंद्रे आणि वर्ग किंवा अभ्यास मंडळे उघडून मागास वर्गात संस्कृतीचा प्रसार" करण्याचा प्रयत्न केला.

**आर्थिक प्रगती:** मागास वर्गाला स्वावलंबी बनविण्यासाठी आणि गरिबीच्या चक्रातून मुक्त होण्यासाठी, सभेने "औद्योगिक आणि कृषी विद्यालये सुरू करून मागास वर्गाची आर्थिक स्थिती सुधारण्याची " योजना आखली.

**सुरुवातीचे कार्य : महाड सत्याग्रह**

सभेची आपल्या कार्याची वचनबद्धता सुरुवातीच्या काळापासूनच स्पष्ट होती. १९२७ चा महाड सत्याग्रह हा संघटनेच्या इतिहासातील आणि भारतातील दलित हक्कांसाठीच्या व्यापक संघर्षातील एक महत्त्वाचा कार्यक्रम म्हणून अधोरेखित झालेला आहे. महाडमधील सार्वजनिक जलस्रोत असलेल्या चौदार तळ्यावर केवळ जातीच्या आधारावर दलित वर्गाला प्रवेश नाकारण्यात आल्याने सत्याग्रह हा त्यासाठी थेट आव्हान होते. भेदभावाच्या या कृत्यामुळे संताप निर्माण झाला आणि दलित समुदायाला त्यांचे मूलभूत हक्क मिळवण्यासाठी प्रेरणा मिळाली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली, सभेने महाड येथे एक मोर्चा आणि परिषद आयोजित केली, ज्यामध्ये या अन्यायाला आव्हान देण्यासाठी हजारो लोकांना एकत्रित केले. महाडमध्ये सुमारे १५,००० स्वयंसेवक आणि दलित वर्गाचे प्रतिनिधी कसे जमले याचे वर्णन त्यावेळच्या सूत्रांनी केले आहे, जे समाजातील वाढती जागरूकता आणि एकी दर्शवते. महाड सत्याग्रहाने भारतीय समाजाला अस्पृश्यतेच्या कठोर वास्तवाचा सामना करण्यास भाग पाडले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि सभेला विरोध करणाऱ्या वर्तमानपत्रांनाही या मुद्द्यावर कसे सहभागी होण्यास भाग पाडले गेले याचे हे यावरून आपणास दिसून येते.

समाजात खोलवर रुजलेल्या जातीव्यवस्थेला आव्हान देऊन आणि दलित वर्गाच्या मूलभूत हक्कांचा पुरस्कार करून, सभेने भविष्यातील सामाजिक सुधारणा चळवळी आणि कायदेशीर बदलांसाठी मार्ग खुला केला. सभेच्या कृतींमुळे, विशेषतः महाड सत्याग्रहामुळे, अस्पृश्यतेचा मुद्धा सार्वजनिकरित्या चर्चेला घेतला जाऊ लागला आणि खोलवर रुजलेल्या या पूर्वग्रहांचे पुनर्मूल्यांकन करण्यास भारतीय समाजाला भाग पाडले. यामुळे अनेकदा सवर्ण हिंदूंच्या विरोधाला सामोरे जावे लागले असले तरी तो जाती-आधारित भेदभाव नष्ट करण्याच्या दिशेने एक महत्त्वाचा टप्पा होता. सभेचा वारसा तिच्या तात्काळ कृतींपेक्षाही पुढे जातो. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे संघटनेतील नेतृत्व, सामाजिक न्यायासाठीचे त्यांचे समर्थन आणि नंतर बौद्ध धर्मात रूपांतर, अधिक समतापूर्ण समाजासाठी प्रयत्नशील असलेल्या व्यक्ती आणि चळवळींना प्रेरणा देत आहे.

बहिष्कृत हितकारिणी सभेची शताब्दी वर्ष २०२४, भारतातील समानता आणि न्यायासाठी सुरू असलेल्या संघर्षाची एक शक्तिशाली आठवण म्हणून प्रेरणा देते. शिक्षण, सांस्कृतिक प्रगती आणि आर्थिक प्रगतीसाठी संस्थेची वचनबद्धता, अस्पृश्यतेविरुद्धच्या तिच्या अटल भूमिकेसह, अधिक समावेशक आणि न्याय्य समाजासाठी पाया रचण्यास सभेची मदत झाली.

बहिष्कृत हितकारिणी सभेने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखालील त्यानंतरच्या चळवळी आणि संघटनांचा पाया घातला, ज्यांनी दलित वर्गाच्या हक्कांवर आणि सक्षमीकरणावर लक्ष केंद्रित केले. १४ जून १९२८ रोजी सभा विसर्जित झाली असली तरी, तिची तत्त्वे आणि उद्दिष्टे भारतातील सामाजिक सुधारणा चळवळींवर प्रभाव पाडत राहतील. भारतीय समाजाच्या खोलवर रुजलेल्या सामाजिक भेदभावयुक्त उतरंडीला आव्हान देण्यात सभेने महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. सभेचा वारसा समानता आणि न्यायासाठीच्या समकालीन संघर्षांशी, विशेषतः जातिव्यवस्थेत ऐतिहासिकदृष्ट्या दुर्लक्षित असलेल्या लोकांमध्ये, अजूनही प्रेरणादायी राहील.




Motto of Bahishkrit Hitkarini Sabha: ‘EDUCATE, AGITATE, ORGANISE’

(Source: Courtesy from Google Images)



Dr. Babasaheb Ambedkar with his Activists of Bahishkrit Hitkarini Sabha

(Source: Courtesy from Google Images)



Dr.Ambedkar with Social Workers

(Source: Courtesy from Google Images)

## ६.३ बहिष्कृत हितकारीणी सभेची स्थापना

मार्च १९२४ मध्ये अस्पृश्यांच्या उत्थानासाठी सामाजिक चळवळ सुरू करण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी ९ मार्च १९२४ रोजी मुंबईतील दामोदर हॉल येथे एक बैठक बोलावली, ज्यामध्ये अस्पृश्यांच्या अडचणी दूर करण्यासाठी आणि त्यांच्या तक्रारी सरकारसमोर मांडण्यासाठी एक केंद्रीय संस्था स्थापन करण्याची इच्छा आहे यावर विचार करण्यात आला. बरीच चर्चा आणि खल झाल्यानंतर, एक संस्था स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला आणि त्यानुसार २० जुलै १९२४ रोजी 'बहिष्कृत हितकारीणी सभा' या

शीर्षकाखाली ती स्थापन करण्यात आली आणि १८६० च्या अधिनियम XXI अंतर्गत नोंदणीकृत करण्यात आली.

**सभेची ध्येये आणि उद्दिष्टे**

(अ) वसतिगृहे उघडून किंवा आवश्यक किंवा इष्ट वाटतील अशा इतर मार्गांचा वापर करून दलित वर्गात शिक्षणाचा प्रसार करणे.

(ब) दलित अभ्यास मंडळांमध्ये संस्कृतीचा प्रसार करणे.

(क) औद्योगिक आणि कृषी विद्यालये सुरू करून दलित वर्गाची आर्थिक स्थिती सुधारणे आणि प्रगती करणे.

(ड) दलित वर्गाच्या तक्रारींना वाचा फोडणे.

**सदस्य**

१. श्री चिमनलाल हरिलाल सेटलवाड - बहिष्कृत हितकारिणी सभेचे अध्यक्ष

२. मेयर निस्सीम - उपाध्यक्ष

३. जे.पी. - उपाध्यक्ष

४. रुस्तमजी जिनवाला - उपाध्यक्ष

५. जी.के. नरीमन - सॉलिसिटर

६. डॉ. आर.पी. परांजपे - सॉलिसिटर

७. डॉ. व्ही.पी. चव्हाण - सॉलिसिटर

८. बी.जी. खेर - सॉलिसिटर

९. डॉ. बी.आर. आंबेडकर - व्यवस्थापकीय समितीचे अध्यक्ष

१०. एस.एन. शिवतरकर - सचिव

११. एन.टी. जाधव – कोषागार

## ६.४ सभेची घटना

सभेची घटना आधीपासून अस्तित्वात असलेल्या तरतुदींनुसार पाळली गेली असावी. ती धर्मादाय आयुक्तांकडे उपलब्ध असलेल्या नमुन्याप्रमाणे तयार केली गेली असावी, जी आजही धर्मादाय आयुक्त कार्यालयाने विहित केलेली आहे. सामान्यतः, त्याला असोसिएशनचे निवेदन (Memorandum of Association) असे म्हणतात आणि येथे आपल्याला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या लेखन आणि भाषणांमधील मूळ लेखनामध्ये खालीलप्रमाणे आढळतात:

I. संस्थेचे नाव : — “बहिष्कृत हितकारिणी सभा”

II. तिच्या भौगोलिक मर्यादा या बॉम्बे प्रेसिडेंसी पुरत्या मर्यादित असतील.

III. सभेचे मुख्य कार्यालय मुंबईत असेल.

IV. सभेचे ध्येये आणि उद्दिष्टे पुढीलप्रमाणे —

(अ) वसतिगृहे उघडून किंवा आवश्यक किंवा इष्ट वाटतील अशा इतर माध्यमांचा वापर करून दलित वर्गात शिक्षणाचा प्रसार करणे.

(ब) ग्रंथालये, सामाजिक केंद्रे आणि वर्ग किंवा अभ्यास मंडळे उघडून दलित वर्गात संस्कृतीचा प्रसार करणे.

(क) औद्योगिक आणि कृषी शाळा सुरू करून दलित वर्गाची आर्थिक स्थिती सुधारणे आणि सुधारणे.

(ड) दलित वर्गाच्या तक्रारींना वाचा फोडणे.

(इ) दलित वर्गाचे सामान्य ज्ञान, सामाजिक उदय किंवा आर्थिक उन्नती घडवून आणण्यासाठी कोणत्याही क्लब, संघटना किंवा कोणत्याही चळवळीचे आयोजन करणे किंवा त्यांना मदत करणे.

**V. प्रस्तावित उपक्रम: —**

(१) सभेच्या उद्देशासाठी आवश्यक किंवा सोयीस्कर असलेले कोणतेही अधिकार आणि विशेषाधिकार खरेदी करणे, भाड्याने घेणे किंवा प्राप्त करणे.

(२) सभेच्या उद्देशासाठी आवश्यक किंवा सोयीस्कर असलेली कोणतीही इमारत किंवा इमारती उभारणे, बांधणे, दुरुस्त करणे आणि देखभाल करणे.

(३) सभेच्या मालमत्तेचा किंवा हक्कांचा आणि विशेषाधिकारांचा सर्व किंवा कोणताही भाग विकणे, सुधारणा करणे, विकसित करणे, देवाणघेवाण करणे, भाडेपट्टा देणे, गहाण ठेवणे, विल्हेवाट लावणे, खाते देणे, व्यवस्थापित करणे किंवा अन्यथा व्यवहार करणे.

(४) सभेच्या ध्येय आणि उद्दिष्टांशी विसंगत नसलेल्या अटी किंवा शर्तींवर सभेच्या सामान्य किंवा विशिष्ट उद्देशांसाठी देणग्या किंवा मालमत्ता स्वीकारणे.

(५) सभेच्या उद्दिष्टांसारखेच ध्येये आणि उद्दिष्टे असलेल्या कोणत्याही सोसायटी किंवा असोसिएशनमध्ये एकत्रीकरण करणे किंवा त्यात समाविष्ट करणे.

**VI. प्रशासन आणि नियामक मंडळ:**

(i) विश्वस्त मंडळ (ii) व्यवस्थापन परिषद (iii) सभेच्या नियमांनुसार नियुक्त केलेले नियंत्रण मंडळ.

**VII.** विश्वस्त मंडळ, परिषद किंवा व्यवस्थापन आणि नियंत्रण मंडळाच्या कोणत्याही बैठकीत गणपूर्ती

गणपूर्तीमध्ये त्या संस्थांचे अनुक्रमे १०, ७ आणि १५ सदस्य असतील. कोणत्याही स्थगित बैठकीसाठी गणपूर्ती आवश्यक राहणार नाही.

**VIII. सदस्यांना वेतन किंवा आर्थिक लाभ:**

विश्वस्त मंडळ, व्यवस्थापन परिषद आणि नियंत्रण मंडळाचा कोणताही सदस्य विश्वस्त मंडळ, व्यवस्थापन परिषद किंवा नियंत्रण मंडळाचा सदस्य असल्याने सभेच्या मालमत्ता आणि निधीतून कोणत्याही आर्थिक लाभासाठी पात्र राहणार नाही.

**सभेचे नियम**

१. १८ वर्षांपेक्षा जास्त वयाची कोणतीही व्यक्ती पुरुष असो वा महिला, सभेच्या सदस्यत्वासाठी पात्र असेल.

२. सभेचा सदस्य बनू इच्छिणारी कोणतीही व्यक्ती त्या उद्देशाने प्रदान केलेल्या अर्जाच्या नमुन्यामध्ये अर्ज करू शकते.

३. व्यवस्थापन परिषदेला सदस्यत्वासाठी कोणताही अर्ज स्वीकारण्याचा किंवा नाकारण्याचा अधिकार असेल.

४. सर्वसाधारण सभेचे अधिकार:

सभेच्या सर्वसाधारण सभेला, सभेच्या हिताला धोका निर्माण करणाऱ्या गंभीर गैरवर्तनासाठी सभेच्या कोणत्याही सदस्याला सभेत उपस्थित असलेल्या सदस्यांच्या ३/४ मतांनी बडतर्फ करण्याचा अधिकार असेल.

५. सदस्यांचे वर्गीकरण आणि निकष:

(i) आश्रयदाते (Patrons ) : जे ३,००० रुपये किंवा त्याहून अधिक एकाच रकमेमध्ये किंवा व्यवस्थापन परिषदेने मंजूर केलेल्या योग्य हप्त्यांमध्ये देतील.

(ii) समर्थक(Supporters ): जे २,००० रुपये किंवा त्याहून अधिक एकाच रकमेमध्ये किंवा व्यवस्थापन परिषदेने मंजूर केलेल्या योग्य हप्त्यांमध्ये देतील.

(iii) सहानुभूती असणारे (Sympathisers ): जे एकाच रकमेमध्ये किंवा व्यवस्थापन परिषदेने मंजूर केलेल्या योग्य हप्त्यांमध्ये १००० किंवा त्याहून अधिक रक्कम देतील.

(iv) आजीवन सदस्य (Life Members ): जे एकाच रकमेमध्ये किंवा व्यवस्थापन परिषदेने मंजूर केलेल्या योग्य हप्त्यांमध्ये ५०० किंवा त्याहून अधिक रक्कम देतील.

(v) सहयोगी सदस्य (Associate Members ): जे एकाच रकमेमध्ये किंवा व्यवस्थापन परिषदेने मंजूर केलेल्या योग्य हप्त्यांमध्ये २०० किंवा त्याहून अधिक रक्कम देतील.

(vi) सामान्य सदस्य (Ordinary Members ):

हे खालील वर्गातील असतील:

अ: जे दरवर्षी २५ रुपये देतात

ब: "" " १० रुपये " "

क: " " " ५ रुपये " "

ड: " " " ३ रुपये "

ई : " " " रे. १ " "

६. विश्वस्त मंडळ:

सभेचे आजीवन १६ विश्वस्त असतील ज्यांच्याकडे सभेची सर्व स्थावर आणि जंगम मालमत्ता तसेच सभेचे सर्व निधी कोणत्याही स्वरूपात असतील. या १६ पैकी किमान ४ जण मुंबईचे रहिवासी असतील.

७. विश्वस्त मंडळाची निवडणूक:

सभेच्या सदस्यांच्या सर्वसाधारण सभेद्वारे विश्वस्त मंडळाची निवड केली जाईल. मृत्यू, राजीनामा, अक्षमता किंवा परदेशात वास्तव्यामुळे विश्वस्त मंडळात रिक्त झालेली कोणतीही जागा, त्या उद्देशाने भरलेल्या सभेच्या सर्वसाधारण सभेमध्ये ३/४ मतांनी, ती जागा रिक्त झाल्यापासून ६ महिन्यांच्या आत भरली जाईल.

८. विश्वस्त मंडळात नेहमीच महार, चांभार, मांग आणि धेड समुदायांचे एक सदस्य किंवा सदस्य असतील आणि ते अशा प्रकारे निवडले जातील की त्यात कोकणातून ४, गुजरातमधून २, कर्नाटकमधून २ आणि मुंबई प्रेसिडेन्सीच्या इतर जिल्ह्यांमधून ८ विश्वस्त असतील.

९. सर्व स्थावर आणि जंगम मालमत्ता आणि सर्व निधी विश्वस्तांच्या नावावर असतील.

१०. व्यवस्थापन परिषद येत्या वर्षात त्यावर करावयाच्या खर्चासह सोयीस्कर मोठ्या आणि लघु शीर्षकांतर्गत विनियोगित केलेल्या खर्चाचे वार्षिक बजेट सादर करेल आणि विश्वस्तांनी मंजूर केल्याप्रमाणे ते अंमलात येईल. परंतु व्यवस्थापन परिषद वर्षाच्या दरम्यान कधीही पूरक बजेट सादर करू शकते.

११. वार्षिक अंदाजपत्रक मंजूर करण्यासाठी सभेच्या मागील अधिकृत वर्षाच्या समाप्तीपासून तीन महिन्यांच्या आत विश्वस्तांची वर्षातून किमान एकदा बैठक होईल आणि व्यवस्थापन परिषदेच्या मागणीनुसार पूरक अंदाजपत्रक मंजूर करण्यासाठी आवश्यक तितक्या वेळा बैठक होईल. विश्वस्त मंडळाच्या सर्व बैठकींमध्ये बहुमताचे मत मान्य असेल.

१२. विश्वस्त मंडळाच्या सर्व अर्थसंकल्पीय बैठकीत परिषदेचे अध्यक्ष, सरचिटणीस आणि कोषाध्यक्ष अतिरिक्त सदस्य म्हणून बसतील. परंतु त्यांच्यापैकी कोणालाही ते स्वतः विश्वस्त असल्याशिवाय मतदान करण्याचा अधिकार राहणार नाही.

१३. विश्वस्त मंडळाच्या प्रत्येक बैठकीसाठी आणि सभेच्या सदस्यांच्या सर्वसाधारण सभेच्या प्रत्येक बैठकीसाठी एक महिन्याची पूर्वसूचना असेल जेणेकरून विश्वस्त निवडले जातील.

१४. विश्वस्तांना ठरावाद्वारे काही मालमत्ता आणि निधी त्यांच्या एक किंवा अधिक सदस्यांच्या नावे निहित केले जातील किंवा त्यांच्याशी व्यवहार केला जाईल असा अधिकार असेल.

१५. विश्वस्तांना महासचिवांनी जारी केलेल्या परिपत्रकाद्वारे कोणत्याही प्रस्तावावर किंवा प्रश्नावर मतदान करण्याचा अधिकार असेल. परिपत्रकाद्वारे मंजूर केलेले सर्व ठराव विश्वस्त मंडळाच्या कार्यवृत्त पुस्तिकेत समाविष्ट केले जातील.

१६. विश्वस्त वेळोवेळी त्यांच्या बैठकीसाठी स्वतःमधून एक अध्यक्ष निवडू शकतात जो बैठक विसर्जित होण्यापूर्वी बैठकीच्या इतिवृत्तांवर स्वाक्षरी करेल.

१७. सभेचे सचिव विश्वस्त मंडळाचे पदसिद्ध सचिव असतील आणि विश्वस्त मंडळाच्या प्रत्येक बैठकीचे इतिवृत्त तयार करतील.

**व्यवस्थापन परिषद**

१८. व्यवस्थापन परिषद ही अधिकृत वर्षासाठी सभेची कार्यकारिणी असेल आणि त्यात खालीलप्रमाणे गठित केलेल्या सभेचे २० सदस्य असतील:

(i) दरवर्षी मुंबईतील रहिवासी असलेल्या विश्वस्त मंडळाद्वारे निवडलेले चार.

(ii) सभेच्या सर्वसाधारण सभेद्वारे दरवर्षी निवडलेले बारा.

(iii) सभेच्या (i) आणि (ii) दलित वर्गातील सदस्यांमधून बनलेल्या १६ सदस्यांद्वारे दरवर्षी निवडलेले चार.

१९. व्यवस्थापन परिषदेत कोणत्याही सदस्याच्या मृत्यू, राजीनामा, अक्षमता किंवा परदेशात वास्तव्यामुळे उद्भवणारी कोणतीही रिक्त जागा परिषदेच्या उर्वरित सदस्यांद्वारे त्या उद्देशाने बोलावल्या जाणाऱ्या बैठकीत योग्यरित्या मंजूर केलेल्या ठरावाद्वारे भरली जाईल.

२०. परिषदेला पुढील अधिकार असतील:

(अ) निधी ग्रहित करणे आणि व्यवस्थापित करणे आणि

(ब) सभेच्या संस्था आणि उपक्रमांच्या फायद्यासाठी सभेच्या विश्वस्तांच्या नावाने मालमत्ता आणि साहित्य भाड्याने घेणे, खरेदी करणे किंवा अन्यथा संपादन करणे आणि विल्हेवाट लावणे.

(क) सभेच्या ध्येये आणि उद्दिष्टांमध्ये येणारी कोणतीही संस्था आयोजित करणे किंवा उघडणे.

(ड) कोणतीही संस्था किंवा उपक्रम कायमचे किंवा तात्पुरते रद्द करणे: परंतु सभेच्या विश्वस्तांच्या ४/५ मतांशिवाय कोणतेही वसतिगृह कायमचे किंवा तात्पुरते रद्द केले जाणार नाही.

(इ) जेथे आणि जेव्हा असे करणे उचित वाटेल तेव्हा सभेच्या शाखा उघडणे किंवा बंद करणे.

(फ) वेळोवेळी कर्मचारी किंवा इतर कामगारांची नियुक्ती करणे आणि त्यांचे वेतन आणि नोकरीच्या अटी निश्चित करणे आणि आवश्यकतेनुसार त्यांना निलंबित करणे आणि बडतर्फ करणे.

(ग) सभेच्या विविध उपक्रमांचे नियमन करणारे उपविधी तयार करणे, बदलणे आणि सुधारणा करणे आणि त्यांचे आचरण आणि व्यवस्थापन आणि तयार केलेले उपविधी नियंत्रण मंडळाद्वारे सुधारित किंवा रद्द होईपर्यंत नियम अंमलात असतील.

(ह) परिषदेचा सदस्य सलग चार बैठकांना उपस्थित राहण्यास अयशस्वी झाल्यास रिक्त जागा घोषित करणे.

(ई) सर्व योगदानकर्त्यांची नियमित यादी ठेवणे.

(ज) सभेच्या सदस्यांच्या सर्वसाधारण सभेची बैठक आणि विश्वस्त मंडळ आणि नियंत्रण मंडळाच्या बैठका आयोजित करण्याची व्यवस्था करणे.

२६. परिषद तिच्या पहिल्या बैठकीत तिच्या स्वतःच्या सदस्यांमधून एक अध्यक्ष, एक सरचिटणीस आणि एक कोषाध्यक्ष निवडेल. याशिवाय परिषद तिच्या सदस्यांपैकी एक किंवा अधिक सदस्यांना विशिष्ट कार्ये किंवा उपक्रमांचे प्रभारी म्हणून सहाय्यक सचिव किंवा संघटन सचिव म्हणून काम करण्यासाठी निवडू शकते. वर्षभरात या पदाधिकाऱ्यांच्या पदावरील कोणत्याही रिक्त जागा पुढील सामान्य मासिक बैठकीत बोलावण्यात येणाऱ्या बैठकीत योग्यरित्या मंजूर केलेल्या ठरावाद्वारे भरता येतील.

२२. सभेच्या मालकीच्या पैशांची योग्यरित्या जमा आणि रकमा काढण्याची जबाबदारी अध्यक्ष, सरचिटणीस आणि कोषाध्यक्ष यांच्यावर असेल. ते सभेच्या विश्वस्तांच्या नावाने परिषदेने नियुक्त केलेल्या बँकेत किंवा बँकांमध्ये पैसे जमा करतील.

२३. सर्व रकमा काढणे अंदाजपत्रकानुसार काटेकोरपणे केले जाईल आणि अध्यक्ष, सरचिटणीस आणि कोषाध्यक्ष यांच्या संयुक्त स्वाक्षरीने कारभार चालेल.

२४. परिषदेच्या बैठका सामान्य किंवा विशेष असतील.

२५. सभेच्या सर्व मिळकती आणि काढलेल्या रकमांचा हिशेब परिषदेच्या पुढील सामान्य मासिक बैठकीसमोर ठेवण्यात येतील.

२६. परिषदेची सामान्य बैठक दर महिन्याच्या १५ तारखेला किंवा त्या आसपास होईल.

२७. कोरमअभावी स्थगित केलेली कोणतीही सामान्य बैठक अध्यक्षांनी निश्चित केलेल्या दिवशी किंवा त्यांच्या अनुपस्थितीत, सरचिटणीस निश्चित करू शकतील अशा दिवशी पाच दिवसांच्या स्पष्ट सूचनेवर पुन्हा भरेल.

२८. परिषदेच्या सामान्य बैठकीसाठी सात दिवसांची स्पष्ट सूचनेची आवश्यकता आहे आणि त्यासोबत अजेंडा प्रसारित केला पाहिजे.

२९. परिषदेच्या सामान्य बैठकीत पुढीलप्रमाणे कामकाज होईल:

(अ) गेल्या बैठकीचे इतिवृत्त वाचन.

(ब) संस्था, सभेच्या शाखा आणि उपक्रमांचे मासिक लेखा विवरणपत्रे आणि अहवाल मंजूर करणे.

(क) सचिवांनी सादर केलेली पत्रे, प्रस्ताव आणि इतर पत्रव्यवहारांची विल्हेवाट लावणे.

(ड) सभेच्या कामकाज आणि मालमत्तेच्या सामान्य प्रशासनाशी संबंधित प्रश्नांवर निर्णय घेणे.

(इ) बिले आणि झालेला खर्च मंजूर करणे.

(फ) अध्यक्षांच्या परवानगीने आयत्या वेळी येणारे विषय.

**परिषदेची विशेष बैठक**

३०. अध्यक्ष किंवा सचिव ३ दिवसांच्या पूर्वसूचनेनुसार परिषदेची विशेष बैठक बोलावू शकतात.

३६. परिषदेचे कोणतेही चार सदस्य, महासचिवांना लेखी विनंती करून परिषदेची विशेष बैठक बोलावू शकतात जी विनंती मिळाल्यापासून १० दिवसांच्या आत बोलावली जाईल.

३२. विनंतीपत्रात त्याचा उद्देश स्पष्ट केला जाईल आणि तो सभेच्या सूचनेसह प्रसारित केला जाईल.

३३. सामान्य सभेतील कोरमचे नियम परिषदेच्या विशेष बैठकींना देखील लागू होतील.

**अध्यक्ष: अधिकार आणि कार्ये**

**३४. अध्यक्षांची कार्ये व कर्तव्ये पुढीलप्रमाणे :**

(अ) परिषदेच्या सर्व बैठकींचे अध्यक्षपद भूषवतील आणि मतांची समानता झाल्यास त्यांना सदस्य म्हणून स्वतःच्या व्यतिरिक्त निर्णायक मत असेल: परंतु अध्यक्षाच्या अनुपस्थितीत परिषदेचा असा सदस्य जो अध्यक्ष म्हणून निवडला जाऊ शकतो तो

अध्यक्षपद भूषवेल आणि परिषदेच्या बैठकीच्या कामकाजाशी संबंधित अध्यक्षांच्या अधिकारांचा वापर करेल.

(ब) परिषदेच्या बैठकीत सुव्यवस्था आणि कार्यपद्धतीचे सर्व प्रश्न ठरवेल आणि त्यांचा निर्णय अंतिम असेल

(क) सर्व व्हाउचरवर स्वाक्षरी करतील.

(ड) सभेचे सर्व परदेशी पत्रव्यवहार चालू ठेवतील.

(इ) परिषदेच्या सामान्य आणि विशेष बैठकींमध्ये केलेल्या कामकाजाचे इतिवृत्त संस्थेच्या अध्यक्ष आणि उपाध्यक्षांना कळवतील.

**सरचिटणीस: अधिकार आणि कार्ये**

३५. सरचिटणीस यांची कार्ये व कर्तव्ये पुढीलप्रमाणे :

(अ) सभेच्या सर्व दप्तरासाठी जबाबदार असतील आणि त्यांचे प्रमुख असतील.

ब) सभेच्या नियमांनुसार जेव्हा आवश्यक असेल तेव्हा परिषद, विश्वस्त मंडळ आणि नियंत्रण मंडळाच्या सर्व बैठका बोलावतील आणि त्यांच्या बैठकींचे कामकाजाचे इतिवृत्त नोंदवतील

(क) सभेच्या संस्था आणि शाखांच्या प्रमुखांकडून मासिक लेखा विवरणपत्रे आणि इतर अहवाल मागवतील आणि त्यांच्या बैठकींचे इतिवृत्त नोंदवतील.

(ड) सभेचा भारतांतर्गत पत्रव्यवहार चालू ठेवतील.

(इ) सभेच्या सदस्यांचे त्यांच्या योग्य पत्त्यांसह योग्य रजिस्टर ठेवतील.

(फ) सभेच्या सर्वसाधारण सभेला वार्षिक अहवाल सादर करतील.

**कोषाध्यक्ष: अधिकार आणि कार्ये**

३६. कोषाध्यक्ष यांचे कार्य व कर्तव्ये पुढीलप्रमाणे :

(अ) सभेच्या वतीने गोळा केलेली सर्व वर्गणी आणि देणग्या स्वीकारतील आणि त्यासाठी पावत्या देतील.

(ब) नियमित हिशोब पुस्तके ठेवतील.

(क) सर्व आर्थिक देणी येतील.

(ड) मागील वार्षिक सर्वसाधारण सभेत सभेने नियुक्त केलेल्या लेखापरीक्षकाने योग्यरित्या लेखापरीक्षण केलेल्या विविध संस्थांच्या स्वतंत्र खात्यांच्या विवरणांसह सभेच्या उत्पन्न आणि खर्चाचे विवरणपत्र दरवर्षी तयार करून परिषदेला सादर करतील आणि ते सभेच्या वार्षिक अहवालात जोडण्यासाठी सचिवांकडे पाठवतील.

**नियंत्रण मंडळ**

३७. नियंत्रण मंडळ ही सभेची सामूहिक संस्था असेल आणि त्यात पुढील पदधिकाऱ्यांचा समावेश असेल:

(अ) सभेचे विश्वस्त

(ब) सभेचे कार्यकर्ते

(क) आश्रयदाते

(ड) आजीव सभासद

(इ) सहानुभूतीधारक

(फ) सहयोगी सदस्य

(ग) सभेच्या प्रत्येक शाखेचा एक प्रतिनिधी.

(ह) अध्यक्ष, उपाध्यक्ष, अध्यक्ष, सरचिटणीस, सहाय्यक सचिव, संघटन सचिव आणि कोषाध्यक्ष.

३८. नियंत्रण मंडळ, व्यवस्थापन परिषदेद्वारे सभेच्या कामकाजाचे नियमानुसार आहे किंवा नाही यावर देखरेख ठेवेल आणि कोणत्याही गंभीर उल्लंघनाच्या बाबतीत अध्यक्ष किंवा उपाध्यक्षांपैकी कोणीही परिषदेच्या अध्यक्षांना योग्य स्पष्टीकरण देण्यासाठी बोलावू शकते.

३९. सभेचे अध्यक्ष, स्वतःच्या प्रस्तावाने किंवा सभेच्या १० सदस्यांच्या लेखी विनंतीवरून, सचिवांना नियंत्रण मंडळाची बैठक बोलावण्यास सांगू शकतात, जी अध्यक्षांकडून त्यासंदर्भात पत्र मिळाल्यापासून दीड महिन्याच्या आत बोलावली पाहिजे. बैठकीत उपस्थित असलेल्या सदस्यांच्या २/३ बहुमताने मंजूर झाल्यास, व्यवस्थापन परिषद, उपस्थित झालेल्या विषयावर नियंत्रण मंडळाच्या ठरावाला बांधील असेल.

४०. नियंत्रण मंडळाच्या प्रत्येक बैठकीसाठी एक महिन्याची पूर्वसूचना असेल.

४६. सभेचे अध्यक्ष नियंत्रण मंडळाच्या प्रत्येक बैठकीचे अध्यक्ष असतील. त्यांच्या अनुपस्थितीत, बैठकीत उपस्थित असलेल्या कोणत्याही उपाध्यक्षाला बैठकीचे अध्यक्ष नेमू शकतील.

४२. नियमांद्वारे अन्यथा केलेली तरतूद वगळता नियंत्रण मंडळाच्या सर्व बैठकांमध्ये बहुमताचे मत मान्य असेल.

४३. महासचिव हे नियंत्रण मंडळाचे पदसिद्ध सचिव असतील आणि मंडळाच्या कामकाजाचे इतिवृत्त नोंदविण्यास जबाबदार असतील, जे सभा विसर्जित होण्यापूर्वी अध्यक्ष सांगतील आणि त्यावर स्वाक्षरी करतील.

**सभेची सर्वसाधारण सभा (General Body of the Sabha )**

४४. दरवर्षी फेब्रुवारी महिन्यात सभेच्या सदस्यांच्या सर्वसाधारण सभेची बैठक आयोजित केली जाईल.

४५. सभेचे अधिकृत वर्ष ३१ डिसेंबर रोजी संपेल आणि वार्षिक सर्वसाधारण सभा मागील अधिकृत वर्ष संपल्यानंतर दर दोन महिन्यांच्या आत आयोजित केली जाईल.

४६. ज्या सदस्यांनी त्यांची वर्गणी भरली आहे त्यांनाच मतदान करण्याचा अधिकार असेल.

४७. सभेच्या सदस्यांच्या सर्वसाधारण सभेच्या बैठकीसाठी एक महिन्याची पूर्वसूचना असेल.

४८. सभेचे अध्यक्ष सभेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे अध्यक्षपद भूषवतील. त्यांच्या अनुपस्थितीत अध्यक्षपदासाठी मतदान झालेला कोणताही उपाध्यक्ष अध्यक्षपद भूषवू शकेल.

४९. वार्षिक सर्वसाधारण सभेत खालील कामकाज पार पाडले जाईल: —

(अ) गेल्या वर्षाचा वार्षिक अहवाल सादर करणे आणि स्वीकारणे.

(ब) येत्या वर्षासाठी व्यवस्थापन परिषदेसाठी १२ सदस्यांची निवड करणे.

(क) येत्या वर्षासाठी लेखापरीक्षकाची नियुक्ती करणे.

(ड) येत्या वर्षासाठी एक अध्यक्ष आणि उपाध्यक्ष निवडणे परंतु वर्षभरात सहा पेक्षा जास्त उपाध्यक्ष नको.

५०. या सभेच्या नियमांमध्ये आणि सभेच्या घटनेच्या कलमांमध्ये, त्या उद्देशाने विशेषतः बोलावलेल्या बैठकीत उपस्थित असलेल्या सभेच्या ४/५ सदस्यांच्या मताने कधीही बदल, सुधारणा, रद्द किंवा नवीन भर घालता येईल, परंतु हे बदल, सुधारणा, रद्द किंवा भर घालणे सभेच्या विश्वस्तांच्या ३/४ सदस्यांनी मंजूर केल्याशिवाय लागू होणार नाही.

## ६.५ पिपल्स एज्युकेशन सोसायटी आणि तिच्या शैक्षणिक संस्था

(Logo of PES with Courtsey from Google Images)



Dr. Babasaheb Ambedkar with his the cooperatives of education sector and the members of People's Education Society.

(Courtesy from Google Images)

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी ८ जुलै १९४५ रोजी स्थापन केलेल्या महत्त्वाच्या शैक्षणिक संस्थांपैकी एक म्हणजे द पीपल्स् एज्युकेशन सोसायटी (पी. ई. एस. ) हे आपण प्रस्तावनेत आधीच पाहिले आहे. ही भारतातील एक प्रतिष्ठित शैक्षणिक संस्था आहे. दूरदर्शी समाजसुधारक आणि भारतीय संविधानाचे प्रमुख शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी बौद्धिक, नैतिक आणि सामाजिक लोकशाहीला चालना देणारे शिक्षण देण्याच्या उद्देशाने पीईएसची स्थापना केली. त्यांचा असा विश्वास होता की शिक्षण हे उपेक्षित समुदायांच्या, विशेषतः अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्गीय आणि बौद्धांच्या उत्थानासाठी सर्वात प्रभावी साधन आहे.

तेव्हापासून हा सोसायटीने  महाराष्ट्र आणि भारताच्या इतर भागांमध्ये शैक्षणिक संस्थांचे जाळे पसरविले आहे. तिच्या छत्राखालील काही उल्लेखनीय उच्च शैक्षणिक संस्थां पुढील प्रमाणे आहेत. :

१. सिद्धार्थ कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, मुंबई, १९४६.

२. सिद्धार्थ नाईट हायस्कूल, मुंबई, १९४६.

३. सिद्धार्थ कॉलेज ऑफ कॉमर्स अँड इकॉनॉमिक्स, मुंबई, १९५३.

४. सिद्धार्थ कॉलेज ऑफ लॉ, मुंबई, १९५६.

५. डॉ. आंबेडकर कॉलेज ऑफ कॉमर्स अँड इकॉनॉमिक्स, वडाळा, मुंबई, १९५६.

६. डॉ. आंबेडकर कॉलेज ऑफ लॉ, वडाळा, मुंबई, १९७६.

७. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट अँड लीगल, १९७८.

८. संशोधन केंद्र, वडाळा, मुंबई, १९९०.

९. डॉ. आंबेडकर कला व वाणिज्य महाविद्यालय, येरवडा, पुणे, १९८५.

१०. डॉ. बाबासाहेब आंबेडकर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, महाड, जि. – रायगड, १९६३.

११. मिलिंद कॉलेज ऑफ आर्ट्स, औरंगाबाद, १९५०.

१२. मिलिंद कॉलेज ऑफ सायन्स, औरंगाबाद, १९५०.

१३. डॉ. बाबासाहेब आंबेडकर कॉलेज ऑफ आर्ट्स अँड कॉमर्स, औरंगाबाद, १९६३.

१४. डॉ. आंबेडकर कॉलेज ऑफ लॉ, औरंगाबाद, १९६८.

१५. पीईएस कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशन, औरंगाबाद, १९८४.

१६. पीईएस कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, औरंगाबाद, १९९५.

१७. पीईएस पॉलिटेक्निक, औरंगाबाद, २०१०.

१८. डॉ. बी. आर. आंबेडकर कॉलेज ऑफ एज्युकेशन, बोधगया, बिहार, २००८.

वरील उच्च शैक्षणिक संस्थांव्यतिरिक्त, सोसायटी नवी मुंबई, नांदेड, पंढरपूर, कोल्हापूर बंगळुरू आणि बिहारमध्ये अनेक शाळा, रात्रशाळा, कनिष्ठ महाविद्यालये देखील चालवते. याशिवाय सोसायटी बंगलोर येथे बौद्ध सेमिनरी आणि शाळा चालवते.

सोसायटीचे मुख्यालय आनंद भवन, ३४८, डॉ. दादाभाई नौरोजी रोड, फोर्ट, मुंबई - ४००००१ येथे आहे.

## ६.६ शिक्षण, आरोग्य आणि भूसंपादन विभाग, नवी दिल्ली यांना अर्ज

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मुंबईत महाविद्यालय स्थापन करण्यासाठी कर्ज मिळावे म्हणून भारत सरकारकडे अर्ज सादर केला. ज्या काळात त्यांनी अर्ज सादर केला त्या काळात ते व्हाइसरॉयच्या कार्यकारी मंडळामध्ये कामगार सदस्य म्हणजेच कामगार मंत्री होते. तो अर्ज खालीलप्रमाणे होता:

माननीय सरदार सर जोगेंद्र सिंह यांसी,

शिक्षण विभागाचे प्रमुख (शिक्षण मंत्री),

आरोग्य आणि भूमी विभाग , नवी दिल्ली.

महोदय,

अनुसूचित जातींमध्ये शिक्षणाच्या प्रसारासाठी मुंबईत महाविद्यालय स्थापन करण्यासाठी ६,००,००० (सहा लाख रुपये) व्याजमुक्त कर्जासाठी मी भारत सरकारकडे हा अर्ज सादर करण्याची विनंती करतो आणि त्यावर अनुकूल विचार व्हावा अशी प्रार्थना करतो.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी १९३० च्या द हारटॉग समितीच्या अहवालाचा उल्लेख केला ज्यामध्ये भारतातील शिक्षणाची स्थिती आणि विविध समुदायांमध्ये त्याचा प्रसार

तपासण्यात आला होता आणि अनुसूचित जातींमध्ये शिक्षणाच्या प्रसाराबाबतची भूमिका सारांशित करण्यात आली होती, ज्यांना त्यावेळी दलित वर्ग म्हटले जात होते. त्यांनी शिक्षण विभागाच्या निदर्शनास आणून दिले की, भारत सरकारच्या १९४३ च्या ठरावाद्वारे अनुसूचित जातींसाठी राखीव असलेल्या रिक्त पदांपैकी ८ १/२ टक्के पदे भारत सरकारच्या विभागांना भरता आलेली नाहीत. पात्र उमेदवारांच्या कमतरतेमुळे हे दिसून येते की, १९२९ मध्ये असलेल्या आकडेवारीनुसार अनुसूचित जातींमध्ये शिक्षणाची स्थिती आतापर्यंतच्या काळात फारशी बदललेली नाही.

त्यांनी लिहिले की, अनुसूचित जातींचा दर्जा उंचावण्याच्या दृष्टिकोनातून आणि त्यांना भारतीय समाजातील उच्च शिक्षणापासून, विशेषतः महाविद्यालयीन शिक्षण त्यांच्यासाठी प्राथमिक शिक्षणापेक्षा जास्त महत्त्वाचे आहे. अनुसूचित जातींचे कल्याण पूर्णपणे सहानुभूतीपूर्ण सार्वजनिक सेवेवर अवलंबून असते आणि जर सार्वजनिक सेवा सहानुभूतीपूर्ण असायला हवी असेल तर ती देशाच्या राष्ट्रीय जीवनातील आणि विशेषतः अनुसूचित जातींच्या विविध घटकांचे प्रतिनिधित्व करणारी असली पाहिजे. अनुसूचित जातींना कार्यकारी पदांची आवश्यकता दाखवताना त्यांनी लिहिले की, कार्यकारी पद मिळविण्यासाठी उच्च दर्जाचे शिक्षण आवश्यक आहे. त्यांनी अनुसूचित जातींच्या महाविद्यालयीन शिक्षणापर्यंत पोहोचण्याचे प्रमाण देखील निदर्शनास आणून दिले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी अर्जामध्ये मुलांच्या गळतीची कारणे सांगितली आहेत, ती म्हणजे i) गरिबी, ii) महाविद्यालयात प्रवेश मिळविण्यात अडचण, iii) शैक्षणिक सवलतींचा अभाव आणि iv) वसतिगृहांची कमतरता. त्यांनी लिहिले की महाविद्यालयीन शिक्षण खाजगी संस्थांच्या हातामध्ये आहे आणि त्यापैकी बहुतेक त्यांच्या संस्थेत आणि त्यांच्या कर्मचाऱ्यांच्या बाबतीत जातीयवादी दृष्टीने वागत असतात. म्हणून, ते अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना प्रवेश नाकारतात.

पुढे ते म्हणतात,

"मी मुंबईत एक महाविद्यालय सुरू करून या कार्याचा आरंभ करण्याचा प्रस्ताव ठेवत आहे व त्याचे वरील उद्दिष्ट असेल आणि ते पूर्ण करण्यासाठी मी प्रयत्नशील राहीन. माझ्या अंदाजानुसार असे महाविद्यालय स्थापन करण्यासाठी सुमारे सहा लाख रुपये खर्च अपेक्षित आहे. दुसरे महायुद्धपूर्व काळात ते कमी रकमेत करता आले असते. परंतु आता महायुद्ध सुरु असल्यामुळे आणि महागाईत वाढ झाल्यामुळे मला वाटत नाही की महाविद्यालयाला यापेक्षा कमी रकमेवर सुरु करता येईल. या रकमेच्या उभारणीबाबत भारतातील सर्वात गरीब समुदाय असलेल्या अनुसूचित जातींना ही रक्कम उभारता येईल अशी अपेक्षा करणे अशक्य आहे. म्हणून मी भारत सरकारला योग्य हप्त्यांमध्ये परतफेड करण्यासाठी व्याजमुक्त रकमेचे कर्ज देण्याची विनंती करत आहे. प्रस्तावित महाविद्यालयाच्या मालमत्ता, कर्जासाठी तारण म्हणून सरकारकडे गहाण ठेवल्या जातील."

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी काही तपशील खालीलप्रमाणे नमूद केले आहेत:

"प्रस्तावित महाविद्यालयाचे कार्य कसे चालेल हे दर्शविण्यासाठी मी खाली काही महत्त्वाचे तपशील नमूद करतो: —

I. धर्मादाय संस्था कायद्याअंतर्गत नोंदणीकृत रीतसर गठित संस्थेद्वारे त्याचे व्यवस्थापन केले जाईल,

II. त्याच्या कला आणि विज्ञान असे दोन विभाग असतील.

III. ते विशिष्ट जातीसाठी नसेल म्हणजेच पुढीलप्रमाणे सर्वांना प्रवेश मिळेल :

(अ) ते सर्व जाती आणि पंथांच्या विद्यार्थ्यांसाठी खुले असेल, फक्त ते अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीचा विशेष विचार करेल.

(ब) शिक्षक कर्मचारी संमिश्र वर्गातील असतील. वंश, धर्म किंवा समुदायाच्या आधारावर कोणताही प्रतिबंध नसेल.

(क) भारतातील विद्यापीठांच्या नियमांनुसार ते कोणत्याही प्रकारचा भेदभाव न करता सर्व प्रांतातील अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांसाठी खुले असेल.

त्यांनी मुंबई येथील महाविद्यालयासाठी जागा निवडण्याबद्दल पुढे लिहिले-

“मी तीन कारणांमुळे महाविद्यालयासाठी मुंबईची हे ठिकाण म्हणून निवड केली आहे. एक म्हणजे, मी माझ्या सध्याच्या पदाच्या जबाबदाऱ्यांपासून मुक्त होताच महाविद्यालयाच्या व्यवस्थापकाची जबाबदारी स्वतःवर घेण्याचा आणि अध्यापनात भाग घेण्याचा प्रस्ताव ठेवतो. सुरुवातीच्या टप्प्यात मला वाटते की, मला या जबाबदाऱ्या स्वतःच्या खांद्यावर घ्याव्या लागतील. जर महाविद्यालय मुंबईत असेल तर मी हे अधिक चांगल्या प्रकारे करू शकेन. दुसरे म्हणजे, सध्या मुंबईत जमलेले आणि सध्याच्या कोणत्याही महाविद्यालयात प्रवेश मिळत नाही अशा मोठ्या संख्येने विद्यार्थ्यांना महाविद्यालयीन शिक्षण देण्यासाठी अधिक महाविद्यालयांची नितांत आवश्यकता आहे. प्रेस रिपोर्ट्सनुसार, दहा नवीन महाविद्यालये उघडण्यासाठी अर्ज मुंबई विद्यापीठाच्या सिनेटसमोर प्रलंबित आहेत, ज्यावरून असे दिसून येते की, प्रवेशासाठी येणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या किती मोठी आहे. यापैकी मोठ्या संख्येने विद्यार्थी महाविद्यालयात येण्याची शक्यता असल्याने मला विश्वास आहे की, महाविद्यालयाचा मार्ग मोकळा होईल आणि महाविद्यालय तोट्यात जाण्याची अजिबात शक्यता नाही. तिसरे म्हणजे, मी स्वतः, सिडनहॅम कॉलेज ऑफ कॉमर्स, मुंबई येथे अर्थशास्त्राचे प्राध्यापक, शासकीय विधी महाविद्यालय, मुंबईचे प्राचार्य, मुंबई विद्यापीठाचे सिनेट आणि सिंडिकेटचे सदस्य असल्याने मला वाटते की, प्रस्तावित महाविद्यालयासाठी मला त्या प्रांताबाहेरील विद्यापीठापेक्षा मुंबई विद्यापीठाकडून अधिक सहजपणे मान्यता मिळू शकेल."

डॉ. बाबासाहेब आंबेडकर, मुंबईमध्ये महाविद्यालयासाठी निवडलेल्या जागेबद्दल असेही लिहितात- “मी महाविद्यालयासाठी अंदाजे सहा एकर क्षेत्रफळ असलेली जागा निवडली आहे. ती मुंबई नगरपालिकेची आहे. मुंबईत उरलेली ही एकमेव जागा आहे जी महाविद्यालयासाठी योग्य मानली जाऊ शकते. जर मी ती जागा गमावली तर मला माझा प्रकल्प सोडून द्यावा लागेल जी माझ्यासाठी एक मोठी आपत्ती असेल. मला आपल्या विभागाकडून निधी उपलबध करण्याचे आश्वासन मिळाले तरच मी जागेसाठी पुढील वाटाघाटी करू शकतो, जे मी आधीच सांगितले आहे की, मी फक्त भारत सरकारकडून

कर्जाच्या माध्यमातून तो निधी मी उभा करू शकतो.. मी कर्जाची रक्कम ताबडतोब खर्च करण्याचा विचार करणार नाही. ती रक्कम भारत सरकारकडेच राहील. जेव्हा जेव्हा गरज पडेल तेव्हा तेव्हाच ती काढली जाईल. मी सदरची उपलब्ध जागा मिळविण्यासाठी उत्सुक असल्याने, माझा अर्ज विलंब न करता मंजूर झाल्यास मी आपला आभारी राहीन."

१ फेब्रुवारी १९४५, आपला,

२२, पृथ्वीराज रोड, विश्वासू,

नवी दिल्ली. सही/- बी. आर. आंबेडकर.

## ६.७ पीपल्स् एज्युकेशन सोसायटी आणि तिची घटना

त्या वेळच्या धर्मादाय आयुक्तांच्या अर्ज करण्याच्या स्वरूपानुसार संस्थेची स्थापना म्हणजेच मेमोरँडम ऑफ असोसिएशनचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी पालन केले आणि त्यानुसार सोसायटीच्या नोंदणीसाठी अर्ज केला.

मुंबईचे मेमोरँडम ऑफ असोसिएशन

पीपल्स् एज्युकेशन सोसायटी,

(स्थापना ८ जुलै १९४५)

संस्थापक: डॉ. बी. आर. आंबेडकर एम.ए. पीएच.डी., डी. एससी, एलएल.डी., (कोलंबिया). डी. लिट., (ओस्मानिया) बॅरिस्टर-ॲट-लॉ.

मुख्य कार्यालय: आनंद भवन, डॉ. दादाभाई नौरोजी रोड, फोर्ट, मुंबई-४०० ०२३.

१८६० च्या सोसायटीच्या नोंदणी कायद्याच्या XXI अंतर्गत नोंदणीकृत. नोंदणी क्रमांक १३७५ १९४५-४६ तारीख ९ जुलै १९४५ आणि बॉम्बे पब्लिक ट्रस्ट कायदा, १९५० (बॉम्बे XXIX १९५०) नोंदणी क्रमांक एफ ३०३ (बॉम्ब.) दिनांक: २ जून १९५३.

**पीपल्स् एज्युकेशन सोसायटी**

**विश्वस्त मंडळ**

१. श्री. के. बी. तळवटकर (ट्रस्टी)

२. माननीय श्री. के. एच. रंगनाथ (ट्रस्टी)

३. श्री. एस. एस. रेगे (ट्रस्टी)

**नियामक मंडळाचे सदस्य**

१. डॉ. एस. पी. गायकवाड, जी.सी.ए.एम. (अध्यक्ष)

२. श्री. एस. एस. रेगे, बी. ए., डिप. Lib. Sc. (उपाध्यक्ष)

३. श्री. के. बी. तळवटकर, एम. ए., एलएल. एम., एस. ई. एम.

४. डॉ. पी. टी. बोराळे, बी. ए., एलएल. बी., पीएच. डी. (कायदा)

५. श्री. एम. एस. मोरे, बी. ए., एलएल. एम.

६. प्रा. एस. के. मोहगावकर, एम. कॉम.

७. माननीय श्री. के. एच. रंगनाथ, बी. एससी., बी. एल.

८. पद्मश्री डॉ. एम. एल. शहारे, एम. एससी., पीएच. डी.

९. प्रा. एस. एल. खोत, एम. ए., एलएल. एम.,

१०. प्रा. अरुण एम. दोंदे , एम. ए., एलएल. बी., माजी एमएलसी.

**सचिवालय**

प्राचार्य डी. जे. गांगुर्डे, एम. कॉम., एलएल. एम., सचिव

मेमोरँडम ऑफ असोसिएशन ऑफ पीपल्स् एज्युकेशन सोसायटी, मुंबई

सोसायटीचे नामनिर्देशन आणि उद्दिष्टे

१) संस्थेला 'पीपल्स् एज्युकेशन सोसायटी' असे म्हटले जाईल आणि त्याचे व्यवस्थापन आणि प्रशासन बौद्ध समाजाद्वारे केले जाईल.

२) संस्थेचे कार्यालय मुंबई येथे किंवा वेळोवेळी ठरवल्या जाणाऱ्या इतर ठिकाणी असेल.

३) संस्थेचे ध्येये आणि उद्दिष्टे अशी असतील:

(अ) माध्यमिक, महाविद्यालयीन, तांत्रिक, भौतिक आणि तत्सम शिक्षणाच्या सुविधा प्रदान करणे;

(ब) महाराष्ट्र राज्यात तसेच भारतातील इतर कोणत्याही भागात योग्य ठिकाणी शाळा, महाविद्यालये, विहार, वसतिगृहे, ग्रंथालये, क्रीडांगणे, बौद्ध संस्था इत्यादी शैक्षणिक आणि बौद्ध धार्मिक संघटना सुरू करणे, स्थापन करणे, चालवणे आणि/किंवा त्यांना मदत करणे;

(क) गरीब आणि बौद्ध समाजाच्या शिक्षणासाठी सुविधा उपलब्ध करून देणे;

(ड) अनुसूचित जातींमधून धर्मांतरित झालेल्या अनुसूचित जाती आणि बौद्ध समाजमध्ये शिक्षणात सामान्य आवड निर्माण करणे आणि वृद्धिंन्गत करणे आणि विशेषतः त्यांना उच्च शिक्षणासाठी विशेष सुविधा, शिष्यवृत्ती आणि मोफत सवलती देणे;

(इ) विज्ञान, बौद्ध आणि इतर साहित्य आणि ललित कलांना प्रोत्साहन देणे आणि धर्माच्या तुलनात्मक अभ्यासात उपयुक्त ज्ञान देणे;

(फ) सोसायटीसाठी मालमत्ता खरेदी करणे, भाडेपट्ट्यावर घेणे किंवा संपादन करणे आणि वेळोवेळी ठरवल्याप्रमाणे सोसायटीच्या पैशांची गुंतवणूक करणे आणि व्यवहार करणे;

(ग) सोसायटीच्या उद्देशाप्रमाणे घरे, विहार, इमारती किंवा बांधकाम करणे, देखभाल करणे, पुनर्बांधणी करणे, दुरुस्ती करणे, बदलणे, स्थापित करणे किंवा पुनर्संचयित करणे;

(ह) सोसायटीची सर्व किंवा कोणतीही मालमत्ता विकणे, विल्हेवाट लावणे, सुधारणा करणे, विकसित करणे, देवाणघेवाण करणे, भाडेपट्टा देणे, गहाण ठेवणे किंवा अन्यथा वेगळे करणे किंवा व्यवहार करणे;

(ई) सोसायटीची ध्येये आणि उद्दिष्टानुसार विशेषतः बौद्धांच्या पुढील प्रगतीसाठी सोसायटी किंवा सोसायटीद्वारे चालवल्या जाणाऱ्या किंवा त्यांच्या मालकीच्या असलेल्या कोणत्याही संस्थेला किंवा संस्थांना सहकार्य करणे किंवा संलग्न करणे;

(ज) सोसायटीच्या कोणत्याही प्रस्तावित, उद्दिष्टे आणि उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी हमीसह किंवा त्याशिवाय पैसे उभारणे;

(क) भारतातील कोणत्याही राज्यात सोसायटीची नोंदणी किंवा मान्यता मिळवणे;

(ल) वरील ध्येये आणि उद्दिष्टांपैकी कोणतेही साध्य करण्यासाठी आनुषंगिक किंवा अनुकूल असलेल्या इतर सर्व कायदेशीर गोष्टी आणि कृती करणे.

II - वर्गणीदार आणि आश्रयदाते

४. सोसायटीला दरवर्षी दहा रुपये वर्गणी देणारी कोणतीही व्यक्ती सोसायटीचा वर्गणीदार म्हणून नोंदणी करण्यास पात्र असेल आणि वारणीदारांसाठी असलेल्या विशेषाधिकारांसाठी पात्र असेल.

५. सोसायटीला ५०० रुपये किंवा त्याहून अधिक रक्कम एकरकमी देणगी देणारी कोणतीही व्यक्ती सोसायटीचा आश्रयदाते म्हणून पात्र असेल आणि आश्रयदात्यासाठी असलेल्या विशेषाधिकारांसाठी पात्र असेल.

III - नियंत्रण आणि व्यवस्थापन

६. सोसायटीकडे : -

(i) एक नियामक मंडळ;

(ii) विश्वस्त मंडळ;

(iii) एक सामान्य (मूळतः व्यवस्थापकीय) परिषद; आणि

(iv) प्रत्येक महाविद्यालय, विहार, शाळा किंवा इतर संस्था किंवा त्यांच्या गटासाठी कार्यकारी समिती नियामक मंडळ तिच्या कारभाराच्या व्यवस्थापनासाठी ठरवू शकते.

७. नियामक मंडळात अकरा जणांचा समावेश असेल

(अ) नियामक मंडळाला अशा नियुक्त्या करणाऱ्या विशेष ठरावात निर्दिष्ट केलेल्या पदांसाठी कोणत्याही व्यक्तीला किंवा व्यक्तींना नियामक मंडळाचे पदसिद्ध सदस्य म्हणून आमंत्रित करण्याचा अधिकार असेल. अशा व्यक्तीला त्याच्या नियुक्तीच्या कार्यक्षेत्राबाहेरील किंवा उद्देशाबाहेरील कोणत्याही प्रश्नावर मतदान करण्याचा अधिकार राहणार नाही. प्रश्न कार्यक्षेत्रात किंवा उद्देशात बसतो किंवा नाही याबद्दल कोणताही वाद उद्भवल्यास, अध्यक्षांचा निर्णय अंतिम असेल.

८. विश्वस्त मंडळात नियमन मंडळाने त्यांच्या स्वतःच्या सदस्यांमधून नियुक्त केलेल्या तीन व्यक्ती असतील. यापैकी किमान दोन अनुसूचित जातींमध्ये धर्मांतरित झालेल्या बौद्धांचे असतील.

९. संस्थेच्या सर्व मालमत्ता आणि निधी विश्वस्त मंडळाकडे असतील, किंवा तशी तरतूद केलेली नसेल तरच.

९. (अ) विश्वस्त मंडळाला संस्थेच्या मालमत्ता आणि निधीबाबत सोसायटीच्या वतीने खटला भरण्याचे आणि खटलयाला सामोरे जाण्याचे अधिकार असतील.

१०. (१) संस्थेच्या सर्व संस्थांच्या कामाचे पर्यवेक्षण आणि समन्वयन  करण्यासाठी एक सामान्य परिषद असेल. सामान्य परिषदेत नियमन मंडळाने नामनिर्देशित केलेले किमान पंधरा सदस्य असतील. या १५ सदस्यांपैकी ११ सदस्य हे नियमन मंडळाचे असतील ज्यापैकी ८ सदस्य हे नियमन मंडळाच्या अनुसूचित जातीच्या सदस्यांमधून धर्मांतरित झालेले बौद्ध असतील. उर्वरित हे वर्गणीदार  आणि आश्रयदाते असतील.

(२) नियमन मंडळाने तशी तरतूद केलेली नसेल तर  प्रत्येक संस्थेचे प्रमुख हे सर्वसाधारण परिषदेचे पदसिद्ध सदस्य असतील.

(३) सर्वसाधारण परिषदेचे ठराव केवळ शिफारसी असतील.

११. प्रत्येक महाविद्यालय, विहार, शाळेसाठी

नियमन मंडळाने नियुक्त केलेले, ज्यापैकी एक महाविद्यालय किंवा शाळा किंवा संस्थेचे डीन किंवा प्राचार्य, संस्थेचे रजिस्ट्रार, अनुसूचित जातीतून धर्मांतरित झालेले बौद्धांपैकी किमान दोन आणि नियमन मंडळाच्या मते शिक्षणतज्ज्ञ असलेले एक असेल.

१२. नियमन मंडळाचे अध्यक्ष, जे बौद्ध असतील, ते विश्वस्त मंडळ, सामान्य (मूळ व्यवस्थापकीय) परिषद आणि सर्व कार्यकारी समित्यांचे पदसिद्ध सदस्य आणि अध्यक्ष असतील. वरील कलमांमध्ये निर्दिष्ट केलेल्या सदस्यांच्या संख्येव्यतिरिक्त तो या प्रत्येक संस्थांचा सदस्य असेल.

१२. (अ) (१) सोसायटीचे कार्यकारी अधिकार अध्यक्षांकडे असतील.

(२) सोसायटीने किंवा तिच्या वतीने अंमलात आणण्याची आवश्यकता असलेली सर्व डीड्स , कागदपत्रे आणि हमी पत्रके केवळ अध्यक्षच अंमलात आणू शकतात आणि ती सोसायटीवर बंधनकारक असतील.

१३. सोसायटी, तिच्या संस्था, तिची मालमत्ता आणि तिचे निधी यांचे सर्वोच्च नियंत्रण आणि प्रशासन नियामक मंडळाकडे असेल.

१४. नियामक मंडळाचे पहिले सदस्य पुढीलप्रमाणे असतील: -

१. माननीय डॉ. बी. आर. आंबेडकर, एम.ए., पीएच.डी., डी.एससी, बॅरिस्टर-ॲट-लॉ, नवी दिल्ली.

२. राव बहादूर, एन. शिवराज, बी.ए., बी.एल., एम.एल.ए., मद्रास.

३. दौलतराव गुलाजी जाधव, बी.ए., एल.एल.बी., मुंबई.

४. राजा राम भोळे, बी.एससी, एलएल.बी., पूना.

५. जे. एच. सुब्बिया, बी.ए., सिकंदराबाद.

६. हिरजीभाई खुशालभाई पटेल, बी.ए., एलएल.बी., मुंबई.

७. जी. टी. मेश्राम, नवी दिल्ली.

८. राव बहादूर एस, के. बोले, मुंबई.

९. एम. व्ही. दोंदे , बी.ए., प्राचार्य, गोखले एज्युकेशन सोसायटी हायस्कूल, परळ, मुंबई.

१०. एस. सी. जोशी, एम.ए., एलएल.बी., नवी दिल्ली.

११. एम. बी. समर्थ, बॅरिस्टर-ॲट-लॉ, मुंबई.

माननीय डॉ. बी. आर. आंबेडकर हे नियामक मंडळाचे पहिले अध्यक्ष असतील आणि त्यांच्यानंतर ते नेहमीच बौद्ध असतील.

१५. नियामक मंडळाचे आणि विश्वस्त मंडळाचे सदस्यत्व मृत्यू, अक्षमता, राजीनामा किंवा काढून टाकल्यामुळे संपुष्टात येऊ शकते.

१६. डीन किंवा प्राचार्य आणि कुलसचिव वगळता जनरल (मूळ व्यवस्थापकीय) परिषदेच्या सदस्यांचा आणि कार्यकारी समितीच्या सदस्यांचा पदाचा कालावधी मृत्यू, अक्षमता, राजीनामा किंवा काढून टाकल्यामुळे संपुष्टात येत नाही तोपर्यंत तीन वर्षांचा असेल. ज्या व्यक्तीचा पदाचा कालावधी संपला आहे तो पुनर्नामांकनासाठी पात्र असेल. डीन किंवा प्राचार्य आणि कुलसचिव कार्यकारी समितीचे सदस्य म्हणून डीन किंवा प्राचार्य किंवा कुलसचिव म्हणून जोपर्यंत पदावर असतील तोपर्यंत ते कार्यकारी समितीचे सदस्य म्हणून राहतील.

१७. नियामक मंडळाला नियामक मंडळाच्या, विश्वस्त मंडळाच्या, सामान्य (मूळ व्यवस्थापकीय) परिषदेच्या आणि कोणत्याही कार्यकारी समितीच्या कोणत्याही सदस्याला संस्थेतून काढून टाकण्याचा अधिकार असेल, परंतु या उद्देशाने विशेषतः बोलावलेल्या बैठकीत उपस्थित असलेल्या नियामक मंडळाच्या तीन-चतुर्थांश सदस्यांनी त्यांच्या पदावरून काढून टाकण्याच्या बाजूने मतदान करावे.

१८. नियामक मंडळाचे विद्यमान अध्यक्ष त्यांच्या उत्तराधिकाऱ्याची  नियुक्ती किंवा नामनिर्देशन करतील.

१९. जर सध्याच्या अध्यक्षांच्या उत्तराधिकाऱ्याचे वैध नामनिर्देशन नसेल, किंवा अशा प्रकारे नामनिर्देशित व्यक्ती कोणत्याही कारणास्तव पद स्वीकारण्यास नकार देत असेल किंवा अयशस्वी होत असेल किंवा पद धारण करणे थांबवत असेल तर अध्यक्षाची निवड नियामक मंडळाच्या उर्वरित सदस्यांद्वारे केली जाईल.

२०. येथे समाविष्ट असलेल्या तरतुदीनुसार, नियामक मंडळाच्या इतर सदस्यांच्या पदातील सर्व रिक्त जागा, विश्वस्त मंडळ, सामान्य (मूळ व्यवस्थापकीय) परिषद किंवा कार्यकारी समिती ही नियामक मंडळाद्वारे भरली जातील, परंतु अनुसूचित जातीच्या सदस्यातून धर्मांतरित झालेल्या बौद्ध धर्माच्या रिक्त पदाची भरती केवळ अनुसूचित जातींमधून धर्मांतरित झालेल्या बौद्ध धर्माच्या व्यक्तीनेच करावी आणि इतर कोणत्याही धर्मातून नाही.

२६. नियामक मंडळाचे अध्यक्ष नियामक मंडळाचे कार्यकारी अधिकारी असतील आणि सामान्य धोरण आणि आर्थिक बाबींमध्ये नियामक मंडळाच्या सदस्यांशी सल्लामसलत करून कार्य करतील.

२२. (i) अध्यक्ष त्यांच्या अनुपस्थितीत उपाध्यक्ष म्हणून काम करण्यासाठी नियामक मंडळाच्या सदस्याची नियुक्ती करू शकतात आणि त्यांना आवडेल तो अधिकार त्यांना सोपवू शकतात.

(ii) अध्यक्ष सोसायटीचे  सचिव म्हणून काम करण्यासाठी एखाद्या व्यक्तीची नियुक्ती करू शकतात आणि सचिवाची कर्तव्ये, त्यांचे वेतन आणि त्यांच्या पदाचा कालावधी लेखी स्वरूपात लिहून देऊ शकतात.

(iii) नियामक मंडळ त्यांच्यामधून सोसायटीच्या सरचिटणीसांपैकी एका  सदस्याची नियुक्ती देखील करू शकते. त्यांचा पदाचा कालावधी तीन वर्षांचा असेल.

२३. नियामक मंडळ त्यांचे कामकाज चालविण्यासाठी आणि संस्था चालविण्यासाठी आवश्यक कर्मचारी नियुक्त करू शकते, त्यांचे वेतन किंवा वेतन आणि सेवा अटी निश्चित करू शकते आणि सोसायटीच्या कर्मचारी, अधिकारी आणि संस्थांच्या मार्गदर्शन आणि निर्देशांसाठी स्थायी आदेश किंवा नियम तयार करू शकते आणि त्यांची कार्ये, अधिकार आणि कर्तव्ये परिभाषित करणारे नियम तयार करू शकते.

२४. प्रत्येक महाविद्यालय, विहार, शाळा किंवा संस्था किंवा त्यांच्या गटासाठी नियामक मंडळ निर्णय घेईल तेव्हा, नियामक मंडळ एक रजिस्ट्रार नियुक्त करू शकते.

२५. अध्यक्षांच्या देखरेखीखाली आणि नियंत्रणाखाली, निबंधक संस्थेच्या प्रमुखाखाली काम करतील. ते संस्थेच्या स्थायी आदेश आणि नियमांनुसार संस्थेच्या दैनंदिन प्रशासनाशी संबंधित सर्व कर्तव्ये पार पाडतील.

**IV - सोसायटीचे निधी**

२६. सोसायटीच्या निधीमध्ये वेळोवेळी मिळणारे अनुदान, देणग्या, वर्गणी, शुल्क, भेटवस्तू इत्यादींचा समावेश असेल.

२७. सचिव सोसायटीच्या उत्पन्न आणि खर्चाचे योग्य हिशेबपुस्तके आणि इतर कागदपत्रे तयार ठेवतील. सोसायटीच्या खात्यांचे लेखापरीक्षण भारतीय कंपनी कायद्याअंतर्गत मान्यताप्राप्त आणि नियामक मंडळाने नियुक्त केलेल्या लेखापरीक्षकांकडून वेळोवेळी केले जाईल.

२८. नियामक मंडळ जनरल कौन्सिल आणि कार्यकारी समिती किंवा समितीच्या सदस्यांमधून एक सचिव नियुक्त करेल जो अनुक्रमे परिषद आणि कार्यकारी समिती किंवा समितीचे सामान्य काम करेल. सचिवाच्या पदाचा कार्यकाळ तीन वर्षांचा असेल.

२९. सोसायटीच्या सचिवांकडून सोसायटीच्या जमा आणि खर्चाचे वार्षिक विवरणपत्र तयार केले जाईल आणि सोसायटीच्या कार्यालयात त्याचे एकत्रित विवरणपत्र ठेवले जाईल आणि ते नियामक मंडळ, विश्वस्त मंडळ, जनरल (मूळ व्यवस्थापकीय) परिषद आणि कार्यकारी समिती, आश्रयदाते आणि वर्गणीदार यांना  तपासणीसाठी नेहमीच खुले राहील. .

**V - सामान्य**

३०. या ज्ञापनपत्रात जोडलेल्या कलमांनुसार (अनुसूची - अ) नियामक मंडळ आणि इतर संस्था त्यांची कर्तव्ये पार पाडतील आणि त्यांचे हक्क, अधिकार यानुसार त्यांची कार्ये पार पाडतील.

३६. परिस्थितीनुसार आवश्यक असल्यास, नियामक मंडळाला सदर कलमांमध्ये बदल करण्याचा, सुधारणा करण्याचा, भर घालण्याचा  किंवा सुधारित  करण्याचा अधिकार असेल, परंतु नेहमीच असे बदल, सुधारणा, भर घालणे किंवा सुधारित करणे या कराराच्या तरतुदींशी विसंगत नसतील याची काळजी घ्यावी. .

३२. या नियामक मंडळाला या ज्ञापनपत्रात बदल, सुधारणा, भर घालण्याचा किंवा सुधारित करण्याचा अधिकार असेल, परंतु नियामक मंडळ, विश्वस्त मंडळ, सामान्य (मूळ व्यवस्थापन) परिषद आणि अनुसूचित जातींमधून धर्मांतरित झालेल्या बौद्ध सदस्यांच्या अशा प्रत्येक संस्थेवरील प्रतिनिधित्वाचे प्रमाण, पहिल्या अध्यक्षाच्या पदाचा कालावधी, अध्यक्षांच्या इतर संस्थांचे पदसिद्ध सदस्यत्व या संबंधीच्या तरतुदी वगळता, कलम ७, ८, ९, १०, ११, १२, १४, २० आणि २१ मध्ये समाविष्ट असलेल्या तरतुदी वगळता,

नियामक मंडळाला या ज्ञापनपत्रात बदल, सुधारणा, भर घालणे किंवा सुधारित करण्यासाठी मतदान करण्याचा अधिकार असेल.

स्वाक्षरीकृत

बी. आर. आंबेडकर.

एस. के. बोले.

एम. व्ही. दोंदे.

एस. सी. जोशी.

एम. बी. समर्थ.

डी. जी. जाधव.

९जुलै,१९४५.

एच. के. पटेल.

अनुसूची “अ”

पीपल्स् एज्युकेशन सोसायटी या संस्थेच्या व्यवस्थापन आणि प्रशासनासाठीची कलमे

१. या कलमांना पीपल्स् एज्युकेशन सोसायटीची कलमे असे म्हटले जाईल.

२. नियामक मंडळ दर सहा महिन्यांनी त्यांच्या नियंत्रणाखालील सर्व संस्था आणि संस्थांकडून अहवाल प्राप्त करण्यासाठी आणि त्यावर विचार करण्यासाठी बैठक घेईल. इतर संस्था तिमाहीतून एकदा आणि वेळोवेळी, सोसायटी, तिच्या संस्था इत्यादींच्या कामकाजासाठी करण्यासाठी आवश्यक असेल तितक्या वेळा त्यांची बैठक घेतील.

३. नियामक मंडळ दरवर्षी एप्रिल महिन्यात वार्षिक सर्वसाधारण सभा म्हणून एक बैठक आयोजित करेल, ज्यामध्ये सरचिटणीस त्यांचे वार्षिक लेखा विवरण आणि सोसायटीच्या कामाचा आणि उपक्रमांचा अहवाल सादर करतील.

४. नियामक मंडळाचे अध्यक्ष त्यांच्या विवेकबुद्धीनुसार किंवा कोणत्याही तीन सदस्यांच्या विनंतीनुसार, त्या वेळी, त्यांना किंवा त्यांना पुरेसे वाटणाऱ्या कोणत्याही कारणास्तव, नियामक मंडळ, विश्वस्त मंडळ, जनरल कौन्सिल किंवा कार्यकारी समितीची विशेष बैठक बोलावू शकतात.

५. सर्वसाधारण, विशेष किंवा स्थगित केलेल्या प्रत्येक बैठकीच्या लेखी सूचना, बैठकीच्या तारखेच्या साधारणपणे सात दिवस आधी प्रत्येक सदस्याला पोस्टाद्वारे पाठवल्या जातील किंवा पोचविल्या जातील. परंतु स्थगित केलेल्या बैठकीच्या बाबतीत, सूचना मूळ आणि स्थगित केलेल्या बैठकीच्या तारखेच्या दरम्यानच्या कालावधीची असू शकते. बैठकीच्या सूचनेत सामान्यतः बैठकीचे ठिकाण, तारीख, तास आणि करावयाचे कामकाज नमूद केले

जाईल आणि विशेष सभेच्या सूचनेत त्यामध्ये चर्चा करावयाच्या विशिष्ट बाबींचा उल्लेख केला जाईल.

६. सध्या प्रत्येक मंडळासाठी गणपूर्तीसाठी आवश्यक असलेल्या सदस्यांची संख्या चार असेल. गणपूर्तीसाठी आवश्यक असलेल्या सदस्यांची संख्या त्या संस्थेच्या एकूण सदस्यांच्या निम्मी असेल.

सध्या प्रत्येक संस्थेची एकूण संख्या.

६. (अ) नियामक मंडळाचा किंवा संस्थेच्या संस्थेच्या समितीचा प्रत्येक सदस्य नियमितपणे नियामक मंडळाच्या किंवा समितीच्या बैठकीला उपस्थित राहील आणि अशा बैठकीला उपस्थित राहण्यास असमर्थ असल्यास, तो सभेला अनुपस्थित राहण्यासाठी लेखी परवानगी मागेल.

७. कोणत्याही बैठकीसाठी नियुक्त केलेल्या वेळेनंतर अर्ध्या तासाच्या आत जर गणपूर्ती झाली नाही तर उपस्थित सदस्य किंवा एखादा सदस्य बैठक स्थगित करू शकतात. त्यासंबंधीचा ठराव मंजूर झाल्यानंतर अध्यक्ष सभा तहकूब करू शकतात. जर अशा स्थगित बैठकीत गणपूर्ती झाली नाही तर उपस्थित सदस्य यांच्यासह गणपूर्ती मानली जाईल.

८. नियामक मंडळाचा अध्यक्ष त्या संस्थांच्या बैठकीचे अध्यक्षपद भूषवेल. प्रत्येक संस्था एप्रिलमध्ये होणाऱ्या तिच्या पहिल्या बैठकीत वर्षासाठी एक उपाध्यक्ष निवडेल जो अध्यक्षांच्या अनुपस्थितीत अध्यक्षपद भूषवेल. जेव्हा अध्यक्ष आणि उपाध्यक्ष दोघेही अनुपस्थित असतील तेव्हा सदस्य स्वतःमधून बैठकीसाठी एक अध्यक्ष निवडतील.

९. ज्ञापनपत्रात अन्यथा तरतूद नसल्यास, प्रत्येक बाब उपस्थित असलेल्या आणि प्रश्नावर मतदान करणाऱ्या सदस्यांच्या बहुमताने निश्चित केली जाईल. अध्यक्षांना त्याच प्रश्नावर यापूर्वी मतदान केले असेल किंवा नसेल तरीही निर्णायक मत देण्याचा अधिकार असेल, परंतु कोणताही सदस्य एकापेक्षा जास्त मत देऊ शकत नाही.

१०. नियामक मंडळ, जनरल परिषद किंवा कार्यकारी समितीने मंजूर केलेला कोणताही ठराव संबंधित मंडळाच्या इतर कोणत्याही बैठकीत सदस्यांकडून वेळोवेळी रद्द केला जाऊ शकतो किंवा बदलला जाऊ शकतो.

११. नियामक मंडळ कोणत्याही बैठकीत चौकशी करण्यासाठी किंवा कोणताही व्यवसाय करण्यासाठी एखाद्या व्यक्तीची किंवा समितीची नियुक्ती करू शकते; परंतु त्या व्यक्तीची किंवा समितीची प्रत्येक कृती आणि कार्यवाही नियामक मंडळाच्या बैठकीत मंजुरीसाठी सादर केली जाईल आणि नियामक मंडळाने मंजूर केल्याशिवाय सोसायटीवर बंधनकारक राहणार नाही.

१२. प्रत्येक मंडळाने एक इतिवृत्त वही तयार ठेवावी. सदस्याच्या पदावर प्रवेशाची आणि मंडळांच्या बैठकीच्या कामकाजाची नोंद इतिवृत्त वहीमध्ये नोंदवावी आणि सभेच्या अध्यक्षांनी सभेच्या समाप्तीच्या वेळी किंवा भविष्यात जर त्यांची पुष्टी झाली असेल तर त्यावर स्वाक्षरी करावी.

१३. संपूर्ण हिशेब योग्य हिशेबाच्या पुस्तकात ठेवला जाईल, जो सोसायटी आणि तिच्या संस्थेच्या खात्यातून अनुक्रमे प्राप्त झालेल्या आणि खर्च झालेल्या सर्व रकमांचा हिशेब ठेवला जाईल. अशा हिशेबाच्या पुस्तके प्रत्येक वर्षासाठी तयार केले जातील आणि पात्र लेखापरीक्षकांकडून योग्य रित्या लेखापरीक्षण केले जाईल. पुढील वर्षी किंवा या उद्देशासाठी नियुक्त केलेल्या इतर कोणत्याही बैठकीत नियामक मंडळाद्वारे तपासणी केली जाईल आणि मंजूर केली जाऊन आणि त्यानंतर सभेच्या अध्यक्षांची त्यावर स्वाक्षरी केली जाईल.

१४. संस्थेच्या वर्गणीदार आणि आश्रयदाते यांची यादी ठेवली जाईल.

१५. संस्थेच्या उद्देशासाठी बॅकेटमध्ये एक खाते उघडले जाईल आणि नियामक मंडळाने निवडलेल्या बँकेकडे ते ठेवले जाईल. संस्थेला मिळालेली प्रत्येक रक्कम, अध्यक्षांनी अन्यथा स्पष्टपणे आदेश दिल्याशिवाय, विनाविलंब बँकेमध्ये खात्यात जमा केली जाईल.

१६. सर्व धनादेश आणि देयकासाठीचे आदेश नियामक मंडळाच्या अध्यक्षांनी किंवा नियामक मंडळाने त्या संदर्भात नियुक्त केलेल्या व्यक्तीने किंवा व्यक्तींनी स्वाक्षरी केल्या पाहिजेत.

कलमांची योग्य प्रत असल्याचे प्रमाणित.

५ जुलै, १९४५.

बी. आर. आंबेडकर

डी. जी. जाधव

एस. सी. जोशी

विविध ठिकाणी संस्थेच्या शाखांसाठी, परिशिष्ट - बारावे पाहावे.

## ६.८ सारांश

बहिष्कृत हितकारिणी सभा ही एक सामाजिक संघटना होती आणि पीपल्स् एज्युकेशन सोसायटी ही एक शैक्षणिक संघटना होती. जर आपण संविधान किंवा मेमोरँडम ऑफ असोसिएशनमध्ये खोलवर गेलो तर आपल्याला दिसून येईल की सभेने कोणत्या प्रकारचे उपक्रम प्रस्तावित केले होते. बहिष्कृत हितकारिणी सभेने अस्पृश्य आणि दलित वर्गातील विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहे सुरू केली जेणेकरून हे विद्यार्थी शिक्षण घेतील आणि त्यांना अन्नपाण्याची अडचण येणार नाही. सभेत उच्च जातीचे तसेच कनिष्ठ जातीचे अनेक सदस्य होते आणि काही स्वच्छ चारित्र्य असलेल्या उच्च शिक्षण पात्र व्यक्तींना घेण्यात आले होते. महाड चौदार तळे सत्याग्रह, मनुस्मृती दहन, सायमन कमिशनला दिलेली साक्ष आणि ज्ञापनपत्र हे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सभेअंतर्गत हाती घेतलेल्या मोजक्या उपक्रमांपैकी काही होते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी पीपल्स् एज्युकेशन सोसायटीची स्थापना त्यांनी १९४५ मध्ये केली होती आणि कामगार मंत्री असताना त्यांनी त्यांच्या पदाचा गैरवापर न करता सोसायटीची मंजुरीचा आणि तिच्या निधीसाठी भारत सरकारच्या शिक्षण विभागाकडे अर्ज केला. मुंबईतील खाजगी महाविद्यालयांकडून भेदभाव केला जाणाऱ्या अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना शिक्षण देण्यासाठी उच्च शिक्षणाची अशी महाविद्यालये काळाची गरज का आहेत याची वस्तुनिष्ठ कारणे त्यांनी भारत सरकारला दिली. दुसरे असे की, सोसायटीच्या घटनेत त्यांनी केवळ अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांनाच प्रवेश देण्याचा प्रस्ताव मांडला नाही तर त्यांच्या जाती किंवा धर्माकडे दुर्लक्ष करून सर्वांना प्रवेश देण्याचा प्रस्ताव मांडला.

अशाप्रकारे, आपल्याला बहिष्कृत हितकारिणी सभा आणि पीपल्स् एज्युकेशन सोसायटीचा पाया सापडतो.

## ६.९ प्रश्न

१. सामाजिक आणि शैक्षणिक दृष्टीकोनातून बहिष्कृत हितकारिणी सभा व पीपल्स् एज्युकेशन सोसायटीचे मूल्यमापन करा.

## ६.१० संदर्भ


- https://baws.in/books/baws/EN/Volume_17_02/pdf/421
- Dr. Babasaheb Ambedkar Writings and Speeches (hereinafter read DBAWS), Vol.17, Part Three, Government of Maharashtra, 2003.
- DBAWS, Vol.1, 1979.
- Keer Dhananjay, Dr. Babasaheb Ambedkar Life and Mission, Popular Prakashan, Mumbai, 1990 (1954).
- Kamble B.C, Samagra Ambedkar Charitra, Vol.3, Sugava Prakashan, Pune, 2007. (Marathi)
- DBAWS, Vol.2, Government of Maharashtra, Mumbai, 1979.
- BLC Debates, Vol. I, Government of Maharashtra.
- Dongre M.K., Dimensions of Ambedkarism, Vinay Publication, Nagpur, 2005.
- Mankar Vijay, Dr. Babasaheb Ambedkar A Chronology, Blue World Series, Nagpur, 2009.
- Khairmode C.B., Dr. Babasaheb Ambedkar Charitra, Vol.2, Sugava Prakashan, Pune, 2003. (Marathi)
- Kuber W.N., Ambedkar A Critical Study, People's Publishing House, New Delhi, 2009.
- BLC Debates, Vol. XXIII, op. cit.

- Lokhande Bhau, Dr. Babasaheb Ambedkari Hitshatrunchya Janiva, Parijat Prakashan, Kolhapur, 2012. (Marathi)
- Kamble B.C., Samagra Ambedkar Charitra, Vol.16, Sugava Prakashan, Pune, 2007. (Marathi)
- Zelliot Eleanor, Ambedkar's World, The Making of Babasaheb and the Dalit Movement, Navayana, New Delhi, 2013(2004).
- Khandare Manik, Quotable Quotes of Babasaheb Ambedkar, People's Publication, Nagpur, 2008.
- DBAWS, Vol.10.
- Khairmode C.B., op. cit., Vol.8, Sugava Prakashan, Pune, 1991. (Marathi)
- Kshirsagar, R.K., Political Thought of Dr. Babasaheb Ambedkar, Intellectual Publishing House, New Delhi, 1992.


✞✞✞✞

# ७

# मानवी हक्कांच्या मुद्द्यांवर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे लेखन आणि भाषणे

**घटक रचना :**


७.० उद्दिष्टे

७.१ प्रस्तावना

७.२ मानवी हक्क म्हणजे काय?

७.३ मानवी हक्कांची सार्वत्रिक घोषणा (UDHR)

७.४ मानवी हक्कांची सार्वत्रिक घोषणा आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे मानवी हक्क प्रस्थापित करण्यासाठी प्रयत्न

७.५ डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे मानवी हक्कांबद्दलचे विचार

७.६ डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे मानवी हक्कांसाठीचे आंदोलन

७.७ भारतीय संविधानाद्वारे मानवी हक्कांचे समर्थन

७.८ कामगार चळवळीतील मानवी हक्क

७.९ डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि महिला सक्षमीकरण

७.१० सारांश

७.११ प्रश्न

७.१२ संदर्भ


## ७.० उद्दिष्टे

१) मानवी हक्कांची संकल्पना आणि महत्त्व एक सार्वत्रिक तत्व आणि त्याची ऐतिहासिक उत्क्रांती म्हणून समजून घेणे.

२) मानवी हक्कांच्या सार्वत्रिक घोषणापत्र (UDHR) आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मानवी प्रतिष्ठेचे आणि समानतेचे दृष्टिकोन यांच्यातील संरेखनाचे विश्लेषण करणे.

३) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मानवी हक्कांबद्दलच्या धारणा आणि उपेक्षित समुदायांच्या सक्षमीकरणात त्यांचे योगदान यांचा शोध घेणे.

४) डॉ. आंबेडकरांनी भारतीय संविधान आणि कामगार आणि महिला हक्कांसह त्याच्या तरतुदींद्वारे मानवी हक्कांचे समर्थन कसे केले याचे परीक्षण करणे.

५) मानवी हक्कांना प्रोत्साहन देण्यासाठी, कामगार हक्कांवर, महिला सक्षमीकरणावर आणि सामाजिक न्यायावर लक्ष केंद्रित करण्यासाठी डॉ. आंबेडकरांच्या चळवळींच्या भूमिकेचे मूल्यांकन करणे.

## ७.१ प्रस्तावना

कलम २५ (२) (ब)हे भारतीय राज्यघटनेतील एक महत्वपूर्ण कलम आहे, जे धार्मिक स्वातंत्र्याशी संबंधित आहे. हे कलम सार्वजनिक स्वरूपाच्या हिंदू धार्मिक संस्थांना, हिंदूंच्या सर्व वर्ग आणि विभागांसाठी उघडण्याची तरतूद करते. या कलमाचा अर्थ असा आहे की, हिंदूंच्या धार्मिक संस्था, जसे की मंदिरे, मठ, आणि इतर धार्मिक संस्था, समाजातील सर्व स्तरांसाठी खुले असावे.

- हे कलम हिंदू धार्मिक संस्थांना सर्वांसाठी उघडण्याची अट घालते.
- या कलमाचा अर्थ आहे की, हिंदूंच्या धार्मिक संस्था समाजातील सर्व स्तरांसाठी, तसेच सर्व जाती, पंथ आणि विभागांसाठी खुले असावे.
- हे कलम सामाजिक सुधारणा आणि समाजाच्या प्रगतीसाठी एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे.
- हे कलम धार्मिक संस्थांमध्ये सर्वांना समान संधी आणि न्याय मिळवून देण्यास मदत करते.
- या कलमामुळे धार्मिक संस्थांमध्ये सर्वांना समान संधी मिळाल्यास सामाजिक समतोल राखण्यास मदत होते.
- हे कलम भारताच्या धर्मनिरपेक्ष तत्त्वानुसार धार्मिक समानता आणि सहिष्णुता वाढवते.
- याव्यतिरिक्त, या कलमाच्या स्पष्टीकरणात, शीख, जैन आणि बौद्ध धर्माचा दावा करणाऱ्या व्यक्तींच्या संदर्भात हिंदूंचा संदर्भ वापरल्यास, तो त्यांना देखील लागू होतो, असे नमूद केले आहे.

**आपली प्रगती तपासा :**

१.अनुसूचित जाती जमातींसाठी संरक्षणात्मक तरतुदींवर माहिती लिहा.

## ११.३ राजकीय संरक्षणात्मक तरतुदी

**१) कलम ३३० :**

कलम ३३० : हे भारतीय राज्यघटनेतील एक महत्त्वाचे कलम आहे. हे कलम लोकसभेत अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती यांच्यासाठी जागा आरक्षित ठेवण्याशी संबंधित आहे. या कलमामुळे, या समुदायांना लोकसभेत प्रतिनिधित्व मिळण्यास मदत होते. भारतीय राज्यघटनेचे कलम ३३० स्पष्ट करते की, लोकसभेत अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातींसाठी जागा राखीव ठेवल्या जातील. याचा अर्थ असा आहे की, या समुदायांच्या लोकांना लोकसभेत निवडण्यासाठी विशेष जागा उपलब्ध असतील. ह्या

आरक्षणांमुळे, या समुदायांना राजकीय प्रक्रियेत सक्रिय सहभाग घेता येतो आणि त्यांच्या समस्या व अपेक्षा मांडता येतात.

- हे कलम सामाजिक न्यायाच्या तत्त्वावर आधारित आहे. यामुळे, समाजात दुर्बळ असलेल्या समुदायांना समान संधी मिळण्यास मदत होते.
- हे कलम अनुसूचित जाती आणि जमातींना लोकसभेत योग्य प्रतिनिधित्व देण्यास मदत करते, ज्यामुळे त्यांच्या गरजा आणि समस्या विचारात घेतल्या जातात.
- या आरक्षणांमुळे, अनुसूचित जाती आणि जमातीसुद्धा राजकीय प्रक्रियेत सक्रियपणे सहभागी होऊ शकतात आणि त्यांच्या समस्या मांडू शकतात.

**२) कलम ३३२:**

कलम हे भारतीय राज्यघटनेतील एक महत्त्वाचे कलम आहे. हे कलम राज्यांच्या विधानसभा निवडणुकांसाठी अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती यांच्यासाठी जागा आरक्षित ठेवण्याशी संबंधित आहे. या कलमामुळे, या समुदायांना विधानसभेचे प्रतिनिधित्व मिळण्यास मदत होते. भारतीय राज्यघटनेचे कलम ३३२ स्पष्ट करते की, विधानसभेत अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातींसाठी जागा राखीव ठेवल्या जातील. याचा अर्थ असा आहे की, या समुदायांच्या लोकांना विधानसभेत निवडण्यासाठी विशेष जागा उपलब्ध असतील. ह्या आरक्षणांमुळे, या समुदायांना राजकीय प्रक्रियेत सक्रिय सहभाग घेता येतो आणि त्यांच्या समस्या व अपेक्षा मांडता येतात.

**३) कलम ३३८ :**

राज्यघटनेच्या अनुच्छेद ३३८ अन्वये अनुसूचित जाती आयोगाची निर्मिती करण्यात आली. ही एक घटनात्मक संस्था आहे. जी अनुसूचित जातींच्या हक्कांसाठी काम करते. या आयोगाचा मुख्य उद्देश अनुसूचित जातींच्या सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक आणि राजकीय प्रगतीसाठी उपाययोजना करणे आणि त्यांच्यावर होणाऱ्या अत्याचारांवर नियंत्रण ठेवणे हा आहे.

- अनुसूचित जातींच्या लोकांवर होणाऱ्या अत्याचारांची चौकशी करणे आणि दोषींवर कठोर कारवाई करणे.
- अनुसूचित जातींच्या लोकांसाठी विकासाच्या योजना तयार करणे आणि त्या प्रभावीपणे राबवणे.
- अनुसूचित जातींच्या लोकांना राजकीय क्षेत्रात अधिक प्रतिनिधित्व मिळवून देणे.
- अनुसूचित जातींच्या स्थितीचा अभ्यास करून सरकारला अहवाल सादर करणे आणि आवश्यक उपाययोजना सुचवणे.
- अनुसूचित जातींच्या लोकांकडून येणाऱ्या तक्रारी नोंदवून त्यावर योग्य कार्यवाही करणे.
- अनुसूचित जातींच्या हक्कांसाठी जनजागृती मोहीम चालवणे. ही महत्वपूर्ण कामे हा आयोग करतो.

### ४) राष्ट्रीय अनुसूचित जमाती आयोग:

राष्ट्रीय अनुसूचित जमाती आयोग ही एक घटनात्मक संस्था आहे. जी भारतातील अनुसूचित, जमातींच्या सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक विकासासाठी काम करते. या आयोगाची स्थापना संविधान (८९ वी दुरुस्ती) अधिनियम, २००३ द्वारे करण्यात आली आहे.

- अनुसूचित जमातींच्या विकासासाठी उपाययोजना करणे आणि त्या संबंधित धोरणे तयार करणे.
- अनुसूचित जमातींच्या हक्कांचे संरक्षण करणे आणि त्यांचे शोषण रोखणे.
- अनुसूचित जमातींच्या सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक विकासासाठी योजनांचे मूल्यांकन करणे.
- अनुसूचित जमातींच्या तक्रारींची चौकशी करणे.

ही कामे हा आयोग करतो.

आपली प्रगती तपासा:

१. अनुसूचित जाती, जमाती व इतर मागास वर्गीयांच्या राजकीय तरतुदींवर संक्षिप माहिती लिहा.

## ११.४ शैक्षणिक व आर्थिक संरक्षण

### १) कलम ४६ :

कलम ४६ हे राज्य धोरणाचे मार्गदर्शक तत्त्व (DPSP) आहे. जे अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि इतर दुर्बल घटकांच्या शैक्षणिक आणि आर्थिक हितसंबंधांना प्रोत्साहन देण्यावर जोर देते. हे कलम सामाजिक अन्याय आणि शोषणातून त्यांचे संरक्षण करण्याचाही प्रयत्न करते.

- हे कलम देशातील दुर्बल घटकांच्या शैक्षणिक आणि आर्थिक प्रगतीसाठी राज्य धोरणांना मार्गदर्शन करते.
- हे कलम या घटकांना सामाजिक अन्याय आणि शोषणापासून संरक्षण देण्याचा प्रयत्न करते.
- हे कलम शैक्षणिक आणि आर्थिक विकासासाठी विशेष उपाययोजना करण्यास प्रोत्साहन देते.
- राज्य सरकार या घटकांसाठी शिष्यवृत्ती, आरक्षण आणि इतर योजना तयार करते. ज्यामुळे त्यांना शिक्षण आणि रोजगारात मदत मिळते.
- हे कलम राज्य सरकारला योग्य धोरणे आणि उपाययोजना लागू करण्यास प्रोत्साहित करते.

**२) कलम २७५(१) :**

भारतीय राज्यघटनेतील अनुच्छेद २७५(१) या कलमाचे मुख्य तात्पर्य हे आहे की, केंद्र सरकार काही राज्यांना त्यांच्या वित्तीय गरजा पूर्ण करण्यासाठी किंवा विशेष योजना राबवण्यासाठी मदत करू शकते. हे अनुदान केंद्र सरकारच्या एकत्रित निधीतून दिले जाते, आणि याची रक्कम आणि अटी संसद निश्चित करते.

कलम २७५(१) नुसार, केंद्र सरकार काही राज्यांना विशेषतः आदिवासी भागांसाठी आर्थिक मदत देऊ शकते. ही मदत विकास योजनांसाठी, पायाभूत सुविधांसाठी, किंवा इतर आवश्यक गरजांसाठी दिली जाऊ शकते. हे अनुदान भारताच्या एकत्रित निधीतून दिले जाते. याचा अर्थ केंद्र सरकारला आपल्या तिजोरीतून ही मदत राज्यांना द्यावी लागते. अनुच्छेदात नमूद केल्याप्रमाणे, अनुदान किती द्यावे आणि कोणत्या अटींवर द्यावे, हे संसद ठरवते. त्यामुळे प्रत्येक राज्यासाठी अनुदान वेगवेगळे असू शकते, आणि ते राज्यांच्या गरजा आणि विशिष्ट योजनांवर अवलंबून असते.

हे कलम विशेषतः आदिवासी भागांसाठी उपयुक्त आहे. आदिवासी भागांच्या विकासासाठी, केंद्र सरकार राज्यांना अनुदान देऊ शकते. या अनुदानातून आदिवासी भागांसाठी आवश्यक असलेल्या सुविधा, जसे की पाणी, रस्ते, वीज, शिक्षण, आरोग्य, इत्यादी पुरविल्या जातात.

हे कलम राज्यांना आर्थिक मदत पुरवते, ज्यामुळे ते विकास योजना प्रभावीपणे राबवू शकतात. हे कलम विशेषतः आदिवासी भागांच्या विकासासाठी मदत करते, ज्यामुळे ते अधिक विकसित होऊ शकतात. हे कलम केंद्र आणि राज्य सरकारमधील समन्वय वाढवते, ज्यामुळे विकासाचे कार्य अधिक प्रभावीपणे करता येते.

हे कलम केंद्र सरकारला राज्यांच्या वित्तीय गरजा पूर्ण करण्याची जबाबदारी देते, ज्यामुळे ते अधिक जबाबदार बनतात.

**३) कलम २७५(१):**

कलम २७५(१) हे केंद्र सरकारला राज्यांना आर्थिक मदत पुरवण्यासाठी अधिकृत करते. हे कलम विशेषतः आदिवासी भागांच्या विकासासाठी उपयुक्त आहे, आणि ते केंद्र आणि राज्य सरकारमधील समन्वय वाढवते. हे कलम राज्यांसाठी आर्थिक मदत आणि विकासासाठी एक महत्त्वाचे साधन आहे. यामुळे या कलमाचा उपयोग आदिवासी लोकांच्या विकासाठी मोठयाप्रमाणात होतो.

**आपली प्रगती तपासा:**

अनुसूचित जाती जमाती शैक्षणिक व आर्थिक संरक्षणावर भाष्य करा.

## ११.५ इतर मागास वर्गीयांसाठी संरक्षण

**१) कलम १५(४) :**

भारतीय राज्यघटनेतील कलम १५(४) हे सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या वर्गांसाठी आरक्षण देण्यास परवानगी देते. या कलमाद्वारे, राज्य सरकार सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या वर्गांसाठी (SC/ST/OBC) विशेष तरतुदी करू शकते.

- ज्यामुळे त्यांना शिक्षण आणि सरकारी नोकऱ्यांमध्ये आरक्षण मिळू शकते.
- सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागासलेले वर्ग (SEBC)या कलमाद्वारे राज्य सरकार सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागासलेले वर्ग (SEBC) निश्चित करू शकते.
- या कलमाद्वारे राज्य सरकार SEBC वर्गांसाठी शिक्षण आणि सरकारी नोकऱ्यांमध्ये आरक्षण देऊ शकते.

**२) कलम १५(५) :**

कलम १५(५) हे भारतीय राज्यघटनेतील एक महत्त्वपूर्ण कलम आहे. हे कलम राज्य सरकारला सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या लोकांसाठी (SC, ST आणि OBC) आणि शैक्षणिक संस्थांमध्ये प्रवेशासाठी विशेष तरतुदी करण्याची परवानगी देते, ज्यात खाजगी संस्था देखील समाविष्ट आहेत.

- हे कलम राज्य सरकारला सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या लोकांसाठी शैक्षणिक संस्थांमध्ये प्रवेशासाठी विशेष तरतुदी करण्याची परवानगी देतो.
- हे कलम सरकारी आणि खाजगी, दोन्ही शैक्षणिक संस्थांना लागू होते.
- हे कलम सामाजिक न्यायासाठी आवश्यक आहे.
- हे सामाजिक न्यायासाठी एक महत्त्वपूर्ण कलम आहे.
- हे कलम मागासलेल्या समुदायांना शैक्षणिक संधी मिळवून देण्यास मदत करते.

**३) कलम १६(४) :**

भारतीय राज्यघटनेतील कलम १६(४) नागरिकांच्या मागासलेल्या वर्गांसाठी सरकारी नोकऱ्यांमध्ये आरक्षणाची तरतूद करते.

- हे कलम विशेषतः अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि इतर मागासलेल्या वर्गांसाठी आरक्षणाची परवानगी देते.
- हे आरक्षण नियुक्तीच्या सुरुवातीच्या टप्प्यातच लागू होते, म्हणजे आरक्षणाचे फायदे फक्त भरतीसाठीच आहेत आणि एकदा नोकरी मिळाल्यावर ते लागू होत नाहीत.
- हे कलम राज्य सरकारला मागासलेल्या वर्गांसाठी विशेष उपाययोजना करण्याची परवानगी देते, ज्यामुळे त्यांना सरकारी नोकऱ्यांमध्ये संधी मिळू शकते.
- कलम १६(४) नुसार, राज्य सरकार मागासलेल्या वर्गांना सरकारी नोकऱ्यांमध्ये आरक्षण देऊ शकते.
- हे आरक्षण फक्त नियुक्तीच्या सुरुवातीच्या टप्प्यातच लागू होते आणि एकदा नोकरी मिळाल्यावर ते लागू होत नाही.
- कलम १६(४) इतर कायद्यांसोबत समन्वय साधून कार्य करते आणि मागासलेल्या वर्गांसाठी आरक्षणाच्या नियमांनुसार सरकारी नोकऱ्यांमध्ये संधी मिळवण्यास मदत करते.

**४) कलम ३४० :**

कलम ३४० हे भारतीय राज्यघटनेतील एक महत्त्वपूर्ण कलम आहे, जे मागासलेल्या वर्गांच्या (ओबीसी) स्थितीचा अभ्यास करण्यासाठी आयोगाची नियुक्ती करण्याचा अधिकार राष्ट्रपतींना देते. मंडल आयोग या संदर्भात एक महत्त्वाचा भाग आहे. या आयोगाने ओबीसींच्या सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक स्थितीचा अभ्यास केला आणि आरक्षणासंदर्भात शिफारसी केल्या.

- भारतीय राज्यघटनेच्या कलम ३४० नुसार, राष्ट्रपती मागासलेल्या वर्गांच्या (ओबीसी) स्थितीचा अभ्यास करण्यासाठी एक आयोग नियुक्त करू शकतात. या आयोगाला मागासलेल्या वर्गांच्या सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक स्थितीचा अभ्यास करायचा आहे आणि त्यासंदर्भात शिफारसी करायच्या आहेत.
- या आयोगाची स्थापना १९७९ मध्ये झाली, आणि या आयोगाचे अध्यक्ष बलराज मंडल होते. या आयोगाने ओबीसींच्या स्थितीचा सखोल अभ्यास केला आणि सरकारी नोकऱ्या आणि शैक्षणिक संस्थांमध्ये आरक्षणाचे धोरण लागू करण्याची शिफारस केली.
- मंडल आयोगाच्या शिफारशींनुसार ओबीसींसाठी आरक्षणाचे धोरण लागू झाल्यावर सरकारी नोकऱ्या आणि शैक्षणिक संस्थांमध्ये आरक्षणाची पद्धत सुरू झाली.
- मंडल आयोगाने आपला अहवाल १९८० मध्ये सादर केला. या अहवालात ओबीसींच्या आरक्षणासंदर्भात अनेक महत्त्वपूर्ण शिफारसी होत्या.
- मंडल आयोगाच्या शिफारशी अंमलात आणल्या गेल्या, परंतु अनेक ठिकाणी त्या पूर्णपणे अंमलात आल्या नाहीत.

**५) कलम ३३८ (ब):**

कलम ३३८ (ब) हे भारतीय राज्यघटनेतील एक महत्त्वपूर्ण कलम आहे, जे मागासलेल्या वर्गांसाठी राष्ट्रीय आयोग (National Commission for Backward Classes) या संस्थेची स्थापना करते. हा आयोग मागासलेल्या वर्गांच्या सामाजिक आणि आर्थिक विकासावर लक्ष ठेवतो आणि त्यांच्या समस्यांवर उपाय सुचवतो.

**६) कलम ३३८ (ब) :**

कलम ३३८ (ब) नुसार,मागासलेल्या वर्गांसाठी एक राष्ट्रीय आयोग असेल, जो राष्ट्रीय मागासलेल्या वर्गांसाठी आयोग म्हणून ओळखला जाईल.केंद्र सरकार राजपत्राद्वारे या आयोगाची स्थापना करेल. या आयोगाला मागासलेल्या वर्गांच्या समस्यांवर लक्ष केंद्रित करायचे आहे आणि त्यांच्या विकासासाठी उपाय सुचवायचे आहेत. कलम ३३८ ब संविधानात दुरुस्ती करून समाविष्ट करण्यात आला आहे.

या दुरुस्तीमुळे, मागासलेल्या वर्गांसाठी अधिक प्रभावी उपाययोजना करणे शक्य झाले आहे.

संविधान (दुरुस्ती) विधेयक, २०१६ या विधेयकाद्वारे कलम ३३८ (ब) संविधानात समाविष्ट करण्यात आले आहे. कलम ३३८ (ब) मागासलेल्या वर्गांच्या विकासासाठी एक

महत्त्वाचे पाऊल आहे. या कलमाद्वारे स्थापन केलेला आयोग, मागासलेल्या वर्गांच्या समस्यांवर लक्ष केंद्रित करून त्यांच्यासाठी योग्य उपाययोजना सुचवेल.

## ११.६ अत्याचार प्रतिबंध नियम

अनुसूचित जाती आणि जमाती (अत्याचार प्रतिबंध) कायदा १९८९ हा कायदा भारतीय संसदेने अनुसूचित जाती आणि जमातींवरील अत्याचार आणि द्वेषपूर्ण गुन्हे रोखण्यासाठी बनवला आहे. हा कायदा'अनुसूचित जाती - जमाती कायदा' किंवा 'अत्याचार प्रतिबंधक कायदा' म्हणून ओळखला जातो.

- हा कायदा अनुसूचित जाती आणि जमाती च्या सदस्यांविरुद्ध द्वेषयुक्त भाषण, शारीरिक हिंसा आणि इतर अत्याचारांना रोखण्यासाठी आहे.
- हा कायदा अनुसूचित जाती - जमाती सदस्यांच्या हक्कांचे संरक्षण करणे आणि त्यांना अत्याचारांपासून वाचविण्यासाठी मदत करतो.
- हा कायदा ३० जानेवारी १९९० पासून लागू झाला.
- या कायद्यात अनुसूचित जाती आणि जमातीच्या सदस्यांशी संबंधित विविध प्रकारच्या अत्याचारांसाठी गुन्हे परिभाषित केले आहेत, जसे की सार्वजनिक ठिकाणी अपमान, शारीरिक हिंसा, वेठबिगारी करणे, मालमत्तेचे नुकसान करणे इत्यादी.

*या कायद्यांतर्गत गुन्हे केल्यास सहा महिन्यांपेक्षा कमी नसलेली आणि पाच वर्षांपर्यंत वाढू शकणारी कारावास आणि दंडाची शिक्षा होऊ शकते.

*या कायद्यात वेळोवेळी सुधारणा करण्यात आल्या आहेत. २०१८ मध्ये या कायद्यात आणखी सुधारणा करण्यात आल्या, ज्यात नवीन गुन्हे समाविष्ट करण्यात आले आणि शिक्षेत वाढ करण्यात आली.

*हा कायदा संपूर्ण भारतामध्ये लागू आहे.

*हा कायदा अनुसूचित जाती - जमाती समाजाला अत्याचारांपासून संरक्षण देतो.

या कायद्यामुळे अनुसूचित जाती - जमाती समाजाला न्याय मिळायला मदत होते.

या कायद्यामुळे अनुसूचित जाती - जमाती समाजाला समाजात समान संधी मिळायला मदत होते.

## ११.७ विशेष योजना

**१) विशेष घटक योजना: (SCP)**

ही अनुसूचित जाती  आणि अनुसूचित जमाती यांच्यासाठी सरकारने सुरू केलेली एक योजना आहे. या योजनेचा उद्देश या विशेष गटांना त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात विकास क्षेत्रांकडून निधीची हमी देऊन लाभ मिळवून देणे आहे.

- अनुसूचित जाती आणि जमाती यांच्या सामाजिक-आर्थिक विकासाला चालना देणे.
- या विशेष गटांना विकास योजना आणि निधीमध्ये समान संधी देणे.
- या गटांना त्यांच्या हक्कांचे संरक्षण करणे.
- राज्य आणि केंद्र सरकार विकास क्षेत्रांमधून या गटांसाठी निधी वाटप करतात.
- या निधीतून विविध विकास योजना राबवल्या जातात.( शिक्षण, आरोग्य, रोजगार, आणि इतर सामाजिक कार्यक्रम.)
- ही योजना जिल्हा योजना समिती आणि इतर संबंधित विभागांद्वारे अंमलात आणली जाते.
- अनुसूचित जाती आणि जमाती विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती, शिक्षण शुल्क माफी, आणि इतर शैक्षणिक सुविधा पुरवणे.
- या गटांना आरोग्य सेवा आणि सुविधा उपलब्ध करून देणे.
- या गटांना कौशल्य विकास कार्यक्रम आणि रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे.
- या योजनेमुळे अनुसूचित जाती आणि जमाती यांच्या सामाजिक-आर्थिक विकासाला चालना मिळते आणि त्यांच्यात समानता निर्माण होते.
- या योजनेमुळे या गटांना त्यांच्या हक्कांचे संरक्षण मिळते आणि सामाजिक न्याय साधण्यास मदत होते.
- या योजनेमुळे समाजाचा सर्वतोपरी विकास साधण्यास मदत होते.

विशेष घटक योजना (SCP)ही अनुसूचित जाती आणि जमाती यांच्या विकासासाठी एक महत्त्वाची योजना आहे. या योजनेमुळे या गटांना सामाजिक-आर्थिक विकास साधण्यास मदत होते आणि समाजात समानता निर्माण होत.

**२) आदिवासी उप-योजना (TSP) :**

आदिवासी उपाययोजना (TSP) ही भारतात राज्यांमधील आदिवासी लोकसंख्येच्या विकासासाठी केंद्र सरकारकडून मिळणाऱ्या लाभांचा प्रवाह मार्गक्रमित करण्यासाठी वापरली जाणारी एक नियोजन संकल्पना आहे. आदिवासी उपाययोजना (TSP) ची प्रेरणा म्हणजे शिक्षण आणि आरोग्य सेवा, गृहनिर्माण, उत्पन्न निर्माण करणाऱ्या संधी आणि शोषण आणि दडपशाहीपासून संरक्षण मिळवून आदिवासी लोकसंख्येतील आणि इतरांमधील दरी कमी करणे.

- पाचव्या पंचवार्षिक योजनेत (१९७४-१९७९) आदिवासी उपाययोजनांची संकल्पना मांडण्यात आली आणि १७ राज्ये आणि २ केंद्रशासित प्रदेशांमध्ये अंमलबजावणी सुरू झाली.
- आदिवासी उप-योजनांमधील क्षेत्र हळूहळू वाढविण्यात आले. *नवव्या पंचवार्षिक योजनेच्या (२००२) शेवटी, २३ राज्ये किंवा केंद्रशासित प्रदेशांचा समावेश या योजनेत करण्यात आला.

- आदिवासी उप-आयोजनेत समाविष्ट असलेले क्षेत्र म्हणजे ५० टक्के किंवा त्याहून अधिक आदिवासी लोकसंख्या असलेले ब्लॉक किंवा तहसील.
- आदिवासी उपाययोजना (TSP) विकासाची प्रक्रिया संबंधित राज्यांच्या आदिवासी कल्याण विभागांद्वारे चालविली जाते.

## ११.८ सारांश

अनुसूचित जाती जमाती व इतर मागासवर्गीय यांचे जीवन अत्यंत बिकट व खडतर होते. या समूहाला सामाजिक तसेच आर्थिक विषमतेचा मोठ्या प्रमाणात सामना करावा लागत होता. या समूहाच्या उद्धारासाठी व उन्नतीसाठी स्वातंत्र्यानंतर घटनात्मक दृष्टिकोनातून प्रयत्न सुरू झाले व या प्रयत्नातून या समाजाला सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक पाठबळ उपलब्ध होवू लागले.तसेच कायद्याचे पाठबळ उपलब्ध झाल्याने हा समाज सुरक्षित झाला. शासन स्तरावर या समूहाच्या उद्धारासाठी सेवा व सुविधा उपलब्ध होवू लागल्या. परिणामी या समूहाचा विकास होण्यास मदत झाली. आरक्षणाचा फायदा या समूहाला झाल्याने हा समूह राजकारण, सेवा, शिक्षण व व्यवसाय या ठिकाणी स्थिरावला. एकंदरीत घटनात्मक संरक्षण या समूहासाठी अत्यंत उपयुक्त व महत्त्वपूर्ण ठरले.

## ११.९ प्रश्न

१. अनुसूचित जाती व जमातींच्या संरक्षणावर भाष्य करा .

२. अनुसूचित जाती ,जमातींच्या व इतर मागासवर्गीय यांच्या राजकीय संरक्षणावर माहिती लिहा.

३. इतर मागासवर्गीयांच्या संरक्षणावर सविस्तर चर्चा करा.

४. अनुसूचित जाती ,जमातीं व इतर मागासवर्गीयांना दिल्या जाणाऱ्या विशेष सवलतींचा आढावा घ्या.

## ११.१० संदर्भ

१. डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि भारतीय राज्यघटना - डॉ. रावसाहेब कसबे, सुगावा प्रकाशन, पुणे.

२. डॉ. भीमराव आंबेडकर - चेतन मेहता, APH प्रकाशन, नवी दिल्ली.

३. भारतीय संविधान व डॉ. बाबासाहेब आंबेडकर- चपळगांवकर नरेंद्र, श्रीविद्या प्रकाशन.

४. डॉ. बाबासाहेब आंबेडकर- कीर धनंजय, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई.

✞✞✞✞

# १२

# घटनात्मक दृष्टिकोनातून महिला, कामगार व अल्पसंख्यांक संरक्षण

**घटक रचना:**

१२.० उद्दिष्टे

१२.१ प्रस्तावना

१२.२ घटनात्मक दृष्टिकोनातून महिला संरक्षण

१२.३ घटनात्मक दृष्टिकोनातून कामगार संरक्षण

१२.४ घटनात्मक दृष्टिकोनातून अल्पसंख्याक संरक्षण

१२.५ सारांश

१२.६ प्रश्न

१२.७ संदर्भ

## १२.० उद्दिष्टे

१) घटनात्मक दृष्टिकोनातून महिला संरक्षणविषयक माहिती जाणून घेणे.

२) घटनात्मक दृष्टिकोनातून कामगार संरक्षणविषयक माहिती जाणून घेणे.

३) घटनात्मक दृष्टिकोनातून अल्पसंख्याक संरक्षणविषयक माहिती जाणून घेणे.

## १२.१ प्रस्तावना

प्राचीन कालखंडापासून आधुनिक कालखंडाच्या सुरुवातीपर्यंत महिलाना अनेक कौटुंबिक व सामाजिक समस्यांना सामोरे जावे लागले. मात्र स्वातंत्र्यानंतर महिलाना अनेक घटनात्मक संरक्षण उपब्ध झाल्याने स्त्रियांच्या स्थितीत सुधारणा होण्यास मदत झाली.ही माहिती आपण या घटकात पाहणार आहोत. त्याच बरोबर समाजातील सातत्याने संघर्ष संघर्ष करणारा कामगार वर्ग व त्या वर्गाला निर्माण होणारे प्रश्न व ते प्रश्न सोडविण्यासाठी तसेच कामगारांचे रक्षण करण्यासाठी करण्यात आलेले घटनात्मक कायदे याची माहिती जाणून घेणार आहोत. तसेच अल्पसंख्याकांच्या संरक्षणासाठी निर्माण करण्यात आलेल्या घटनात्मक बाजू याची माहिती जाणून घेणार आहोत.

## १२.२ घटनात्मक दृष्टिकोनातून महिला संरक्षण

भारतात महिलांच्या हितासाठी त्यांच्या अधिकारांचे संरक्षण करण्याच्या उद्देशाने अनेक कायदे करण्यात आले आहे. आज विविध क्षेत्रात महिला पुरुषांच्या बरोबरीने काम करत

आहे. ते केवळ या कायद्यांमुळेच महिलांना कामाच्या ठिकाणी काही अडचणींचा सामना करावा लागू नये म्हणूनही कायदे करण्यात आले आहे. महिलांसाठी करण्यात आलेल्या या कायद्यांबद्दल या ठिकाणी माहिती नमूद करण्यात आली आहे.

### १) राष्ट्रीय महिला आयोग कायदा : (National Commission for Women, NCW)

भारतीय संसदेने १९९० मध्ये पारित केलेल्या एका अधिनियमाद्वारे, १९९० च्या राष्ट्रीय महिला आयोग कायद्यांतर्गत राष्ट्रीय महिला आयोगाची (NCW) स्थापना केली. महिलांच्या हक्कांचे संरक्षण हे महिला आयोगाचे कार्य आहे. कोणतीही महिला तिच्या समस्येबाबत राष्ट्रीय महिला आयोगाकडे तक्रार करू शकतात. राष्ट्रीय महिला कायदा आयोगाचा मुख्य उद्देश हा महिलांची स्थिती सुधारणे आणि त्यांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी काम करणे हा आहे. त्यामुळे घटनात्मक दृष्ट्या या आयोगाचा फायदा महिला संरक्षण व सबलीकरणासाठी झाला आहे.

### २) भारतीय घटस्फोट कायदा: (Indian Divorce Act 1869)

भारतीय घटस्फोट कायद्यानुसार केवळ महिला किंवा पुरुषांना त्यांचे लग्न संपवता येते. अशा प्रकरणांची नोंदणी, सुनावणी आणि निपटारा करण्यासाठी कौटुंबिक न्यायालये स्थापन करण्यात आली आहे. महिलांवर अत्याचार होत असतील तर याबाबत या कायद्याचा आधार महिला घेऊ शकतात.

### ३) हिंदू उत्तराधिकारी कायदा :१९५६ (Hindu Succession Act, 1956)

हिंदू उत्तराधिकारी कायद्यानुसार महिलांना संपत्ती मध्ये व्यापक अधिकार देण्यात आले असून स्त्री धनाचा उपभोग घेण्यासाठी अनिर्बंध अधिकार स्त्रीला दिले आहेत.हिंदू स्त्रीला एकत्र कुटुंबाच्या संपत्तीत सुद्धा वाटणी मागता येते. स्त्री धन मिळावे म्हणून स्त्री कोर्टात खटला दाखल करू शकते. स्त्रीला मुलाप्रमाणे वडिलोपार्जित संपत्ती मध्ये या कायद्याने समान हक्क दिलेला आहे.

### ४) समान वेतन कायदा १९७६ : (Equal Remuneration Act, 1976)

समान वेतन कायदा १९७६ मध्ये निर्माण करण्यात आला. समान वेतन कायदा एकाच कामासाठी स्त्री व पुरुष दोघांना समान वेतन मिळाले पाहिजे हे स्पष्ट करतो. हा कायदा महिला आणि पुरुष कर्मचाऱ्यांसाठी समान कामासाठी समान वेतन सुनिश्चित करतो. या कायद्यानुसार, एकाच कंपनीमध्ये समान काम करणाऱ्या महिला आणि पुरुष कर्मचाऱ्यांना समान वेतन दिले जाते. समान वेतन कायद्याचे मुख्य उद्देश लिंगावर आधारित वेतनभेद न करणे हा आहे. या कायद्यानुसार, महिला आणि पुरुष कर्मचाऱ्यांमध्ये वेतनात बाबत कोणताही लिंगभेद (gender discrimination) नसावा, असे स्पष्ट करतो. समान काम करणाऱ्या महिला आणि पुरुष कर्मचाऱ्यांनी समान वेतन मिळवण्याचा अधिकार आहे. महिलांना कामाच्या ठिकाणी समान संधी मिळवून देण्यासाठी हा कायदा मदत करतो. महिलांना कामाच्या ठिकाणी समान वेतन आणि इतर अटी (रोजगाराच्या अटी) मिळवण्याचा अधिकार हा या कायद्याने सुनिश्चित केले आहे. जर एका कंपनीमध्ये महिला

आणि पुरुष कर्मचारी समान काम करत असतील, तर त्यांना समान वेतन दिले पाहिजे. या कायद्यानुसार, लिंगाच्या आधारावर वेतनात कोणताही फरक करता येणार नाही. समान वेतन कायद्याचे पालन करणे आवश्यक आहे. या कायद्याचे उल्लंघन झाल्यास, नियोक्ता (employer) आणि कंपनीवर कारवाई (action) होऊ शकते.

भारतातील समान वेतन कायदा Equal Remuneration Act, 1976 या नावाने ओळखला जातो. समान वेतन कायदा हा एक महत्त्वाचा कायदा आहे, जो महिला आणि पुरुष कर्मचाऱ्यांमध्ये वेतनात समानता स्थापित करण्यास मदत करतो. हा कायदा महिलांना समान संधी आणि समान वेतन मिळवून देण्यासाठी मदत करतो.

**५). हुंडा प्रतिबंधक कायदा : (Dowry Prevention Act, 1961)**

वाढत्या हुंडाबळींचे प्रमाण लक्षात घेवून घटनात्मक दृष्टिकोनातून महिला संक्षणासाठी १९६१ मध्ये हुंडा प्रतिबंधक कायदा लागू करण्यात आला.भारतात हुंडा प्रथेला प्रतिबंध करण्यासाठी बनवलेला हा कायदा आहे. या कायद्यानुसार, हुंडा देणे, घेणे किंवा मागणे हे बेकायदेशीर मानले जाते. हुंड्यासाठी स्त्रियांचा मोठयाप्रमाणात छळ केला जातो. स्त्रियांचे शारीरिक व मानसिक खच्चीकरण केले जाते. या कायद्याअंतर्गत, हुंडा देणे किंवा घेणे या गुन्ह्यासाठी ५ वर्षांपर्यंतची शिक्षा आणि १५००० रुपयांपर्यंत दंडाची तरतूद आहे. हुंडाबळीची संख्या निश्चित करणे कठीण आहे, परंतु ही एक गंभीर समस्या आहे हे स्पष्ट आहे. हुंडा प्रतिबंधक कायदा (१९६१) आणि इतर कायदे या समस्यांवर उपाययोजना करत असले तरी, समाजात जागरूकता करणे आवश्यक आहे.

**६) गर्भलिंग चाचणी प्रतिबंधक कायदा: ( Pre-Conception and Pre-natal Diagnostic Techniques (Prohibition of Sex Selection) Act, 1994.)**

ज्याला "गर्भधारणापूर्व व प्रसूतीपूर्व निदानतंत्र (गर्भलिंग निदान प्रतिबंध) कायदा" (PCPNDT Act) असेही म्हणतात, हा एक कायदा आहे जो गर्भलिंग चाचणी आणि त्यानंतर लिंगानुसार गर्भपाताला प्रतिबंध करतो. हा कायदा १९९४ मध्ये लागू झाला आणि २००३ मध्ये त्यात सुधारणा करण्यात आली.

या कायद्याचा मुख्य उद्देश गर्भलिंग चाचणी रोखणे हा होय. हा कायदा गर्भधारणा होण्यापूर्वी किंवा प्रसूतीपूर्वी गर्भलिंग तपासणी (गर्भलिंग निदान) करण्यावर बंदी घालतो.स्त्री भ्रूण हत्येला प्रतिबंध या कायद्याचा मुख्य उद्देश आहे. स्त्री भ्रूण हत्येला आळा घालणे आणि लिंग निवड प्रतिबंध करणे हा आहे.

या कायद्यामुळे लिंग गुणोत्तर सुधारण्यास मदत होते. या कायद्याचे उल्लंघन करणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करण्याची तरतूद या कायद्यात आहे. कायद्याची अंमलबजावणी करण्यासाठी आणि जनजागृतीसाठी विविध उपक्रम राबवले जातात. या कायद्याची अंमलबजावणी करण्यासाठी आरोग्य विभाग, महिला व बाल विकास विभाग आणि इतर संबंधित विभाग काम करतात. गर्भलिंग चाचणी प्रतिबंधक कायदा हा स्त्री-पुरुष समानता आणि लिंग गुणोत्तर सुधारण्यास मदत करतो. या कायद्यामुळे महिलांवरील अन्याय कमी होण्यास मदत होते आणि त्यांना योग्य आरोग्य सुविधा मिळण्यास मदत होते.

**८) पोक्सो कायदा :(Protection of Children from Sexual Offences Act, 2012)**

हा कायदा म्हणजे प्रोटेक्शन ऑफ चिल्ड्रन फ्रॉम सेक्शुअल ऑफेन्स ऍक्ट. पोक्सो कायदा हा मुलांच्या सुरक्षेसाठी करण्यात आला आहे. हा कायदा २०१२ मध्ये आणण्यात आला. या अंतर्गत मुलांचे लैंगिक शोषण हा गुन्हा आहे. हा कायदा १८ वर्षांखालील मुले आणि मुली दोघांसाठीही लागू आहे.

**९) लैंगिक छळ कायदा २०१३ : (Sexual Harassment of Women at Workplace Act, 2013)**

लैंगिक छळ कायदा अंतर्गत, महिलांना कामाच्या ठिकाणी शारीरिक छळ किंवा लैंगिक छळापासून संरक्षण दिले जाते. कार्यालयात किंवा कोणत्याही कामाच्या ठिकाणी महिलेचा शारीरिक किंवा मानसिक छळ होत असेल तर ती महिला आरोपीविरुद्ध तक्रार दाखल करू शकते.

**१०) महिला सुरक्षा कायदा :**

लैंगिक शोषणा विरुद्ध कठोर कारवाई करण्याच्या उद्देशाने डिसेंबर २०१६ मध्ये महिला सुरक्षा कायदा करण्यात आला.

या कायद्याअंतर्गत जर गुन्हेगाराचे वय १८ वर्षांपेक्षा कमी असेल, तर ते किरकोळ प्रकरण मानून ते बाल न्याय अंतर्गत पाठवले जात होते. म्हणजे कठोर शिक्षेपासून तो वाचतो. मात्र, निर्भया प्रकरणानंतर या कायद्यात बदल करण्यात आले. आता गुन्हेगाराचे वय १६ ते १८ वर्षांच्या दरम्यान असेल तर त्यालाही कठोर शिक्षा होऊ शकते. २०१६ नंतर एखाद्या व्यक्तीने एखाद्या महिलेचा पाठलाग करणे देखील कायदेशीर गुन्हा मानला जाऊ लागला. घटनात्मक दृष्टिकोनातून या कायद्याचा फायदा महिला संरक्षणासाठी झाला आहे.

**११) मातृत्व लाभ कायदा २०१७ : (Maternity Benefit Amendment Act, 2017)**

मातृत्व लाभ कायद्याने अनिवार्य केलेल्या महिलांच्या रोजगार आणि मातृत्व लाभांचे नियमन करण्यासाठी हा कायदा तयार करण्यात आला आहे. या कायद्यानुसार प्रत्येक काम करणाऱ्या महिलेला सहा महिन्यांची प्रसूती रजा मिळते. या काळात महिलांना पूर्ण पगार मिळण्याचा अधिकार आहे.

**आपली प्रगती तपासा :**

१.महिला संरक्षण संदर्भातील माहिती थोडक्यात लिहा.

## १२.३ घटनात्मक दृष्टिकोनातून कामगार संरक्षण

भारतीय कामगारांच्या सुरक्षिततेसाठी घटनात्मक दृष्टिकोन नजरेसमोर ठेवून कामगार कायदे करण्यात आले आहेत. हे कायदे कामगारांच्या हक्कांचे संरक्षण करण्यासाठी आणि

रोजगाराशी संबंधित बाबींमध्ये मालकांना मार्गदर्शन करण्यासाठी निर्माण करण्यात आले आहेत. हे कायदे म्हणजे कायदेशीर तरतुदी आणि नियमांचा संग्रह आहे. हे कायदे कामगारांना अधिकार भारतीय संविधानातून अधिकार मिळवून देतात. हे कायदे वेतन, कामाचे तास, कामाची परिस्थिती, आरोग्य आणि सुरक्षितता, मानके, सामाजिक सुरक्षा आणि वाद निराकरण अशा विविध क्षेत्रांशी संबंधित आहेत. वेतन संहिता, अप्रेंटिस कायदा, कंत्राटी कामगार कायदा आणि बाल आणि किशोरवयीन कामगार कायदा यासारखे प्रमुख कायदे हे सुनिश्चित करतात. या कायद्याने निष्पक्ष रोजगार पद्धतींचे पालन केले जाते आणि कामगारांच्या मूलभूत हक्कांचे संरक्षण केले जाते.

**१) कामगार नुकसान भरपाई कायदा १९२३ :**

एखादा कामगार कामावर असताना जर त्याला अपघात झाला,कोणत्याही प्रकारची शारीरिक बाधा झाली किंवा त्याचा मृत्यू झाला तर त्यास मोबदला व मदत मिळण्याच्या उद्देशाने सरकारने १९२३ मध्ये कामगार नुकसान भरपाई कायदा केला. या कायद्याने जर कामगारस अपघात झाला तर त्यास मालकाकडून अपघात नुकसान म्हणून लागणारा खर्च मिळतो. जर कामगाराचा मृत्यू झाला तर त्यांच्या नातेवाईकांना अर्थिक मोबदला मिळतो.

**२) कामगार संघटना विषयक कायदा १९२६ :**

कामगार संघटनांना मान्यता देण्यासाठी शासनाने कामगार संघटना विषयक कायदा १९२६ मध्ये पास केला. या कायद्यान्वये कामगारांचे रजिस्ट्रेशन, कामगार संघटनांचा उद्देश, कामगार संघटनेचे स्वरूप, कामगार संघटनांची कार्यप्रणाली आणि कामगारांचा न्याय हक्क लढा याबाबतच्या गोष्टी या कायद्याने स्पष्ट केल्या या कायद्यामुळे कामगारांमध्ये एकसंघता निर्माण झाली व त्यांना आपल्या लढासाठी एक हक्काचे व्यासपीठ मिळाले. याचा फायदा कामगार संघटनांना व कामगारांना होऊ लागला. परिणामी घटनात्मक दृष्टिकोनातून हा अधिकार सुद्धा कामगारांच्या दृष्टिकोनातून फायद्याचा ठरला.

**३) वेतन विषयक कायदा १९३६ :**

कामगारांना वेळेवर सुनिश्चित व योग्य वेतन मिळावे यासाठी रॉयल श्रम आयोगाने सरकारला विनंती केली या विनंतीला अनुसरूनच सरकारने १९३६ सरकारने वेतन निश्चिती कायदा लागू केला. कायद्यामुळे मालकांना कामगारांना वेळेवर वेतन देणे बंधनकारक ठरले.तसेच योग्य वेतन देणे सुद्धा बंधनकारक ठरले. याचा फायदा कामगारांना झाला व कामगारांना वेतनाबाबतची कायदेशीर सुरक्षितता प्राप्त झाली.

**४) औद्योगिक कलह कायदा १९४७ :**

औद्योगिक संघामध्ये संप, ताळेबंदी, मोर्चे व संघर्ष अशा प्रकारची परिस्थिती निर्माण झाल्यास ती परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी १९४७ मध्ये शासनाने औद्योगिक कलह कायदा पास केला. या कायद्यामुळे मालक व कामगार यांच्यातील सबंध सुधारण्यासाठी मदत होऊ लागली. या यंत्रणेत तडजोड अधिकारी, तडजोड मंडळ, चौकशी न्यायालये, औद्योगिक न्यायालये, राष्ट्रीय औद्योगिक न्यायालये यांचा समावेश करण्यात आला. या सर्व यंत्रणेमुळे कामगारांना त्यांचे न्याय हक्क मिळविण्याच्या दृष्टीने फायदा झाला.

### ५) कारखाना विषयक कायदा १९४८ :

भारतात पहिला कारखाना विषयक कायदा १८८१ मध्ये करण्यात आला होता. या कायद्यात वेळोवेळी सुधारणा करण्यात आल्या. नंतर १९४८ मध्ये या कायद्यात बदल करण्यात आले. या कायद्यान्वये

- कोणत्याही कामगाराला आठवड्याला ४८ तासा पेक्षा जास्त काम देण्यास मनाई करण्यात आली.
- कारखाना मालकांनी कोणत्याही कामगाराला दिवसाला ९ तसा पेक्षा जास्त काम देऊ नये अशी मनाई केली.
- कारखाना मालकांना १४ वर्षा खालील मुलांना कारखान्यांमध्ये काम देऊ नये असे सांगण्यात आले.
- स्त्रियांना संध्याकाळी सात ते सकाळी सहा या वेळेत कारखान्यात काम देऊ नये.
- कामगारांच्या आरोग्य व सुरक्षिततेची जबाबदारी कारखाना मालकांनी घ्यावी.
- ज्या ठिकाणी २५० संख्येच्या वर कामगार आहेत त्या ठिकाणी कारखाना मालकाने उपहार गृहाची व्यवस्था करावी.
- ज्या कारखान्यात ३० पेक्षा जास्त स्त्री कामगार आहेत त्या कारखान्यात स्त्रियांच्या बालकांसाठी शिशुगृहाची व्यवस्था करावी.
- कारखाना मालकांनी कामगारांच्या पगारी रजा व सुट्टी देण्या बाबतच्या नियमांचे काटेकोरपणे पालन करावे.

हा कायदा कामगारांच्या हिताच्या दृष्टीने अत्यंत उपयुक्त ठरला.

### ६) किमान वेतन कायदा १९४८ :

१९४८ मध्ये शासनाने कामगारांसाठी किमान वेतन देण्याचा कायदा पास केला या कायद्यान्वये कामगारांना पैशाच्या स्वरूपात वेतन देण्याचे निश्चित करण्यात आले. यासाठी केंद्र व राज्य शासनाने एक सल्लागार मंडळाची नियुक्ती केली व या मंडळाला वेतन निश्चितीचे अधिकार देण्यात आले. हा कायदा सर्वसमावेशक दृष्टिकोनातून कामगाराच्या हिताचा ठरला. त्याचा फायदा असंख्य कामगारांना झाला.

### ७) कामगार राज्य विमा कायदा १९४८ :

१९४८ मध्ये कामगार राज्य विमा कायदा पास करण्यात आला. या कायद्यामुळे कामगारांना सर्व प्रकारच्या वैद्यकीय सुविधा मिळण्यास मदत झाली. विमाधारक कामगाराला तसेच त्यांच्या कुटुंबियांना या कायद्यान्वये मोफत आरोग्य विषयक उपचार मिळू लागले. त्याचबरोबर एखाद्या कामगाराचा अपघात झाला तर त्या कामगाराला या कायद्यामुळे वैद्यकीय व आर्थिक मदत होण्यास मदत झाली.तसेच या कायद्यान्वये एखाद्या कामगाराचा जर अपघाती मृत्यू झाला तर त्या कामगाराच्या कुटुंबीयांना त्याचा आर्थिक

फायदा होण्यास मदत झाली. परिणामी आरोग्य आणि नुकसान भरपाई या दोन्ही गोष्टींच्या दृष्टिकोनातून कामगारांना या कायद्यान्वये फायदा होण्यास मदत झाली.

**८) खाणविषयक कायदा १९५२ :**

१९५२ च्या खाणविषयक कायद्यान्वये कामगारांच्या कामाच्या तासाचे नियमन, आठवड्याच्या कामाचे तासाचे नियमन, दिवसाच्या कामाच्या तासाचे नियमन, तसेच बालकामगार प्रतिबंध नियमन या गोष्टी निश्चित करण्यात आल्या. त्याचबरोबर या कायद्यान्वये कामगारांसाठीच्या सेवा सुविधांच्या बाबतीत सुद्धा नियम करण्यात आले.यामध्ये उपहारगृह, प्रथमोपचार स्वच्छतागृह, पिण्याची पाण्याची व्यवस्था आदीबाबत सुद्धा मार्गदर्शक सूचना करण्यात आल्या. परिणामी या कायद्यान्वये स्वतः कामगारांना सुरक्षितता प्राप्त होण्यास मदत झाली.

**९) भविष्य निर्वाह निधी कायदा १९५२ :**

बहुसंख्या कामगारांचे आर्थिक जीवन हे अत्यंत बिकट परिस्थितीचे असते आर्थिक परिस्थिती कमजोर असते. म्हणूनच कामगारांच्या हिताच्या दृष्टिकोनातून शासनाने भविष्य निर्वाह निधी कायदा पास केला. आज कामगारांसाठी

- भविष्य निर्वाह कायदा निधी १९५२.
- कामगार निवृत्ती योजना १९५५.
- कामगार डिपॉझिट लिंक्ड इन्शुरन्स १९७६सुरू असून कामगारांच्या भविष्याच्या दृष्टीने उपयुक्त ठरत आहेत.

**१०) भारतीय व्यापारी जहाज योजना १९५८ :**

भारतीय व्यापारी जहाज योजना १९५८ अन्वये प्रत्येक जहाज मालकाने प्रवास, प्रवास कालावधी, ठिकाण व वेतन या बाबत जहाज कामगारांशी करार करणे आवश्यक आहे. तसेच प्रत्येक जहाज कामगाराकडे जहाज परवाना असणे आवश्यक आहे. या कायद्यान्वये किशोरवयीन मुलांना विशिष्ट प्रकारची कामे करण्यास प्रतिबंध करण्यात आला आहे. तसेच त्यांना शारीरिक क्षमतेचे प्रमाणपत्र सादर केल्या शिवाय कामावर घेण्यास मनाई करण्यात आली आहे. जहाज मालकाने कामगारांना पिण्याचे पाणी व औषधे पुरविणे आवश्क आहे असे सांगण्यात आले आहे.तसेच या कायद्यान्वये सरकारला जहाज कल्याण अधिकारी नेमण्यास सांगितले आहे. परिणामी हा कायदा जहाज कामगारांच्या दृष्टीने हिताचा ठरला आहे.

**११) मोटार वाहतूक कामगार कायदा १९६१ :**

ज्या ठिकाणी ५ किंवा त्याहीपेक्षा जास्त कामगार काम करतात त्या मोटार वाहतूक व्यवस्थेसाठी हा कायदा लागू करण्यात आला आहे. या कायद्यान्वये आठवड्याला ४८ तासा पेक्षा जास्त तास काम कामगारांना देता येणार नाही असे नमूद केले आहे. तसेच कामगारांसाठी उपहारगृह व विश्रांतीगृह देणे बंधनकारक केले आहे. तसेच पगारी रजा व सुट्ट्या बाबत तत्वे निर्देशीत केली आहेत. व्यतिरिक्त मालकानी कामगारांना रेनकोट, कपडे

व प्रथमोपचाराच्या सुविधा पुरविण्यास सांगितले आहे. परिणामी याचा फायदा मोटार कामगारांना होण्यास मदत झाली आहे.

### १२) प्रसूती लाभ कायदा १९६१ :

स्त्रिया जेव्हा एखाद्या ठिकाणी काम करतात तेव्हा त्यांना प्रसूती काळात फायदा व्हावा या दृष्टीने १९६१ मध्ये प्रसूती लाभ कायदा पास करण्यात आला. या कायद्यान्वये अशा स्त्रियांना प्रसूती पूर्व व प्रसूती नंतर लागणाऱ्या विश्रांतीसाठी रजेची तरतूद करण्यात आली आहे. त्याच बरोबर त्यांना या कालावधीतील वेतन देण्याची तरतूद करण्यात आली आहे. तसेच या कालावधीत त्यांना कामावरून काढता येणार नाही असे सांगण्यात आले आहे. या कायद्याचा फायदा अशा स्त्रियांना होण्यास मदत झाली आहे.

### १२) बोनस वेतन कायदा १९६५ :

केंद्रशासनाने १९६५ मध्ये कामगारांसाठी बोनस वेतन कायदा पास केला. या कायद्यान्वये मालकांना कामगारांच्या वार्षिक पगाराच्या ८.३३ % बोनस देण्याचे सूचित करण्यात आले. हा अतिरिक्त मोबदला कामगारांना उपलब्ध झाल्याने कामगारांना याचा आर्थिक फायदा होण्यास मदत झाली.

### १३) कंत्राटी मजूर कायदा १९७० :

ठेकेदार किंवा कंत्राटदार यांच्या पिळवणुकीपासून कंत्राटी मजूराना संरक्षण मिळावे या दृष्टीने केंद्रशासनाने १९७० मध्ये कंत्राटी मजूर कायदा पास केला. या कायद्यान्वये कामगारांना काम संपल्या नंतर कामाच्या वेळेत व नियमित वेतन देणे, हजेरी पत्रक ठेवणे, कामाचे रजिस्टर ठेवणे अशी बंधने टाकली. त्याच बरोबर कंत्राटी मजूर कायद्याची अंमलबजावणी करताना येणाऱ्या प्रश्नाचे निर्मूलन करण्यासाठी केंद्र व राज्य सरकाराना राज्य कंत्राटी मजूर बोर्डाचा सल्ला घेण्यास सांगितले. या कायद्याचा फायदा कंत्राटी मजुरांना होण्यास मदत झाली.

### १४) वेठबिगार पद्धत निर्मूलन कायदा १९७६ :

१९७६ मध्ये वेठबिगार पद्धत निर्मूलन कायदा पास करण्यात आला. या कायद्यान्वये वेठबिगारांची कायम सुटका करण्यात आली. तसेच त्यांची कर्जे माफ करण्यात आली. तसेच एखाद्या व्यक्तीने एखाद्या व्यक्तीला वेठबिगारी करण्यास भाग पाडले तर त्या व्यक्तीस ३ वर्षाचा तुरुंगवास व रुपये २००० दंड भरावा लागेल असे स्पष्ट केले. याचा फायदा वेठबिगाराना झाला.

### १५) समान वेतन कायदा १९७६ :

१९७६ समान वेतन कायद्याने एखाद्या कामाचा मोबदला देत असताना स्त्री - पुरुष असा भेदभाव न मानता समान कामासाठी समान मोबदला देण्याचे निश्चित केले. या कायद्यामुळे कामाच्या ठिकाणी स्त्री - पुरुष हा भेदभाव होत होता तो नष्ट होण्यास मदत झाली.

**१६) गोदी कामगार कायदा १९७६ :**

१९७६ गोदी कामगार कायद्यात गोदी कामगाराची सुरक्षितता, कल्याण व आरोग्याबाबतची मार्गदर्शक तत्वे आहेत. या कायद्याच्या अंमलबजावणीची जबाबदारी भारत सरकारच्या श्रम व रोजगार मंत्रालयाकडे देण्यात आली आहे. याचा फायदा गोदी कामगारांना होण्यास मदत झाली.

**१७) बाल कामगार कायदा १९८६ :**

१९८६ च्या बाल कामगार कायद्याने १४ वर्षाखालील मुलांना व्यापारी संस्था, शेती, हॉटेल, दुकाने, चित्रपटगृह, नाट्यगृह या ठिकाणी कामास ठेवण्यास बंदी घालण्यात आली आहे. जर या सर्वांचे या घटकांनी उलंघन केले तर अशा ठिकाणच्या मालकांना ३ महिने ते १ वर्षाची शिक्षा होऊ शकते. त्यामुळे बाल कामगारांचे संरक्षण होण्यास मदत झाली आहे.

कामगारांच्या संरक्षणासाठी केंद्र व राज्यशासनाने वेगवेगळे कायदे केले. या कायद्यांमध्ये कामगार नुकसान भरपाई कायदा , कामगार संघटना विषयक कायदा, वेतन विषयक कायदा, औद्योगिक कलह कायदा, कारखाना विषयक कायदा, किमान वेतन कायदा,कामगार राज्य विमा कायदा, खाणविषयक कायदा, भविष्य निर्वाह विषय कायदा, भारतीय व्यापारी जहाज विषयक कायदा, मोटार वाहतूक कामगार कायदा प्रसूती लाभ कायदा, बोनस वेतन कायदा, कंत्राटी मजूर कायदा, वेठबिगारी पद्धत निर्मूलन कायदा, समान वेतन कायदा, गोदी कामगार कायदा व बाल कामगार कायदा या सर्वच कायद्यांचा फायदा कामगारांना होऊन कामगारांचे संरक्षण होण्यास मदत झाली.

**आपली प्रगती तपासा:**

१. कामगार संरक्षणावर अचूक माहिती लिहा.

## १२.४ घटनात्मक दृष्टिकोनातून अल्पसंख्याक संरक्षण :

अल्पसंख्याक म्हणजे एका समाजातील असा गट जो संख्येने बहुसंख्येपेक्षा कमी असतो. या गटाला संस्कृती, धर्म, भाषा किंवा इतर वैशिष्ट्यांवर आधारित वेगळे ओळखले जाते. अल्पसंख्याक समुदाय म्हणजे, एका विशिष्ट समाजात, त्यांच्यापेक्षा जास्त संख्येने असलेल्या समूहांपेक्षा वेगळ्या संस्कृती, भाषा किंवा धर्माचे पालन करणारे लोक.

"अल्पसंख्याक म्हणजे एका विशिष्ट समाजात किंवा गटात, बहुसंख्यांपेक्षा कमी लोकसंख्या असलेला समूह होय."

हा समूह भाषा, धर्म, जात, वंश किंवा इतर सांस्कृतिक वैशिष्ट्यांवर आधारित असतो.

**१) राष्ट्रीय अल्पसंख्यांक आयोग:**

केंद्र सरकारने राष्ट्रीय अल्पसंख्याक आयोग कायदा, १९९२ अंतर्गत राष्ट्रीय अल्पसंख्याक आयोग (NCM) स्थापन केला. सुरुवातीला केंद्र सरकारने मुस्लिम, ख्रिश्चन, शीख, बौद्ध आणि झोरोस्ट्रियन (पारशी) या पाच धार्मिक समुदायांना अल्पसंख्याक समुदाय

म्हणून अधिसूचित केले. पुढे २७ जानेवारी २०१४ च्या अधिसूचनेद्वारे, जैनांना देखील दुसरा अल्पसंख्याक समुदाय म्हणून अधिसूचित केले.

केंद्र सरकारने नवी दिल्लीत राष्ट्रीय अल्पसंख्याक आयोगाची स्थापना केली आणि राज्य सरकारने त्यांच्या संबंधित राज्यांच्या राजधानींमध्ये राज्य अल्पसंख्याक आयोगांची स्थापना केली. या संघटनांची स्थापना भारतीय संविधानात आणि संसद आणि राज्य विधिमंडळांनी लागू केलेल्या कायद्यांमध्ये तरतूद केल्यानुसार अल्पसंख्याकांच्या हितांचे रक्षण आणि संरक्षण करण्यासाठी केली जाते.

अल्पसंख्याक समुदायातील पीडित व्यक्ती त्यांच्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी संबंधित राज्य अल्पसंख्याक आयोगांकडे संपर्क साधू शकतात. शिवाय, त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या सर्व अधिकृत उपाययोजनांचा वापर करून ते राष्ट्रीय अल्पसंख्याक आयोगाकडे त्यांचे निवेदन पाठवू शकतात.

**अ) अल्पसंख्याकांसाठी मूलभूत हक्क:**

**१) कायद्यापुढे समानता :**

अनुच्छेद १४ अन्वये प्रत्येक व्यक्तीस कायद्यापुढे समानता व कायद्याचे समान संरक्षण मिळण्याचा हक्क आहे. परिणामी अनुच्छेद १४ अन्वये अल्पसंख्यांकांना कोणत्याही प्रकारच्या भेदभावापासून संरक्षण मिळण्यास मदत झाली आहे.

**२) भेदभावास मनाई :**

अनुच्छेद १५ अन्वये अल्पसंख्यांकांना धर्म, वंश, जात, लिंग किंवा जन्मस्थान याच्या आधारावर कोणताही भेदभाव करता येणार नाही याचा फायदा झाला. आहे.या बाबींमुळे राज्याला सामाजिक व शैक्षणिक दृष्ट्या मागासलेल्या वर्गांसाठी (अल्पसंख्यांकांसाठी) विशेष तरतुदी करता येतात.

**३) सरकारी नोकरीत संधींची समानता :**

अनुच्छेद १६ अन्वये सर्व नागरिकांना सरकारी नोकऱ्यांमध्ये समान संधी मिळाल्याने धर्म, वंश, जात, लिंग, वंशपरंपरा, जन्मस्थान किंवा निवास याच्या आधारावर भेदभाव करता येणार नाही असे स्पष्ट केल्याने सरकारी नोकऱ्यात समानतेच्या संधीचा फायदा अल्पसंख्यांकांना झाला आहे.

**ब) सांस्कृतिक व शैक्षणिक हक्क :**

अल्पसंख्यांकांच्या हितांचे संरक्षण: अनुच्छेद २९ (१) अन्वये अल्पंख्यकाना विशिष्ट भाषा, लिपी किंवा संस्कृती जपण्याचा हक्क मिळाला आहे. ही बाब धार्मिक व भाषिक अल्पसंख्यांकांसाठी लागू आहे.

**२) शिक्षणात भेदभावास मनाई :**

अनुच्छेद २९(२) अन्वये धर्म, वंश, जात, भाषा इत्यादींवरून कोणत्याही शासकीय/शासकीय अनुदानित शिक्षण संस्थेत; अल्पसंख्याकांचा प्रवेश नाकारता येणार नाही असे स्पष्ट केले आहे.

**३) शैक्षणिक संस्था स्थापनेचा व व्यवस्थापनाचा हक्क :**

अनुच्छेद ३०(१) अन्वये अल्पसंख्याकाना त्यांच्या शैक्षणिक धार्मिक व भाषिक पसंतीच्या शैक्षणिक संस्था स्थापण्याचा व चालवण्याचा हक्क मिळाला आहे.

**४) अनुदान देताना भेदभावास मनाई :**

अनुच्छेद ३० (२) अनअल्पसंख्यांक चालवित असलेल्या संस्थांना अनुदान देताना कोणतीही राज्य भेदभाव करू शकत नाही असे स्पष्ट केले आहे.

**४) धार्मिक स्वातंत्र्याचे हक्क:**

**१) धर्माचे स्वातंत्र्य :**

अनुच्छेद २५ अन्वये प्रत्येक व्यक्तीस धर्म मानण्याचा ,पाळण्याचा व धर्माचा प्रचार करण्याचा हक्क अल्पसंख्यांकांना मिळाला आहे.

**२) धार्मिक व्यवहारांचे व्यवस्थापन:**

अनुच्छेद २६ अन्वये प्रत्येक धार्मिक संप्रदायाला धार्मिक व धर्मार्थ संस्थांची स्थापना व देखभाल करण्याचा, त्यांच्या धार्मिक व्यवहारांचे व्यवस्थापन करण्याचा हक्क मिळाला आहे त्याचा फायदा अल्पसंख्याकांना मिळाला आहे.

**३) धर्मासाठी कर भरावा लागणार नाही:**

अनुच्छेद २७ मध्ये कोणत्याही व्यक्तीला धार्मिक प्रचार किंवा धर्म संस्थांसाठी कर भरण्यास भाग पाडता येणार नाही असे स्पष्ट केले आहे त्याचा फायदा अल्पसंख्यांकांना मिळाला आहे.

**४) शासकीय शाळांमध्ये धार्मिक शिक्षण:**

अनुच्छेद २८ मध्ये पूर्णता राज्यांच्या निधीतून चालवल्या जाणाऱ्या शाळांमध्ये धार्मिक शिक्षण देता येणार नाही असे स्पष्ट केले आहे.

**ड) भाषिक अल्पसंख्याकांसाठी विशेष तरतुदी:**

**१) मातृभाषेत शिक्षण:**

अनुच्छेद ३५० अ अन्वये भाषिक अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी प्राथमिक स्तरावर मातृभाषेत शिक्षणाची योग्य व्यवस्था राज्य सरकारने करावी असे स्पष्ट केले आहे. त्यामुळे अल्पसंख्याकांना त्यांच्या भाषेत शिक्षण घेण्याची संधी उपलब्ध झाली आहे.

**२) भाषिक अल्पसंख्याकांसाठी विशेष अधिकारी:**

अनुच्छेद ३५० ब अन्वये राष्ट्रपती भाषिक अल्पसंख्याकांसाठी विशेष अधिकाऱ्यांची नियुक्ती करतो. हा अधिकारी भाषिक अल्पसंख्याकांसाठी असलेल्या संरक्षणाची पाहणी करून राष्ट्रपतीस अहवाल सादर करतो. या गोष्टीचा फायदा अल्पसंख्याकांना झाला आहे.

**इ ) राज्याच्या धोरणातील तरतुदी :**

**शैक्षणिक व आर्थिक हितसंबंधांचे संवर्धन :**

अनुच्छेद ४६ अन्वये राज्याने आर्थिक व शैक्षणिक दृष्ट्या दुर्बल घटकांचा विशेषतः अनुसूचित जाती व जमातीं तसेच अल्पसंख्यांकांचे हितसंबंध जपावे असे स्पष्ट केले आहे त्याचा फायद अल्पसंख्यांकांना झाला आहे.

भारतीय संविधानात अल्पसंख्यांकांच्या सांस्कृतिक शैक्षणिक धार्मिक आणि कायदेशीर हक्कांचे संरक्षण कसे करावे याबाबतची माहिती आहे. हे संरक्षण त्यांच्या ओळखीचे जतन, समान सहभाग आणि राष्ट्रीय विकासात सहभागी होण्याचा हक्क सुनिश्चित करते. हे भारताच्या बहूसांस्कृतिक व समावेशक मूल्यांचे प्रतिबिंब आहे.

**आपली प्रगती तपासा :**

१) अल्पसंख्यांक संरक्षण विषयक घटकांची माहिती लिहा.

## १२.५ सारांश

घटनात्मक दृष्टिकोनातून राष्ट्रीय महिला आयोग, घटस्फोट कायदा, हिंदूउत्तराधिकारी कायदा, समान वेतन कायदा, हुंडा प्रतिबंध कायदा, समान मोबदला कायदा, गर्भलिंग प्रतिबंध कायदा, पोक्सो कायदा, लैंगिक छळ प्रतिबंध कायदा, महिला सुरक्षा कायदा, मातृत्व लाभ कायदा या कायद्यान्वये महिलांना संरक्षण मिळाले तर कामगारांना कामगार नुकसान भरपाई कायदा, कामगार संघटन कायदा, वेतन विषयक कायदा, औद्योगिक कलह कायदा, कारखाना विषयक कायदा, किमान वेतन कायदा, कामगार राज्य विमा कायदा, खाणविषयक कायदा,भविष्य निर्वाह कायदा, भारतीय व्यापारी जहाज कायदा, मोटार वाहतूक कायदा, प्रसुती लाभ कायदा, बोनस वेतन कायदा, कंत्राटी मजूर कायदा, वेठबिगारी पद्धती निर्मूलन कायदा, समान वेतन कायदा, गोदी कामगार कायदा बाल कामगार कायदा या कायद्याने संरक्षण मिळाले तर अल्पसंख्यांकांना मूलभूत हक्क, सांस्कृतिक व शैक्षणिक हक्क, धार्मिक स्वातंत्र्य हक्क, भाषिक अल्पसंख्यांक विशेष तरतुदी व राज्यांच्या ध्येय धोरणातील तरतुदी यामुळे संरक्षण मिळाले.

## १२.६ प्रश्न

१) महिला संरक्षण विषयक कायद्याचा आढावा घ्या .

२) कामगार संरक्षण विषयक कायद्यावर सविस्तर माहिती लिहा.

३) कामगार संरक्षण विषयक घटक थोडक्यात नमूद करा.

४) अल्पसंख्यांकांच्या संरक्षणावर भाष्य करा.

## १२.७ संदर्भ

१. डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि भारतीय राज्यघटना- डॉक्टर रावसाहेब कसबे, सुगावा प्रकाशन, पुणे.

२. डॉ. भीमराव आंबेडकर- चेतन मेहता, एपीएच प्रकाशन, नवी दिल्ली

३. भारतीय संविधान व डॉ. बाबासाहेब आंबेडकर, चपळगावकर नरेंद्र, श्रीविद्या प्रकाशन.

४. डॉ. बाबासाहेब आंबेडकर – कीर धनंजय, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई.

५. सामाजिक  न्याय आणि आरक्षण- इंगळे कृष्णा.

✞✞✞✞